१०-३०

म. ग्रं. सं. ठाणे
विषय टीका
सं. क्र. २५

REFBK-0004317

# जगाच्या [illegible] वातावरणात



लेखक :
डॉ. [illegible] मोदर वासुदेव पाडे
जी. पी. ए. सी. एम. बी. इ[illegible]

स्थलांतर
म.ग्रं.सं.ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०८९
१८८१
ठाणे,

मराठी ग्रंथ संग्रहालय
१८८१३९
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. ४३९८

# जगाच्या वातावरणांत

लेखक

डॉ. दामोदर वासुदेव सांडू,

इन्डियन थिरॅप्युटिक्स, रोगविज्ञान पुस्तकाचे कर्ते

१ ली आवृत्ति

प्रकाशक

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स.

आर्यौषधी कारखाना चेंबूर, मुंबई.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

REFBK-0004317

१९३०.

## —×❋ समर्पण ❋×—

ज्यांच्या प्रेमाच्या सोज्वळ छत्राखालीं व बालबोध शिक्षणाखालीं
आज जगाच्या वातावरणांत चार शब्द मांडण्याचे मला
सामर्थ्य आलें त्या माझ्या परमपूज्य व वंदनीय
मातोश्री, वडील, व चुलते
यांच्या चरणीं
ही
माझी अल्प कृति अत्यंत प्रेमादरपूर्वक
अर्पण केली आहे.

नम्र बालक,

दामोदर वासुदेव सांडू.

# वाचकांशी हितगुज

**जगाच्या वातावरणांत** ही लेखमाला प्रसिद्ध करावी किंवा नाहीं, याविषयीं आरंभीं शंका वाटली म्हणून १-२ प्रकरणें लिहून माझे प्रेमळ व हितचिंतक मित्र श्री. **अप्पाराव कुळकर्णी** ( नवाकाळ ) व सचित्र करमणुकीचे संपादक श्री. **कृ. ना. अस्नोडकर** या उभयतांना दाखविली व त्या उभयतांच्या प्रोत्साहना-मुळेंच ती करमणूकींतून शेवटास गेली. स्वतःची प्रॅक्टिस संभाळून, संपादकांचा दर आठवड्यांचा प्रेमाचा इशारा संभाळणें किती कठिण असतें, तें अनुभवावाचून कळणें शक्य नाहीं ही लेखमाला वाचकांना इतकी लोकप्रिय होईल याची मला कल्पनाहि नव्हती. ही लेखमाला चालू असतां माझ्या प्रेमळ वाचकांनीं जी मला अभिनंदनीय पत्रें पाठविलीं व स्वतंत्र पुस्तक रुपानें प्रसिद्ध करण्यांस मला प्रेमांची विनंती केली, त्यामुळेंच ती आज स्वतंत्र पुस्तकरुपानें वाचकांच्या हातीं पडत आहे. श्रीयुत **अप्पाराव** व श्री. **अस्नोडकर** यांनीं हें पुस्तक बाहेर पडण्याच्या कामीं जी कळ-कळीची मेहनत घेतली आहे. व वेळोवेळीं ज्या सूचना केल्या आहेत त्याबद्दल मी उभयतांचा ऋणी आहे माझे प्रेमळ आईबाप व चुलते यांच्या बालबोध व प्रेमळ शिक्षणांचाच आजचें हें पुस्तक म्हणजे सुफल होय. **एकत्र कुटुंबांत राहून कसें वागावें, एकीचें महत्व किती आहे.** वगैरे जे उपदेशाचें बाळकडू मला बालपणांपासून आज मितीपर्यंत पाजलें तेंच मी निराळ्या प्रकारानें तरुण पिढीपुढें मांडलें आहे. माझ्या वडिलांच्या व चुलत्यांच्या कृपेचें छत्र त्या दयाळू, अनंत ब्रम्हांडनायक रघुनाथानें त्यांना उदंड आयुष्य देऊन टिकवावें एवढीच त्या समर्थ प्रभूजवळ प्रार्थना आहे. माझे प्रेमळ चुलत बंधु श्री. **बाबुराव सांडू** तसेंच रा. **सरपोतदार** रा. **जावकर**, रा. **पाटकर** वैद्य, यांनीं मला वेळोवेळीं सूचना केल्या त्याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहे.

श्री. **आवडे** यांचा न्युमनोहर प्रींटींग प्रेस, अगदी लहान असतां त्यांनीं छपाईचें काम सुबक व व्यवस्थित करून दिल्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें उचित आहे.

श्री. अस्नोडकरांच्या प्रेमळ आग्रहामुळें **स्त्रीरोग चिकित्सा** ही नवीन लेखमाला करमणूकींत सुरू केली आहे ती अशीच माझ्या हातून पार पडून माझ्या प्रेमळ वाचकांच्या प्रेमास पात्र होवो, त्याचप्रमाणें हें पुस्तक लिहीतांना ज्या पाश्चात्य व पौर्वात्य ग्रंथाचा उपयोग झाला त्या ग्रंथकर्त्यांचे आभार मानून व त्या जगन्नियंत्या प्रभूची प्रार्थना करून हें दोन शब्द पुरे करतो.

मुंबई
१५-६-३०

सर्वांचा नम्र,
**दामोदर वासुदेव सांडू.**

म. सं. ग्रं.

# उपोद्घात

या जगांत जन्मलेल्या प्रत्येक प्राण्यास-लहानशा कीटकापासून तों मनुष्य-प्राण्यापर्यंत-मरेपावेतों निरनिराळ्या अवस्थांतून जावें लागतें. हा काल कसा काढतां येईल, हा काल कसा जाईल, याची अगाऊ योजना त्या जगन्नियंत्या प्रभूनें केलेली असते. बाल्यावस्था, तरुणावस्था व वृद्धावस्था अशा कल्पिलेल्या तिन्हीं अवस्था, ज्याच्या त्याच्या वागण्यानुसार व क्रमानुसार प्रत्येकाच्या वांट्यास येत असतात. बाल्यावस्थेंत आपले आईबाप काळजी करणारे असतात, तेव्हां कशा-विषयींच आपल्याला काळजी नसते. शाळेमध्यें आपण जाऊं लागलों, तारुण्यावस्था प्राप्त झाली, शिक्षण संपादन केलें म्हणजे नोकरीधंद्याच्या मार्गाला आपण लागतों. ह्या मार्गाला आपण लागलों म्हणजे आपल्याला मित्र मिळतात, मोठ-मोठ्या लोकांशीं संबंध येतो व अशाप्रकारें या जगामध्यें आपलें पाऊल पुढें पुढें पडत असतें. शाळेमधील अगर कॉलेजमधील शिक्षणक्रम संपला तरी वर्त-मानपत्रें, मासिकें वगैरे मार्गांनीं आपल्याला ज्ञान होऊं लागतें. ज्ञानाचा सागर अगाध आहे. आयुष्य पुरें पडलें तरी हें ज्ञान संपावयाचें नाहीं. अलिकडे निघणाऱ्या माला, मासिकें वगैरे पाहिलीं असतां त्यांतील प्रेमविषयक वर्णनामुळें, तारुण्यांत अगर शिक्षण घेत असलेल्या तरुण मुलांमुलींवर परिणाम होतो. प्रेम-विषयक साप्ताहिकांनीं पत्रकारांची तुंबडी भरते, व त्यांचा खप वाढतो ही गोष्ट जरी खरी आहे; तरी शाळांमध्यें शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या मनावर त्यांचा काय परिणाम होतो व अप्रत्यक्ष रीतीनें भावी पिढीचें नुकसान कसें होतें, याचा विचार कोणी करीत नाहीं. मुंबईसारख्या बकाली शहरांत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत न राहिल्यामुळें, वाटेल त्यानें वाटेल तें लिहावें, व आपण बंधनाच्या पलिकडे गेलों आहोंत म्हणून श्रेष्ठता मानावी, हें मनाचें आकुंचित क्षेत्र समाजावर, भावी पिढीवर कसे परिणाम करीत आहे, याचा विचार वैद्यकीय दृष्ट्या करावयाचा आहे. शृंगारिक प्रेमविषयक वर्णनें, त्याचप्रमाणें जगाच्या वातावरणांतील अलिकडच्या प्रत्येक बाबीचा विचार वगैरे महत्वाचे विषय क्रमशः देण्यांत येऊन एकप्रकारें वैद्यकीय विषयासारखा रुक्ष विषय निराळ्या तऱ्हेनें वाच-कांच्या पुढें मांडण्याचा प्रयत्न केला आहे एकत्र कुटुंब पद्धतींत जो वागलेला

आहे व वागत आहे, त्यांच्यांत व अलिकडच्या कित्येक तरुणांत स्वतंत्रपणें विन्हाड करून रहाणाऱ्या सारखा छचोरपणा आढळणार नाहीं. एकत्र कुटुंबांत रहाणारांना, आपल्या वडील माणसांचा मान कसा राखावा, स्त्री–पुरुषांनीं कसें वागावें, हें शिक्षण आपोआप मिळत असल्यामुळें, तारुण्यांत असणाऱ्या उच्छृंखल वृत्तीला साहजिकच आळा पडतो; परंतु, हल्लीं अशीं कुटुंबें कितीशीं आढळतील ? स्वतंत्रता हेंच ध्येय, नाना प्रकारचे माला–मासिककार आपल्या लेखांतून जोगवीत असल्यामुळें, याला कांहीं तरी आळा पडावा व वाचकांच्या कोंवळ्या मनावर अनिष्ट परिणाम होऊं नयेत या सद्भावनेनें ही लेखमाला लिहिलेली आहे. मनोविकार उद्दीपन वर्णन, त्याचप्रमाणें स्त्रीपुरुष संयोग वगैरे विषय क्रमशः येणार असले तरी त्यांचीं वर्णनें किळसवाणीं व बिभत्स येणार नाहींत, याबद्दल शक्य तेवढी खबरदारी घेतली आहे. शाळेंत जाणाऱ्या मुलांपुढें व तरुण वर्गापुढें इंद्रियविषयक वर्णनें अगर भाषा बोलण्यांत आल्यास त्यांपासून त्यांच्यावर अनिष्ट परिणाम होतो. कित्येक समाजक्रांतिकारक लोक अशा प्रकारचे विषय उघड उघड प्रतिपादित असतात व हें ज्ञान प्रत्येकाला अवश्य पाहिजे असें सांगतात. परंतु हें शिकण्याला लांब जाण्याची जरूरी असली तरी तें देण्याची रीत मात्र निराळी आहे. मनुष्याला भूक लागली म्हणजे हें खा, तें खाऊं नको, अशी विनवणी करण्याची जरूरी लागत नाहीं; परंतु काय खाल्लें असतां शरीर बिघडेल, अजीर्ण होईल, याची माहिती मात्र दिली पाहिजे. त्याचप्रमाणें समाजाची क्रांति करणाऱ्या, समाजसेवकांनीं जगांतील लोकांचें सौख्य वाढविण्यासाठीं म्हणून वाटेल तसे मार्ग सुचविणें, पाश्चात्यांच्या जोडीला आपण बसण्याचा प्रयत्न करणें, अशा प्रकारची विचारसरणी समाजामध्यें अत्यंत घातुक आहे. प्रत्येक मनुष्याला इंद्रियविषयांचें ज्ञान होण्यापूर्वी आपलें शरीर कशाचें बनलेलें आहे, आपली पचनक्रिया कशी चालते, इंद्रियांचीं कार्यें कोणतीं आहेत, त्यांचा कमी जास्त क्षय झाल्यानें शारिरीक परिणाम काय होतात, वगैरे माहिती आरंभीं आवश्यक असल्यामुळें, त्याचा विचार पुढील प्रकरणांत पहिल्या प्रथम केलेला आहे. शारिरीक माहिती एकदां कळली म्हणजे समाजांतील चाली वगैरेची माहिती समजणेंही सोपें जाईल. जगाच्या वातावरणांत प्रवेश करतांना ब्रह्मचर्य, तरुण स्त्रीपुरुषांनीं कसें वागावें, वगैरे इतर विषय क्रमशः येणार असल्यामुळें, त्यांचें विवरण येथें न करतां, ते क्रमशः वाचकांच्या पुढें मांडलें आहे.

---

# जगाच्या वातावरणांत

## प्रकरण १ लें

### शरीराची रचना

आपलें हें शरीर अत्यंत महत्वाचें आहे. सर्व प्राणीमात्रांत मनुष्याची योग्यता अत्यंत श्रेष्ठ मानलेली आहे. या शरिराची जोपासना चांगली केली, निसर्गाच्या नियमानुसार वर्तन केलें, म्हणजे सृष्टिक्रमानुसार सुखानें या जगांत राहतां येतें. निसर्गाचे नियम लाथेनें तुडवणाऱ्यास, एकदां शरीर नादुरुस्त झालें म्हणजे तें पूर्वस्थितीप्रत यावयास बराच काळ लागतो. आपल्याजवळ लाखों रुपये असले तर वाटेल तशी सुंदर इमारत बांधतां येईल, त्या इमारतीवर नानाप्रकारचें कला-कौशल्य रचून ती शृंगारतां येईल, परंतु शरिराची जोपासना बरोबर केली नाहीं, तर त्याची घडी पुन्हा पूर्ववत् बसण्यास कठीण जातें. एखाद्या श्रीमंत इसमाला वाटेल तेवढीं सुखसोयींचीं साधनें असलीं व शरीर चांगलें नसलें तर त्या संपत्तीला तो तुच्छ समजत असतो. पैशाच्या मागें लागणारे लोभी लोक, महत्वाकांक्षी वगैरे आपल्या शरिराकडे लक्ष देत नाहींत, यामुळें त्यांना घांसभर अन्न पोटांत जाणें कठीण जातें. फोर्डसारखा महत्वाकांक्षी, मोटार-कारखानदार यांचा जीवन-क्रम पाहिला म्हणजे त्याची सत्यता कळून येईल. आपल्या धार्मिक गोष्टी, धार्मिक वंशपरंपरागत चाली यांचें सूक्ष्म अवलोकन केलें म्हणजे, त्या शरिराच्या संरक्षणा-करितांच केलेल्या आहेत असें आढळून येईल. 'जुनें तेवढें वाईट' अशी आधुनिक तरुणांची प्रवृत्ति झाली आहे; ती किती चुकीची आहे, याचें वर्णन क्रमशः पुढें येणारच आहे. आपल्या दिनचर्येचें सूक्ष्म अवलोकन करणाऱ्या तरुणाला आपले आईबाप वेळोवेळीं आपल्याला कसे वागा सांगतात, हें अनुभवानें आलें आहे प्रत्येकाला पटत जातें. तात्पर्य काय, या जगांतील सर्व गोष्टी ईश्वरानें आपल्या करतां केलेल्या आहेत व त्यांचा उपयोग घेण्याकरितां शरीर हें चांगलें निकोप व

8390

सुव्यवस्थित ठेवणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. नानाप्रकारच्या शास्त्रज्ञांनीं नाना प्रकारचे शोध लावून सुधारणा केल्या, परंतु ईश्वरानें निर्माण केलेला हा देह पुनः करूं म्हटलें तर तो कोणालाहि करतां येणार नाहीं. आपण बाहेरून जें शरीर पहातों, त्यापेक्षां आंतील इंद्रियें सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिलीं व एकमेकांचीं एकमेकांवर अवलंबून असणारीं कार्यें अवलोकन केलीं म्हणजे ईश्वराच्या अलौकिक सामर्थ्याची जाणीव होते. स्पंज, व आपला जीवाणू ( Protoplasm ) यांची जीवनदशा एक प्रकारची आहे. स्पंजाचा लहानसा अणू पाण्यांत असला म्हणजे हळुहळू तो वाढतो, त्याचें पोषण पाण्यामधून होतें, त्याचप्रमाणें आपल्या शरिराची स्थिति आहे. घर बांधण्याला ज्याप्रमाणें लाकडें लागतात, त्याचप्रमाणें हें शरीर उभें राहण्यास हाडांची जरूरी आहे. हीं हाडें एकंदर २०० आहेत. हीं हाडें स्थानपरत्वें निरनिराळ्या आकारांची असतात व तीं स्नायुंच्या वेष्टनानें, जखडलेलीं असतात. हे स्नायु हात खालींवर करतांना, पाय लांब करतांना, चालतांना, आपल्याला मदत करतात. स्नायु म्हणजे मांसाचें स्थितीव्यापक गोळे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. बाल्यावस्थेंत हीं हाडें—खनिज पदार्थ कमी असल्यामुळें—मऊ असतात व यामुळें वांकडीं होण्याचा जास्त संभव असतो. म्हातारपणांत तीं ठिसूळ ( Brittle ) व ताठ असतात, त्यामुळें मोडण्याचा संभव फार असतो. २० ते २५ वर्षांपर्यंत हाडांची वाढ पुरी होते. या वर्षांपर्यंत हाडें वांकणें, तिरपी होणें, आंखूड होणें, व्यंगयुक्त वगैरे होण्याचा जास्त संभव असतो. चिनमधील बायका सुंदर दिसण्याकरितां लहानपणापासून आपले पाय घट्ट बांधित असतात. या पायांवरच त्यांचा सुंदरपणा अवलंबून असतो. शरीर कणखर व्हावें, छाती चांगली रुंद व्हावी, वगैरे कारणाकरितां तरुण वयांत व्यायाम केल्यास हाडांची मजबुती होण्यास मदत होते.

स्नायु (Muscles). स्नायु म्हणजे मांसाचे गोळेच आहेत. सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिलें म्हणजे हे लहान लहान तंतुचे बनलेले आहेत असें आढळून येतें. स्नायूचा १ इंच तुकडा तयार होण्यास असंख्य सूक्ष्म तंतूंची जरुरी लागते. स्नायुमध्यें संकोचन व प्रसारकशक्ति असते. स्नायूंच्या संकोचन प्रसरण शक्तिमुळेंच इंद्रियें आपलीं कार्यें करण्यास समर्थ असतात. चालणें, बोलणें, हातपाय हालवणें, खाणें, उडी मारणें, चाळणें, धांवणें या गोष्टी स्नायूमुळें होतात. हातांच्या स्नायूमुळें काम करतां येतें, लिहितां येतें, खेळतां येतें, त्याचप्रमाणें वाद्यें वाजवतां येतात.

पुपफुसाच्या स्नायूमुळें श्वासोच्छ्वास करतां येतो, व शरीर ताठ रहाणें हेंही स्नायूवर अवलंबून असतें. पोट व छाती यांमध्यें जो पडदा आहे त्याला उरोदर पटल ( Diaphragm ) म्हणतात, त्याचा उपयोगसुद्धां श्वास करण्याकडे होतो. काम, क्रोध, लोभ वगैरे मनोविकार हे ह्या स्नायूंच्या आकुंचन प्रसरणांमुळें प्रदर्शित होतात. थोडक्यांतच म्हणावयाचें म्हणजे स्नायू सर्वत्र शरिरभर पसरलेले आहेत व त्यांना स्थान परत्वें कार्यानुसार निरनिराळीं नांवें आहेत. स्नायूंचें कार्य बंद पडलें ह्मणजे हालचाल बंद झाली असें समजावें. अर्धांगवायूच्या रोग्यांमध्यें स्नायूंचें कार्य बंद झाल्यामुळें रोग्यांला बोलतां येत नाहीं, चालतां येत नाहीं, व परावलंबीपणा प्राप्त होतो. व्यायाम केला म्हणजे या स्नायूंच्या वाढीला मदत होते; ते कणखर बनतात व त्यामुळें एकप्रकारें शरिराला सुंदरपणा येतो.

स्नायू दोन प्रकारचे आहेत. ज्या स्नायूंवर आपला ताबा चालवितां येतो, त्याला ऐच्छिक स्नायू ( Volunatary muscles ) म्हणतात. हे स्नायू हात, पाय, पोट, पाठ, चेहरा या ठिकाणीं असतात. ह्यांचा तांबडा रंग असतो व ते नेहमीं हाडांच्या एका भागापासून त्याच किंवा दुसऱ्या हाडांस लागलेले असतात. स्नायूंच्या टोंकाचा रंग पांढरा असून ते चिवट, मजबूत, दोरखंडासारखे असतात व ह्या दोरखंडाचा उपयोग हाडें बांधण्याकरितां होतो. ह्यालाच स्नायुबंधन ( Tendon ) ह्मणतात. ह्या बंधनांमुळेंच हाडांना मजबुती येते, व यदाकदाचित हाड मोडलें तरी तें बंधन तुटत नाहीं. ही बंधनें हातापायांचीं बोटें हालविलीं असतां दिसून येतात.

दुसऱ्या प्रकारचे स्नायू असतात त्यांना अनैच्छिक स्नायू (Involuntary muscles ) ह्मणतात. या स्नायूंवर आपला ताबा चालत नाहीं. योगी, लोक योगसामर्थ्यानें ह्यांवर आपला ताबा चालवूं शकतात. आंतडीं, गर्भाशय रक्तवाहिन्या, पक्वाशय ह्या ठिकाणीं हे स्नायू आढळतात ह्यांचा रंग तांबडा नसून हे जोरदारही नसतात व ह्यांना बंधनाची जरुरी नसते. एकंदर स्नायू ५०० वर आहेत. स्नायूंच्या नांवावरून ते कोणचे स्नायू आहेत हें ओळखतां येतें.

ज्यांचा वर उल्लेख करण्यांत आला आहे त्या उरोदर पटलाचा आकार घुमटासारखा असतो व तो कण्याला ( Spine ) पुढें व बाजूस फांसळ्यांना लागलेला असतो. या पडद्या वरील बाजूस फुप्फुसें (Lungs) व हृदय

(Heart) व खालच्या बाजूस यकृत (liver) अन्नाशय, (Stomach) प्लीहा, ( Spleen ) व आंतडीं ( Intestines ) आहेत. ह्या पडद्यामुळें श्वास घेण्यास, मलमूत्र विसर्जन व वांति ह्या क्रिया होण्यास मदत होते. ह्या पडद्याला तीन छिद्रें आहेत, एका छिद्रांतून एक रक्तवाहिनी पोटांत उतरते; दुसऱ्यांतून अन्ननलिका, तिसऱ्यांतून अशुद्ध रक्तवाहिनी पोटांतून छातींत वर चढते.

---

# प्रकरण २ रें

—:o:—

## हृदय व रक्तवाहिन्या

## ( Heart and Blood Vessels )

हृदय हें दोन्हीं फुफ्फुसांमध्यें, डाव्या बाजूला, तिसऱ्या फांसळीपासून सहाव्या फांसळीपर्यंत असतें. त्याची लांबी ५ इंच असते. हृदयाची उजवी व डावी बाजू असे भेद केलेले आहेत. प्रत्येक बाजूचे दोन भाग असतात. वरच्या भागाला कर्णिका (Auricle) व खालच्या भागाला जवनिका (Ventricle) म्हणतात. हृदय हें एका पिशवीमध्यें वेष्टिलेलें असतें. त्याला वायुपटल म्हणतात, व खालच्या बाजूला एक पडदा असतो दोन्हीं मिळून पिशवीसारखा आकार आलेला असतो. छातीच्या डाव्या बाजूला स्तनांच्या जागीं हात ठेवला म्हणजे आपल्याला एक प्रकारचे ठोके ऐकूं येतात. लब्–डप् असे ठोके पडत असतात. आपलें हृदय म्हणजे पंपाप्रमाणें आहे. या हृदयाच्या मकोचन प्रसरण क्रियेमुळें सर्व शरिरांमध्यें रक्त फिरत जातें. भिती, उत्साह वगैरे मनोविकारांमुळें हृदयाच्या गतीमध्यें कमीजास्तीपणा येतो. हृदयाचें वजन पुरुषांचे २५ तोळे असतें व स्त्रियाचे २० तोळे असतें. प्रत्येकानें आपलें हृदय केवढें आहे याची कल्पना येण्याकरितां मूठ वळवून पहावी. या मुठीच्या आकाराएवढें प्रत्येकाचें हृदय असतें.

हृदय उघडून पाहिले तर त्यांमध्यें पडदे आढळतात. हृदयाला रक्तवाहिन्या जोडलेल्या असतात. या दोन प्रकारच्या असतात त्यांस अशुद्ध रक्तवाहिनी

( नीला ) व शुद्ध रक्तवाहिनी ( रोहिणी ) अशीं नांवें आहेत; एका रक्तवाहिनीमध्यें लाल रक्त अगर शुद्ध रक्त व दुसऱ्या वाहिनीमध्यें अशुद्ध निळसर काळें रक्त वहात असतें. त्याला शिरा असें म्हणतात. त्या दोन्हीं रक्तवाहिन्या सारख्याच बाजूनें वहात असतात व त्या सर्व शरिरांमध्यें पसरलेल्या असतात. या दोन्ही रक्तवाहिन्या सूक्ष्म तंतुसारख्या केंसाकार ( Capillaries ) रक्तवाहिन्यांनीं जोडल्या जातात. हृदयाचे दोन भाग आहेत त्या एका भागांमधून शुद्ध रक्त सर्व शरिरांत शुद्ध-रक्तवाहिन्यांच्या द्वारें पाठवलें जातें व अशुद्ध रक्तभागांत परत अशुद्ध शिरेच्या द्वारें सांठवलें जातें. रक्ताचा एक बिंदु सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं तपासला ह्मणजे जलरुपी द्रव्यांत सूक्ष्म असे कण त्यांमध्यें (Serum) तरंगत असलेले आढळतात. एका इंचामध्यें हे रक्तकण ३ ते ३५०० राहूं शकतील. हे कण या जल-रूपी द्रव्यांतून बाहेर काढले व तपासले तर त्यांचा रंग, लालसर आढळणार नाहीं तर पिवळसर आढळेल. या रक्तकणांमध्यें पांढऱ्या प्रकारचे कण आहेत त्याची सरासरी १ ला ६००–७०० रक्तकण या प्रमाणांत असते. हे रक्तकण स्वतंत्र असतात व ते आपलें कार्य स्वतंत्रपणें करित असतात. प्रत्येक रक्तकणाचें आयुष्य ६ आठवडे सरासरीं असतें. लाल रक्तकण असतात त्यांमध्यें प्राणवायु ( Oxygen ) असतो, हा प्राणवायु फुप्फुसांच्या द्वारें मिळत असतो व हाच वायु सर्व शरीरांमध्यें वांटला जातो. प्राणवायु कमी झाला ह्मणजे रक्ताचा लालपणा जाऊन काळसरपणा येतो व हा फरक रक्तवाहिनी व शिर ( Vein ) हें पाहिलें असतां आढळून येतो. ज्याच्या अंगांत हे लालरक्तकण कमी असतात तो पांढुरका फिकट दिसतो व अशुद्ध रक्त ज्यांच्यामध्यें असतें, त्याच्या चेहऱ्या-वर काळसरपणा विशेष येतो. रक्त अंगांमध्यें भरपूर असणाराचा चेहरा, टव-टवीत लालसर आढळतो. पांढरें रक्तकण शरिरांतील इंद्रियांची दुरुस्ती करीत असतात व इजा झालेल्या भागास पूर्वस्थिती आणून देण्यास मदत करीत असतात. छत्र्या दुरुस्त करणारे, ज्याप्रमाणें रस्त्यावर फिरत असतात, त्याच-प्रमाणें हे रक्तकण इंद्रियांची दुरुस्ती करण्यांकरतां फिरत असतात.

रक्तांमधील जो द्रव पदार्थ सांगितला त्या द्रवांपासूनच हाडे, स्नायू व इतर इंद्रियांना मदत होत असते. हीं तत्वें आपण जें अन्न खातों त्यावर अवलंबून असतात, ज्या प्रकारचें अन्न आपण खाऊं त्याप्रमाणें त्या त्या इंद्रियांची वाढ होत असतें.

**रक्त कसें फिरतें**—प्रत्येक नाडीच्या गतीबरोबर रक्ताची लाट पुढें जात असते. ज्याठिकाणीं रक्तवाहिनी त्वचेच्या सपाटीवर असते तेथें बोटें ठेवली असतां आपल्याला कळून येईल. १ मिनिटाला नाडीचें ७२ ठोके पडत असतात. हृदयाच्या डाव्या बाजूच्या खालच्या पडद्यांमधून जें रक्त निघतें तें सर्व शुद्ध रक्तवाहिन्यांच्याद्वारें सर्व शरिरभर पसरतें; नंतर तें सूक्ष्म ( Capill aries ) रक्तवाहिन्यांच्याद्वारें, ( Vein ) शिरेला मिळतें नंतर तें या शिरेच्या द्वारें, हृदयाच्या उजव्या बाजूकडे येतें व तें मोठ्या रक्तवाहिन्यांच्याद्वारें खालच्या बाजूनें फुफुसांमध्यें जातें. शिरेमध्यें असलेल्या रक्तांत इंद्रियांमधील घाण असते. फुफुसांमध्यें गेल्यानंतर तेथें त्याचा काळसरपणा जाऊन प्राणवायुमुळें लालपणा येतो व पुनः ते रक्त पूर्ववत् आपलें कार्य करण्यास तें समर्थ होतें. रक्त कसें फिरतें याची माहिती समक्ष चित्र पाहिल्याशिवाय देतां येणार नाहीं, इतकी ती गुंतागुंतीची आहे. साधारणपणें कल्पना येण्याकरितां स्थूल वर्णन सांगितलेलें आहे. सामान्य जनतेला एवढी माहिती पुढील विषयाला पुरेशी आहे. हृदयाचें महत्व अत्यंत आहे. हृदयाच्या स्थितीवर आपलें आयुष्य अवलंबून असतें. हृद्यांवर इंद्रियांचें आयुष्य अवलंबून असतें. निजलें असतां नाडीचे ६० ठोके आढळतात, बसले असतांना, ६६ ते ६८ उठलें असतां ७२ ते ७५ इतके असतात. उडी मारणें, धावणें यामुळें गति वाढून १०० च्यावर ठोक्यांची संख्या जाते. व्यायाम योग्य घेतला म्हणजे याची गति वाढवतां येते, परंतु त्यामध्यें सुद्धां नियमितपणा पाहिजे. तंबाखू, दारू, त्याचप्रमाणें उत्तेजक पदार्थ, यामुळें हृदयावर परिणाम होतो. तंबाखू व दारू पिणारे अकालीं एकाएकीं मरतात. प्रथमतः परिणाम जरी दिसला नाहीं तरी तो हळुहळू होत असतो. शरिरांत ज्याप्रमाणें विजातीय घाण उत्पन्न होईल, त्याप्रमाणें रक्ताचा रंग बदलत जातो. रक्त चांगले राहण्यास ही घाण त्वचा, फुफुसें, यकृत, मूत्रपिंड व मळद्वारें या मार्गानें बाहेर गेली पाहिजे. ज्यांचें रक्त बिघडलें आहे, त्याच्या त्वचेवर खरुज, गजकर्ण यांसारखे विकार होतात. अशा लोकांनीं मसालेदार पदार्थ, दारू, उत्तेजक पेयें वगैरे वर्ज्य केलीं पाहिजेत. मलावरोध ज्यांना आहे, त्यांच्या पोटांत एक प्रकारचें विष तयार होत असतें. हें विष त्यांच्या आंतड्यांत सांचलेलें असतें; त्यामुळें डोकें दुखणें, कमर दुखणें, मूत्रपिंडाचे विकार, अकालीं वार्धक्य, पोटशूळ, मज्जातंतूची शिथीलता हे विकार होतात. झोंप आली नसतां दुसऱ्या दिवशीं रक्त तपासून पाहिलें, म्हणजे याची सत्यता कळून येतें. रक्त चांगलें

असलें म्हणजे, इंद्रियें चांगलीं शाबूद असतात; व इंद्रियें चांगलीं शाबूद असलीं ह्मणजे शरिराचें आरोग्य चिरकालीन होऊन रहातें.

---

# प्रकरण ३ रें

—:o:—

## शरिरांतील निरनिराळीं इंद्रियें

**पचनेंद्रियें** ( Digestive Apparatus ) आपला अन्न-मार्ग ३० फूट लांबीचा आहे. हा अन्नमार्ग म्हणजे एक प्रकारची गिरणी—चक्की म्हटल्यास वावगें होणार नाहीं. दांतामध्यें अन्न चावलें जातें, त्यामध्यें लाळेचें मिश्रण होतें. हें मिश्रण तयार होण्यांत जिभेची मदत होते. या मिश्रणाचा गोळा गळ्याखालच्या स्नायूकडून आमांशयांत ढकलला जातो. आमांशयांत ३ पाइंट अन्नरस तयार होतो. ( Gastric Juice ) आमांशयाच्या शेवटच्या टोंकाला, लहान आंतड्यांचें मुख मिळतें. आमांशयांत अन्न पचन होऊन तें आंतड्यांमध्यें येतें, तेथें आंतड्यांमध्यें दोन प्रकारचे रस मिळतात. क्लोम ह्मणून आमांशयाच्या ( Stomach ) खालीं एक इंद्रिय आहे. त्यांतून वहाणारा रस व यकृतांमध्यें वहाणारें पित्त या दोहोंचें मिश्रण त्यांत होतें. शिवाय आंतड्यांत आल्यानंतर, त्यामधील रस त्यांत मिळत असतो व नंतर विशिष्ट भागाचें रक्तांत मिश्रण होऊन अवशिष्ट भाग, गुदद्वारें बाहेर पडून जातो.

अन्न पचनाला लागणारीं मुख्य ५ रसद्रव्यें ( Fluids ) लाळ, आमांशयांतील रस, क्लोम मधील रस ( Pancres ) पित्त व आंतड्यांमधील रस. या प्रत्येक रसाचें अन्नांवर विशिष्ट कार्य असतें. अन्नामध्यें असणारा स्टार्च याच्यावर फक्त लाळेचा परिणाम होतो व त्याची साखर वनते. आमांशयांतील रसाचा अल्ब्युमीन वर परिणाम होतो. पित्ताचा चरवीवर व इतर अवशिष्ट राहिलेल्या पदार्थांवर ( स्टार्च अल्ब्युमीन, चरवी ) क्लोमाचा परिणाम होतो. हें सर्व समजण्याकरितां चपातीचें उदाहरण घेऊं. चपाती, आपण दातानें चावूं लागलों ह्मणजे त्यामधील असलेल्या स्टार्चची साखर वनत असते. हें फार वेळ

तोंडांत घास ठेवला असतां अनुभवास येतें. आमांशयांत गेल्यानंतर, चपातींतील ग्ल्युटीनवर [ अल्ब्युमीन सारखा पदार्थ ] आमांशयाचें कार्य होतें, नंतर आंतड्या-मध्यें आल्यानंतर पित्ताचें कार्य त्यामध्यें असलेल्या सिद्ध पदार्थांवर होतें व त्याचे एक प्रकारचे फेंसयुक्त मिश्रग होतें ( साबूच्या फेंसा वरून कल्पना येईल ) व या मिश्रणावर क्लोमचे कार्य होतें. आंतड्यांमधील रसांचें साखरे-सारख्या भागांवर क्वचितच कार्य होतें अशा प्रकारें चपातीचें पचन होतें, नंतर एक प्रकारच्या सूक्ष्म अशा रसवाहिन्यांच्या द्वारें ( Villi ) रक्तवाहिन्यामध्यें मिळून तें परत यकृतांमध्यें नंतर हृदयांमध्यें जातें, व हृदयाच्याद्वारें सर्व इंद्रियांना मिळतें. आमांशयांत असणारा रस जंतुनाशक व दुर्गंधीनाशक आहे. आमांशयांचे जें मुख व टोंक आहे, त्याची उघडझांक करण्याकडे याचा उपयोग होतो, या रसामुळें यकृत वगैरे इंद्रियांमधून रस वहाण्यास उत्तेजन मिळतें. आपलें यकृत ३ ते ३॥ पौंड वजनाचें आहे. यामधून वहाणाऱ्या पित्ताचा रंग पिवळसर असतो. उलटींतून पित्त जें पडतें तें निळसर रंगांचें पडतें; यावरून तें तशा रंगांचें असावें अशी कल्पना करतात परंतु पित्ताचा व आमांशयांतील असणाऱ्या आम्ल रसांचा संयोग झाल्यानें पित्ताचा रंग बदलतो. यकृत हें रक्तांमधील साखर त्याचप्रमाणें निरनिराळीं विषें यांचा संचय करित असतें. बाजवीपेक्षां जास्त खाण्यांत आलें तर यकृताचें कार्य बिघडून ती साखर बाहेर लघ्वीच्याद्वारें पडून जाते. दारु पिणाऱ्याचें यकृत वाढतें. दारुमधील विषारी द्रव्यें, यकृताच्या गुणधर्मामुळें आंत सांचलीं जातात व यकृतांचें कार्य बंद होतें. त्यावेळीं त्यामध्यें सूज येऊन तें पिकतें व रोग्याचा प्राण जातो. यकृतांवर आरोग्य अवलंबून आहे व ह्मणूनच हृदय व मेंदुप्रमाणें याचें महत्व फार आहे. यावरून, मादक पदार्थ, तिखट मिरच्या वगैरे दाहक पदार्थ खाणाऱ्यांचें यकृत कोणच्या प्रकारचें असेल ह्याचा विचार करावा.

**पोट केव्हां रिकामें होतें ?** ४ ते ४॥ तास झाल्यानंतर आमांशयांतील अन्न आंतड्यांमध्यें जातें. नंतर ४ ते ५ तासानंतर ह्मणजे ९ तासानी लहान आंतडी व आमांशय यांमध्यें पचन होऊन, मोठ्या आंतड्यांत जातें. ६ ते ७ तासांनंतर ही घाण बाहेर पडून जाण्याचा शौचाच्याद्वारें संभव असतो. निरोगी प्रकृतीवर खालीलप्रमाणें फेरफार होतात. ज्याला एकच वेळां शौचाला होतें त्याच्या आंतड्यांमध्यें पुष्कळ मळ शिल्लक असतो व या मळापासून एक प्रकारचें अन्नजविष ( Auto-intoxication ) तयार होतें.

**त्वचेचे कार्य**—स्थूल दृष्ट्या त्वचेचे दोन भाग आहेत. अंतर्त्वचा व बाह्यत्वचा. अंतर्त्वचेंमध्यें रक्तवाहिन्या, मज्जातंतु, घर्मपिंड वगैरे असतात. उष्णता वाहण्याचें काम त्वचेचें आहे, हवेमध्यें ज्याप्रमाणें फेरफार होईल. त्याप्रमाणें बदल होत असतो. फुप्फुसांप्रमाणें, विजातीय घाण बाहेर काढून टाकण्यांस त्वचेचा उपयोग होतो. त्वचा स्वच्छ नसली म्हणजे घाण बाहेर जात नाहीं व रोग वाढण्याला मदत होते. त्वचेचीं छिद्रें स्नानानें मोकळीं व उघडीं होतात. ज्यांना घाम फार येतो त्यांच्या अंगास एक प्रकारची घाण येऊं लागते यावरून त्वचेचें कार्य कसें होत असतें तें समजून येईल. उष्णता त्याचप्रमाणें बाह्य पदार्थाचें ज्ञान त्वचेचें द्वारां आपल्याला मिळतें.

**फुप्फुसें**—(Lungs) हीं आपल्या छातीमध्यें दोन आहेत. एक उजवें व दुसरें डावें. उजवें फुप्फुस डाव्यापेक्षां साधारण मोठें असतें. हें स्पंजासारखें स्थिती स्थापक (Elastic) असतें व तें श्वासनलिकेच्या शाखांचे बनलेलें असतें. यांत हवा भरलेली असते. फुप्फुसांचे वजन सुमारें २॥ रत्तल असतें. फुप्फुसाला आवरण असतें त्याला फुप्फुसावरण म्हणतात. श्वासनलिका ( Trechea ) नाकपुडीपासून फुप्फुसांपर्यंत जी नळी जाते तिला वायुचा अगर हवेचा मार्ग म्हणतात. ह्या नळीचे दोन भाग कल्पिलेले आहेत. वरच्या भागाला स्वरनलिका व खालच्या भागांला श्वासनलिका म्हणतात. मागल्या बाजूनें श्वासनलिका अन्न मार्गाला लागलेली असते. श्वासनलिकेचे दोन्ही भाग फुप्फुसांत जातात. प्रत्येक भागांच्या लहान लहान सूक्ष्म शाखा होऊन त्या फुप्फुसाच्या पृष्ठभागांवर पसरतात, ह्यानळयांच्यावर सूक्ष्म वायुकोश असतो ( Air cells ) ह्यांवर असलेलें आवरण पारदर्शक व नाजूक असतें. ह्या वायुकोशांवर सूक्ष्म केशाकार वाहिन्यांचें जाळेंच पसरलेले असतें व ह्या जाळ्यांमध्यें शरिरांतील अशुद्ध रक्तवाहिन्यांच्याद्वारें आलेलें रक्त फिरत असतें. आपण जी नाकांच्याद्वारें हवा घेतों त्या हवेमध्यें प्राण वायु असतो; त्या प्राणवायूच्या मुळें अशुद्ध रक्ताचा रंग बदलून पुनः तें लाल होतें व परत इंद्रियांचें पोषण करण्यांस लायक होतें.

**मूत्रपिंड**—( Kidneys ) हे आमांशयाच्या खालीं व पाठिमागें कमरेच्या आंत वर असतात. हे दोन आहेत. यांतून दोन नलिका निघतात, त्या मूत्राशयाला मिळतात. मूत्रपिंडाचें कार्य रक्तांतील विषारीं द्रव्यें बाहेर काढणें हेंच होय. मूत्राशयांत लघवी सांठली म्हणजे मूत्रद्वारें बाहेर पडून जातें

**मूत्रनलीका**— ( Ureters ) मूत्रपिंडांतून मूत्र ज्या मार्गानें मूत्राशयांत येतें, त्यांना मूत्रनलिका ह्मणतात. ह्यांची लांबी साधारणतः १॥ फूट व जाडी कोळ पेनाएवढी असते. मूत्रनलिका आंतड्यांच्या मागल्या बाजूस असते.

**मूत्राशय**—( Bladder ) हा त्रिकोणाकार असतो. मूत्राशयाच्या मागें अस्थि व मागें गुदद्वार हीं आहेत. मूत्राशयाच्यावर आंतडीं आहेत. मूत्राशयाचे तीन भाग कल्पिलेले आहेत. ऊर्ध्व, मध्य व ग्रीवा. वरच्या भागाला ऊर्ध्व भाग, मध्यभागांच्या खालीं जो अरुंद भाग त्याला ग्रीवा म्हणतात व या ग्रीवेच्या सभोंवतीं प्रोस्टेट ग्लंड आहे. खालच्या भागाच्या तळाशीं वीर्याशयाच्या ( Seminal-vesicles ) दोन पिशव्या आहेत. याला तीन आवरणें आहेत रसत्वचा, स्नायू व श्लेष्मावरण हीं होत.

**मूत्रमार्ग**—( Urethra ) शिश्नाच्या टोंकापर्यंत मूत्राशयापासून जो मार्ग निघतो त्याला मूत्रमार्ग म्हणतात. याची लांबी ८ इंच असते. याचें तीन भाग कल्पिलेले आहेत. पहिला भाग १ इंचापेक्षां सुमारें कांहीं लांब मोस्टेट ग्रंथीपर्यंत जातो. दुसरा भाग १ इंचापेक्षां कमी आहे.

**प्रोस्टेट ग्रंथी**—( Prostate glands ) गुदद्वार व मूत्राशय याच्या मध्यभागीं या ग्रंथीं आहेत. याचा आकार सुपारीसारखा असून शंकाकार आहे. त्याचें टोंक पुढें असून रुंद भाग मागें असतो. गुदद्वारांत बोट घातलें असतां हा आढळून येतो. म्हातारपणांत ह्या ग्रंथी वाढल्यामुळें लघ्वीचा त्रास होतो. स्त्रियांना हा ग्रंथी नसतो.

**वीर्याशय**—( Seminal-Vesicles ) वृषणांतून वीर्यवाहिन्या ओटींत येऊन मूत्राशयांवर येऊन नंतर खालीं उतरतात. मूत्राशयाच्या बुडाशीं, प्रत्येक नलिका रुंद होते व तिचा आकार गुच्छासारखा होतो. यामध्यें वीर्य सांठून रहातें. मूत्राशय व गुदद्वार यांमध्यें दोन वीर्याशय आहेत. ह्या नालिका प्रोस्टेटग्रंथीमधून मूत्रमार्गांत सुटतात व तेथून वीर्य बाहेर पडतें. योनीच्या पुढें मूत्राशय, मूत्रमार्ग व पाठिमागें मलद्वार असतें.

**गर्भाशय**—( Uterus ) वस्ती प्रदेशांत ( Pelvis ) मधोमध गर्भाशय असतो. त्याचा आकार चपट्या पेरुसारखा आहे. लांबी ३ इंच रुंदी १॥ इंच व १ इंच जाडी असते, वजन २ औंस ते ४ औंस असतें. गरोदरावस्थेंत

आकार, वजन, लांबी हीं वाढत असतात. योनीच्या आंत बोट घातले असतां जो भाग लागतो त्याला गर्भाशयाची ग्रीवा ( Cervix ) म्हणतात. मध्यभागाला मुख ( os ) ह्मणतात, व जेथें ग्रीवा व गर्भाशयाचा आंतील भाग एकमेकांशी मिळतात त्या स्थानाला अंतर्मुख ह्मणतात.

गर्भाशयांला तीन आवरणें आहेत. रसत्वचा, श्लेष्मावरण व स्नायू—हीं होत. ह्या आवरणांत पिंड असतात व त्यामधून एक प्रकारचा स्राव होत असतो. विटाळशीपणांत व गरोदरावस्था यांमध्यें फेरफार होतात.

**शिश्न**—( Penis ) अग्रभागाला फूल असें ह्मणतात. आंतल्या भागांत लघ्वीचें द्वार असतें. फुलाच्या मागें चक्राकार खळगा आहे, तेथें त्वचा लागलेली असते; ही त्वचा मागें पुढें होऊं शकते. यामध्यें सूक्ष्म पिंड असतात व त्यांमधून चिकट पांढरा स्राव होत असतो.

**वृषण**—( Testis ) त्वचेच्या कोथळींत हे दोन बाजूस दोन असतात. गर्भावस्थेंत ते मूत्रपिंडाजवळ असतात व आठव्या महिन्याच्या सुमारास ते वृषणाशयांत खालीं येतात. बाह्य आवरण त्वचेचें व आंतील स्नायूमय असल्यामुळें तें संकोचमय असतें. वीर्यनलीका, रक्तवाहिनी व शिरा यांचे एक दोरखंड बनून त्याच्या आधारानें वृषण मागें पुढें होत असतात.

**योनी**—( Vagina ) योनीपासून गर्भाशयापर्यंत जाण्यांचा मार्ग त्याला योनी मार्ग ह्मणतात. लांबी ४ ते ६ इंच असते. यांचे आंतील आवरण श्लेष्ममय असते व त्यामध्यें चिकट स्राव होत असतो.

गर्भाशयाच्या दोन्ही बाजूस दोन नलिका असतात. ह्यांना फलवाहिन्या ( Fallopian-Tubes ) म्हणतात. प्रत्येक नलीका ४ इंच लांब असते. ती गर्भाशयाच्या वरील बाजूस जोडलेली असते.

**स्त्रीअंड**—(Ovaries) गर्भाशयाच्या दोन्ही बाजूस बदामाच्या आकारा-एवढें हे स्त्रीअंड असतात. लांबी १॥ इंच, रुंदी तीन चतुर्थांश इंच व जाडी एक द्वितीयांश इंच असते वजन सुमारें एक द्वितीयांश तोळा असतें. ह्यामध्यें अनेक बीजें असतात. बीजें ज्याप्रमाणें परिपक्व होतात त्याप्रमाणें दर महिन्याला फलवाहिन्याच्याद्वारें गर्भाशयांत येत असतात.

**ओटीचा भाग**—( Pelvis ) बेंबीच्या खालचा भाग यांस ओटी ह्मण-तात. त्रिकास्थी ( Coccyx ) मागें गुदास्थी ( Secrum ) व पुढें ढुंगणाच्या

अस्थी ( Pubis ) एवढी सर्व मिळून हाडांची पोकळी बनलेली असते तिला ओटी असें नांव आहे. ओटीमध्यें मूत्राशय, गुद, प्रोस्टेटग्रंथी, वीर्याशय, आंतडी, गर्भाशय व स्त्रीअंडांची उपांगे हीं असतात.

**मेंदू**—( Brains ) मेंदूचें वजन अदमासें ३ पौंड असतें. स्त्रियांमध्यें हें कमी असतें. मेंदूला जोडणारी एक रज्जू असतें ( Spinal Cord ) ही मज्जातंतुची बनलेली असते. हे मज्जातंतु दोन प्रकारचे असतात. गतितंतु व ज्ञानतंतु; या मज्जातंतूचें कार्य सर्व इंद्रियांवर, शरिरांवर चालतें. मनांत विचार आला कीं हात बाजूला करावयाचा आहे; लगेच मेंदूकडून हाताच्या स्नायूमधील असणाऱ्या गतितंतुकडून हात बाजूला झालाच म्हणून समजावें. हें लिहिण्यास जेवढा वेळ लागला त्याच्यापेक्षां फार जलद हीं कार्यें होत असतात.

कण्यामध्यें असणाऱ्या रज्जूचे दोन वर्ग केलेले आहेत. बाह्य जगतांतील होणाऱ्या परिणामांचा संदेश कळवणारा एक वर्ग व हा संदेश अमलांत आणणारा दुसरा वर्ग. मेंदूचें चार भाग आहेत. बुद्धिचें ठिकाण मेंदु आहे. मन इच्छाशक्ति वगैरे पर्याय शब्द मेंदुलाच उद्देशून असतात.

मन कोठें आहे, याचा शोध अद्याप जरी निश्चित झाला नाहीं तरी त्याच्या कार्यावरून त्याचें अस्तित्व सिद्ध होतें. चेतना कशी येतें, विचार उत्पन्न कसा होतो, याचा शोध अद्याप लागला नाहीं, परंतु मेंदू हें मनाचें स्थान असावें अशी खालील विवेचनावरून कल्पना येतें.

( १ ) मेंदूवर परिणाम अगर दुखापत झाली म्हणजे मनावर परिणाम होतो. झोंप, बेशुद्धि यांमध्यें मेंदूचें कार्य बंद असतें.

( २ ) मेंदूचें वजन जितकें जास्त तितका मनुष्य बुद्धिवान जास्त असतो. वेडसर मनुष्यामध्यें मेंदूचें वजन २ पौंड असतें.

**डोळे**—डोळयानें पहातां येतें व ते हाडाच्या पोकळींत बसवलेले असल्यामुळें सुरक्षित असतात. मेंदूपासून मज्जातंतू यामध्यें मिळतात.

**कान**—बाह्यकान व आंतील कान असे दोन भेद आहेत. वाऱ्याच्या लहरी [ Vibrations ] चा परिणाम होऊन आवाज उत्पन्न होतो व आपल्याला ऐकूं येतें. कानामध्यें जो पडदा आहे त्यांवर या लहरींचा परिणाम होतो व हा परिणाम मज्जातंतू वाहिन्यावर होतो. याच लहरींना आपण आवाज म्हणतो.

**नाक**—( Nose ) नाकाच्याद्वारें फुप्फुसांमध्यें हवा जाते. नाकांमधील अंतःत्वचेमध्यें एकप्रकारच्या ग्रंथी असतात व त्यांमधून स्राव होऊन नाक नेहमीं ओलसर असतें. नाकांमध्यें केंस असतात. हवेमधून येणारी घाण आंत जाऊं नये म्हणून या केसांची योजना असते. यामध्यें घाण अडकली जातें व एक प्रकारें हवा गाळून आंत जाते. यदाकदाचित जंतु गेल्यास, अंतःत्वचेंतील रसांमध्यें मरून जातात. या करितांच नाकानें श्वास घेणें महत्वाचें आहे. जे तोंडानें श्वास घेतात त्यांच्या गलग्रंथी वाढतात, अशुद्ध हवा मिळते व त्यामुळें छातीवर परिणाम होऊन फुप्फुसाचें विकार होतात.

**जीभ**—( Tongue ) जीभेचा उपयोग रुचि समजण्याकडे आहे. हिच्या ठिकाणीं स्पर्श ज्ञान आहे व त्यामुळें चांगलें व वाईट हें कळतें. शरिराला निरुपयोगी असणाऱ्या वस्तूंचा जिभेकडून [ निरोगी अवस्थेंत ] प्रतिकार केला जातो.

[ शरिरांतील इंद्रियांच्या किया मेंदु व मज्जानंतू यांच्याद्वारें चालतात हें जरी सिद्ध झालें आहे तरी या सर्व गोष्टींची प्रेरणा करणारा कोण याचा सिद्धांत अद्याप लागलेला नाहीं. शरिरांत जोंपर्यंत जीव आहे, ज्याला इंग्रजींत Life म्हणतात, तो कोठें आहे, तो दाखवतां येत नाहीं. तो आहे, हें त्याच्या कार्यावरून समजतें. नानाप्रकारच्या कविनीं ह्या सृष्टिंतील सुंदर देखावे म्हणून त्यांच्यांवर नानाप्रकारचीं कवनें केलेलीं आहेत. वेदांती लोक त्याच्या शोधार्थ आपल्या आयुष्याचा व्यय गिरीगव्हरांत राहून करीत आहेत. समाजसत्तावादी, नीतिशास्त्रप्रवर्तक, जीव आहे असें नानाप्रकारें प्रत्येकाच्या मनावर बिंबवीत आहेत; अशा प्रकारें प्रत्येकजण ह्या जिवाचा शोध, हा कोठून आला, याचें अस्तित्व कोठें आहे, हा नाहिंसा कां होतो, कसा होतो, ह्याचा जसा जसा विचार करूं लागतात, तसतसें त्या दयाघन प्रभूच्या लिलेचें कौतुक वाटतें. सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं रक्ताचा थेंब तपासून पाहिला तर तो अत्यंत सूक्ष्म अशा अणूचा ( Atoms ) बनलेला आहे असें आढळून येतें. पाण्याचा थेंब पाहिला तर त्यांत असंख्य जीवाणू तरंगत असलेले आढळतात. ते पारदर्शक, आकारहीन, इंद्रियविरहित परंतु त्यामध्यें सजीवपणा आढळून येतो. तात्पर्य काय प्रत्येक डोळ्यांना होणारें गोचर सर्व सूक्ष्म अणूपासून बनलेलें आहे. स्थूलदृष्ट्या प्राणी व वनस्पती असे दोन वर्ग ह्या जीवात्म्याच्या दृष्टिनें मनुष्यानें केलेले आहेत.

जीवनशास्त्रवेत्यानें, ज्याला प्रोटोप्लाझम असें नांव दिलेलें आहे. एखाद्या घाणेरड्या जमिनींत उगवणारें वासाचें फूल पाहिलें व त्याच्या जमिनीचा विचार केला म्हणजे हा वास फुलांमध्यें कसा उत्पन्न झाला ? गुलाबाचें फूल पाहिलें, त्याच्या पाकळ्या किती व्यवस्थित रचलेल्या सुवासिक असतात, वसंतऋतूंत कोकिळपक्षाचा गाण्याचा आवाज पाहिला म्हणजे असा सुन्दर गळा त्याला कोणी दिला. वगैरे वगैरे या जगांतील गोष्टींचा दूरवर विचार करूं लागलें म्हणजे ही अदृश्य मनुष्याच्या ज्ञानापलिकडची शक्ति आहे असेंच प्रत्येकाला आढळून येईल. व ह्याच शास्त्रज्ञानीं जीवन शक्ति, चेतना ( Vitality ) असें नांव दिलेलें आहे. वैद्यकीय स्थानत्य विषयाचे ( Science ) विद्यार्थी, ज्यांना सूक्ष्मदर्शक यंत्रांची जरुरी वारंवार पडते अशांना जीवितांचें महत्व जास्त कळतें; थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे जगन्नियंत्याने हा मनुष्य प्राणी उत्पन्न केला, त्याचवेळीं त्यानें आपला प्रवेश त्याच्यामध्यें करून त्या मनुष्याच्याद्वारें त्याला जिवंत ठेऊन आपलें कौशल्य जगांमध्यें पसरविलें आहे असें म्हणणें रास्त होईल. या जगांतील प्रत्येक व्यक्तिचें अस्तित्व कांहीं विशीष्ट तत्वांकरितां असतें. तीं तत्वें पार पाडण्याचें कार्य तो ईश्वर ज्याच्या त्याच्याकडून करवून आपण नामानिराळा असतो. तें कार्य त्या व्यक्तिकडून झालें म्हणजे मृत्यु येतो. अशाप्रकारें हें रहाट गाडगें तो चालवित असतो. कर्ताकरविता निराळा असतो व मी केलें मी केलें म्हणून आपण तो अभिमान बाळगत असतो, तो वृथा किती आहे याचा दूरवर विचार केला म्हणजे पटल्याशिवाय रहाणार नाहीं. ]

**जंतुशास्त्र:**—पेश्चुर यानें शोध लावल्यापासून, जंतूचें महत्व वैद्यकशास्त्रांत फार आलेलें सर्व रोग जंतुमुळें होतात व या जंतुचा शरिराच्या इंद्रियांवर परिणाम होऊन नंतर रोग होतात असें मत जरी ग्राह्य धरलें तरी नुसत्या जंतुनाशक क्रियेनें रोग बरा होत नाहीं. यावरून जंतुशास्त्राच्या पलिकडे रोग होण्याचें निराळें कारण असलें पाहिजे व हेंच आयुर्वेदांत त्रिदोषाच्या थिअरीनें सिद्ध झालेलें आहे. असो. हवेमध्यें जंतु सर्व पसरलेले आहेत. श्वास मार्गानें ते आमच्या पोटांत जात असतात परंतु हें शरिर जोपर्यंत निरोगी आहे, त्याच्या आंगांत एक प्रकारची प्रतिबंधक शक्ति आहे, तोंपर्यंत यांचा पगडा बसत नाहीं. ह्मातारपणीं त्याचप्रमाणें एखादा बराच दिवसाचा आजारीपणा होण्याला

कारण म्हणजे निसर्गाची व जंतुची एकमेकांवर कुरघोडी करण्याकरितां चाललेला खटाटोप होय व याचमुळें इंद्रियें निर्जीव होत असतात. आपण सकाळीं उठल्या-नंतर आपली जीभ पाहिली तर तिच्यावर एक प्रकारचा पिंवळा थर (Coating) आढळतो. त्या थरामध्यें जंतु असतात. अधाशीपणानें खाणारा, भूक नसतांना जेवणारा, याचें अन्न बरोबर पचन होत नाहीं व आंतड्यांत तें सांठल्यामुळें एकप्रकारचें विष तयार होतें. हें विष वाढत चाललें म्हणजे आपल्या तोंडांतील असणारी लाळसुद्धां बिघडून जाते व उलट तिचा जंतुनाशनाचा धर्म जाऊन जंतुचें पोषण होण्यास मदत होते. एक प्रकारचे जंतु आपल्या तोंडांत असतात; परंतु लाळेच्या जंतुनाशक धर्माप्रमाणें त्यांचे अस्तित्वाची बाधा होत नाहीं. निसर्गानें जंतु नाश करण्याची कशी योजना केलेली आहे ती पहा. नाकांतून जाऊं नये, म्हणून नाकांत केस ठेवलेले आहेत, त्यांतून जर गेले तर अंतःत्वचेच्या आंवरणांतील स्रावानें ते मरून जातात. लाळ ही जंतुनाशक आहे. लाळ बिघडली व जंतु पोटांत गेले तर आमांशयांतील रस, [ Gastric Juice ] हा आम्ल ( Acid ) कफनाशक असल्यामुळें त्यामध्यें जंतु मरून जातात. एखाद्या सांथीमध्यें ज्यांची पचनक्रिया चांगली आहे, त्यांच्या पोटांतील हा रस निरोगी स्थितींत असल्यामुळें रोगाची बाधा त्याला होत नाहीं.

विडी, दारु, मादक, उत्तेजक पदार्थ यामुळें आमांशयांतील रस बिघडतो. आपली अंतःत्वचा ( Mucus Membrane ) जुलाबाचीं औषधें वारंवार घेतल्यामुळें, दाह, पोटशूळ, या विकारांत बिघडलेली असते. तिची प्रतिबंधक शक्ति कमी झालेली असते, अशा स्थितींत जंतुचा पगडा बसल्यास नवल काय ? अतिसार होतो त्यावेळीं मनुष्य अशक्त होतो, याचें कारण म्हणजे शरिरांतील विषें होत. याकरितां हीं विषें, शरिरांमध्यें सांठणार नाहींत याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे.

हीच विषें रक्तांत मिसळलीं म्हणजे यकृतामध्यें ( Liver ) सांठवलीं जातात व त्यांपैकीं बऱ्याच विषाचा सांठा यकृतांत होतो. यकृतामध्यें जाणारें रक्त, यकृताच्या रक्तवाहिनीनें आपोआप शुद्ध होतें. रक्तांत हे जंतु वाढतात त्यावेळीं रक्तांमध्यें असणाऱ्या पांढऱ्या रक्त कणांची वाढ होत असते. ह्या पांढऱ्या रक्त कणांवरून आंतड्यांचे शेवटीं असलेलें जें टोंक ( Appendix ) याचा दाह कळून येतो. तात्पर्य काय, वेळेवर न जेवणें, फार खाणें, वाईट-संवयी,

चहा, कॉफी, तंबाखू मादक पदार्थ फार सेवन करणें, व्यायाम न घेणें व एका जागीं बसून रहाणें, ह्यामुळें शरिरांत असलेल्या रक्तकणांची प्राणवायुच्या कमी-पणामुळें जीवनशक्ति ( Vitality ) कमी होते व जंतुचा अमल बसावयास वेळ लागत नाहीं. यावरून खेडेगांवांत रहाणारा वर्ग व शहरांतील सुधारलेला वर्ग, आजारीपणांच्या वेळीं कसा टिकून रहातों, याचें कारण काय ते सूज्ञांच्या ध्यानांत येईल.

---

# प्रकरण ४ थें

—:०:—

## जननेंद्रियें व बाळंतपण

प्राणी व वनस्पती या दोघांना पोषण व उत्पादन क्रिया जन्मांपासून लाग-लेल्या आहेत. प्रथमतः आपलें जीवित कसें रक्षण होईल याचा विचार व नंतर सृष्टिकर्मानुसार उत्पत्तिचा विचार मनांत असतो. आपलें पोट कसें भरावें हें कोणाला सांगावें लागत नाहीं. या पोट भरण्याकरितांच प्रत्येक जण आपआपल्या बुद्धिनुसार उद्योग करित असतो परंतु त्याच्या उलट उत्पत्तिचा विचार फार घोंटाळ्याचा आहे. ईश्वराचे अगाध चातुर्य त्यामध्येंच सांठवलेलें आहे. प्राण्यांचा विचार केला ह्मणजे आपल्याला निरनिराळी स्थिती आढळून येते. मांस कसें सडते, त्याचा दुर्गंध कसा येऊं लागतो, त्याचप्रमाणें तेथें जीवजंतु कसे उत्पन्न होतात वगैरे माहिती अलिकडे सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहाय्यानें सिद्ध होत आहे. हे जंतु उष्णतेच्या शुन्या पेक्षां १० डिग्रीनें जिवंत राहू शकतात व फार वेळ ते पाण्यांत उकळले तर मरून जातात, यामुळें असें तत्व बाहेर आलेलें आहे कीं प्रत्येक प्राणी जन्मावरोबर जीवाचें मूळ बरोबर घेउन येतों. निसर्गाच्या नियमाप्रमाणें जगांत कोणचीहि व्यक्ति येण्यास कांहीं तरी कारण लागतें. या करितां प्रजोत्पादनक्रिया धर्मानें सांगितलेली आहे. त्यामध्यें जीव घालण्याची शक्ति ईश्वराची असते. बांडगुळें एखाद्या आंब्याच्या झाडांवर होतात परंतु आंब्याच्या झाडांवर ही कशीं होतात, सडलेल्या झाडांवर वनस्पती कशा

उद्भवतात हें कां व कसें होतें ही किल्ली त्या परमात्म्यानें आपल्या हातांत ठेवलेली आहे.

समुद्रांच्या सपाटीखालीं आढळणारे स्पंज, मोतीं, प्रवाळ, यांमध्येंसुद्धां सूक्ष्म जंतु असतात, व त्यामुळें यांची वाढ होत असते. दृष्टिला जरी दिसत नसतें तरी त्यांची हालचाल, वाढ, आकार वगैरे बदलत असतो व एकापासून दुसऱ्याची उत्पत्ति होणें हा नियम आपल्याला आढळून येतो. मनुष्यप्राणी जन्माला येण्याला स्त्री व पुरुष यांची जरुरी असते.

पुरुष व स्त्री यांच्या शरिरांमध्यें फरक असतो. स्त्रियांचें शरिर नाजुक असतें व त्या पुरुषांपेक्षां अशक्त असतात. पुरुष म्हटला म्हणजे त्याला वाटेल तीं कामें करतां येतात त्याप्रमाणें स्त्रियांमध्यें आढळत नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांत स्त्रिया पुरुषांप्रमाणेंच प्रत्येक शाखेंत भाग घेऊं लागल्यामुळें व आपण त्यांचें अंधानुकरण करण्याचा विडा उचलल्यामुळें आपल्या देशांत आढळणारा जो भिन्न स्वभाव चालीरिती त्या बदलत चाललेल्या आहेत. पाश्चात्य स्त्रियांचें अनुकरण आपल्यामधील कांहीं सुशिक्षीत स्त्रिया आचरूं लागल्या आहेत त्याचा इष्ट किंवा अनिष्ट परिणाम भावी कालावर सोंपवणें बरें. पुरुष व स्त्रियांच्या उंचींमध्यें, वजनामध्यें फरक असतो. पुरुषांची उंची ५॥ फुट धरली तर वजन १४५ पौंड असतें व स्त्रियांमध्यें ४॥ ते ५ फुट धरली तर वजन १२६ पौंड असतें. हें वजन व उंची हीं प्रत्येक देशांत निरनिराळी आढळते. पुरुषांचे खांदे जरा रुंद, मांड्या आखुड, व अवयव सरळ असतात. स्त्रियांमध्यें मांड्या रुंद, छाती पुढें आलेली, खांदे आखुड, व गळसरी ( Clavicle ) जरा लांब व वळलेलें असतें. या फरकांमुळें ज्याप्रमाणें पुरुषांच्या हातून मर्दानी कामें होतात त्याप्रमाणें स्त्रियांकडून होत नाहींत.

**पेशी व त्याचे भाग**–(Cell & Divisions) कोणचीही पेशी घेतली ह्मणजे त्याच्यामध्यें एक प्रकारचें जीवनीय द्रव्य ( Proto-plasm ) असतें व त्या द्रव्यांच्यामध्यें एक प्रकारचा लहान बिंदु असतो त्याला इंग्रजींत न्युक्लीन असें ह्मणतात. या न्युक्लीन प्रमाणेंच इतर असेच सूक्ष्म लहान पिंड असतात ते आपल्याला सूक्ष्मदर्शक यंत्राशिवाय पहातां येणार नाहींत. या पेशींची वाढ एक प्रकारच्या अदृश्य शक्तिनें होत असतें, त्याला जीवनशक्ति अगर व्हायटॅलीटी असें ह्मणतात. या शक्तिमुळेंच पेशींची हालचाल, वाढ, नवीन उत्पन्न

होणें, या क्रिया चालत असतात. बालपणांत त्या शक्तिची हालचाल विशेष आढळण्यांत येते.

ज्यामुळें प्रजोत्पादन होतें व जो आपल्या वीर्यामध्यें जंतु असतो त्याला/ वीर्यजंतु ह्मणतात.

**पुरुषांचे अंडकोश**—(Scrotum) हे प्रत्येक पुरुषाला दोन असतात. ते मूत्र पिंडाच्या जवळ असतात व जन्माच्या अगोदर पोटांतून खालीं उतरतात. पोटाच्या पडद्यामधून ज्यावेळीं ते खालीं येतात त्यावेळीं तें छिद्र आपोआप बंद होतें. परंतु कित्येकवेळां तें बंद न झाल्यामुळें आंतडें वृषणाच्या कोशांत उतरतें व त्यालाच अंतर्गळ (Hernia) ह्मणतात. कित्येक लोकांमध्यें हे वृषण नसतात त्यामुळें त्यांच्यापासून प्रजोत्पत्ती होत नाहीं परंतु यालासुद्धां कांहीं गोष्टी अपवादात्मक आहेत. उजव्यापेक्षां डावा वृषण कधींकधीं लहान असतो. वृषणाचा व मूत्रमार्गाचा संबंध आहे व तो मूत्राशयांशी संबंध झालेला आहे.

वीर्यजंतु सूक्ष्मदर्शक यंत्राने पाहिला ह्मणजे त्याचा आकार एक साठांश इंच इतका व पृच्छाकार असतो. जीवंत असतांना त्याची हालचाल मेणबत्तीच्या ज्वालेप्रमाणें असते. वृषणांमध्येंच वीर्यजंतु उत्पन्न होतात. तारुण्याची सुरवात झाली ह्मणजे हे वीर्यजंतु तयार होऊं लागतात व ते वृद्धावस्थेपर्यंत होत असतात. वीर्याचा स्राव झाला नाहीं तर याचे शरिरामध्यें पुनः शोषण होते. ओजस तत्व यालाच आयुर्वेदाने ह्मटलेले आहे. २४ वर्षांचा मनुष्य होईपर्यंत वीर्याची पूर्णता होत नाहीं असें नामांकित तज्ज्ञांचें ह्मणणें आहे. ५० वर्षांनंतर हळुहळु यांची प्रजोत्पादनक्रिया कमी होत जाते.

पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांच्यामध्यें स्त्रीअंड असतात. परंतु ते बाहेर नसून आंतल्या बाजूला असतात. ते पुरुषांच्या वृषणासारखे हालचाल करीत नाहींत. या स्त्रीअंडाला लहान नलिका दोन्ही बाजूला दोन असतात व त्यांचा संबंध गर्भाशयांशीं असतो. या स्त्री अंडामधून बीज जें बाहेर पडतें तें गर्भाशयांत नलिकेच्या ( Ovarian-Tube ) द्वारें येतें.

वीर्यजंतुप्रमाणें स्त्रीबीजें जास्त नसतात. साधारणपणें २८ दिवसांनीं एकदां स्त्री ज्यावेळीं ऋतुस्नात होते त्यावेळीं हीं बीजें बाहेर पडतात. त्या बीजाबद्दल पुष्कळ तज्ज्ञांची भिन्न मतें आहेत; त्यांचा येथें विचार करण्याचें कारण नाहीं.

पुरुषांचें वीर्य व स्त्रीबीज यांच्या संयोगानें संतति निर्माण होतें. स्त्री पुरुष संयोग होतांना स्त्रीबीज गर्भाशयांत नसलें तर कांहीं उपयोग होत नाहीं.

संतति न होण्याला इंद्रियांचीं लांबी कमी अगर जास्ती असणें, स्रावांमध्यें आम्लतत्व जास्त असणें, वीर्याचा स्राव, स्त्रीबीज व वीर्यजंतु यांचा संबंध न होणें, वगैरे दुसरी कारणें आहेत. कित्येक वेळां वीर्यामध्यें उत्पन्न होणारा वीर्यजंतु मुळींच नसतो व तो ४० वर्षांपर्यंतही आढळत नाहीं नंतर उत्पन्न होतो. यामुळें आपल्याला कांहीं लोकांमध्यें उतारवयांत संतति झालेली आढळते. या शिवाय, त्याचा विचार "गर्भधारणा" या स्वतंत्र प्रकरणांत केलेला आहे.

गर्भाशयाचा आकार पेरू सारखा आहे. तो स्नायुमय असल्यामुळें त्याचें संकोचन व प्रसरण होतें. गर्भाशयाच्या दोन्ही बाजूला स्त्रीअंड असतात व ते बीज वाहक नलिकेनें जोडले जातात. योनीचें ( Vagina ) मुख व गर्भाशय जेथें जोडले जातें त्याला गर्भशयाची मान ( Neck of the Uterus ) व त्याच्या पुढील भागाला तोंड ( Os ) ह्मणतात. याचाच योनीशीं संबंध असतो.

गर्भाची स्थापना झाली ह्मणजे हळुहळु गर्भाशयाचा आकार वाढत जातो. प्रसुति होण्यास साधारणपणें २८० दिवस लागतात, क्वचित हे दिवस कधींकधीं लांबतात.

**गर्भाशयांत गर्भाचें जीवन कसें असतें:**—आई जे खाणें खाईल त्यावर गर्भाचें पोषण, स्वभाव अवलंबून असतो. गर्भवती स्त्रीला आपलें भावी बालक सुदृढ व्हावें अशी इच्छा साहजिकच असणार. तेव्हां तिनें चहाची संवय असली तर **निदान प्रसुति होईपर्यंत चहा वर्ज्य करावा.** चहा अत्यंत घातुक आहे. रिकेटस्सारखे विकार चहानेंच होतात. ज्या बाईला चहा पिण्याची संवय आहे तिचीं मुलें, दुध न पितां चहाकरितां हट्ट करीत असलेलीं आढळतात.

शिवाय अशा बाईच्या अंगावर दुध मुलांना पुरेसें मिळत नाहीं. तिनें खुल्या हवेंत हिंडलें पाहिजे. त्याप्रमाणेंच नुसतें स्वस्थ बसून न रहातां कामही केलें पाहिजे. प्रसुति होईपर्यंत काम करणारी स्त्री, त्रासाशिवाय बाळंत होते असा अनुभव आहे. गर्भाचें पोषण, नाळ (Placenta) च्या द्वारें होतें नाळामध्यें मज्जातंतु नसतात. आईच्या रक्तांच्या द्वारें गर्भाच्या पोषणाला व वाढीला

लागणारीं तत्त्वें मिळत असतात. गरोदर स्त्रियांनीं कसें वागावें हें खालीलप्रमाणें आपल्या आयुर्वेदांत सांगितलेलें आहे.

गर्भिणी स्त्रीनें व्यायाम, उपवास, बैलगाडीचा प्रवास, रात्रींचें जागरण करणें, रक्त काढणें, मलमूत्रादि वेगांचा अवरोध, भयंकर, नकल्या, खुज्या, स्त्रियांशीं बोलणें अगर स्पर्श करूं नये. कानांला अप्रिय असें भयंकर शब्द ऐकूं नयेत. शिळें अन्न, पुनः ऊन केलेलें अन्न, मुळींच खाऊं नये. बाहेर पडणें, वड, पिंपळ या झाडाखालीं संध्याकाळच्या समयीं बसणें वर्ज करावें. उंच उशी घेऊं नये. नुसत्या सतरंजीवर निजूं नये. त्याचप्रमाणें तेल लावून घेऊं नये.

गर्भ राहिल्यापासून स्त्रीनें आनंद वृत्ति ठेवावी. चांगलीं वस्त्रें अलंकार घालावेत. गुरु, ब्राह्मण, देव यांचें दर्शन घ्यावें, व हलकें अन्न सेवन करावें. इंद्रिय विज्ञान शास्त्रदृष्ट्या विचार करतां, गर्भ राहिल्यानंतर स्त्रियांच्या मज्जातंतुवर विशेष परिणाम होतो याकरितां वरील गोष्टी पाळल्यास मज्जातंतु व मेंदूवर परिणाम होत नाहीं व अप्रत्यक्षपणें बालकांवर होणारा अनिष्ट परिणाम टळतो, परंतु अशा प्रकारचा नियम किती कुटुंबांत पाळले जात असतील ह्याचा ज्यानें त्यानें विचार करावा. ईश्वर सर्व कांहीं करतो. त्याच्या इच्छेनें सर्व कांहीं होतें हें जरी खरें मानून चाललें तरी मानवीनियम बुद्धिनुसार पाळले तर बालक खात्रीनें निरोगी झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

नऊ महिने पूर्ण झाल्यानंतर बालक जन्माला येतें, व तिसऱ्या दिवसां-पासून मुलाचें पोषण होण्याकरितां त्या प्रभूनें आईच्या स्तनांत दुधाची व्यवस्था केलेली असते.

अलिकडे जागेच्या अभावीं पुष्कळशीं बाळंतपणें हास्पिटलमध्यें होत असतात, व त्यापैकीं बऱ्याच बायकांच्या अंगांवर मुलांना पुरेसें दुध मिळत नाहीं. तिकडे ब्रँडी देण्यांत येते, त्यामुळें दुधावर परिणाम होतो. शिवाय चहा अतिशय पिणाऱ्याच्यामध्येंही दुध निसर्गतः कमी असतें. बाळंत झाल्यानंतर गर्भाशय सैल झालेला असतो. जसें जसें अंगांवर मूल दुध पिईल त्या त्याप्रमाणें गर्भाशयांचें संकोचन होत जातें व तो ९।१० दिवसांत पूर्वस्थितीवर येतो; त्यांच्या उलट मुलाला दुध मिळालें नाहीं ह्मणजे ज्या प्रमाणांत गर्भाशयाचा आकार कमी झाला पाहिजे त्याप्रमाणें होत नाहीं. त्यामुळें स्राव बाहेर जाणें कमी होतें व स्राव आंत राहिल्यामुळें कुजतो व यामुळें बाळंत रोगांसारखे

विकार होतात. आईच्या दुधांतून मिळणारा कॅलसियम खात्रीनें गाईच्या दुधापेक्षां श्रेष्ठ आहे. चहा अंगांतील बारीक कडकी उत्पन्न करून दुध कमी करतो व हीच कडकी पुष्कळशा स्त्रियांना एकही बाळंतपण सिद्धीस जाऊं देत नाहीं. दाईचें दुध मुलांस देण्याची रीत आह्मीं पाश्चात्यांची उचलली आहे दाई कशी असावी याबद्दल सांगावयाचें ह्मणजे सुशील, कुलीन स्वच्छता राखणारी असावी. ज्याप्रमाणें दाईचा स्वभाव असेल त्याप्रमाणें मुलांत गुण उतरतात. शक्य तोंपर्यंत दाईचें दुध न देणें बरें; त्यापेक्षां गाईचें निर्भेळ दुध घ्यावें. मुंबईच्या गोरक्षणशाळेनें स्वल्पदरानें मुलांना गाईचें निर्भेळ दुध देण्याची व्यवस्था केलेली आहे ती खात्रीनें कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे. भावि पिढीचे आशिर्वाद त्यांना मिळाल्याशिवाय रहाणार नाहींत. अलिकडे गाईच्या दुधाऐवजीं सुशिक्षीत कुटुंबांत आमचा डॉक्टरवर्ग त्याचप्रमाणें बेबीवुइकमध्यें काम करणाऱ्या पदवीधर स्त्रिया लहान मुलांना हजारो मैलांवरून येणाऱ्या डब्यांतलें दुध पाजण्याची शिफारस करीत असलेल्या आढळतात. ताजें गाईचें दुध सोडून स्वाभिमान विसरून आह्मीं लहानपणापासून मुलांच्या पोटांत अशाप्रकारें डब्याचें दुध बाळकडु ह्मणून पाजित असतो; तर अशा प्रकारें दुध पिणारीं मुलें राष्ट्रांच्या अभ्युदयाला कितीशीं उपयोगी पडतील व पडत आहेत याचा विचार प्रत्येकानें करावा.

मूल बाहेर आल्यानंतर प्रथम रडूं लागतें, रडूं लागलें ह्मणजे त्याचीं फुप्फुसें हवेनें भरतात. व श्वासोश्वास क्रिया चालू होते. व त्यानंतर खरें रुधिराभिसरण सुरू होतें. आईच्या स्तनांतून ज्यावेळीं प्रथम मूल दुध पितें त्यावेळीं त्यामध्यें जुलाब होण्याचें द्रव्य असतें त्याला ( Colostrum ) ह्मणतात. त्यामुळें पोट साफ होतें व खरें दुध तिसऱ्या दिवसानंतर मिळूं लागतें. बाळंतिणीच्या मनांवर दुःखाची गोष्ट अगर मनावर धबका होण्यासारखी बातमी न पडेल याची खबरदारी घ्यावी. याप्रमाणें न केल्यास दुधावर परिणाम होऊन मुलांला अतिसार, मुरडा, आंकडी, उलटी यासारखे विकार होतात.

जन्मलेल्या मुलांचें वजन ६ ते ७॥ पौंड असतें. लहान मुलाला स्पर्शज्ञान नसल्यामुळें त्याला कोठें दुखते वगैरें कळत नाहीं. कांहीं आठवडपर्यंत त्याला ऐकूं येत नाहीं, यामुळें मूल बहिरें असावें असें वाटतें. कानांमध्यें घट्ट मळ सांठलेला असल्यास तो काढून टाकल्यास २-३ आठवड्यानीं सुधारणा होते. आपल्यामध्यें

तिळाचें तेल पहिल्यापासून घालण्याची रीत आहे ती याकरितांच आहे. मोठा आवाज ऐकल्यानंतर तें दचकून डोळे मिटतें. तिसऱ्या महिन्यास त्याला ऐकूं येतें व तें आवाजाप्रमाणें डोकें वळवतें. ५–६ महिन्यांत मुलाला चांगलेंच ऐकूं येतें. पहिल्या कांहीं महिन्यांत डोळ्यावरून त्याला समजत नाहीं. उजेड पडला ह्मणजे चटकन् तें डोळे मिटतें. चार महिन्यानंतर मूल आपल्या आईला ओळखूं शकतें व परके इसम बघितल्यास तावडतोब रडूं लागतें. जिभेची रुचि व वास हा जन्मापासून चांगलाच असतो. त्याला साखर व मीठ याची रुचि समजते, त्याचप्रमाणें अमोनीया वगैरे सारखा कडक वास त्याबरोबरच समजतो. भूक लागली ह्मणजे मूल रडूं लागतें व दुध पाजल्यानंतर रडणें कमी होऊन तें तात्काळ झोपीं जातें.

जननेंद्रियें, ह्मणजे, शिश्न व अंड हीं होत. अंड ज्या कोशांत वेष्टिलेले असतें त्यांना वृषण कोश ( Scrotum ) म्हणतात. शिश्नाचा उपयोग, लघ्वी करण्याच्या कामीं, त्याचप्रमाणें स्त्री संयोग करण्याकडे होतो. शिश्न पेशीमय असून त्यामध्यें असंख्य सूक्ष्म रक्तवाहिन्या असतात. मनोविकार जागृत होतात त्यावेळीं त्याच्यामध्यें ताठरपणा ( Turgid ) येतो व वीर्यस्राव झाल्यानंतर पूर्ववत् त्याचा आकार होतो. त्या मार्गाला मुत्र मार्ग ( Urethera ) म्हणतात. या मार्गातूनच वीर्यस्राव होतो. हा मार्ग एक प्रकारच्या कातडीनें आच्छादलेला असतो. वीर्याचा साठा अंडामध्यें असतो, त्याचा स्राव नच झाल्यास तें परत शरिरांमध्यें शोषलें जातें. वीर्य, हें शक्ति व कांति वाढवणारें आहे. ज्यांना तारुण्यांत मुष्टिमैथुनांसारख्या वाईट संवयी लागतात, त्याचप्रमाणें चहापान, विडी, दारू, याचें व्यसन लागतें, अशा लोकांच्यामध्यें उष्णता उत्पन्न होऊन वीर्यामधील तत्वें कमी होतात, त्यामध्यें पातळपणा येतो, ताबा रहात नाहीं व न समजतां आपोआप स्राव होत असतो.

ज्यांच्यामध्यें अकाली वीर्यस्राव, स्वप्नावस्था होत असते, अशाचें चेहरे नेहमीं चिंतातुर, चंचल स्मरणशक्तिहीन असें दिसतात थोडेसें काम केल्यास थकवा, भूक नसणें अशा प्रकारचें विकार होतात. ( 'तारुण्यांतील विकार' या सदरांखालीं पुढें याचें विवरण विस्तारपणें करण्यांत येईल ) मनुष्य ज्यावेळीं तारुण्यांत येतो, त्यावेळीं त्याचे मनोविकार जाग्रत होतात, तोंडावर मुरमें येतात, त्याला

तारुण्य निठीका ( Acme ) म्हणतात. वीर्यामध्यें जें तत्व आहे, त्याला ओजस तत्व म्हणतात. या तत्वावरच पुरुषांचें पुरुषत्व व जिवीत्व अवलंबून असतें. ओजस तत्वाला इंग्रजीत व्हायटॅलिटी म्हणतात. हें तत्व जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत मनुष्याच्या हालचाली होत असतात, व औषधांचीं कार्यें घडत असतात. याचा क्षय झाला म्हणजे कांहींही लागू पडत नाहीं. मूत्राशयाच्या खालीं ( Bladder ) एक प्रकारची ग्रंथी आहे, तिला प्रोस्टेट ग्लॅंड म्हणतात. हिच्यामधून होणारा स्राव, वीर्याबरोबर होत असतो. ही गांठ वृद्धावस्थेंत मोठी होते व त्यामुळें, लघ्वी बाहेर पडण्यांस त्रास पडतो. विशेषतः उपदंश, पुप्रमेह, या रोगांमध्यें ही गांठ मोठी झालेली आढळण्यांत येतें.

प्रोस्टेट ग्रंथीच्या बाजूला निराळया लहान ग्रंथी आहेत त्याला कॉपर्स ग्रंथी म्हणतात, यांतून होणारा स्राव वीर्याचा एक भाग असतो.

**स्त्रियांमधील जननेंद्रियें**—स्त्रीअंड ( Ovaries ), गर्भाशय ( Uterus ), स्त्रीवीज वहाणाऱ्या नलिका (Fallopian-tubes) व योनी, हीं होत, या सर्वांना इंग्रजीमध्यें व्हाल्व्हा ( Vulva ) म्हणतात. योनीच्या बाहेर जो एक ग्रंथीयुक्त भाग असतो त्याला क्लीटोरीज म्हणतात. आंतल्या बाजूचा स्नायुमय भाग असतो त्याला लेबीया (ओष्ठ) लहान व मोठे असे म्हणतात. योनीच्या आंतील भाग एका पातळ पडद्यानें वेष्टलेला असतो, त्याला हायमेन म्हणतात. या पडद्यावरून स्त्रिच्या कुमारित्वाची साक्ष पटते, परंतु रोगानें अगर आकस्मिक मनावरील धक्क्यामुळेंसुद्धां हा पडदा तुटण्याचा संभव असतो. योनी मार्ग हा मूत्राशय व गुदद्वार [ Anus ] यांच्या मधीमध आहे. स्त्रीअंडामधून जें स्त्रीवीज निघतें तें स्त्रीवीज नलिके द्वारा गर्भाशयांत येतें.

अशावेळीं जर पुरुषांच्या वीर्यामधील वीर्यजंतु तेथें हजर असला तर त्यांचा संयोग होऊन गर्भधारणा होते. तारुण्यावस्था पुरुषांमध्यें १८ वर्षांनंतर सुरु होते, व स्त्रियांमध्यें १२ वर्षांपासून सुरू होतें. हा फरक प्रत्येक देशांतील हवामानांवर अवलंबून असतो. इंग्लंडसारख्या थंड देशांत हा काल बराच लांबलेला आढळतो. हिंदुस्थानांतील हवा उष्ण असल्यामुळें, स्त्रियांमध्यें त्याच-प्रमाणें पुरुषांमध्यें, तारुण्यावस्था लवकर आढळते. हवामानाशिवाय, स्वभाव, प्रकृति, संवयी, आनुवंशिकपणा, शिक्षण, ह्यांवर ही सर्व अवलंबून असतें.

व्यायाम करणारा वर्ग ह्यामध्यें, यौवनावस्था, लवकर आढळत नाहीं. कादंबऱ्या, ज्यामुळें स्त्रीपुरुषांच्या प्रेमांचीं वर्णनें वाचून मनोविकार उद्दीपन

होतात, अशामुळेंसुद्धां यौवनावस्था अकालीं येते. याकरितां, प्रत्येक आई-बापांनीं मुलाला १६ वर्षें लागल्यानंतर तो पुस्तकें काय वाचतो, त्याची संगत कोणच्या प्रकारची आहे, तो खाणें काय खातो, इकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे.

तारुण्यावस्था प्राप्त होते त्यावेळीं मुलांच्या खाण्यापिण्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. मसालेदार पदार्थ, मांसाचेरस ज्यामध्यें उत्तेजक द्रव्यें घालून तयार करतात; अशा प्रकारचे पदार्थ त्याचप्रमाणें चहा, कॉफी वगैरे अवश्य बंद केलीं पाहिजेत. मटण खावें म्हणून जे उपदेश करतात, त्यांनीं तारुण्यावस्थेच्या भावी परिणामांकडे लक्ष दिलेलें दिसत नाहीं. मासे, मटण वगैरे प्राणीज पदार्थ, यांमध्यें ताकद वाढवणारी द्रव्यें आहेत, हें जरी खरें आहे, तरी त्यांमध्यें पडणाऱ्या मसालेदार, उत्तेजक पदार्थांमुळें, फायदा न होतां तोटा होण्याचा संभव विशेष असतो. यापेक्षां ताज्या पालेभाज्या, चपाती, पाव व लोणी, दुधभात, अशा प्रकारचें सात्विक पदार्थ खाण्यांत आले, तर मनोविकार उद्दीपत होत नाहींत. व जननेंद्रियांची पूर्णावस्था होण्याचा कालही वाढतो. आई-बापांनीं अशा काळांत मुलांवर सक्त लक्ष दिलें पाहिजे. व त्याच्या अन्नांमध्यें फेरबदल केला पाहिजे. ज्या मुली पित्तविकाराच्या असतात., फार चहा घेणाऱ्या असतात, शेवगाठी, भजी यांसारखें, तळलेलें पदार्थ विशेष खातात, त्यांच्यामध्यें रजोदर्शन अकालीं येतें. १२ ते १४ व्या वर्षी, रजोदर्शन ज्या मुलीमध्यें होतें, त्यांचें आयुष्यही मर्यादितच असते. रजोदर्शन अशा लहान वयांत आलें म्हणजे, जुन्या तऱ्हेचें आईबाप मुलीच्या लग्नाची घाई करतात. व लग्न झालें म्हणजे मुलांची परंपरा पाठीमागें लागतें. रजोदर्शन अकालीं होणें हें निरोगीपणाचें लक्षण नव्हे; शिवाय, जननेंद्रियांची पूर्णावस्था रजोदर्शनावर अवलंबून नसते. तेव्हां अशाप्रकारच्या जोडप्यांपासून होणारी संतति, पाप्यांचे पितर झाली तर दोष कोणाचा याचा सुज्ञांनीं विचार करावा. अल्पवयांत मातृपद प्राप्त झालेल्या स्त्रिया बहुतेक बाळंतरोग होऊन मरण पावतात. याकरितां अकालीं जरी रजोदर्शन झालें, तरी सुज्ञ स्त्री पुरुषांनीं स्त्री १६ ते १७ वर्षांची होईपर्यंत संभोग न करणें बरें. हा उपदेश ज्यांना मान्य नसेल, त्यांनीं मग आपल्या कर्माला व देवाला हात लावून औषधांच्या बाटल्या घेत रहाव्या यापेक्षां दुसरा मार्ग नाहीं.

# प्रकरण ५ वें

—:o:—

## तारुण्यावस्थेमध्यें होणारा स्त्री पुरुषांमधील फरक

तारुण्याचा पगडा बसूं लागला म्हणजे पुरुषांमध्यें छाती व खांदे जरा रुंद, आवाज मोठा होणें, हनुवटी, दाढी, गाल यावर केस येतात. जननेंद्रियें वाढीस लागतात, वीर्याचा स्राव कधींकधीं होतो. स्त्रियांमध्यें नितंब व पोट मोठें होतें. स्नायू व सांधे, साधारण मोठे होतात व एकप्रकारचा सुंदरपणा व मोहकपणा त्यांच्या ठिकाणीं दिसूं लागतो. पुरुषांना पाहिल्या नंतर लज्जा उत्पन्न होते. स्तनाची वाढ व दर २८ व्या दिवशीं, रजस्राव सुरु होतो. हा जो स्त्रियांमध्यें फरक होतो त्यावेळीं त्यांच्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. शहरांसारख्या ठिकाणीं १४ व्या वर्षींच मुलींना ऋतू प्राप्त झालेला पहाण्यांत येतो. स्त्रीबीजें त्यावेळीं गर्भाशयांत येत असतात; व यामुळें मनोविकार उद्दीपन होण्याचा विशेष संभव असतो. यामुळेंच जुन्या विचाराचीं माणसें लवकर लग्न करून टाकण्याच्या मार्गास लागतात. पूर्वकाळिन लग्नपद्धति पालटल्यामुळें अष्टवर्षांभवेत्कन्या हा मंत्र जाऊन १६ ते २५ च्या पुढेंही मंत्र म्हणण्याची वेळ आलेली आहे. एकत्र कौटुंबिक पद्धती अलिकडे मोडली असल्यामुळें, मुलगा नोकरीस लागला म्हणजे बिऱ्हाड करण्याच्या तयारीस लागतो; नोकरी हें ध्येय त्याकाळीं आजच्यासारखें नसल्यामुळें एकत्र कुटुंबांत, अल्पवयाच्या ८–९ वर्षांची मुलगी व १६ वर्षांचा मुलगा अशाप्रकारची लग्नें होत असत. ऋतूस्नात होईपर्यंत, कसें वागावें, वगैरे प्रकारचें शिक्षण तिच्या सासुसासऱ्याकडून मिळत असे व १४ वर्षांची होईपर्यंत संभोग होणेंच कठीण अशाप्रकारची स्थिती त्या कामीं होती. आज तशी स्थिती राहिली नाहीं. लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं आईबापापासून फडकून राहून आजच्या तरुणांची स्वतंत्र बिऱ्हाड करण्याची प्रवृत्ति असते. उभयतांही तारुण्यांत असल्यामुळें शहरासारख्या ठिकाणीं रहाणाऱ्या जोडप्यांवर आपण करूं ती पूर्वदिशा असें मनाला वाटत असते मनावर ताबा नसतो. पगार व्यवस्थित असला म्हणजे, सिनेमा, नाटकें यांचे ढंग सुचतात,

व जे नियम पाळले पाहिजेत ते पाळले जात नाहींत; यामुळें अधाशी मनुष्य ज्याप्रमाणें बेतावाहेर खाऊन मृत्युमुखीं पडतो त्याचप्रमाणें स्वैर वर्तनामुळें अशा प्रकारच्या स्त्री-पुरुषांवर पाळी येते. संतति नियमन वगैरे पाश्चात्य चळवळी अंगीकारण्यांचा प्रयत्न जरी करण्यांत आला, तरी जेथें सर्वच निसर्गाच्या विरुद्ध आमच्या गोष्टी चालल्या आहेत, तेथें अशापासून कितीसा फायदा होणार? संतति नियमनाची चळवळ म्हणजे थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, मी वाटेल तितकें खाणार परंतु अजीर्ण होतां कामा नये. हें म्हणणें ज्याप्रमाणें हास्यास्पद आहे, त्याचप्रमाणें ही चळवळ आहे. मुलें व्हावयाची बंद केलीं व ब्रह्मचर्याचें पालन झालें नाहीं तर क्षयासारखे विकार पुरुषांना होऊन विधवांची संख्या वाढेल याला जबाबदार कोण? असा तारुण्यावस्थेंत होणाऱ्या चुका टाळण्यासाठीं स्त्रीपुरुषांनीं कसें वागलें पाहिजे याची कल्पना पुढील कांहीं नियमावरून येईल.

( १ ) तरुण स्त्रीपुरुषांनीं, फार मानसिक त्याचप्रमाणें शारिरीक काम करूं नयेत. याचें कारण म्हणजे इंद्रियांच्या वाढीमध्यें फरक होत असतो व अशावेळीं अंगाबाहेर काम केल्यास त्यांच्या वाढीमध्यें अडथळा येण्याचा संभव असतो.

( २ ) कांहींना कांहीं उद्योगांत मन नेहमीं गुंतलेलें असावें. आळसांत बसून राहूं नये. देवादिकांची चरित्रें, त्याचप्रमाणें भक्तिप्रद ग्रंथांचें वाचन ठेवावें.

( ३ ) नेहमीं उघड्या हवेंत सहल करावी. सूर्यप्रकाश व शुद्ध हवा हीं तत्वें जीवन देणारीं आहेत.

( ४ ) संगती चांगली ठेवावी. चंचल स्वभावाचीं तरुण-स्त्रीपुरुषें संगतीनें बिघडतात.

( ५ ) चटकदार, प्रेमविषयक, कादंबऱ्या, त्याचप्रमाणें चहासारखीं उत्तेजक व मादक पेयें वर्ज्य करावींत.

# प्रकरण ६ वें

—:o:—

## रजःस्राव.

या प्रकरणांत ज्या विषयांचा ऊहापोह करावयाचा आहे, तो अत्यंत नाजूक आहे. पाश्चात्य व पौर्वात्य स्त्रियांमधील स्वभावाचा मुख्य फरक म्हणजे आपल्या स्त्रिया अत्यंत मर्यादशील व लाजाळू असतात. त्यांना काय होतें, हें त्यांच्या अंगांत जोंपर्यंत सहनशक्ति आहे, तोंपर्यंत त्या कोणाला फार काय स्वतःच्या पतीला सांगावयाच्या नाहींत. आपल्या समाजांतील कोणतीहि स्त्री आजारी पडली म्हणजे तो आजार बरेंच दिवसाचा आहे असें खुशाल समजावें. हा आनुवंशिक स्वभाव घातुक असला व समाजसुधारक यांच्यामतें, जरी कनिष्ट प्रतीचा असला, तरी या स्वभावानें, याव वागण्यानें, आपल्या हिंद भूमीची अब्रु आज टिकून राहिली आहे. स्त्री पुरुषांच्या जननेंद्रियाची माहिती मागें आलेलीच आहे. या जननेंद्रियाचा कमी जास्ती उपयोग होण्यावर स्त्री-पुरुषांची प्रकृति अवलंबून असते. संतति–नियमन–प्रवर्तक कांहींहि म्हणोत, परंतु कोणचीही गोष्ट नियमित व प्रमाणबद्ध पाहिजे.

मुंबईसारख्या शहरांत, ज्या कुमारिका आहेत, त्याचप्रमाणें ज्यांचीं लग्नें झालेलीं आहेत, त्यापैकीं किती स्त्रियांची प्रकृति निरोगी असेल? त्यांचा मूळचा नाजुकपणा अगर सुदृढपणा कायम दिसावा म्हणून फॅशनच्या नावाखालीं वाटेल तेवढी चेरीव्लासमची पॉवडर लावली तरी आजारीपणाची झांक व कृत्रिमपणा नजरेस आल्याशिवाय रहाणार नाहीं आजकालचे आह्मी इंग्रजी शिकून तरबेज झालेले लोक, जुन्या गोष्टीला नेहमीं नांव ठेवीत असतों. परंतु त्याचवेळीं, त्या जुन्या गोष्टींवा आजच्या शास्त्रानुसार विचार केला, तर पुष्कळशा गोष्टी चांगल्या आहेत. असेंच अनुभवास येतें; परंतु हें डोळे उघडे ठेवणाराला पटणार हें उघड आहे. ज्यांच्या घरांत आज म्हातारी वयोवृद्ध माणसें आहेत, त्यांची ताकद, करारीबाणा, आजकालच्या पिढींत कां दिसूं नये! याचें कारण म्हणजे आपली धर्माची परंपरा मोडली हें होय.

पूर्वी जें धार्मिक शिक्षण आपल्याला मिळत असे व जें शिक्षण आरोग्य-शास्त्राच्या पायावरच रचलेलें होतें त्याचा अभाव सध्यां फार भासत आहे हें प्रत्येकाला बारकाईनें विचार केल्यास आढळून येईल.

हल्लीं जग सपाट्यानें सुधारत चाललें आहे. परंतु एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं या सुधारणेनें आमचे जीवित सुदृढ होण्याऐवजीं अशक्त व नाना-प्रकारच्या संकटांशीं टक्कर देण्यास नालायक झालेलें आहे.

स्त्रियांच्या बाबतींत गर्भाशयाचे विकार हें अशक्तपणाचें मुख्य कारण आहे. जननेंद्रियाची रचना इतकी गुंतागुंतीची आहे, कीं त्यांच्या मज्जातंतूंच्या कार्यांत बिघाड झाला ह्मणजे सर्व शरिरांवर त्याचा परिणाम होतो. नूतन विवाहीत स्त्री जिला कांहीं महिने लोटले आहेत ( गरोदरावस्था ) तिला खालील प्रकारचीं लक्षणें आढळतात. उलटी, पोटांत गडबड, बेचैन होणें, शिवाय हीच लक्षणें कांहीं बाबतींत बाळंत होईपर्यंत चालू असतात.

गरोदरावस्था प्राप्त होणें हा निसर्गाचा नियमच आहे, परंतु हा गरोदरपणा, त्रासिक व्हावा अशी त्या प्रभूची इच्छा नाहीं. तेव्हां हें कसें टाळतां येईल, याचा विचार करण्यापूर्वी स्त्रियांमध्यें प्रथमतः जो रजःस्राव सुरु होतो, याची माहिती करुन घेतली पाहिजे. आपल्या देशांत १३ ते १४ वर्ष लागलें, ह्मणजे प्रत्येक मुलीला रजोदर्शन प्राप्त होतें. कांहीं मुलींना हें समजत नहीं. व त्यामुळें, त्या एकदम घाबरुन जातात व घाबरल्यामुळें, गर्भाशयांतून होणाऱ्या स्रावाला प्रतिबंध होतो. हा स्राव निरोगी अवस्थेंत दर अठ्ठावीसाव्या दिवशीं होतो. या दर महिन्याला होणाऱ्या रक्तस्रावावर स्त्रियांचा निरोगीपणा अवलंबून असतो. या स्रावाच्या बरोबर पुष्कळशी घाण बाहेर जात असते. ह्या रजस्रावाची माहिती प्रत्येक मुलीच्या आईनें तिला दिली पाहिजे.

प्रथम रक्तस्राव होताना कांहीं स्त्रियांमध्यें कमर दुखणें, पायांत कळा येणें, पाठ दुखणें, जरा थंडी वाजणें, चैन न पडणें, डोकें जड होणें, चक्कर येणें अशी लक्षणें होतात. प्रकृती चांगली असली तर हीं लक्षणें होत नाहींत. रक्तस्रावाची सुरवात ह्मणजे स्त्रियांमधील तारुण्याची सुरवात असें समजण्यास हरकत नाहीं.

हा रजस्राव जोंपर्यंत गरोदरावस्था प्राप्त झाली नाहीं तोंपर्यंत दर २८ व्या दिवशीं नियमीत यावयाचा असा निसर्गाचा नियम आहे. अलिकडच्या काळांत

३० वें वर्षपर्यंत काळजी व बरीच मुलें झाल्यामुळें लवकर वृद्धावस्था प्राप्त होते. खरा विचार केला असतां ४५ व्या वर्षी बहुतेक स्त्रियांचा विटाळ अजीबात बंद होतो. ज्यांची प्रकृति चांगली नाहीं, त्यांना हा रजस्राव महिन्यांतून दोनदां, अनियमीत व वरील लक्षणानें युक्त असा असतो. गरोदरावस्था ही नेहमीं पाळी सुरू होण्याच्यापूर्वी दोन दिवस अगर नंतर १५ दिवसपर्यंत होऊं शकते. या संबंधीं सुद्धां भिन्न मतें आहेत. पुरुषांचा वीर्यजंतु ३६ तासपर्यंत गर्भाशयांमध्यें राहूं शकतो व याचवेळीं स्त्रियांच्यामधील बीज हजर असलें तर गर्भधारणा होतें, नाहीं तर हा जंतु स्रावांबरोबर वाहून जातो.

या रजस्रावांचा उपयोग काय याचा विचार करूं. स्त्रियांमध्यें असलेले स्त्रीअंड हें बीज व एक प्रकारची घाण, बीज वाहक नलिकेच्या द्वारा गर्भाशयांत सोडित असतात व ही घाण दर आठ दिवसाच्या दिवशीं निसर्ग बाहेर टाकित असतो. हा जो रक्तस्राव वहातो, यामधील रक्त जीवनाला उपयोगी नसतें, त्यामुळें तें बाहेर जाणेंच योग्य असतें. हें ज्यांना ज्ञान नाहीं, त्या स्त्रियांवर रोगाची छाया हळुहळू पडूं लागतें. स्तन व जननेंद्रियें यांचा संबंध आहे. रक्तस्राव सुरूं होतो, त्यावेळीं स्तनांमध्येंही वाढ सुरूं होते. गर्भाशयाचा अगर स्त्रीअंडामधील विकार असल्यास स्तनामध्यें दुखावा सुरू होतो.

ज्यांना मूल होत नाहीं, ज्यांच्या स्त्रीअंडामधून स्त्रीबीजें तयार होत नाहींत व गर्भाशयांत जात नाहींत त्यांचे स्तनांचीही वाढ होत नाहीं. पाळी अनियमीत येणें व त्यावेळीं पोटांत दुखणें, याला कारण म्हणजे गर्भाशयाच्या अंतःत्वचेचा दाह, अगर योनीमध्यें असणारा जो पडदा, त्याचा अडथळा हें होय. हें लक्षण कळल्यानंतर, जर पतीला ही हकिगत कळवली नाहीं, तिकडे लक्ष दिलें नाहीं, तर हें विषारी रक्त शरिरांमध्यें भिनून निराळे विकार उत्पन्न होतात ओटीमध्यें दुखणें ही निसर्गाची ताकीद आहे, असें समजून उपचार करावेत. थंडी, त्याचप्रमाणें गर्भाशयांचा मार्गांत ग्रंथी यामुळेंसुद्धां दुखावा होतो, एखादेवेळीं गर्भाशयांची मान बाजूला वळत असतें व स्राव येण्यास अडथळा येतो; शिवाय स्त्रीअंडांमध्यें व गर्भाशयांमध्यें रक्ताधिक्य, तोंडावर मोड असणें ( Polypus ), वगैरे कारणें असतात. तरी सूज्ञ स्त्रीनें डॉक्टरला दाखवून त्याप्रमाणें इलाज करावा.

ज्यांच्या अंगांत रक्त कमी झालेलें आहे, अशांना आर्तव साफ येत नाहीं, व आल्यास प्रथम दिवशीं थोडेसें येतें. जिच्या अंगांत रक्त असून पाळी येत नाहीं, प्रकृति निरोगी आहे, त्यांचें तोंड लाल रुंद कपाळ दुखणें, कमर दुखणें, पाठींत कळा, स्त्रीअंडांमध्यें कळ येणें हीं लक्षणें होतात. वेळींच जर कळ आली तर उर्ध्व क्रिया होऊन, फुप्फुसांतून गुदद्वारानें नाकांतून रक्तस्राव होतो. गर्भावस्थामुळें जर स्राव बंद झाला, तर स्तनाच्या बोंडीमध्यें फरक होतो.स्तन घट्ट लागतात व पोट हळुहळु मोठें होऊं लागतें.पायाना सुज कित्येकांमध्यें येत नाहीं. एखादेवेळीं गर्भाशयांत ग्रंथी झाली तरीसुद्धां अशाप्रकारचीं लक्षणें होऊं लागतात. असो रज:स्रावाच्या संबंधी वेळींच काळजी घेतली नाहीं तर पांडुरोग, क्षय असे दुर्धररोग होऊन स्त्रिया मृत्युमुखीं पडतात. ज्यांचें लग्न झालेलें नाहीं, अशा कुमारिका वयांत आल्यानंतर प्रतिकूल गृहस्थितींशीं तोंड द्यावें लागत असल्यामुळें नानाप्रकारच्या प्रेमविषयक कादंबऱ्याच्या वाचनामुळें मनावर परिणाम होऊन, त्यामुळें रज:स्रावामध्यें अनियमीतपणा येतो. प्रख्यात डॉ. मेरिस्टोपंत, हावेलीक एवीजसारखे या विषयांतील तज्ज्ञ असे ह्मणतात कीं, लग्न झालेल्यांमध्यें आर्तवाच्यावेळीं पिडा होते याला कारण शोधलें असतां असें आढळून येते कीं, पुरुष व स्त्री संयोग होतांना, स्त्रीची इच्छा त्यावेळीं अतृप्त राहिल्यामुळें, ज्या स्रावामुळें परस्परांना समाधान होतें, तें समाधान एकाच वेळीं न झाल्यामुळें, बायकामध्यें हे विकार उत्पन्न होतात. परस्पराचें समाधान, हेंच गर्भस्थापनेचें मुख्य लक्षण आहे. असो. पुढल्या प्रकरणांत प्रदररोगांचा विचार करून जननेंद्रियांची काळजी कशी घ्यावी याचा उहापोह करूं.

---

# प्रकरण ७ वें.

—:0:—

## प्रदर.

योनीमधून एक प्रकारचा जो पातळ, चिकट स्राव वहातो, त्याला प्रदर अगर धुपणीचा विकार असें ह्मणतात. या विकाराची जर वेळींच काळजी घाळगली नाहीं तर तो स्राव घट्ट, पुवासारखा व एकसारखा सुरु होतो. हा विकार बरेच दिवस अगर महीने चालू राहिला ह्मणजे त्याचा रंग हिरवट, पिवळट व घाण मारुं लागते. या विकारांमुळें स्त्रीची मनःस्थिती बिघडून जाते, तिला काम करावेंसे वाटत नाहीं, भूक लागत नाहीं, सुस्ती वाटते, चक्कर येणें, छातींत धडाका, श्वासोश्वासामध्यें प्रतिबंध झाल्यासारखें वाटणें, फिक्कटपणा, डोळयाच्या भोंवतीं काळसरपणा, मांड्या व कमर यांमध्यें फुटाफुट, अशी लक्षणें होऊं लागतात. विशेषतः सकाळीं याची जाणीव फार होते. हा स्राव बरेच दिवस चालू राहिल्यामुळें त्याला पुवाचें स्वरूप येतें, व त्यामुळें कित्येक संशयी नवरे, आपली स्त्री दुराचारी आहे किंवा काय याचा संशय घेतात. ज्या स्त्रीच्या कुलांत आनुवंषिक गंडमाळा, क्षय, यासारखे विषजन्य विकार असतात अशामध्यें पूप्रमेह हा ( Gonorrhoea ) सारखीं लक्षणें आढळतात. प्रदरांचा विकार जोंपर्यंत स्थानिक म्हणजे योनीच्या मध्येंच असतो तोंपर्यंत बरें असतें. अशावेळीं तुरटीच्या पाण्यानें, पोटॅशपरमॅंगनेट, त्रिफळयाचा काढा, यानें योनी धुतली असतां विकार लवकर बरा होतो. परंतु आपल्या स्त्रियांचा स्वभाव लाजाळु असल्यामुळें त्या सहसा सांगत नाहींत. म्हणून सूज 'पती, याची जाणीव बाह्य लक्षणावरून अगर लघवी ग्लासांत धरून पाहिल्यास कळून येईल. असो. हा स्राव असाच सुरू राहिला तर सूज गर्भाशयांपर्यंत जाते व त्यामुळें, स्त्रिया रागीट चिंतातूर मनाच्या दुर्बळ बनतात व हिस्टेरिया, क्षय अशा प्रकारचे विकार त्यांना जडतात. स्त्रियांमधील प्रदर म्हणजे पुरुषांमध्यें होणारा धातुस्राव ज्याप्रमाणें शक्ति क्षीण करतो त्याप्रमाणें, स्त्रियांमध्येंही शक्ति क्षीण करतो. ज्या तरुण मुली, ज्यांचें लग्न होत नाहीं, व ज्यांना मुष्टि-मैथुनासारख्या संवयी लागतात, अशांमध्यें हा विकार

नेहमीं आढळतो. साधारणतः १६–१७ वर्षापर्यंत मुलींमध्यें हा संवयीं लागत नाहींत परंतु अलिकडचें वातावरण बदललें आहे. नानातऱ्हेच्या कादंबऱ्या, प्रेमविषयक वर्णनें, तरुण स्त्री पुरुषांच्या खाजगीं गांठी, वगैरे सुधारणामुळें, याला एकप्रकारची पुष्टी मिळण्याचा संभव आहे. अतिशय चहा पिणें मसालेदार पदार्थांची चटक लागणें, इत्यादि नानाप्रकारचीं पेयें मनाला उत्तेजित करतात. व त्याचा परिणाम फार अनिष्ट होतो. सोळा किंवा वीस वर्षांची तरुण स्त्री पुरुषें पाहिलीं तर किती जणांच्या तोंडावर लाली, तारुण्याची झांक दिसत असेल, याचा विचार प्रत्येकानें करून पहावा. तरुण स्त्री पुरुष सोडून दिले तर जे विवाहित आहेत, त्यामध्यें सुद्धां हे विकार होण्याची दुसरी कारणें आहेत. अतिशय स्त्रीसंग, मूल होउं नये ह्मणून प्रतिबंधक उपचार करून संग करणें, प्रेम नाहीं अशा पुरुषांशीं संग, आर्तव साफ न जाणें हीं होत. आपल्यामध्यें, शौच व लघवी करतांना इंद्रियांवर पाणी घेऊन तीं साफ धुऊन टाकावीत असा नियम आहे ; हा नियम दोघांनाही आहे, परंतु हा कितपत पाळला जात आहे ? स्त्रीपुरुष संयोग झाल्यानंतर प्रत्येक स्त्रीपुरुषांनीं इंद्रियें, स्वच्छ पाण्यानें साफ धुनलीं पाहिजेत. अशा कामीं टाळाटाळ केल्यास या विकाराला वाव मिळतो. संतती नियमनकार संतति होऊं नये ह्मणून अशा वेळीं गरमपाण्याच्या पिचकारीचा उपयोग ताबडतोब करावा असें ह्मणतात. परंतु यां पासून फायदा न होतां नुकसान कसें होतें तें पहा. ज्यावेळीं परस्परांचा स्राव झालेला असतो त्यावेळीं योनीच्या अंतःत्वचेमधील मज्जातंतु व गर्भाशयांमधील मज्जातंतु हे विकलीन झालेले असतात अशा वेळीं, पाण्याच्या पिचकारीचा उलट तोटा होतो. त्यांचीं कार्यें त्यावेळीं बंद झालेलीं असतात. त्याचप्रमाणें नेहमीं थंड पाण्याची पिचकारी घेतल्यामुळें, तेथील मज्जातंतु आपलें कार्य करण्यास नष्ट होतात व संयोगामुळें होणारें परस्परांचें समाधान होत नाहीं. नैसर्गिक स्थितींत योनीच्या अंतःत्वचेमधून जो स्राव होत असतो तो जंतुनाशक असतो; त्या स्रावामुळें योनी चांगल्या स्थितींत असते. पुरुषांच्या वीर्याचा संबंध ज्यावेळीं योनीमध्यें येतो त्यावेळीं त्यांच्या कार्यामध्यें बिघाड होण्याचा संभव असल्यामुळें संयोग झाल्यानंतर तो भाग साधारण कोमट पाण्यानें अगर वर सांगितल्याऔषधांनीं धुतल्यास स्वच्छपणास मदत मिळते. धंदा करणाऱ्या स्त्रिया ज्या संयोगानंतर आपला भाग धुतात व ज्यांना हा प्रसंग रात्रींतून कित्येकवेळां येत असेल अशांच्या योनीमधील स्राव कमी झाल्यामुळें, व मज्जातंतुची शक्ति कमी झाल्यामुळें, तो भाग रुक्ष

व खडवडित असण्यांचा संभव आहे. त्यामधील भागांची संज्ञावाहक शक्ति नष्ट झाल्यामुळें या स्त्रियांच्या दारांत पाऊल टाकणारांस कितीसें समाधान होत असेल? शिवाय गरमी, पूयमेह अशाप्रकारच्या जंतूचा वांकडे पाऊल टाकणारांवर पगडा बसतो ही गोष्ट निराळी. योनीच्या द्वारांत एक प्रकारचा पातळ पडदा असतो. त्याला योनीद्वार पटल ( Hymen ) म्हणतात. हा पडदा, प्रथम संभोगाच्या वेळीं फाटतो, व ही कौमार्याची खुण आहे, असें समजतात. परंतु हा पडदा पुष्कळवेळां शिकताना, खोकतांना अगर इतर कारणामुळें फाटण्याचा संभव आहे. कित्येक वेळीं लहान मुलींमध्यें कृमीमुळें, खाज येऊन तो भाग खाजवल्यामुळें पडदा फाडतो. निसर्गानें जी कौमार्यावस्थेंत पडद्याची योजना केली आहे, तिचा उपयोग असल्या शिवाय केलेला नाहीं. तारुण्यावस्था प्राप्त होण्यापूर्वी, थंडी, त्याचप्रमाणें बाह्य जंतू यांपासून, आंतील इंद्रियांचें संरक्षण करावयाचें असतें. या हेतुनेंच हा पडदा निसर्गानें तयार केलेला असतो. ज्यांच्या मध्यें हा पडदा कांहीं कारणामुळें फाटतो, त्यांना कौमार्यावस्थेंत गर्भाशयाचे विकार होण्याचा विशेष संभव असतो. ज्यावेळीं ऋतुस्राव होतो त्यावेळीं हा पडदा फाटलेला असतो व या स्रावामुळें गर्भाशयांतील त्याचप्रमाणें शरिरांतील विजातीय घाण बाहेर जात असते. दर २८ ज्या दिवशीं हा स्राव होतो व या स्रावावर स्त्रीची प्रकृति निरोगी राहणें अवलंबून असतें. आपली जुनी मंडळी नेहमीं स्त्रीची पाळी बरोबर आहे किंवा नाहीं इकडे जे विशेष लक्ष देत असतात त्याचें कारण हेंच होय.

---

**अशोकारिष्टः**—प्रदर व इतर गर्भाशयांचे विकार यांवर उपयोगी. वा. किं. १। रुपया.

# प्रकरण ८ वें

—:०:—

## स्त्री–पुरुष संबंध.

कोणचीही गोष्ट आपल्या मनाप्रमाणें झाली, म्हणजे ती आपण केली असें आपण मानतो, व तीच मनाच्या विरुद्ध झाली, ह्मणजे त्याचा बोल नशिबाला अगर ईश्वराला लावित असतों. वारकाईनें विचार केला ह्मणजे, "तुझें आहे तुजपाशीं, परि तूं जागा चुकलाशी ॥ " असें जें तुकाराम बुवा ह्मणतात, त्याची जाणीव प्रत्येकाला अनुभवांअंती सुखदुःखाच्या लाटा आद-ळल्या ह्मणजे पटतें. स्त्रीपुरुषांचें लग्न झाल्यानंतर आपल्या धर्मामध्यें गर्भाधान ह्मणून जो संस्कार सांगितला आहे त्याचें महत्व त्या मंत्रांतील अर्थ मानणारांना कळून येतें. खाना पीना मजा करना हा गर्भाधान संस्काराचा हेतु नाहीं, आपल्या संयोगामुळें जें बालक जन्मास यावें तें निरोगी सुदृढ व्हावें, व आपल्या वंशाचें नांव अजरामर करावें ह्याच हा विधी करण्याचा हेतु असतो. हा संयोग स्त्री पुरुषांनीं कितीदां करावा, यासंबंधीं आपल्या धर्मानें त्याचप्रमाणें आयुर्वेद प्रवर्तक मुनींनीं नियम सांगितलेले आहेत. वात्सलायन ग्रंथ याकरितां तर मुद्दाम लिहिला गेला आहे.

हा ग्रंथ इतका महत्वाचा आहे कीं, अलिकडच्या डॉ. मेरी स्टोपस ह्वेवे-लॉक एलीजसारख्यांनीं या पुस्तकांचे आधार घेतलेले आहेत. असो. तेव्हां हे नियम पाळले पाहिजेत. हे नियम न पाळणारांना निसर्गाकडून शिक्षा मिळते.

तेंव्हां अशा महत्वाच्या नाजुक विषयांचा उहापोह या प्रकरणांत करा-वयाचा आहे. साधारणतः प्रत्येक मनुष्याच्या ३ अवस्था स्थूलदृष्ट्या कल्पिलेल्या आहेत; बाल्यावस्था, तारुण्यावस्था व वृद्धावस्था. निसर्गाच्या नियमाप्रमाणें पुरुष १६ ते १८ वर्षांचा होईपर्यंत त्याला कामवासना ह्मणजे काय याची जाणीव नसते. त्याच्यामध्यें कोणतेही विकार त्या संबंधींची माहिती घेणें वगैरे विषयींची कल्पनाच त्याला अशा वयांत नसते असें ह्मटल्यास अति-शयोक्ति होणार नाहीं. १८ वें वर्ष लागलें, जननेंद्रियांच्या वाढीमध्यें फेरफार

होऊं लागला ह्मणजे हळुहळु वीर्यपात, धातुस्राव होणें, अशाप्रकारचीं सौम्य लक्षणें जाणवूं लागतात. आह्मीं हा निसर्गाचा नियम वर दिला आहे, तो पाळला ह्मणजे साहजीकच बंधुभगिनींचें नातें प्रत्येकजण मानीत असतो. मनुनें प्रत्यक्ष आपल्या प्रौढ बहीणीबरोबर अगर मुलीबरोबर एकांतात बसूं नये. ह्मणून कडक रीतीनें सांगितलेलें आहे. डॉक्टर ॲक्टन ह्मणून नामांकित शस्त्रवैद्य होऊन गेला तो ह्मणतो लहानपणापासून मूल कोणत्या मार्गाचें होणार तें त्याच्या वागणुकीवरून कळून येतें. मुलांचें पाय पाळण्यांत दिसतात अशी आपल्यांत एक ह्मण आहे ती याच अर्थानें योजलेली आहे. एखादा लहान मुलगा आपल्या वयाच्या संवगड्यांच्या संगतीत न रहातां त्याला मुलींच्या संगतींत आवड वाटूं लागली कीं त्यांच्या खेळण्यांतही भिन्नपणा आढळतो. मुलींच्याबरोबर जास्त लघळपणा व प्रेम दाखवतांना, नेहमीं त्यांच्या मागून राहिलेला वगैरे गोष्टी साहाजिकच होत असतात व हें आपण असें कां करतों, हे त्यालाही समजत नाहीं, व आईबापांच्या लक्षांतही येत नाहीं. तेव्हां ह्या गोष्टी आढळल्या ह्मणजे आपला बाळया कोणत्या प्रकारचा होणार हें जाणून त्याप्रमाणें प्रतिबंधक उपाय करणें बरें. एवढ्या लहान वयांत इंद्रियांचा कल अशा प्रकारचा आढळणें हें भावी आयुष्याला विघातक आहे. अशा मुलांमध्यें सकाळीं उठल्यानंतर लघ्वी होतांना वीर्यस्राव झाल्याचें आढळून येतें. स्त्रीसंयोग होण्याच्या वेळीं मन प्रसन्न असावें, त्यावेळीं कुविचार नसावा. काळजी वगैरे जें सांगितलेलें आहे त्याचें कारण हेंच होय. अशा वेळीं जे विचार येतात त्याचा परिणाम संततिवर होत असतो व यामुळें आपलीं मुलें अशा प्रकारचीं कां झालीं याचा सूक्ष्म विचार केला ह्मणजे आपणच याचें कारण कसें आहोंत हें कळून येतें.

कामवासना लहान मुलांत अवेळीं होण्याचें कारण ह्मणजे कृमी होणें, लघ्वीला वेळेवर न गेल्यामुळें मूत्राशयाचा दाब वीर्यस्थानांवर पडल्यामुळें सुद्धां अकाली वीर्यपात होतो. शिवाय तरुण आईबापांची वर्तणूक हेंही पुष्कळदां मुलांमध्यें वासना अकालीं उत्पन्न होण्याचें कारण असतें.

शहरांतील तरुण स्त्रीपुरुषें वडील माणसें घरांमध्यें नसल्यामुळें, वाटेल तसें चेष्टाचार आपल्या ३-४ वर्षांच्या मुलांपुढें करीत असतात. मुलानें पाहिलें म्हणून काय झालें म्हणून तिकडे कानाडोळा करीत असतात. अप्रत्यक्षपणें बालकांवर याचा कसा परिणाम होत असतो याची काळजी कोणी बाळगीत नाहीं. चहा,

मसालेदार पदार्थ, सिनेमा, नाटकें, कादंबऱ्या, हीं लहान वयांत वाचण्यास व पहाण्यास मिळणें हेंही दुसरें कारण होय. अमेरिकेसारख्या सुधारलेल्या राष्ट्रांत त्यांच्या सुधारणा ह्या कुधारणा ठरत आहेत. ह्मणून परिस्थिती ओळखून ते शिक्षणक्रम बदलीत आहेत. एकत्र कुटुंबांत ज्याना रहाण्याची संवय आहे, त्यांना प्रत्यक्ष आपले वडील, आपल्या आईबरोबर बोललेले आढळत नव्हतें व त्याप्रमाणें कधींही ते मुलांच्या दृष्टीस आजच्या तरुणाप्रमाणें फाजीलपणा करीत असलेले आढळत नव्हतें. यांवरून भाविपीढी चांगल्याप्रकारची व्हावी या उद्देशानेंच आपल्या जुन्या चालीरिती, इतक्या कडक तऱ्हेनें आंखलेल्या होत्या हें आपोआप सिद्ध होतें. ही उदाहरणें सांगण्याचा हेतु ह्मणजे आपली वागणुक, आचारविचार, यांचा अप्रत्यक्षपणें संततिवर परिणाम घडल्याशिवाय रहात नाहीं हें दाखविण्याचा आहे.

शरिरांत जें ओजसतत्व आहे त्यांवर शरिराच्या क्रिया अवलंबून असतात, त्याचा क्षय झाला ह्मणजे, नानाप्रकारच्या विकारांचा पडदा शरिरांवर बसतो. स्त्री पुरुष संयोग करणें, याला नियम आहेत व ते नियम काय आहेत हें एखाद्या स्वतंत्र प्रकरणांत सांगण्याचें अभिवचन देउन वाचकांची नजर पुढील प्रकरणांकडे वळवूं.

---

# प्रकरण ९ वें

—:०:—

## विवाहाची मर्यादा.

हर विलास सारडा यांनीं वधुवरांच्या विवाहाचा प्रश्नांसंबंधींचे बील कौन्सिलपुढें आगल्यामुळें जुन्या व नव्या लोकांत एकप्रकारची खळबळ उडालेली आहे. आपल्या एकंदर समाजाची व्यवस्था पाहिली म्हणजे आजच्या तरुण पिढीला स्वतःचा धर्मव्यवहार म्हणजे काय, याची माहिती नसल्यामुळें साधक बाधक विचार करण्याची प्रवृत्ति पुष्कळ अंशीं कमी आढळून येते. इंग्रजी शिक्षणांचा फैलाव वाढत असल्यामुळें व धर्मशास्त्र गौण ठरत असल्यामुळें, त्या

बाजूला वळून कालक्षेप करण्यांत काय फायदा अशा तऱ्हेची विचारसरणी मनाची झाली तर नवल नाहीं. पुरुषार्थाचे संपादक श्रीयुत विद्वरत्न श्रीपाद दामोदर सातवळेकर यांनीं तुलनात्मक, साधकबाधक दृष्टिनें पूर्वापारपासून आपली अमलांत कशी आली व त्यांमध्यें सुधारणा काय केली पाहिजे यांचा उत्तम तऱ्हेनें विचार केलेला आहे. त्यांच्या विचारानें समाजाला आपल्या वैवाहिक पद्धतिचें तत्व कळेल या सद्धेतूनें या पुस्तकांत त्यांचे विचार खालीलप्रमाणें ग्रंथित केलेले आहेत.

विवाहाच्या वेळीं वधूवरांचें वय कोणतें असावें हा आजचा विचाराचा प्रश्न आहे. जग उत्पन्न होऊन जवळ जवळ कोट दोन कोट वर्षं झाली आहेत. इतक्या काळामध्यें सारखे स्त्री पुरुषांचे संबंधही होत आले आहेत; तथापि विवाहाच्या वेळीं वधूचें वय ८ वर्षांचें असावें कीं १४ वर्षांचें असावें, याचा वाद अजून चालूच आहे व अजूनही याविषयीं कोणाचें एकमत होत नाहीं, याचें आश्चर्य करावें तितकें थोडें आहे ! ! जगाच्या प्रारंभापासून आतांपर्यंत वैवाहिक स्थितीचा जो अनुभव मनुष्यांना मिळाला आहे. त्यावरून पाहतां खरें म्हटलें तर मनुष्याला विवाहाच्या वेळीं वधूवरांच्या वयाची मर्यादा काय असावी हें कळलें पाहिजे होतें; पण तें तसें कळलें आहे असें वाटत नाहीं. म्हणून कित्येकांस या संबंधाचे कायदे करावे लागत आहेत व कित्येकांस ते मोडावे ही लागत आहेत ! !

युरोप खंडांतील देश हिंदुस्थानापेक्षां पुष्कळ पुढारलेले देश आहेत व इंग्लंडाचा दबदबा तर सर्व जगांत फारच मोठा आहे. अशा इंग्लंडामध्यें गेल्या वर्षापर्यंत वधूची वयोमर्यादा विवाहाच्या वेळीं १२ वर्षांची असावी असें कायद्यानें ठरवलेलें होतें; या वर्षीं तेथें ही मर्यादा १६ वर्षांची करण्यांत आली आहे. म्हणजे कायद्यानें वधूची किमान वयोमर्यादा विवाहाच्या वेळीं किती ही जरी थोडी मानलेली असली, तरी त्यामुळें राष्ट्राच्या प्रगतीमध्यें फारसा फरक पडूं शकत नाहीं. कारण इंग्लंडसारख्या देशांत गेल्या वर्षापर्यंत वधूची वयोमर्यादा १२ वर्षांची असतांनाही त्यांचें एवढें साम्राज्य वाढलें, श्री छत्रपती शिवाजी महाराजांपासून तो पेशवाईच्या भर अमदानीपर्यंत जवळ जवळ बाल विवाह सर्वत्र रूढ असतांही त्यांच्यामध्यें स्वराज्य स्थापणारे व वाढवणारे बलाढ्य थोर पुरुष निर्माण होऊं शकत होते व यांच्या उलट

आज आपणामध्यें प्रौढ विवाह जवळ जवळ सुरू झाला असला तरी त्यामुळें आमची शक्ति धडाडी व हिमतीनें महत्कार्य करण्याची धमक पूर्वीपेक्षां वाढलेली आहे असें दिसत नाहीं, उलट ती कमी होत असल्याचाही भास होत आहे. तेव्हां विवाहाच्या वेळीं वधूवरांच्या वयाची मर्यादा अमुक असली म्हणजे राष्ट्रोन्नति लवकर होईल व ती कमीजास्त झाली म्हणजे होणार नाहीं असें कोणासही म्हणतां यावयाचें नाहीं; कारण तसा त्यांचा परस्पर संबंध नाहीं असें आपणांस या इतिहासावरून दिसतें.

आपल्यामध्यें 'विवाहसंस्कार' हा भिन्न आहे व पुढें 'गर्भाधान संस्कार' हा अगदीं भिन्न मानला आहे. इंग्रजांमध्यें किंवा अन्य राष्ट्रांमध्यें 'विवाह' याचाच अर्थ 'गर्भाधान' असाव होतो. त्यामुळें त्यांना विवाहाची वयोमर्यादा ठरवणें अत्यंत आवश्यक असतें. वास्तविक पाहतां आपल्याकडे विवाहाची वयोमर्यादा न ठरवतां गर्भाधानाची वयोमर्यादा ठरवणें इष्ट आहे कारण विवाह कितीही लहानपणीं झालेला असला व त्यांचें गर्भाधान जर अकालीं झालें नाहीं तर कोणत्याही रीतिनें त्यांचा शारीरिक ऱ्हास होणार नाहीं. तसेंच इंग्लंड सारख्या थंड देशांत जर वधूची वयोमर्यादा विवाह समयीं १२ किंवा १६ वर्षांची पुरे होते तर भारत वर्षासारख्या उष्ण देशांत ती त्यापेक्षां कमी असावी असें म्हटलें तर तें कांहीं अयोग्य आहे असें कोणीही म्हणणार नाहीं.

शिवाय या आपल्या देशामध्यें कांहीं वर्ग पुढें गेलेले आहेत व कांहीं अगदीं मागसलेले आहेत. त्यांची राहणी ही इतकी विभिन्न आहे कीं त्या सर्वांसाठीं आपण एकच कायदा करून विवाहाची वयोमर्यादा ठरवणार म्हटलें, तर तें अगदीं अशक्य आहे. याला उदाहरण पहा. महाराष्ट्रांतील ब्राह्मण वर्गामध्यें व शिक्षित वर्गामध्यें वधूच्या लग्नाची वयोमर्यादा १७।१८ वर्षांच्या पुढें गेलेली आहे. कित्येक प्रसंगीं २०।२५ किंवा ३० वर्षांच्या मुली अविवाहित राहिल्या तरीसुद्धां त्याबद्दल कोणास वाईट वाटत नाहीं व २५ वर्षांची कुमारिका करून घेण्यास ही कोणी मागें पुढें पाहत नाहीं. पण याच प्रांतांत अशिक्षित लोकांमध्यें ६।७ किंवा ८ व्या वर्षीं मुलींचीं लग्नें उरकून घेण्यांत येतात व त्यांची आर्थिक अवस्था अशी आहे कीं त्यांना वधूच्या वयाची मर्यादा आजच वाढवणें जवळ जवळ अशक्य आहे. महाराष्ट्रांत शिक्षित लोक शेकडा १० व अशिक्षित ९० आहेत व यांच्या राहणींत फारच फरक आहे. असें असतां सर्वां-

साठीं एकच वयोमर्यादा ठरवणें किती अशक्य आहे हें वाचकांस तेव्हांच समजून येईल.

सध्यां पसार झालेलें 'शारदा बिल' हें एक या वरील विधानास उत्तम उदाहरण ह्मणून देण्यासारखें आहे. या बिलाचे जनक ना० हरबिलास शारदा हे मोठे विद्वान् व आस्थेवाईक देशभक्त आहेत. पण आपल्या देशांतील लोकांचे खालपासून वर पर्यंतचे थर पाहण्यास त्यांस वेळ नाहीं. म्हणून ते असें समजतात कीं, आपल्या कुटुंबाप्रमाणेंच सर्व हिंदी कुटुंबांची स्थिति आहे! यासाठीं जें मला बरें वाटतें तें केलें तर सर्व हिंदी राष्ट्राचा लाभ झालाच पाहिजे. पण ही विचारसरणी जरी आजच्या पुष्कळ नेत्यांची असली तरी ती अत्यंत चुकीची आहे. प्रस्तुत विचारास घेतलेल्या १४ वर्षांच्या वधूच्या विवाह मर्यादेचा शिक्षितांवर कांहीं दुष्परिणाम होणार नाहींच कारण त्यांची वयोमर्यादा यापेक्षां फारच पुढें गेलेली आहे पण अशिक्षितांना मात्र हा विवाह पदोपदीं जाचणार आहे व त्यामुळें त्याचें सुख वाढण्याच्या ऐवजीं दुःख मात्र वाढणार आहे असें दुःखानें म्हणावें लागतें. ज्या परिस्थितिमुळें शिक्षितांच्या वधूवरांच्या वैवाहिक वयाची मर्यादा वाढली, तशी परिस्थिति अशिक्षितांना आल्याशिवाय वैवाहिक वयाची मर्यादा वाढणें शक्य नाहीं व तशी परिस्थिति न बदलतां जर कायद्याने ह्मणजे कृत्रिमपणानें वयोमर्यादा वाढवली तर त्यामुळें उत्पन्न झालेली जबाबदारी त्यांना झेपणें शक्य नसल्यामुळें तसें करणें त्यांचें दुःख वाढवण्यास मात्र कारणीभूत होईल. हें पहावयाचें असल्यास वाचकांनीं खेड्यापाड्यांत जाऊन ज्या आर्थिक अडचणींमुळें त्यांना प्रौढ विवाह करतां येत नाहीं, त्या आर्थिक परिस्थितिचा उत्तम अभ्यास करावा; म्हणजे मागसलेल्यांच्या स्थितीची त्यांस कल्पना करतां येईल व त्यांची खरी सुधारणा करण्याचे उपाय कोणते आहेत हेंही त्यांना समजेल.

आपल्या समाजामध्यें कोण कोणत्या विवाहपद्धति होत्या व त्या कसकशा बदलत गेल्या व सध्यांची पद्धति कशी अमलांत आली तें पाहिलें पाहिजे. यासाठीं आपल्या समाजांतील वैवाहिक संस्थेचा पंचवीस तीस हजार वर्षांचा इतिहास पाहिला पाहिजे. वैवाहिक वयाचा प्रश्न आला कीं पुष्कळ लोक विचारतात कीं वेदामध्यें या संबंधानें काय लिहिलें आहे, पुराणांचें मत काय आहे व स्मृतींचा पक्ष काय आहे, हें सर्व आपणास समजावें म्हणून आपण प्रारंभापासूनचें वैवाहिक चालीरीतिचें विहंगमदृष्ट्या निरीक्षण करूंया:—

प्रारंभ वि–रज् म्हणजे रांजा नाहीं अशी, अवस्था होती. कोणी कोणाचा नियंता नाहीं, कोणी कोणाचा मालक नाहीं, अशी ही मानव समाजाची स्थिति होती. ज्यावेळीं एकाचें दुसऱ्यावर नियंत्रण नव्हतें व एकाचा दुसऱ्यांशीं स्थिर संबंध घडण्याची कल्पनाच नव्हती, त्यावेळीं आजच्या सारखें स्थिर विवाह संबंध असणेंच शक्य नाहीं. अर्थात या अगदीं प्रारंभींच्या कालामध्यें गृहसंस्था नव्हती. पुढें ( उदाक्रमत् ) समाजाची उत्क्रान्ति झाली व ही उत्क्रान्ति (गार्हपत्येन्यक्रामत्) गृहपति सस्थेमध्यें परिणत झाली. गृहसंस्था नव्हती त्यावेळीं कोणी अग्नि बाळगीत नव्हते, पण गहसंस्था निर्माण झाल्यावर घरामध्यें नित्य अग्नि ठेऊं लागले. अग्नि ठेवणें अत्यंत आवश्यकच झालें कारण अग्निशिवाय घरांतील माणसांचें चालणेंच शक्य नाहीं. हा जो उन्नतिचा क्रम या अथर्वमंत्रामध्यें दिला आहे, त्या वरून हें स्पष्ट होतें कीं, विवाह संस्था पुष्कळच कालानंतर अस्तित्वांत आली व ती येईपर्यंत पुष्कळच उन्नति मानव समाजामध्यें चालू होती. समाजाची " विराज् अवस्था " व समाजामध्यें चालू झालेली " गृहपति संस्था " यामध्यें बरेंच कालाचें अन्तर मानलें पाहिजे, कारण या गोष्टी कांहीं अल्पकालामध्यें होणें शक्य नाहीं.

## गण–विवाह

विवाहाची संस्था ही आजच्या सारखी एकदम प्रचारांत आली नाहीं. मध्यंतरी अनंत घडामोडी झाल्या. निरनिराळे अनुभव आले; ते सर्व या लेखा मध्यें देणें शक्य नाहीं, पण प्रस्तुत प्रसंगीं आपल्या प्राचीन गणसंस्थेचा विचार केल्याशिवाय पुढें जाणें शक्य नाहीं, म्हणून या गणसंस्थेचा विचार करूं.

विवाहाच्या वेळीं वधूवरांचे ' गण ' पाहत असतात. ही गोष्ट पुष्कळांस माहित आहे. ' देवगण, मनुष्यगण व राक्षसगण ' अशा नांवानें हे प्रसिद्ध आहेत. याशिवाय भूतगण, पिशाचगण, किन्नरगण वगैरे बरेच गण आहेत वसु, रुद्र, आदित्य, मरुत् आदि गणदेव ही प्रसिद्ध आहेत. आपल्या गणांमध्येंच विवाह व्हावा परगणांत विवाहसंबंध होऊं नये करावयाचा असला तर मनुष्यगणानें देवगणाशीं करावा पण राक्षसगणाशीं करूं नयेत अशी पद्धति आहे. वसुगणाचा रुद्रगणाशीं होत नाहीं व मरुगणाचा आदित्यगणाशींही विवाह होत नाहीं. मानवी इतिहासामध्यें राक्षसगण अति प्राचीन व देवगण त्यांच्या मागाहून

अस्तित्वांत आला. म्हणूनच राक्षसांना ' पूर्व-देव ' म्हणजे ' पूर्वीच्या काळचे देव ' असें म्हणतात. त्या राक्षसगणानंतर देवगण आले व पुष्कळ कालानंतर मनुष्यगण अस्तित्वांत आला. मनुष्य गणामध्यें पुढें आर्य व दस्यु वगैरे भेद झाले.

गणसंस्था ही प्रामुख्यानें देव नांवाच्या मानव जातीमध्यें विकास पावली या गणदेवांची विवाहपद्धति मोठी विलक्षण असे. गणांतील पुरुषांना ' गणदेव ' व गणस्त्रियांना ' गणदेवी असें म्हटलें जाई. पुरुषांच्या गणांत स्त्रियांच्या गणांशीं सामुदायिक विवाह होई. देवजातीच्या इतिहासामध्यें अगदीं प्रमुख वीरांचा वैयक्तिक विवाह झालेला आपण पाहतों, पण गणदेवांचा वैयक्तिक विवाह झाल्याचा उल्लेख नाहीं व त्यांच्या व्यक्तिशः स्त्रिया असल्याचाही उल्लेख नाहीं. सर्व गणदेवांच्या सर्व गणस्त्रिया या स्त्रिया असत. या गणस्त्रियांनाच ' गणिका ' असें म्हणत. गणिका म्हणजेच गणस्त्रिया. एका स्त्रीवर कोणा एका पुरुषाची मालकी नसे व एका पुरुषाशीं एक स्त्री कायमपणानें ही संलग्न नसे. सर्व गणिका या सर्व गण देवांच्या गणस्त्रिया असत. ज्याची ज्यावेळीं जशी लहर लागेल त्यावेळीं त्याची ती स्त्री होई. यावेळीं स्त्रीपुरुषांचा असा हा स्वेच्छा संबंध होता यांत निर्बंध एवढाच असे कीं आपल्या गणाच्या आंत कायतो संबंध व्हावा. बाहेर होऊं नये.

' गणिका ' शब्द सध्यां व्यभिचारिणी स्त्री, वेश्या या अर्थी वापरला जातो पण गणसंस्थेंतील विवाहपद्धति जेव्हां प्रचलित होती व ज्यावेळीं सध्यां प्रमाणें वैयक्तिक विवाहपद्धति फारशी दृढमूल झाली नव्हती, त्यावेळीं या शब्दामध्यें वाईट भावना मुळींच नव्हती. कारण त्यावेळचे सर्वच लोक आपल्या गणसंस्थेच्या नियमांनीं बद्ध असल्यामुळें दुसऱ्या पद्धतीची त्यांस कल्पनाच नव्हती.

## वार-स्त्री-पद्धति

याच वरील पद्धतींतून ' वार स्त्री पद्धति ' प्रचारांत आली. कांहीं दिवसांच्या करारानें पुरुष स्त्रीशीं विवाह करी. तेवढे कराराचे-दिवस संपले म्हणजे हा विवाह तुटत असे. मग त्या स्त्रीला किंवा त्या पुरुषाला दुसरा विवाह करण्यास

मोकळीक असे. किंवा त्यांचा संबंध पुनः घडावयाचा असेल तर पुनः नवा करार करावा लागे.

सध्यां 'वारस्त्री' शब्दाचा अर्थ सुद्धां व्यभिचारिणी वेश्या असा झाला आहे. पण आजन्म विवाहाचें कायमचें बंधन प्रचलित होण्याच्या पूर्वीच्या काळांत मुदतबंदीचेच विवाह शिष्टसंमत असल्यामुळें त्यावेळीं या पद्धतिमध्यें कोणास कांहीं वाईट वाटत नसे. आजची आपली पद्धत सुरू झाल्यानंतर मग या जुन्या पद्धति निंद्य वाटूं लागल्या.

गण स्त्रीपद्धति व वारस्त्रीपद्धति या दोनहि पद्धति भारतीय आर्यांमध्यें केव्हांच नव्हत्या. त्या तिबेट व हिमालय यामध्यें निवास करणाऱ्या जातींमध्यें होत्या. त्याच जाती खालीं उतरून त्यांच्यांत भारतीय आर्यविवाहपद्धति पुढें विकसित झाली.

'गण–स्त्री–पद्धति' मध्यें काळाचा मुळींच निर्बंध नसे, तो निर्बंध कांहीं दिवसांच्या मुदती पुरता तरी 'वार–स्त्री–पद्धती' मध्यें आला. म्हणजे वैवाहिक बंधन कांहीं दिवसांपुरतें तरी स्थिर झालें व कांहीं दिवसांपुरता तरी स्त्री पुरुषांचा पाश एकमेकांना बंधनकारक होऊं लागला. गण स्त्रियांच्या बंधन-रहित अवस्थेपेक्षां वारस्त्रीयांची मुदतबंदीची विवाहपद्धति अधिक कौटुंबिक सुख देते, असा अनुभव येऊं लागल्यानंतर ही मुदत बंदी वाढतां वाढतां शेवटीं तिचें आजन्म विवाहपद्धतिमध्यें रूपांतर झालें आहे.

सध्यां रशियांतील बोल्शेविक किंवा सोविएट विचारांच्या लोकांनीं अल्पमुदतीची विवाहपद्धति सुरू केलेली आहे. ही गोष्ट आम्हांला कांहीं नवीन नाहीं आमच्या समाजानें या पद्धतिचा अनुभव प्राचीनतम काळामध्यें घेतला होता व ती पद्धति सदोष वाटल्यावरून ती सोडून दिली व सध्यांची पद्धति अधिक निर्दोष ठरल्यावरून ती सार्वत्रिक केली. युरोपीयन, अमेरिकन व विशेषतः रशियन लोक आज वार स्त्रीपद्धतिच्या युगांमध्यें आहेत किंवा त्या पद्धतिच्या आसपासच्या युगामध्यें कोठें तरी घुटमळत आहेत. व आपली पद्धति त्या कालाच्या किती तरी पुढें गेलेली आहे, हें येथें वाचकांनीं लक्षांत ठेवावें. युरोपच्या वैवाहिक पद्धतीचे देव्हारे माजविणाऱ्यांनीं या इतिहासाकडे विशेष लक्ष द्यावें.

पुराणांमध्यें आलेल्या अप्सरा या गणस्त्रीया किंवा वारस्त्रियाच असत. त्यामुळें हवी ती अप्सरा मिळते अशी जी समजूत आहे, तिच्या मुळांत हा इतका इतिहास आहे. आजन्म स्थिर-विवाह होण्याच्या पूर्व कालांतील ही पद्धति होती हें लक्ष्यांत आलें, म्हणजे अप्सरांच्या व्यवहारांचें स्वरूप आपल्या लक्ष्यांत येईल.

## उद्दालक ऋषि

स्थिरविवाहाची मर्यादा कायम केरण्यामध्यें उद्दालक ऋषींचे प्रयत्न विशेषँ कारणीभूत झालेले आहेत. या उद्दालक ऋषिपर्यंत आर्यामध्यें ही स्थिर विवाहपद्धति सर्वत्र प्रचलित झालेली नव्हती. उद्धालक ऋषि स्वतः आपल्या वडिलांजवळ अध्ययन करीत बसला असतां त्याची आई दुसऱ्या पुरुषाबरोबर निघून गेली. हें पाहतांच त्यानें वडिलांस विचारलें कीं, हें काय आहे ? व वडिलांनीं सांगितलें कीं ‘ बा उद्दालका ! स्त्रिया स्वतंत्र आहेत, ’ हें ऐकल्यावर उद्दालकानें तेथेंच प्रतिज्ञा केली कीं ‘ आजपासून स्त्रियांचा एकच विवाह व्हावा अशी पद्धती मी चालू करण्याच्या प्रयत्नास लागतों. या प्रतिज्ञेप्रमाणें उद्दाकल ऋषिनें आपल्या आयुष्यामध्यें तसा कायदा करून सोडला व हाच नियम आजपर्यंत चालू राहिला आहे.

यावरून वाचकांच्या लक्ष्यांत येईल कीं विवाहबंधन मुळींच नसलेली स्थिति, गणविवाह स्थिति, वारस्त्री विवाह स्थिति, अस्थिर विवाह स्थिति व उद्दालक ऋषिच्या नंतर स्थिरविवाह पद्धति या प्रमाणें ही आमची विवाहसंस्था उन्नत झालेली आहे. या सर्व पद्धतींचे बरेवाईट परिणाम आमच्या समाजानें अनुभवले आहेत व शेवटीं सर्व तऱ्हेनें अधिक निर्दोष अशी आजची विवाह-पद्धति शेवटीं धर्माच्या नेत्यांनीं स्थिर केली आहे. या स्थित्यंतरांमध्यें आणखी पुष्कळच दुवे आहेत. पण त्या सर्वांचा विचार येथें करण्याचें कारण नाहीं. गणांनीं आपल्यांतील गणस्त्रियांशींच विवाह करावा, हीच पद्धति सध्यांच्या सवर्ण-विवाह व स्वजातीय विवाह या पद्धतीमध्यें परिणत झालेली आहे व अल्पमुदती विवाहपद्धति सध्यां कायम विवाहपद्धतींत परिणत झालेली आहे.

बहुपतिविवाह म्हणजे सर्व भावांमध्यें सर्वांची मिळून एकच बायको करण्याची पद्धति प्राचीन कालापासून आजपर्यंत चालू आहे. असा विवाह

केवळ पाण्डवांचाच झाला होता, हें म्हणणें चुकीचें आहे. आज या घटकेसही हिमालयांतील कांहीं भागांमध्यें क्षत्रिय कुटुंबांतील सर्व भावांमध्यें एकच बायको करण्याची रीति प्रचलित आहे. या भरत खंडांत ही रीति पूर्वी नव्हती व आज ही नाहीं. पण हिमालयांत ही पद्धति पूर्वीपासून आजपर्यंत प्रचलित आहे व त्या देशांत अशा विवाहाला कोणीच वाईट म्हणत नाहीं, उलट हिमालयांतील क्षत्रिय लोक या पद्धतिनें संततिनियमन होत असल्यामुळें दारिद्र्य वाढत नाहीं, असें म्हणून या पद्धतेचें समर्थनच करितात !

याच पद्धतिचा एक अवशेष म्हणजे पति निधनानंतर दीराला नवऱ्याच्या ठिकाणीं समजणें ही ' देवृ-संबंधा 'ची चाल ऋग्वेदापासून चालू होती. ही चाल पंजाबांतील क्षत्रियांमध्यें कांहीं ठिकाणीं अजूनही अवशिष्ट आहे. सर्व भावांशीं विवाह करण्याच्या पद्धतीमधील ही एक सुधारणाच आहे. या पद्धतीमध्यें इतर भावांचा हक्क फक्त पतिनिधनानंतर मानण्यांत येतो. ऋग्वेदामध्यें ' विधवेव देवर ' ( ऋ. १०।४०।२ ) विधवा दीराकडे जाते, या मंत्रानें या चालीचा उल्लेख केला आहे

या पद्धतिला नियोग पद्धति असें म्हणतात. याच पद्धतिमध्यें पुढें अशी सुधारणा झाली कीं विधवेस संतति नसेल तरच हा नियोग करण्यांत यावा. संतति असेल तर नियोग करूं नये. यापुढें आणखी सुधारणा होऊन सध्यां ही रीति कायमची बंद केली गेली आहे. हिमालयाच्या कांहीं भागांत सर्व भावांमध्यें एक बायको करण्याची पद्धत असली व पंजाबांतील कांहीं क्षत्रियांमध्यें देवृसंबंध मान्य असला तरी एकंदर भारतीय आर्यांमध्यें हे सर्व प्रकार बंद झाले आहेत. यावरून विवाह संस्था आर्यांमध्यें कशा रीतिनें स्थित्यंतर पावत गेली हें दिसेल.

मलबार मध्यें बायकोच्या घरीं नवरा जाऊन राहतो व बायकोचा वंश चालतो ही एक विलक्षण चाल आहे. विवाहाच्या उत्क्रांति अपक्रान्तिच्या दृष्टीनें या चालीचेंही महत्त्व आहे. मुलीनेंच नवऱ्यांच्या घरीं कां जावें व नवऱ्यानें घरीं कां जाऊं नये ? हा अनुभव पाहण्यासाठीं मलबारांतील लोकांनीं हा प्रयोग चालवला. युरोप अमेरिकेमध्यें अजूनपर्यंत हा अनुभव घेतला गेला नाहीं, तो हिंदूंनीं घेतला आहे. विवाहसंस्थेचा विचार करावयाचा असेल त्यावेळीं या अनुभवाचा विचार अवश्य केला पाहिजे.

याप्रमाणें अनेक पद्धतींचा अनुभव हिंदूनीं घेतला आहे व विचार केला असतां असें दिसून येईल कीं बहुतेक कोणतीही पद्धति अनुभवांत आणण्याची खटपट हिंदूनीं केली नाहीं अशी गोष्ट नाहीं. अर्थात् युरोप अमेरिकेंत चालू असलेल्या सर्व पद्धति व त्यांनीं अनुभव न घेतलेल्याही अनेक पद्धति आम्हीं अजमावल्या आहेत.

## ब्राह्मण विवाह

१ ब्राम्हविवाह—वेदज्ञानी सदाचारी शील संपन्न वराला आदरानें बोलावून आणून, त्याची पूजा करून, त्याला उत्तम वस्त्रें व आभूषणें यांनीं अलंकृत केलेली कन्या दान करणें हा ब्राम्ह-विवाह आहे.

२ देवविवाह—यज्ञ चालू असतां त्या यज्ञांत उत्तम कर्म करणाऱ्या ऋत्विजाला सालंकृत कन्यादान करणें हा देव-विवाह होय.

३ आर्षविवाह—एक किंवा दोन सवत्स गाई घेऊन वराला कन्यादान करणें याला आर्ष-विवाह ह्मणतात.

४ प्राजापत्यविवाह—तुम्ही दोघें आजपासून गृहस्थ धर्माचें पालन करा असें ह्मणून कन्यादान करणें याला प्राजापत्य-विवाह असें ह्मणतात.

या चारही रीतिंचा समावेश आजच्या आमच्या विवाह पद्धतीमध्यें झालेला आहे. विवाह संकल्प पाहिला म्हणजे याची साक्ष पटेल. या चारही पद्धतीमध्यें वधूच्या बापानें कन्येचें दान वराला करावयाचें आहे. वधूवरांच्या संमतीचा येथें प्रश्नच नाहीं. वधूच्या पित्यानें वराचें कुल, शील, विद्या व पौरुष यांचा विचार करून आपल्या मुलीस अनुरूप असा वर पाहून त्यास कन्यादान करणें व दानसांगता होण्यासाठीं वराला योग्य दक्षिणा देणें या विधिमध्यें मुख्यत: असतें. या चारही पद्धतीपैकीं प्रजापत्य विधिमध्यें मात्र वधूवरें प्रौढ ह्मणजे तरुण असावीं लागतात. बाकीच्या तीनही विवाहांमध्यें वयाची मर्यादा अमूकच असावी असें निश्चित नाहीं. वधूच्या वयाची मर्यादा आठ वर्षांपेक्षां कमी नसावी व स्वतंत्र मन बनेल इतकी मोठीही नसावी, इतकाच साधारण विचार यामध्यें आहे; कारण वधूच्या बापावरच सर्व जबाबदारी असल्यामुळें मुलीचें मत स्वतंत्र होण्यापूर्वींच हा विवाह होणें इष्ट असतें. हे चारही प्रकारचे विवाह ब्राम्हणीधर्मांतील होत. पुढील चारांपेक्षां हे पहिले चार श्रेष्ठ आहेत व यासाठीं

सर्व हिंदू समाजामध्यें हे पहिले चार कमी अधिक मानानें प्रचलित झालेले आहेत. आतां पुढील चार विवाह पहा.

## ब्राह्मणेतर विवाह

५ आसुरविवाह—मुलीच्या नातलगांना शक्तिप्रमाणें पैसा देऊन आपल्या इच्छेप्रमाणें मुलगी करून घेणें याला आसुर विवाह ह्मणतात.

६ गांधर्वविवाह—नवरा नवरीच्या परस्पर पसंतीनें जो कामेच्छा तृप्तीसाठींच विवाह होतो त्यास गांधर्व विवाह असें म्हणतात.

७ राक्षसविवाह—मारामारी, तोडातोडी व छेदाछेदी करून आक्रोश व रडारड चालली असतां बापाच्या घरांतून जबरदस्तीनें कन्येचें हरण करणें हा राक्षस–विवाह होय.

८ पैशाचविवाह—मुलगी निजलेली असतां, घाबरली असतां किंवा धुंगीमध्यें असतां तिच्याशीं बलात्कारानें संबंध करणें हा अत्यंत अधम पैशाच–विवाह आहे.

हे चार प्रकारचे विवाह क्षत्रियांना प्रिय आहेत व राक्षस विवाहाशिवाय इतर तीन विवाह वैश्य व शूद्रांमध्यें प्रचलित आहेत. मुलीचे पैसे घेण्याची चाल असुर लोकांची मुळची आहे. ती त्यांमध्यें अजूनही चालू आहे. आसुरी वंशांतील हिंदुस्थानाबाहेरील पठाण आदि जातींत मुलीच्या बापास पैसा दिल्याशिवाय लग्न होत नाहीं. सध्यां ही आसुरी चाल कांहीं ब्राह्मणांमध्येंही अल्पप्रमाणानें घुसली आहे. उच्च क्षत्रियांमध्यें बहुत करून नाहीं पण इतर ब्राम्हणेतरांमध्यें मुलीचे पैसे घेण्याची चाल मोठ्या प्रमाणांत आहे. गांधर्व विवाह क्षत्रियांचीच मत्ता आहे व राक्षस व पैशाच हेही त्यांचेच विवाह आहेत. यांपैकीं राक्षसविवाह आजही हिमालयांतील क्षत्रियांमध्यें चालू आहे. सध्यां वाडवडील मुलांमुलींचे विवाह ठरवीत असले, तरी मारामारी व रडारडी हे विवाहविधीचे मुख्य भाग तेथें मानले जातात व खरी मारामारी नसली तरी मारामारीची नक्कल तरी ते करीत असतातच !

यांपैकीं गांधर्व व पैशाच हे निःसंशय प्रौढ विवाहच आहेत. आसुर व राक्षस हेही मूळांत प्रौढ विवाहच आहेत. कारण आजही मुलीचा पैसा घेणारे आईबाप मुलीला वाढवीत असलेले दिसतात. कारण मुलगी जितकी वाढेल

तितकी ती धनप्राप्तीच्या दृष्टीनें त्यांस इष्टच असते. असो. या चार विवाहांमध्यें मुलीच्या आईबापांची सात्विक खुषी नसते, जुलूम. जबरदस्ती, पैशाचा लोभ, कामाचा अतिरेक हेच दोष या चार क्षात्र विवाहांमध्यें असतात.

आजच्या ब्राह्मणेतरांमध्यें असुर, राक्षस, गंधर्व व पिशाच या जातींचा व सर्प आदि जातींचा समावेश झालेला असल्यामुळें त्यांच्यांत या भयंकर सदोष विवाह पद्धति घुसल्या आहेत. या पद्धति त्यांची मुळची संस्कृति दाखवीत आहेत. या पद्धतीची सुधारणा करावी व सर्वत्र ब्राम्हणांनीं ब्राह्म–विवाह पद्धति किंवा पहिल्या चारही पद्धति मिळून झालेली मिश्र विवाह पद्धति सुरू करावी, म्हणून कित्येक हजार वर्षें ब्राह्मणांची खटपट चालू आहे व त्या खटपटीला थोडेसें यशही आलेलें आहे व त्यामुळेंच राक्षस व पैशाच विवाह त्यांच्यातून जवळ जवळ नष्ट झाले आहेत. गांधर्व विवाहही जवळ जवळ क्षत्रियांतून गेला आहे व केवळ आसुर विवाह काय तो विशेषें करून राहिला आहे. याप्रमाणें ब्राह्मणांनीं आपली श्रेष्ठ विवाह पद्धति इतरांच्या व्यवहारांत पुष्कळ अंशानें आणली आहे. जबरदस्ती न करतां योग्य ती धार्मिक सुधारणा करण्याची ही रीति खरोखर प्रशंसनीय आहे.

युरोप अमेरिकेंत गांधर्व विवाह पद्धति प्रचलित आहे. या गांधर्व पद्धतीमध्यें जे अनंत दोष आहेत, त्यांचा अनुभव युरोपीयन आज घेत आहेत व तेथें विवाह पद्धतिची उत्क्रांति अजून व्हावयाची आहे. आपली ब्राह्मविवाह पद्धति ही गांधर्व विवाहापेक्षां कितीतरी श्रेष्ठ आहे यांत कोणालाही शंका नाहीं. राजा दुष्यंत कण्वऋषीच्या विद्यालयांत जातो. तेथें शकुंतलेशीं गांधर्व विवाह करतो व पुढें जबाबदारीची वेळ येतांच कानावर हात ठेवतो ! हा गांधर्व विवाहांतील मोठा दोष आहे. हे प्रीतिविवाह सुरू झाल्यानंतर ‘ काडीमोडण्याची चाल व अज्ञात पितृक संतति या दोन गोष्टी येणारच असे अनेक दोष या शेवटच्या चार विवाहांमध्यें असल्यामुळें आपल्या प्राचीन थोर पुरुषांनीं ब्राह्म विवाहच श्रेष्ठ मानला आहे व त्यामुळेंच तो सर्वत्र प्रचलितही झाला आहे.

# प्रकरण १० वें.

—:0:—

## कालाचा महिमा

विवाह होणें, ही प्रत्येकाच्या आयुष्यांत बदल करणारी चीज आहे. लग्न म्हणजे ब्रह्मचर्याचा त्याग करून गृहस्थाश्रमांत प्रवेश होय. आपण लग्न ही धार्मिक बाब समजतों, व त्यांवरच भावी पिढीची मदार अवलंबून असते. ह्या लग्नाच्या चालि, निरनिराळ्या देशांत कशा आहेत, व त्यांत कालानुक्रमानें सुधारणा कशा होत गेल्या, ह्याची माहिती ‘ Das Weild ’ या पुस्तकांत सांगितलेली आहे. वाचकांना त्यांमधील माहिती थोडक्यांत दिल्यास करमणूक होईल यांत संशय नाहीं, पुष्कळ बायका करणें, ह्मणजे विशेष कांहीं आहे, असें इतर देशांतील लोकांस वाटत नसे जपान व चायना यामध्येंसुद्धां अजून पुष्कळ बायका करण्याची रीत आहे. मुसलमानी अमलाखालीं राहणारा ज्यूवर्ग, पुष्कळ बायका करण्याचा विरुद्ध नव्हता. इराणी लोकही त्याचवर्गांतले होत. हिंदुमध्यें जे राजे सरदार लोक आहेत त्यांच्या पुष्कळ बायका आपण पहातो. आपल्या देशांत, हैद्राबादचे निजामसाहेब या बाबतींत महशूर आहेत.

निग्रो मरतो त्यावेळीं आपली संपत्ति, बायको, आपल्या वारसाच्या ताब्यांत देतो. मुसलमानाला कुराणांमध्यें चार बायका कराव्यात असें जरी सांगितलें आहे तरी बहुतेक एक पत्नीव्रत पाळतात असें पहाण्यांत येतें. इराणांमध्येंसुद्धां हीच स्थिती आहे. काशी, राजपुताना, येथें रहाणारा भय्या वर्ग यांचीं लग्नें पाळण्यांतच होतात स्कॉटलंडमध्यें, मुलींना मार्केटमध्यें आणून, कोणच्याही तरुणाला त्यापैकीं निवड करण्याचा हक्क असे. या बाजारांत मुलगी पडल्यानंतर तिनें एक वर्षभर राहून परस्परांचा स्वभाव कसा जमतो हें पाहून नंतर लग्न करण्याची रीत होती. केनेरी बेटांमध्यें प्रत्येक बाईला तीन नवरे व प्रत्येकाजवळ एक महिना तिनें काळ काढणें, व त्या मुदतींत तिचें पालन पोषण करण्याची जबाबदारी त्याच्यावर याप्रमाणें पद्धत असे. तिबेटामध्यें अनेक भावांत मिळून एकच बायको

४३१८

असते असें अद्याप पहाण्यांत येतें. ग्रीसमध्यें अविवाहित मनुष्याला मान देत नसत व मुसोलिनीनें अलिकडे तर त्यांच्यावर जबर कर बसविलेला आहे. पॅरागे गॅरोज, या देशांमध्यें पतीची मागणी मुलीकडून होत असे. रानटी लोकांमध्यें एखाद्या बाईची प्राप्ती करावयाची म्हणजे आपसांत लढाई करून त्यामध्यें जो जिंकेल त्याला ती प्राप्त होत असे. परंतु सर्वांचा निकर्ष पाहिला तर एक पत्नी व्रत पाळणें, याबद्दल सर्वांची सहानुभूति होती. असो. नवीन समाज स्थापन झालेले आहेत, आपल्यामध्यें असणारी, विवाह पद्धति, इंग्रजी शिक्षणांमुळें नकोशी झालेली आहे, जाती बंधनें शिथील होत आहेत व त्यामुळें लग्न ही बाब थट्टेचा विषय झालेला आहे. पाश्चात्यांप्रमाणें, कोर्टांत जाऊन रजिष्टर विवाह केला म्हणजे लग्न झालें व हें लग्न वाटेल त्यावेळीं मोडण्यांचाही कायदेशीर हक्क प्राप्त झालेला आहे. अशा तऱ्हेची नव सुधारणींत कुटुंबें कशी सुखानें नांदत असतील ती कोर्टांच्या खटल्यांच्या हकिकती वाचून कळून येतेंच आहे. विवाहाचें असणारें धार्मिक स्वरूप पालटून एकप्रकारें स्वातंत्र्य वृत्तांचा तो कळसच आहे असे म्हटल्यास हरकत नाहीं. प्रेम म्हणजे परस्परांची विषय वासना तृप्त होणें हेंच प्रेम अशा तऱ्हेचा अर्थ भावीं परिणामावरून ठरविण्यांस हरकत नाहीं. पूर्वकालीन बाल विवाहाचा येथें विचार केल्यास अतिशयोक्ती होणार नाहीं. ८ वर्षांची मुलगी व बारा ते १४ वर्षांचा वर अशा प्रकारची लग्नें २०।२५ वर्षांपूर्वीं होत असत, त्या वेळच्या कालाचा विचार केला म्हणजे आजच्या सारखी स्वातंत्र्याची कल्पना कोणाच्या डोक्यांत येत नसे. शिवाय एकत्र कौटुंबिक पद्धतींत वागण्याची संवय प्रत्येकाला झाल्यामुळें आपली वडीलमाणसें जें करतील तें चांगलेंच असणार अशी मनाची भावना प्रत्येकाची असे. शिवाय, मुलीला रजस्त्राव येईपर्यंत मध्यंतरीचा परस्परांचा काल एकमेकाच्या आकर्षणामुळें प्रेम वृद्धिंगत करण्यास मदत करीत असे. शिवाय ह्या कालांत विषय वासना म्हणजे काय याचीही कल्पना कोणाला येत नसे. सध्यासारखें शहरांत राहणारानां एका खोलीला २५।५० रुपये भाडेंही द्यावें लागत नसे व शिवाय, चटोर वाङ्मय, सिनेमा, ह्यांचाही आजच्या सारखा सुळसुळाट नव्हता. पुष्कळसें लोक खेडेगांवांत खाऊन पिऊन सुखी असल्यामुळें शहरांतल्या मजा पहाण्याची वेळ म्हणजे कधींतरी येत असे; आज तो मनु पालटला आहे. शिक्षण वाढत आहे व परस्पर स्त्री पुरुष, शिक्षण घेत असल्यामुळें, त्याकाळीं न उद्भवणारे विचार तारुण्याच्या काळांत संगतीच्या सहाय्यानें उत्पन्नझालें तर त्यांत मोठेंसें नवल

करण्याची जरुरी शहरांसारख्या ठिकाणीं, तरुण स्त्री पुरुषांच्या गांठी एकसारख्या पडतात. कादंबऱ्याच्या वाचनानें, सिनेमाच्या पहाण्यानें रोमान्स प्रत्येकाला पाश्चात्याप्रमाणें करावेसें वाटतात व त्याचें वाईट परिणाम परस्परांना भोगावें लागतात. यांत शंका नाहीं.

आजच्या काळाला लग्न कोणच्या वर्षी करावें तें पाहूं. वैद्यकीय दृष्ट्या विचार केला ह्मणजे २० ते २४ वर्षांचा पुरुष व १५ ते १६ वर्षांची स्त्री याचें लग्न होण्यास हरकत नाहीं. स्त्रियाची जननेंद्रियें २० वर्षांपर्यंत पूर्णावस्थेस नसतात. **स्त्रीला रजस्राव झाला ह्मणजे ती संतति होण्यास लायक झाली असें समजणें चुकीचें आहे.**

याला खालींलप्रमाणें कारणें आहेत.

( १ ) इंद्रियांची वाढ झालेली नसल्यामुळें व तीं पूर्णावस्थेंत नसल्यामुळें विजातीय ह्मणजे गर्भाची वाढ करणें, हें शरिराला एक प्रकारें ओझें असतें.

( २ ) अकालीं संयागामुळें थकवा येतो, मज्जातंतूवर त्यांचा परिणाम होतो, व त्यामुळें मेंदु व बुद्धि यांवर परिणाम होतो.

( ३ ) पुरुषांपेक्षां स्त्रियांवर याचा परिणाम जास्त होतो, त्यांना होणारीं मुलें, यांची जोपासना कशी करावी यानें ज्ञान नसतें यामुळें परस्परांची हेळसांड होऊन औषधांचा मारा गर्भारपणांपासून सुरू होतो. अशा वयांत होणाऱ्या मुलांची वाढ बरोबर झालेली नसल्यामुळें ती बुद्धिनें अपक्व अशीं असतात व ताकदही कमी असल्यामुळें रोगाची बाधा होण्यास वेळ लागत नाहीं.

स्त्री पुरुष यांमध्यें अंतर म्हणजे ७ ते ८ वर्षांचें असावें; यापेक्षां जास्त अंतर असल्यास स्वभाववैचित्र्य, आवड यांच्या भिन्नतेमुळें विवाहाचा हेतु साध्य होत नाहीं. उतार वयांत लग्न करणारे नेहमीं पश्चात्ताप पावल्याचें पहाण्यांत येतें, जी गोष्ट त्यावेळीं सुखाची म्हणून करतो तीच त्यांस असमाधानाची होते, याचें कारण वयांमधील अंतर हें होय; पक्वविचार व अपक्वविचार यांची सांगड कशी काय जमणार हें प्रत्येकानें आपल्याशीं ताडून पहावें वडिलाचे विचार त्यांच्या मुलाला पटत नाहींत, याचें कारण त्याच्या वयांमधील अंतर हें होय. प्रत्येक तरुण स्त्रीपुरुषांच्या आयुष्यावर होत असतो व त्याचप्रमाणें विचारांत ही क्रांति होत असते. काळाचा, परिस्थीतीचा परिणाम प्रत्येक तरुण स्त्रीपुरुषांच्या आयुष्यांवर

होत असते, आज ज्ञानाच्या गोष्टी सांगणारा आपल्या बाळपणांत आपण काय केलें याचा विचार करूं लागला म्हणजे आपणही तेंच केलें असें त्याला अनुभवास येतें. यांवरून असें सिद्ध होतें कीं प्रत्येकजण आपण शहाणा म्हणून जें समजतो, तें चुकीचें असून प्रत्येकजण प्रयोगावस्थेंत व विद्यार्थीच असतो असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. आई-बापांनीं मुलांना वळण लावणें वडील भावानें आपल्या धाकट्या भावाला चुकत असेल तर सांगणें, पतीचें पत्नीनें ऐकणें वगैरे संसारामध्यें गोष्टी ठरलेल्या आहेत, त्याप्रमाणें प्रत्येकानें वागलें पाहिजे. ज्याला कांहींच करावयाचें नसतें व असेल माझा हरी तर देईल—वरी, म्हणून जो वागतो, त्याला सौख्य न होतां दुःखच भोगावें लागतें. प्रत्येक मनुष्यानें आपलें कर्तव्य केलेंच पाहिजे; हीं कर्तव्यें काय आहेत, त्याची जाणीव धर्मशिक्षणाच्याद्वारें प्रत्येकाला लहानपणापासून होत असते. आज धर्माला महत्व नाहीं, धर्म हें भट भिक्षुकांनीं माजविलेलें बंड आहे, विवाहविधी, श्राद्धपक्ष. यांची हेटाळणी, आपल्यामधीलच ब्राम्हणाच्या व त्यांतल्या त्यांत शास्त्र्यांच्या वंशांत जन्म घेतलेल्या आंग्ल पदवीधरांकडून केली जात आहे, याला दैवदुर्विपाक नाहीं तर काय ह्मणावें! स्नानसंध्या वगैरे जे ब्राम्हणांचें कर्तव्य आहे तें, साहेब तुम्हीं करूं नका म्हणून सांगत नाहीं. अगर याने काय होतें व त्यानें काय होतें अशा शंका कुशंका काढून आपण न करतां इतर लोकांना हिणवणें हें कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ अशा प्रकारची कित्येकांची मनःस्थिती पाहून कींव येते. अमेरिकेसारख्या सुधारलेल्या राष्ट्रानें आमच्या धार्मिक रीतीचा अवलंब करावयास पाहावें व त्याच्या उलट आमच्या लोकांना त्याचें महत्व वाटू नये, हा काळाचा महिमा होय ! आपला धर्म, आरोग्य शास्त्राच्या पायांवर रचलेला आहे आपल्या धर्मांतील षोडश संस्कार प्रत्येक व्यक्तिच्या सुखाकरितां आहेत, धर्म पाळला म्हणजे शरिरांचें आरोग्यही पाळलें जातें, आरोग्य राहिलें म्हणजे सुखाचीं साधनें उपभोगावयास मिळतात परंतु जेथें आमचा पायाच ढांसळला आहे तेथें नुसत्या लेखांनीं अगर भाषणांनीं काय होणार हें उघड दिसत आहे. कालानुरोधानें या सुशिक्षीत समजल्या जाणाऱ्या वर्गाला गप्प बसावयास काय याल असें म्हणण्याची पाळी येणार यांत संशय नाहीं.

# प्रकरण ११ वें

—:०:—

## लग्न कोणी करूं नये ?

मागच्या प्रकरणांत लग्न व त्याच्या रीती निरनिराळ्या देशांत कशा आहेत यांचा थोडक्यांत उहापोह झाला. आतां लग्न कोणी करूं नये, याचा विचार करूं. लग्न ही गोष्ट मनुष्याच्या आयुष्यांत क्रांति करणारी आहे. लग्न झाल्यानंतर एक प्रकारची जबाबदारी मनुष्यावर पडत असते. श्रीमंताच्या मुलांचे अल्पवयांत लग्न झालें तर त्याला त्याची फिकीर वाटत नाहीं. लग्न केल्यानंतर एका जास्त माणसाची पोसण्याची जबाबदारी त्याप्रमाणें लहान जन्मास येणाऱ्या बालकांचें संगोपन करण्याची जबाबदारी शिरावर पडत असते. दिवसेंदिवस दयाळु सरकाराच्या कारवाईनें आपला देश निकृष्टावस्थेंत पोंचत चालला आहे. निरनिराळ्या प्रकारचे कर निरनिराळ्या सुटसुटीत व गोंडस नांवांनीं गरीब प्रजेवर लादले जात आहे. आपसांतील दुहींमुळें भांडणें होऊन व्यापारांत मंदी व तोटा ही झपाट्यानें वाढत चालली आहेत. शिवाय जेथें ७।८ रुपायांचे भाडें असें तेथें २५ ते ५० रुपये भाडें पडत आहे. मध्यम वस्तींच्या राहणीला पगार, भाडें, दूषित, हवापाणी यामुळें देण्यांत येणारा डॉक्टर वैद्यांचा कर वगैरे गोष्टी आजच्या काळांत तरुणांच्या लग्न करण्याच्या मार्गांत आड येत असतात. हीच गोष्ट मुलींच्या बाबतींतही आहे. हुंडा ही चीज मुली असणारांना कराच्या रूपानें द्यावी लागते; व हा कराचा बोजा शिक्षणाच्या डिग्रीवर अवलंबून असतो; पूर्वकालीं मुलाचें घरदार पाहून हुंड्यामधील चढ उतार होत असें परंतु आजच्या काळाला मुलाला घरदारांची जरूरी नाहीं. आमच्यांतील पुष्कळसा सुशिक्षित वर्ग लग्न करणें म्हणजे, सासऱ्यानें आपल्या जामातांचा संसारच डोक्यावर उचलून घेणें असें समजतात. जुनें लोक पुरवलें परंतु आजकालचे सुशिक्षित जाडे पदवीधर नकोत, असें ह्मणण्याची पाळी यैते. त्यांतल्यात्यांत हा पदवीधर विलायतेचें पाणी पिऊन आलेला असला व विलायतेंत एखादे घोंगडें मळ्यांत अडकलेलें असलें तर ही गोष्ट हा पदवीधर शेवटपर्यंत गुपित ठेऊन मोठ्या हुंड्यासह दुसरें लग्न करून आंग्ल तरुणींचा भार सासऱ्यावर

टाकित असतो. हुंड्याच्या पायीं चांगल्या चांगल्या स्त्रीपुरुषांच्या आयुष्याची हानि झालेली आहे. हुंडा न घेतां परस्परांनां भारी न जाईल. अशा तऱ्हेनें विवाहाला तयार होणाऱ्या प्रत्येक तरुणांनीं मार्ग काढल्यास हिंदुस्थान देशाचें खरोखर भाग्यच होय असें समजण्यास हरकत नाहीं. हा प्रश्न तरुणपिढीचा आहे. इतकें वर्णन करण्याचें कारण ह्मणजे विवाह कां होत नाहीं, विवाहाच्या मार्गांत नैसर्गिक अडचणी कोणत्या येतात, हें दाखवण्याचा होय. विवाह वेळींच न झाल्यामुळें परस्परांची प्रकृति चांगली रहात नाहीं व निरनिराळे विकार सुरु होतात. व त्यामुळें या वयांत वाईट मार्गाला लागण्याचा फार संभव असतो. ज्याच्या घराण्यांत आनुवंशिक विकार आहे. प्रकृती चांगली रहात नाहीं अशांनीं ब्रह्म-चर्यानें राहणें योग्य. आपलें वडील आजोबा, जे ८० ते ९० वर्षांपर्यंत राहिलें तें आयुष्यमान आज राहिलें नाहीं. ५० ते ६० ह्मणजे वयाची कमाल झाली. साधारणत: २५ ते ३० वर्षांपर्यंत शिक्षणांमध्यें जातात. आजचें शिक्षण पाहिलें तर पुष्कळसें व्यवहारांत उपयोगी न पडणारें असें असतें. एखादी पदवी घेतल्यानंतर ७–८ वर्षें जम बसावयास जातात व हळुहळु कोठें उदय होतो तोंच अस्तंगत होण्याची पाळी येतें. शहरासारख्या ठिकाणीं सर्व रोग होण्याचें जें मूळ कारण मलावरोध तें प्रत्येकांच्या पाठीस लागतें; व आयुष्य क्षीण होण्यास हेंच कारण असतें. क्षय, दमा, उपदंश, दुष्ट व्रण, अपस्मार, फेंफरे, वेडेपणा महारोग वगैरे विकार अनुवंशिक असतात. अशा कुटुंबांतील मुलीशीं अगर मुलांशीं विवाह झाल्यास संतति सुदृढ होत नाहीं व एखाद्या बाळंतपणांतच मृत्यु येतो, शिवाय या विकाराची छाया संततिवर होत असल्यामुळें ती संततिही अल्पायु होते. या लोकांनीं लग्न करणें हें एक प्रकारचें पाप आहे असें समजलें पाहिजे.

(१) क्षय व उपदंशजन्य आईबापांचीं मुलें लहानपणतच मरतात. त्यांतल्यात्यांत जगलीं तर तें विष त्यांच्या मुलांमध्यें उतरत असतें. तिसऱ्या पिढीला ह्या विकाराचें निर्मूलन होतें. ज्याला उपदंश झालेला आहे अशांची मुलें पाहिलीं असतां, खरोखर त्या मुलांची स्थिती करुणास्पद व चिंताजनक असते. ज्यांना हा रोग झाला त्यानें तज्ञ डॉक्टर वैद्यांचें औषध घेऊन रोग निर्मूलन झाल्यानंतर २ ते ३ वर्षांनीं लग्न करावें. **उपदंशासारखा भयंकर विकार दुसरा नाहीं**. हा बरा झालेला आपल्याला पहाण्यांत येतो परंतु एखादे वेळीं खाण्यापिण्यांत चूक झाली तर त्याचें स्वरूप उघडकीस येतें. उपदंश हा विकार जे बाहेरख्याली

व अविचारानें वागणारे असतात, त्यांनाच होतो. अशा प्रकारचे लोक हा विकार आपल्याला होणार नाहीं, म्हणून बेफिकीर असतात व आपल्याला कांहीं झालें नाहीं म्हणून स्वस्त बसतात. ( या रोगांसंबंधीं स्वतंत्र प्रकरणांत विचार करूं ) त्यावेळींच प्रतिबंधक औषधें घेतलीं तर रोग तावडतोब थांबतो.

( २ ) अशा लोकांनीं लग्न करणें म्हणजे समाजाचा गुन्हा करणें होय. लग्न करून दूषित रक्तांची संतति उत्पन्न करणें हा लग्नाचा उच्च हेतु नाहीं. ह्या व्यक्ति स्वतः बिघडतात, आपल्या संततिला बिघडवितात व समाजाला अशामुळें कीड लावतात.

( ३ ) कांहीं हरीचे लाल लग्न करून बाहेर छ्यालीपणा करणारे आहेत. हे तिकडून मिळणारी शिक्षा आपल्या स्वतःच्या स्त्रीला देतात व तिचीही प्रकृति बिघडून टाकतात व याचा परिणाम तिला, स्वतःला व भावी संततिला भोगावा लागतो.

( ४ ) देवी, गोंवर, क्षय, इन्फुएन्झासारखे सांसर्गिक विकार यांपासून दुसऱ्याला त्यांची बाधा न होईल याबद्दल शक्य ती खबरदारी बाळगली पाहिजे.

( ५ ) आनुवंशिकपणा ही महत्त्वाची बाब आहे. कित्येक कुटुंबांत ८० ते ९० वर्षांच्या उमरीपर्यंत जगणारी मंडळी असतात, तर कित्येकांत २५ ते ३० च्या आंत मंडळी अल्पायु होऊन मरतात. एका कुटुंबांत, लेखकाला असें आढळलें कीं, मुलगा जो ८–१० वर्षांचा होतो, तो बापाचा मृत्यु एकाएकीं होऊन तो मरतो. वंशाला आधार तयार झाला म्हणजे झालें. ईश्वराची करणी अगाध आहे खरी. ही तऱ्हा आज २–३ पिढ्या चालत आहे. अशा कुटुंबांतील मंडळीनें लग्न न करणें बरें. ज्याच्या बापाला क्षय झालेला आहे, त्याला निःसंशय क्षय होणार असें समजून लग्न करण्याच्या भानगडींत त्यानें पडूं नये. अपस्मार, वेडेपणा वगैरे सारख्या विकारांचीं अल्प लक्षणें असलीं व शरिर प्रकृति चांगली असेल तर औषधोपचार करून नंतर लग्न करण्यास हरकत नाहीं.

( ६ ) मुसलमानांमध्यें चुलत भाऊ व चुलत बहीण यांचीं लग्नें झाल्याचीं आपण पहातों. अशाप्रकारचीं लग्नें वैद्यकीय दृष्ट्या अपायकारक आहेत. नैतिक

दृष्टया एक तर परस्परांचें बहीण भावांचें नातें असतें व रक्त एकच असल्यामुळें कुटुंबांत असलेले अनुवंशिक विकारांची बाधा संततीस होते.

( ७ ) जन्मापासून आंधळेपणा असणें बहिरेपणा इंद्रियांमध्यें व्यंग. अशा तऱ्हेच्या माणसांनीं लग्न केल्यास संततिही त्या प्रकारची होण्याचा बहुशः संभव आहे.

( ८ ) गुन्हेगार लोकांनीं. चोरी दरवडेखोर दारुबाज या लोकांनीं लग्न करूं नये. शास्त्रीय दृष्टया असें सिद्ध झालें कीं, अशांच्या संततीत त्यांच्या आई-बापांचें गुण उतरत असतात व हीच संतति देशांमध्यें धुमाकुळ चालवण्यास कारण होते.

दारुबाजांची मुलें कित्येकदां बापाच्या स्वभावाच्या विरुद्ध आढळतात व जनता त्याला धन्यवाद देत असते. परंतु रक्तांमध्यें असणारीं अदृश्य रूपानें राहिलेली दारुची ठिणगी केव्हां ना केव्हां तरी प्रज्वलित होऊन त्या मार्गाला तो मुलगा जातो असें सिद्ध झालेलें आहे.

( ९ ) ज्यांचें शरीर ओबडधोबड आहे, जे फारच खुजें ( Dwarf ) आहेत अशांनीं लग्न करूं नये.

( १० ) नेहमीं नवऱ्याचें वय बायकोपेक्षां ५–१० वर्षांनीं जास्त असावें. आपल्या समाजांत पूर्वी २५ वर्षांचा नवरा व ८ वर्षांची मुलगी अशी लग्नें होत असत व त्यावेळीं होणारी संतति इतकें अंतर असतांना सुद्धां सुदृढ होत असे. परंतु आज सुधारणेच्या युगांत आपण असल्यामुळें आजच्या काळाला अनुसरून वागणें बरें.

( ११ ) लग्न करतांना आपल्यामध्यें पत्रिका पहाण्याची रीत आहे. वधुवर यांची पत्रिका स्वभाव गुण कसे आहेत तें जमतात किंवा नाहींत हें पहाण्याची रीत आहे. नुसतें बाह्य सौंदर्यावरून परिक्षा करावयाची नसून पत्रिकेप्रमाणें परस्परांचें वर्णन, शील जमतें किंवा नाहीं हें पाहून नंतर लग्न करण्याची रीत आहे; परंतु दुर्दैवानें जेथें जन्मच बरोबर नाहीं तेथें ज्योतिषी तरी काय करणार ? शिवाय एखादा त्रासलेला बाप, मुलीचें जमत नाहीं हें पाहून शेवटीं पैशाच्या पिशवीचें तोंड वराच्या बापाला दाखवून मध्यस्थाच्या मदतीनें वराच्या पत्रिकेला जुळेल अशी पत्रिका तयार करतो व ३६ गुण जमले म्हणून परस्पर समाधानांत अस-

तात. परंतु जेथें मुळांतच खोटेपणा तेथें १-२ महिन्यांत मुलीला वैधव्य आलें तर नवल तें काय ? खरें पाहिलें असतां पत्रिकेमध्यें गुणां बरोबरच पुढील काळ कसा जाईल, निदांन ५ ते १० वर्षे कशी जातील इकडे न पाहातां ३६ गुण जमवण्याची जी रीत आहे ती अत्यंत घातुक आहे. कांहीं वर्ग असे आहेत कीं ते लग्नाच्या बाबतींत मुलांचे राहोच परंतु आपल्या नातलगांशीं सुद्धां मुलीची पत्रिका लागूं पडते किंवा नाहीं हें पाहून वधू पसंत करतात. अशा लोकांचा लग्न होणें म्हणजे दुर्मिळच; ब्रह्मदेवानेंच जर या लोकांकरितां नवीन वधू निर्माण केली तरच होईल. असे चिकीत्साखोर लोक शेवटीं पश्चात्ताप पावल्याचें आढळून येतें. अलिकडे पत्रिका पहाण्याची पद्धति बंद होऊन बाह्य देखाव्या वरुनच मुलीला पसंत करण्याची रीत पडलेली आहे.

( १२ ) कोणच्याही आईबापानें मुलांचे शिक्षण पुर्ण झाल्याशिवाय व तो स्वताच्या पायांवर उभें राहिल्याशिवाय लग्नाच्या भानगडींत पडूं नये.

कांहीं कुटुंबांत जुनी माणसें अशा प्रकारची असतात कीं, एकदां बाळ्याचें लग्न होऊन जाऊं दे ह्मणजे काशी यात्रा घडली असें समजतात; परंतु अकालीं लग्न झाल्यामुळें व त्या वेळीं अपक्व विचार असल्यामुळें पुष्कळ तरुणांचा नाश झालेला आहे. **स्त्री विषय** असा आहे कीं, तारूण्यामध्यें असणारा मी मी ह्मणणारा प्राणी मोहानें विषय लंपट बनतो. शिक्षणक्रम जेथल्या तेथें रहातो; घरची चांगली स्थिती असली तर शिक्षणाचा बाजा झाला तरी काळजी नसतें; परंतु कांहीं काळ गेल्यानंतर डोळे उघडतात व पश्चात्ताप होतो. सुज्ञ आईबापानीं अल्पवयांत लग्न करणें म्हणजे आपल्या भावी पिढीचें नुकसान करणें असें समजून, काळाकडे लक्ष देऊन शिक्षण पुरें झाल्याशिवाय लग्न करुं नये. या जगांत स्त्री व पैसा याला कोण मोह पावणार नाहीं ? तारुण्याचें वय, अपक्व विचार, अशावेळीं शिक्षण घेत असतांना लग्नाची बिडी अडकवणें त्याचा सुपरिणाम म्हणून समजणाऱ्या आई-बापांना पुढें विपरित झालेला आढळून आला तर दोष कोणाचा ? स्वतःच्या पायांवर चार पैसे मिळविण्याची धमक आल्या खेरीज कोणीही तरूण पुरुषानें लग्न करूं नये; परंतु पुष्कळ वेळां भीडेमुळें, आपलीं मतें गुंडाळून ठेवावीं लागतात व हा भीडस्तपणा दोघांनाहीं पश्चातापास कारण होतो. मग हौदसे गयी तो बुंदसे नही आती अशी स्थिती होऊन जाते.

( १३ ) मुलगी करणें ती चांगल्या कुलांतील करावी. एकाद्या कुलवान कुटुंबांत पैशामुळें दरिद्रता आली असेल तर पैसा नाहीं म्हणून त्याची मुलगी नाकारणें चांगलें नाहीं; एखादा गृहस्थ अनाचार करून संपतिमान झालेला असला तरी त्याचें वंशपरंपरेचें गुण नष्ट झालेलें नसतात, त्याचें विचार पाहिले तर नेहमीं क्षुद्र असलेलें आढळून येतात; याकरितां जुनी मंडळी कुल व शील इकडे अगोदर लक्ष देतात. ईश्वरावर ज्याची भक्ति नाहीं अशा सुधारकाला मुलगी देऊं नये. ज्याचें त्या दयाळु प्रभूवर प्रेम व भक्ति नाहीं तो आपल्या बायकोवर व मुलांवर कितीसें प्रेम करणार ? असा इसम बायकोला प्रेमाच्या भरांत कितीही आश्वासनें देणारा असला तरी तो तीं कितपत पाळणार हें उघड आहे.

याकरितां लग्न करणारांनीं कुलशील पाहून लग्न करावें. पैशाच्या आड येऊन लग्न मोडूं नये. पैसा वाटेल तसा मिळवतां येईल परंतु कुल व शील मिळवितां येणार नाहीं.

---


# दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स यांचा

## आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें,

हा कारखाना अव्याहत ३५ वर्षे चालला असून जनतेच्या उदार आश्रयामुळें दिवसेंदिवस त्याची भरभराट होत आहे.

कारखान्यांत निरनिराळ्या रोगांवर उपयोगी अशीं सुमारें ६०० औषधें तयार आहेत. औषधें अत्यंत गुणकारी व खात्रीचीं असून त्यांचे चांगूलपणाबद्दल हिंदुस्तानांत भरलेल्या निरनिराळ्या प्रदर्शनांकडून सोन्या–चांदीचीं पदकें व प्रमाणपत्रें मिळालीं आहेत.

वैद्य, डॉक्टर, व्यापारी, लोकलबोर्डाचे व धर्मार्थ दवाखाने यांची मागणी कारखान्यांतील औषधांस असून त्यावर कारखान्यांकडून कमीशन ही भरपूर दिलें जातें.

भरपूर माहितीचा मोठा कॅटलाग गुजराथी, इंग्लीश व मराठी या भाषांत तयार असून ०६ चीं पोष्टाचीं तिकिटें आलीं असतां पाठवला जातो.

# प्रकरण १२ वें.

—:०:—

## निरनिराळ्या देशांतील विविध चाली.

समाजाला कीड लावणारे जर कोणते रोग असतील तर ते ह्मणजे **उपदंश** ( Syplhils ) व **पू-प्रमेह** (Gonorrhoea) हें होत. हे विकार ज्यांना बाहेरख्यालीपणाची चटक लागलेली आहे अशांना धंदेवाईक स्त्रियांपासून होतात. हा विकार अविवाहीत त्याचप्रमाणें विवाहीत स्त्रीपुरुषांनाहि होतो. तारुण्यांतलें वय, मसालेदार पदार्थ खाण्यांची संवय, शृंगारात्मक प्रेम विषयक सिनेमा पहाण्याची संवय वगैरे कारणें मागील प्रकरणांत दिलेलीं आहेत त्या सर्व कारणांपासून काम वासना जागृत होते व पुरुषांला बाहेरख्यालीपणांची संवय लागते. धंदेवाईक स्त्रियांचा वर्ग आपल्याच देशांत नसून तो सर्व जगभर पसरलेला आहे. या वर्गाची जरूरी पूर्वकालापासून भासत आलेली आहे. आज मुंबई-सारख्या ठिकाणीं रहाणारा नोकरी पेशाच्या वर्ग ज्यांना अपुरा पगार व जागेच्या अभावीं बिऱ्हाड करतां येत नाहीं, ज्यांना स्वातंत्र्याची चटक लागलेली आहे असा वर्ग बहुधा ह्या फंदांत पडून शेवटीं पश्चात्ताप पावतो. वेश्या वर्ग नसावा अशा प्रकारची विचारसरणी कांहीं सुशिक्षित लोकांची आहे परंतु खोल विचारांतीं असें आढळून येईल कीं हा वर्ग नाहींसा करून भागणार नाहीं ह्या वादांत खोल न जातां हा वर्ग पूर्वींपासून कसा चालत आला आहे, प्रत्येक देशांत या वर्गाची रहाणीं कशी काय आहे हें पाहूं ! इजिप्तमध्यें स्वतःच्या स्त्रीनें पातिव्रत्यानें रहाणें महत्वाचें समजत नसत ! ग्रीसमध्यें बचुज व फॅलस या देवतांपुढें मुलींना अर्ध-वट नग्न स्थितीमध्यें नाचण्याची परवानगी होती. ग्रीक लोक स्त्रियांनीं पातिव्रत्यांत राहिलें पाहिजे असें समजत असतात पण स्वतःला मात्र वाटेल तो बदफैलीपणा करण्यास हरकत नाहीं असें मानीत असत. हेटेरे ( Hetaerae ) ह्मणून तनु-विक्रीचा धंदा करणारा जो वर्ग आहे त्याला तिकडे फार मान आहे. हा वर्ग त्या काळीं सुशिक्षित त्याचप्रमाणें नृत्य व गायन यांमध्यें प्रविण होता. त्यावेळच

सोलॅन ह्मणून जो वकील होऊन गेला त्याचा विवाहीत स्त्रीपुरुषांचें रक्षण व्हावें ह्मणून त्यांच्याकरितां एक निराळा कायदा असावा असा विचार होता. पेरिलस म्हणून एका विवाहीत वकील होता यानें याच वर्गापैकीं एक बाई ठेविली होती. लस म्हणून त्याकाळीं एक बाई होऊन गेली, तिनें आपल्या स्वरुपावर अलोट सपत्ति मिळविली. बेबीलॉन ( Babylon ) देशांत एकाकाळीं अशी रीत होती कीं, वर्षांतून एकदां तेथील देवळांत येणाऱ्या पाहुण्यांची सोय व आदरातिथ्य प्रत्येक स्त्रीनें केलें पाहिजे.

एशिया मायनर, सायमस, फिनीशीया, या ठिकाणीं सुद्धां अशीच रीत होती. रोमची एकाकाळीं याबद्दल तर ख्यातीच होती. दक्षिण समुद्राजवळ असलेल्या अमेरिन बेटांत एक प्रकारची सोसायटी स्थापन केली होती. त्यांतील सभासद कोणत्याही वयातील कुमारीवर आपला पहिला हक्क आहे असें समजून वागत असत कांहीं ठिकाणीं देवाला मुली वहाण्याची चाल आहे व ह्या मुलींत तेथें येणाऱ्या पाहुण्यांशीं तनुविक्रय करण्याची चाल पडलेली आहे. एक अशी जात आहे कीं, तिच्यामध्यें कोणत्याही बायकोवर सर्वांचा हक्क आहे असें प्रत्येकजण समजून त्याप्रमाणें त्यांना वागण्यांत कमीपणा वाटत नाहीं. ह्या स्त्रियांचें लग्न देवाबरोबरच झालेलें असतें. त्यांच्यामध्यें दोन जाती आहेत व त्या त्यांच्या धंद्यांवरून पडलेल्या आहेत. देवदासी व वेश्या. वेश्या म्हणून जो वर्ग आहे, तो शहरांसारख्या ठिकाणीं राहून तनुविक्रय करून उपजीविका करीत असतो. देवदासी यांना लहानपणापासून नृत्य गायनाचें शिक्षण मिळतें. त्यांना देवळांच्या उत्पन्नापैकीं ठराविक तनखा मिळत असतो व हा तनखा देवळाच्या उत्पन्नांप्रमाणें कमी जास्ती होण्याचा संभव असतो.

देवदासी ज्या नृत्य व गायन करीत असतात त्यांच्या अंगावर बहुमोलाचे सोन्यारत्नाचे अलंकार आढळतात. ह्या वर्गाला प्रत्येक जातीकडून मान असतो व या वर्गाला लग्न–मुंजीमध्यें नृत्य व गायन करण्याकरितां बोलावणें मानाचें समजलें जातें. या जातींतील मुलगी वयांत आली ह्मणजे तिचें कौमार्यत्व जो जास्त पैसे देईल अशा एखाद्या गृहस्थाकडून भ्रष्ट केलें जातें. यावेळीं मोठा समारंभ केला जातो. मद्रास इलाख्यांत देवाला वाहिलेल्या पुष्कळ मुली आहेत व त्यापैकीं बऱ्याच पोटाकरितां वेश्याव्यवसाय करीत असतात.

महम्मद पैगंबराच्या वेळीं अरबस्तानांत वेश्याव्यवसाय हा फार हीन समजत असत. जी मुलगी वेश्याव्यवसायाला प्रवृत्त झालेली आढळून येई, तिचा बाप तिला जिवंत पुरीत असे. कुराणामध्यें महम्मद पैगंबर ह्मणतो, "तुमच्याकडे नोकरी करणाऱ्यामुली ज्यांना आपलें जीवित चांगल्याप्रकारें घालविण्याची इच्छा असेल अशा तुमच्या पदरीं गरीब म्हणून नोकरी करीत असल्या तरी, त्यांचा तनुविक्रय न करितां त्यांचें जीवित चांगलें जाईल यासाठीं त्यांना मदत करा." पेलाव ( Pelau ) नांवाचीं बेटें आहेत, तेथें १०-१२ वर्षांची मुलगी झाली ह्मणजे ती पोटांकरितां दुसऱ्या जवळच्या ठिकाणीं जाऊन, एखाद्याजवळ लग्नाच्या बायकोप्रमाणें राहून नोकरी करण्याची चालच पडलेली आहे. चीनमध्यें पुष्कळ ठिकाणीं अशा-प्रकारच्या स्त्रिया आढळतात; त्या आपला तनुविक्रय एखाद्या दलालीणबाईच्या मार्फत करीत असतात. त्यांना अशाप्रकारचे शिक्षण ६ ते ७ वर्षांपासून देण्याची रीतच पडलेली आहे. ११-१२ वर्षांचे होईपर्यंत त्यांना वाचणें, नाचणें व लिहीणें शिकवतात. १५-१६ वर्षांचे वय झालें म्हणजे तनुविक्रय करण्यास सुरवात होते. यांच्या तारुण्याचा नाश झाल्यानंतर यांना कोणी विचारीत नाहीं व मग त्या रस्त्याच्या ठिकाणीं मजुरी व जुने कपडे विकत असलेल्या आडळतात. १८६१ सालीं चीनमध्यें बाप आपली मुलगी या धंद्याकरतां विकत असे. चीन-मध्यें पूर्वीच्या काळांत फुलें विकणाऱ्या बाया, फुलें विकून-शिवाय तनुविक्रयही करीत असल्याचें आढळून येतें. ग्रीसमध्यें याचप्रमाणें स्थिति होती.

सोलोमन नांवाचीं बेटें आहेत, त्या ठिकाणीं राहणारे उगी क्रिस्टो बोल लोक आहेत. हे फार लोभी, हलक्या मनाचे व नीतिभ्रष्ट आहेत. त्यांच्यामध्यें सर्वांच्या मुली तनुविक्रय करण्याचा धंदा करतात. त्याची दिक्कत त्यांना वाटत नाहीं व शिवाय त्या लोकांना स्वतःच्या बायकोपेक्षां एखाद्या घरती बायकोजवळ प्रेमचेष्टा करणें जास्त पसंत पडतें. हेती ह्मणून एक जात आहे, ते आपल्या बायका उन्हाळयाच्या सुटींत एखाद्या रम्य ठिकाणीं घेऊन जाऊन, आपल्या बायकांना त्या ठिकाणीं वाटेल त्याच्याबरोबर रममाण होण्यास सांगून येतांना आपल्याबरोबर उपदंशासारखे विकार आणीत असत. बरजोट म्हणून जात आहे तेथील स्त्रिया व मुली यांची पैशांकरितां वाटेल तें करण्याची तयारी आढळून येते. ग्रीनलॅंडमधले विवाहीत एक्सिमो लोक आपल्या पत्नीबरोबर क्षुल्लक कारण काढून परस्त्रीशीं रममाण होणें म्हणजे अभिमानाची गोष्ट आहे असें समजतात.

समनर, फॉकवेज या पुस्तकांत लिहितो, "रशियाजवळ असलेल्या स्लॉव्होनीक प्रदेशांत, बाप आपल्या मुलांचें लग्न करतो व आपल्या सुनेला रखेली म्हणून तिच्याशीं व्यवहार करतो. मुलगा मोठा झाला व त्याला मुलें झालीं म्हणजे तोही आपल्या बापाप्रमाणेंच वागतो." कोरोडोकेन म्हणून एक जात आहे. तेथील मुलीला लग्न करावयाचें म्हणजे अगोदर अनीतिच्या मार्गानें झालेल्या मुलांचे सर्टिफीकेट दाखवावें लागतें, त्याशिवाय तिला लग्न करतां येत नाहीं.

सोगेस्टी म्हणून एक जात आहे, ते आपल्या बायकांना व मुलींना पाहुण्यांना देण्यांत मोठेपणा समजतात. नीग्रो लोकसुद्धां असेच निर्लज्ज आहेत. नग्न स्थितींत स्त्रीपुरुषांनीं पाहुणा जवळ असतां निजणें म्हणजे त्याची त्यांना खंतीच वाटत नाहीं. वर दिलेल्या उदाहरणावरून देहविक्रय करण्याची चाल प्रत्येक देशांत कशा प्रकारची आहे हे समजून येईल. नीतिचीं तत्वें म्हणजे कशाशीं खातात वगैरे माहिती वाचकांना कळावी या हेतूनेंच ही येथें दिली आहे.

जगाच्या वातावरणांत प्रवेश करतांना तारुण्यांत असतांना प्रत्येक स्त्री-पुरुषाला नानाप्रकारचे प्रसंग येतात, याकरितां वेळींच त्याची माहिती अगर कल्पना असली म्हणजे विचारानें त्यांतून मनुष्य पार पडूं शकतो.

जननेंद्रियांची लाज मनुष्याला कां वाटावी? व तें झांकून ठेवण्याची आवश्यकता कां भासावी? पशु, प्राणी यांच्याकडे नजर टाकली म्हणजे त्यांना तीं इंद्रियें झांकून ठेवण्याची आवश्यकता वाटत नाहीं. पुष्कळ लोकांच्या मनांत असे विचार येतात व अशापैकीं कांहीं सुशिक्षित लोकांनीं जर्मनीमध्यें, गांवाच्या बाहेर कंपाउंड काढून त्यांत रहाण्याची व्यवस्था केलेली आहे.

कपड्याचा उपयोग थंडीपासून बचाव करण्यांत आला. मसाइस म्हणून लोक आहेत तें जननेंद्रियें झांकणें म्हणजे कमीपणा समजतात. रानटी लोक आहेत, ते आपलें जननेंद्रिय झांकण्याकरितां फक्त कपड्याचा उपयोग करतात. नग्न राहण्याची कांहीं लोकांत चाल आहे, त्यांना त्याजबद्दल लाजही वाटत नाहीं व कोणाही पुरुषांच्या मनांत तें पाहून विकारही उत्पन्न होत नाहींत. नग्न स्थितींत रहाणें चांगलें किंवा वाईट यासंबंधीं पुष्कळांचीं निरनिराळीं मतें आहेत. कांहीं लोकांनीं नग्न राहूं नये म्हणून रानटी लोकांमध्यें प्रयत्न केला होता परंतु त्यांपासून कांहीं फायदा झालेला नाहीं. उलट, त्यांनाच लाज वाटूं लागली

वॅलेस ह्मणून निसर्गोपचारक होऊन गेला. तो ह्मणतो, " ज्याप्रमाणें आपल्या बायकांना परस्थ पुरुषांपुढें नेसण्याची लाज वाटते, त्याप्रमाणें, एका रानटी मुलीला कपडे घालण्याची लाज वाटत असे ! तिला नग्न स्थितींत रहाण्यांतच समाधान वाटत असे. "

बायकांनीं पाय दाखवणें हें चिनी लोक लाजिरवाणें समजतात. मुसलमान लोक बायकांनीं चेहरा दाखवूं नये म्हणून त्यांना पडद्यांत ठेवतात. फ्रीकवेज पुस्तकांत सुमतर म्हणतो, ' कांहीं रानटी लोक कमरेंत दोरी घालणें भूषण समजतात व तीं नसणें ह्मणजे कमीपणा मानतात. जुन्या काळच्या स्त्रियांना घट्ट लुगडीं नेसण्याची संवय पडलेली आहे, त्यामुळें इंद्रियांवर काय परिणाम होतो याचा त्या विचार करीत नाहींत. कांहीं रानटी लोक जे कपडे वापरीत नाहींत ते आपलीं तोंडें रंगानें रंगवतात. त्याशिवाय बाहेर जाणें ते कमीपणा समजतात. युगांडामध्यें काळे लोक रहातात, ते नग्न असून, त्यांच्यामध्यें नीति फार आढळून येते. आफ्रिकेच्या बेगांड प्रदेशांत, कांहीं लोक सर्वांग कपड्यांनीं झांकून टाकतात. परंतु नीतिच्या दृष्टीनें ते युगांडाच्या लोकांच्या उलट आढळतात. मध्य-आफ्रिकामध्यें स्त्रिया कपडे वापरत नाहींत, पण पुरुष वापरतात. कांहीं ठिकाणीं याच्या उलट प्रकार आहे. तेथें कपडे वापरले ह्मणजे बायकी इसम आहे असें समजतात. रोज गरम पाण्यानें स्नान करणें हें जपानी लोक प्रत्येकाचें कर्तव्य आहे असें समजतात. स्त्रीपुरुषांना स्वतंत्र स्नान करण्याकरितां स्नानगृहें निरनिराळीं बांधलेलीं आहेत. एसकिमेमुळें १६ वर्षांची होईपर्यंत, नग्न स्थितींत रहातात व १६ वर्षांनंतर लहानशी कपड्याची पट्टी कमरेभोंवती गुंडाळतात. १४ व्या १५ शतकांत युरोपामध्यें पुष्कळ लोक नग्न स्थितींत राहत असल्याचें दिसून येतें; यानंतर कपडे वापरण्याची रीत सुरू झाली व नग्न स्थितींत आढळणाराला शिक्षा होऊं लागली. एक इतिहासकार म्हणतो, " डेन्मार्कमध्यें १६ व्या शतकापर्यंत लोक कपड्याच्या महागाईमुळें नग्न स्थितींतच वागत असत. " त्यानंतर सरदार लोकांनीं कपडे वापरण्याची चाल पाडली. त्यावेळीं राजा जातांना, त्याच्या समोर येणारी स्त्री-पुरुष मंडळी नग्न स्थितींतच त्याच्या सामोरी जात असे. स्त्री-पुरुषांनीं एकेठिकाणीं आंघोळ करणें आरोग्य दृष्ट्या चांगलें नाहीं, याकरितां कायदे केलेलें आहेत. जर्मन लोक स्नानांचे फार शोकी आहेत. उपदंशासारख्या विकारांचा प्रादुर्भाव सुरू झाल्यामुळें, सार्वजनिक

स्नानांचें ठिकाणीं जाणें धोक्याचें समजण्यांत येऊं लागलें. युरोपसारख्या ठिकाणीं चुंबन घेणें म्हणजे कमीपणा वाटत नाहीं. त्या लोकांना रस्त्यांत, ट्रामध्यें, आगगाडींत वगैरे सार्वजनिक ठिकाणीं चुंबन घेणें ह्मणजे एक प्रकारचें भूषणच वाटतें; परंतु अलिकडे आरोग्याच्या दृष्टीनें तेंही कमी होऊं लागलें आहे. उपदंश, घटसर्प, इन्फल्युएंझा, न्युमोनिया वगैरे विकार या चुंबनांपासून पसरण्यास कारणीभूत होतात. एका :सार्वजनिक ठिकाणीं उपदंशजन्य तरुणांचें. ७–८ मुलींनीं चुंबन घेतल्यामुळें त्यांना तो विकार झाल्याचें आढळून आलेलें आहे.

चीन व जपान यांमध्यें चुंबन घेणें कमीपणाचें समजलें जातें. चुंबन घेणें ही पद्धत पोलेनीशीयनस, मळाई, नीग्रो व दक्षिण अमेरिकेचे इन्डियन लोक यांना माहिती नाहीं. चुंबनाबद्दल त्यांची आदरसत्कार करण्याची पद्धत म्हणजे तें नाक घासतात, चावतात, अगर वास घेतात.

युरोपमध्यें मधल्या काळांत चुंबनाची पद्धत फार प्रचारांत होती. पाहुण्यांचे त्याचप्रमाणें नृत्यामध्यें भाग घेणारा वर्ग यांचें स्वागत चुंबनानें करण्याची पद्धत होती. १५ व्या व १६ व्या शतकांत चुंबनाचा प्रसार फार होता. वेस्टर मार्क ह्मणतो, "ज्याप्रमाणें सुधारणा वाढत चालल्या त्या प्रमाणांत बाहेरख्यालीपणा व बिनवारशीं मुलाची संख्याही वाढत चालली. खेडेगांवापेक्षां शहरांत तर याचें प्रमाण फारच वाढलेलें आहे, व असें जरी चाललें आहे; तरी रोमच्या सीनेटरनें. आपल्या मुलीच्या देखत बायकोचें चुंबन घेतलें हा मोठा गुन्हा केला आहे,' अशी नोंद इतिहासांत राहून गेलेली आहे.

ह्या सर्व बाबतींत पॅरिस पुढें गेलेलें असल्यामुळें, आमचे संस्थानिक व श्रीमंत लोक यांचें प्रकृतिमान त्या हवेवर गेल्याशिवाय सुधारत नाहीं. लंडनमध्यें सुद्धां हीच स्थिति आहे. रस्त्यानें फिरणाऱ्या व थोडक्या पैशांकरितां तरुण युवकांना जाळ्यांत गुंतवणाऱ्या बऱ्याच मुली रस्त्यानें फिरतांना आढळतात. त्यांना 'स्ट्रीट गर्ल्स्' असें ह्मणण्याची चाल पडली आहे. पालमाल गॅझेटचा संपादक ह्मणतो:—" ह्या मुलींना इंद्रियें व त्यांचा उपयोग काय यांचें ज्ञान बिलकूल नसतें.

जगांत कशाप्रकारची स्थिती चाललेली आहे हें वरील वर्णनांवरून वाचकांच्या ध्यानांत येईल. अशाप्रकारचे मार्ग व रिती म्हणजे समाजाला एक प्रकारचा रोग आहे. हा रोग नाहींसा कसा करतां येईल, त्या संबंधीं काय केलें पाहिजे वगैरे माहितीचा विचार पुढें करूं.

# प्रकरण १३ वें.

—:o:—

## विवाह व ब्रह्मचर्य

लग्न केलें असता ब्रह्मचर्य पाळणें व लग्न झालें नसतां ब्रह्मचार्यात रहाणें ह्या पासून प्रकृतिवर कांहीं अपाय होतो किंवा नाहीं याचा विचार या लेखांत करावयाचा आहे. ब्रह्मचर्य नियमानें पाळणाराला सहसा रोगांची बाधा होत नाहीं; परंतु हा नियम आजच्या काळांत पाळणें अत्यंत कठीण आहे. ब्रह्मचर्यानें नपुंसकत्व येतें असाही कांहीं लोकांचा समज आहे. मुष्टिमैथुनादि वाईट संवयी जडलेल्या असतात. व जे ब्रम्हचर्याच्या लांब लांब बाता मारतात, अशामध्यें नपुंसकत्व येतें व हें इंद्रियविज्ञान शास्त्रदृष्ट्या सिद्ध झालेलें आहे. ज्यांना लग्न करावयाचें नाहीं अगर ज्यांचें लग्न होत नाहीं, अशाची प्रकृति वरील कारणामुळें विवाहीत लोकांपेक्षां जास्त बिघडते. शिवाय इंद्रिय विषयांचें मनन केल्यामुळेंसुद्धां वीर्यपात होतो. मलावरोध, मसालेदार पदार्थ, दारु, चहा, हीं मादक पेयें घेण्यांत आल्यास कामवासना फाजील होण्यास मदत होते. प्रत्येक मनुष्य तारुण्यांत आला म्हणजे त्याला कामवासना होणें हें साहजिकच आहे; परंतु ही वासना इच्छा व व्यायाम यांच्या सहाय्यानें कमी होते.

( १ ) मनुष्याची शक्ति कायम राखण्यास ब्रम्हचर्यासारखें दुसरें औषध नाहीं.

( २ ) अतिमैथुनामुळें इंद्रियांची शक्ति कमी होऊन तीं आपलीं कामें करण्यास निर्जीव होतात.

( ३ ) जे व्यायाम करतात, त्यांनीं ब्रम्हचर्य पाळणें अत्यंत महत्वाचें आहे. ज्यांना तें पाळतां येत नसेल त्यांनीं व्यायामाच्या भानगडींत न पडणें बरें.

( ४ ) कुस्ती करणारांमध्यें सुद्धां ब्रम्हचर्य पाळणारा कुस्ती जिंकू शकतो.

ब्रह्मचर्यासंबंधीं पुष्कळ पुस्तकें लिहिलीं आहेत तीं वाचून सुज्ञांनीं माहिती करून घ्यावी.

ब्रह्मचर्याच्या आड येणाऱ्या गोष्टीः–

शृंगारयुक्त कादंबऱ्या, मसालेदार पदार्थ, वाईट संगति, या गोष्टी टाळण्यांत याव्या. आपली दृष्टी मनोहर वस्तु दिसली म्हणजे ती घेण्यास मोह पावते सुंदर गायन ऐकू येऊं लागलें म्हणजे कान तें ऐकण्यांस धावतात त्याचप्रमाणें तेलकट मसालेदार पदार्थ पाहिले ह्मणजे जीभ खाण्यांकडे वळतेच. हीं सर्व मोहाचीं साधनें आहेत. साधें अन्न, साधी रहाणी व साधें कपडे वगैरे गोष्टी नीतिदर्शक आहेत. आपलीं जननेंद्रियें नेहमीं कार्यतत्पर असतात. मनांत विचार येण्याचा अवकाश कीं त्या मार्गाकडे वृत्ति वळतेच. हा विचार अमलांत आला नाहीं तर त्यापासून फायदाच होतो. स्त्रीसंयोग करणें तो फक्त प्रजोत्पत्ति करण्यापुरताच करणें असा धर्माचा उद्देश आहे. हा संयोग करण्यासंबंधीं दिवस पाळण्यांस सांगितले आहेत; ते जो पाळतो तो ब्रम्हचर्य व्रत पाळतो असें समजण्यास हरकत नाहीं. विवाहांत स्त्रीपुरुषांनीं संयोग करणें तो महिन्यांतुन ४ दांच करणें चांगलें. शिवाय पौर्णिमा अमवास्या, पितृतिथी वगैरे दिवस टाळले पाहिजेत. शास्त्राच्या नियमानुसार चालणांराला महिन्यांतुन १ किंवा २ दिवसच मिळूं शकतात. कामवासना तृप्त करणें व संतति वाढवणें हा विवाहाचा हेतु नाहीं हें प्रत्येक तरुणानें लक्षांत ठेऊन त्याप्रमाणें वर्तन करावें. वस्तु गोड लागली ह्मणजे अधाशा-सारखी खाल्ली तर अजीर्ण होऊन जुलाब होतात व फायदा होण्याच्या ऐवजीं नुकसान मात्र होतें. तारुण्यामध्यें संगत चांगली असावी अशी इंग्रजींत ह्मण आहे. मनुष्याची संगत ज्याप्रमाणें असेल, त्यावरून साधारणपणें स्वभावाची परीक्षा होते. दारुड्या इसमाला दारुड्याचीच संगत महत्वाची असतें. तारुण्यांचें वय ह्मणजे आपल्यामध्यें ' गाढव पंचवीशी ' म्हणतात. या वयामध्यें ज्याप्रमाणें संगत लागेल त्याप्रमाणें भावी आयुष्यावर परिणाम होतो; याकरितां अशा वयामध्यें आपल्या मुलांची संगति कोणच्या प्रकारची आहे, इकडे आईबापांनीं अवश्य लक्ष दिलें पाहिजे. शहरांत राहणाऱ्या मुलांची कशी स्थिति होतें ती पहा. आईबाप ऑफिसमध्यें जातात, त्यावेळीं मुलगा अगर मुलगी, शाळा कॉलेजमध्यें जात असतात. बरें घरीं येतात त्यावेळीं थकल्यामुळें मुलां-मुलीं-संबंधीं विचारपूस करण्याचा साहजिकच कंटाळा येतो. यामुळें लक्ष देण्यास सवड होत नाहीं व यामुळें तीं कशी वागतात हें समजत नाहीं. अलिकडे समाज सुधारणा, जाती मोडणें वगैरे विषय अशा तरुण स्त्री पुरुषांच्या वाचण्यांत येत असल्यामुळें त्यांचे प्रीति-विवाह केव्हां जमनात याची आईबापांना जाणीव

नसते. प्रेमाच्या ठिकाणीं जात आडवी येत नाहीं. पुष्कळांचें आईबाप जुन्या पद्धतीचे असल्यामुळें, त्याना असले सुधारकी पाश्चात्याचें विचार न पटलें तर त्यांत नवल नाहीं. विवाहापर्यंत ज्यावेळीं मजल येते, त्यावेळीं मग आईबाप त्याचा विचार करूं लागतात; परंतु Too late झाल्यामुळें, त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं व अप्रत्यक्षपणें शिक्षणावर दोष लादण्यांत येतो.

हे विवाह कितपत सुखकर होत असतील यांचा विचार भावी कालावर सोपवणेंच बरें ! परंतु आजच्या कालाच्या दृष्टीनें विचार केला म्हणजे ज्या दृष्टीनें आईबाप शिक्षण देतात व अपेक्षा करीत असतात, त्याच्या उलट फल वरील प्रकारच्या राहणीमुळें मिळतें.

ज्यांना स्वतःच्या कुटुंबाचें पालन व समाधान करतां येत नाहीं ते राष्ट्राची समाजांची उन्नति ती काय करणार ? या विचारांचा या प्रकरणांत उल्लेख करण्याची जरूरी नव्हती; परंतु संगतिमुळें कसे परिणाम होतात, एवढेंच दाखवण्याचा हेतु आहे. शहरासारख्या ठिकाणीं राहून ब्रह्मचर्याच्या वाता मारणें सोपें आहे; परंतु तें पाळणें अत्यंत कठीण आहे. निदान, ज्याची विद्यार्थी दशा आहे अशा स्त्रीपुरुषांनीं खालील गोष्टीकडे लक्ष द्यावें.

( १ ) शुद्ध अंतःकरण, शुद्ध वागणूक व आपल्या धर्मांतील रीती पाळणें.

( २ ) वाईट विचार मनांत आल्यास तो घालवण्याचा प्रयत्न करणें.

( ३ ) प्रेमविषयक, शृंगारीक गोष्टींचा विचार मनांत न आणणें व तिकडे दुर्लक्ष करणें.

जितकी मनाची तयारी आपण वाढवूं तितकें आपल्याला पुढें ब्रह्मचर्य पाळणें सोपें जातें.

अन्न खातांना जरा पोटाकडे लक्ष देऊन खाल्लें पाहिजे. ज्याप्रमाणानें आपण अन्न खातों त्याप्रमाणानें रक्त बनत असतें. मसालेदार पदार्थामुळें रक्तही तामसी होतें. उत्तेजक पेयें वर्ज्य करावीत. उत्तेजक पेयांचा मज्जातंतूवर वाईट परिणाम होतो व त्यामुळें जनेंद्रियें उत्तेजित होत असतात.

खाणें नेहमीं साधें व अल्प असावें. ज्यानें पोटाला ताण बसेल असें अन्न खाऊं नये. ज्यांत मीठ व मसाला जास्त आहे अशा खाण्यानें शरीराला अन्न किती पाहिजे हें न समजल्यामुळें, प्रमाणाबाहेर अन्न जाण्याचा संभव असतो. व्यायाम ( Exercise ) मानसिक व शारिरीक व्यायाम यांत मन नेहमीं गुंतलेलें असावें. आळशी मनुष्याच्या कामांत नेहमीं सैतान गडबड करीत असतो.

वाईट विचार मनांत येऊं नयेत ह्मणून आपल्याला आपले आईबाप ईश्वराचें ध्यान करण्यास व पोथी वगैरे वाचण्यांस सांगतात.

अशा प्रकारच्या धार्मिक वाचनानें मन एकाग्र करण्याची संवय लागते. एकाग्र स्थिति म्हणजेच मनाच्या शक्तीची वाढ. ही ज्यांची वाढते त्यांचा पगडा दुसऱ्यावर बसण्यास वेळ लागत नाहीं. शिवाय यामुळें वाटेल ती गोष्ट या शक्तीच्या जोरावर साध्य करून घेतां येतें. आळसीपणा सोडून द्यावा व उद्योगांत नेहमीं असावें. चालणें, घोड्यावर बसणें, बोटींत बसून वल्हीं मारणें, दंड, आट्यापाट्या, हॉकी वगैरे खेळ शरीराला मजबुती देणारे व वाईट विचारास अवसर न देणारे आहेत.

व्यायामामुळें स्नायू मजबूत होतात. अशक्तपणा येईल इतका व्यायाम कधींही करूं नये. नियमीत झोंपणें व पहाटेस उठण्याची संवय ठेवावी.

रात्रीं फार वाचत बसणें, त्याचप्रमाणें जागरण करणें, यामुळें मज्जातंतूचा क्षोभ होऊन, त्यांचा अप्रत्यक्ष परिणाम जननेंद्रियांवर होऊन, स्वप्नावस्था, धातु-विकार वगैरे विकार होतात ज्यांना अति स्त्रीसंगाची संवय आहे, त्यांनीं या वरील गोष्टी मनांत बाळगून त्याप्रमाणें वागल्यास त्यांचा फायदा होईल.

**स्नान**—करणें तें चांगलें अंग घांसून, थंड पाण्यानें करावें. थंड पाण्यानें त्वचेंतील रक्तवाहिन्यांचा संकोच होतो व थोडक्याच वेळांत त्यांचें प्रसरण झाल्यामुळें, विजातीय रक्तामध्यें असणारी घाण बाहेर जाण्यास मदत होते.

आतां शेवटची महत्वाची गोष्ट ह्मणजे त्या दयाळू जगच्चालक प्रभूवर विश्वास ठेवणें हें होय प्रत्येक गोष्ट त्याच्याच प्रेरणेनें होत असते. ईश्वरावर विश्वास ठेवल्यास वाटेल त्या संकटांतून तो पार पाडतो. संतचरित्रें वाचावींत. संत चरित्रासंबंधीं म. भा. भू. श्रीयुत जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर व मुमुक्षुकर्ते पांगारकर यांच्या सारख्यांनीं तरुण पिढीवर उपकार केलेले आहेत दुसऱ्यांची निंदा करूं नये व चांगले करतां येईल इकडेंच नेहमीं लक्ष असावें. आपण जें नेहमीं बोलतों, तो एक प्रकारचा फोर्स असतो. ह्या फोर्सचा जसा उपयोग करावा तसें फळ मिळतें. हा अनुभव बारकाईनें प्रत्येकजण पाहूं लागला म्हणजे त्याचा त्याला कळून येतो. आज दुसऱ्याचें अहित व निंदा करण्यांत आपल्याला तत्पुरतें समाधान वाटतें; पण तीच पाळी थोड्याच दिवसांत आपल्यावर आल्यानंतर पश्चात्ताप होतो. मग दूषण कोणास देणार !

# प्रकरण १४ वें

## उपदंश

उपदंशासारखा समाजाला लागलेला भयंकर रोग कसा नाहींसा करतां येईल याचा विचार आतां करूं. खरें पाहिले असतां हा विकार वाढविण्यास पुरुषच कारण होतात, असें म्हटल्यास वावगें नाहीं. ज्याप्रमाणें मागणी असते त्याप्रमाणें वस्तुचा पुरवठा होत असतो; जर पुरुषच नीतीच्या मार्गानें जाऊं लागले तर हा धंदा करणाऱ्या बाया सुद्धां कमी होतील. टाळी केव्हांही एका हातानें वाजत नाहीं. तेव्हां कोणीतरी या बाबतींत पुढाकार घेतला पाहिजे. या धंदेवाईक स्त्रियांमध्यें शिक्षणांची गोडी लागल्यामुळें त्यांना आपल्या परंपरागत धंद्यांत मन घालणें कंटाळवाणें वाटूं लागलें आहे व त्यापैकीं पुष्कळांचीं लग्नेंही शास्त्रानुसार झालेलीं आढळतात. या अल्पवयी मुलींवर त्यांचा देहविक्रय करून वाटेल तसा पैसा मिळवणारी त्यांची मंडळी असते परंतु हें तारुण्य किती दिवस टिकणार! रोज रात्रीं १२–२ वाजेपर्यंत जागरणें, प्रत्येक गिऱ्हाइकांच्या वेळीं चहा, सोडा, दारुसारखीं पेयें, रात्रींत वाटेल तितक्या पुरुषांशीं समागम, या सर्व कारणांमुळें ५–१० वर्षांच्या आंत तरुण मुलींची स्थिती एखाद्या वयस्क झातान्या बाईसारखी होऊन जाते; त्यांत उपदंशासारख्या विषांची भर असली ह्मणजे बघावयास नकोच. या स्त्रियांची स्थिती पाहिली म्हणजे इदंचनास्ति परंचनास्ति अशी स्थिती होऊन जाते. लेखकाच्या पहाण्यांत अशीं पुष्कळ उदाहरणें आलेलीं आहेत; ह्याला कारण कोण तर स्वातंत्र्याच्या बाता मारणारे, खोटें प्रेम भासवणारे, न्यायनीतीला पायांखालीं तुडविणारे, लुच्चे हृदयहीन लोकच होत. एकदां तरुणपणाची माती झाली ह्मणजे या दीन होणाऱ्या स्त्रियांची घरांतून हकालपट्टी होते, त्यावेळीं पैसा त्यांच्याजवळ नसतो व चारित्र्य तर गमावलेलेंच असतें; तेव्हां अशा हतभागिनीला कोण आश्रय देणार? तिनें काय करावें? चांगल्या कुलांतल्या घराण्यांत तिला नोकरी मिळत नाहीं व तिचें जीवित दुर्घट होऊन जातें. याप्रमाणेंच जे आपल्या बायकांना सोडून बाहेरख्यालीपणा करतात त्याचप्रमाणें एखाद्या घरगुती बाईला

नानाप्रकारची फुस लावून तिच्याशीं कामापुरती मजा मारतात त्या स्त्रियांची वरील प्रमाणेंच स्थिति होतें. अशा लोकांना समाजानें कडक शिक्षा करूं नये काय? पांढरपेशा वर्गामध्यें ज्या बायकांचा अकाली नवरा मरतो त्यांना पुनर्विवाहाची परवानगी नसल्यामुळें वांकडे पाऊल पडण्याचा संभव असतो. मनोविकार हे वयांत आलेल्या प्रत्येक व्यक्तिला त्रास देत असतात. ते नवरा मेला ह्मणून त्या स्त्रीमध्यें कमी होत नाहींत तर बाजूच्या वातावरणानें उलट प्रज्वलित होत असतात व अशा दुर्दैवी स्त्रिया कांहीं ना कांहीं कारणानें नेहमीं अजारी असतात. याला कारणें काय तें पाहूं.

प्रत्येक मनुष्याचा स्वभाव चांगला किंवा वाईट बनणें हें त्याला आरंभापांसून मिळणाऱ्या **गृहशिक्षणांवर** अवलंबून असतें. आपली गृहशिक्षणाची पूर्वकालीन पद्धती कशी होती ती पहा. बहुधा पहाटेस उठून लहान मुलांच्या समवेत आपले आजोबा अगर वडील ईश्वराच्या भूपाळया, पहाटेच्या सुमारास ह्मणतांना आढळत असत. थंडगार वातावरण, शुद्धविचार त्या प्रभूचें गुणानुवाद, यानें कोणाचें अंतःकरण शुद्ध होणार नाहीं? नंतर शौच मुखमार्जन, स्नान, सूर्याला नमस्कार वगैरे गोष्टीमुळें एक प्रकारचा आज्ञाधारकपणा व वळण लागत असे. Child is the father of man ह्मणून एक इंग्रजीत ह्मण आहे. लहान मुल नेहमीं अनुकरण करणारें असतें. आईबापांचें वर्तन चांगलें असलें तर मुलांचें वर्तन चांगलें असतें. गृहशिक्षण कसें आहे हें मुलांच्या वागणुकीवरून कळून येतें. मनावर संस्कार जे होतात ते हेच होत. ह्या संस्कारामुळें सहसा वांकडें पाऊल पडत नाहीं व यदाकदाचित पडलें तर वेळींच तो सावध झाल्याशिवाय रहात नाहीं. याकरितां नम्रपणा, आज्ञाधारकपणा, सात्विकपणा वगैरेंचें शिक्षण आरंभापासून दिलें तर त्याचीं फळें गोड आल्याशिवाय रहाणार नाहींत. परंतु ज्यावेळीं मुलांना शिक्षण द्यावयाचें, चुकेल तेथें मार्ग दाखवायचा, हें सोडून वाटेल तसा तूं वाग ह्मणून जर परवानगी दिली व अंगांत जर दुर्गुणांचें बीज असलें तर त्यांची फळें साहजिकच कडु येणार हें उघड आहे. आपल्या मुलांमध्यें जर गैरवर्तन दिसलें तर सामोपचारानें ताबडतोब त्याचा बंदोबस्त केला पाहिजे. पहिल्या क्रमिक पुस्तकांत शाळेला जातांना कसें वागावें, रस्त्यानें इकडे तिकडे न पहातां सरळ शाळेंत जावें वगैरेची माहिती सोप्या शब्दांत देण्यांत हाच हेतु होता. त्याचा अर्थ त्यावेळीं बालकांच्या मनांला पटला नाहीं परंतु तो वयमाना

कळतो. वाईट संगत न लागेल याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे. एकदां क्षुद्र विचार डोक्यांत शिरले ह्मणजे त्याप्रमाणें भावनाही होतात व वाईटमार्गाकडे प्रवृत्ति साहजिकच वळते. मागें एका प्रकरणांत लेखकानें लहान मुलांच्या वाचनांकडे, खाण्यांकडे कां लक्ष दिलें पाहिजे यांची कारणें स्पष्ट केलेलीं आहेत. गरीबी हा रोग फार भयंकर आहे. ज्या स्त्रियांना पोटभर खाण्यास मिळत नाहीं, आप्तेष्टांची मदत नाहीं, अशा स्त्रिया अनीतीचा धंदा करण्यास प्रवृत्त होतात; परंतु असें जरी आहे, तरी ज्या मुलीला चांगलें शिक्षण मिळालें आहे ती गरिब असली तरी भिक्षा मागून पोट भरील पण हा धंदा करणार नाहीं. अलिकडे गरीबांना व स्त्रियांना मदत करणाऱ्या संस्था स्थापन झालेल्या आहेत· व अशा आड मार्गानें जाणाऱ्या स्त्रियांची सोयही करण्यांत आलेली आहे, ही त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट होय.

**अज्ञानः**—ज्या स्त्रिया धंदेवाईक असतात त्या अज्ञानीं असतात, आपलें पुढें काय होईल याची जाणीव त्यांना नसते. अशिक्षीत व कमी दर्जाच्या असतात, यामुळें त्यांना या मार्गाशिवाय कांहीं सुचत नाहीं व त्यांना शिक्षण दिलें तरी तरी उपयोग होत नाहीं.

**रोगः**—मलावरोध, मुळव्याध, कृमी, इंद्रियांच्या ठिकाणीं खरुज ह्या कारणामुळें कामविकार अकालीं वाढतात; व वाईट मार्गाला जाण्याची प्रवृत्ति होण्याचा संभव असतो.

ज्या स्त्रिया आळशी व चैनींत वागलेल्या असतात, त्यांना नीति व शुद्धपणाची वागणूक काय हें न कळलें तर आश्चर्य नाहीं.

देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया बहुधा चंचल मनाच्या आढळून येतात; व त्या शेंकडा ७५ ते ८० अशा असतात. त्यांची सुधारणा म्हणजे मुलीला आईपासून वेगळी करून शिक्षण देणें होय. आईच्या ताब्यांत असलेल्या मुलीवर लहानपणापासून तोच संस्कार झाल्यामुळें त्या सुधारणांचे काम फार कठिण असतें. ज्यांना स्वतःची स्त्री असून, बाहेर ख्यालीपणाची लज्जत लागली आहे त्यांना निसर्ग, उपदंश व प्रमेह या बिकाराची शिक्षा देतो. खरें पाहिलें असतां ज्यांचें लग्न झालेलें आहे, अशांना स्वतःच्या स्त्रीपासून सौख्य न वाटतां अशा बाहेरख्याली बाईकडून कां वाटावें, व मोह कां वाटावा हा प्रश्न खरोखर विचार

करण्यासारखा आहे. या लेखकाला तसा अनुभव नसल्यामुळें इकडच्या तिकडच्या माहितीवरून अनुमानानें ती बाजू मांडत आहे. खरें पाहिलें असतां, स्त्रीसंयोग व त्यापासूनचें सौख्य स्वतःच्या स्त्रीपासून मिळेल त्याप्रमाणें अशा स्त्रीपासून मिळणार नाहीं. धंदेवाईक स्त्रियांमध्यें जो एक प्रकारचा हावभाव, नटवेपणा वगैरे आढळतो, तशाप्रकारची वागणूक आपल्या स्त्रिया लाजाळु असल्यामुळें त्यांच्याकडून होत नाहीं व मनुष्याला मनोविकार उद्दीपन करण्यास जीं कारणें लागतात तीं या धंदेवाईक स्त्रिया बेमालूम करीत असतात, यामुळें बाजीच्या नादीं लागलेला एकदां या व्यवसायांत गुरफुटला म्हणजे त्याला बाहेर पडणें कठीण जातें. यामुळेंच पू–प्रमेह व उपदंश विकाराची पैदास होतें. ही धंदेवाईक स्त्री एकालाच धरून राहिलेली असली तर या विकाराचा फैलाव होत नाहीं व बाधाही होत नाहीं. हा विकार झाला म्हणजे त्यांतून बरें होणें कठिणच असतें. औषधानें बरा झालेला असला तरी केव्हां ना केव्हां तरी हा विकार जाणवतो. उपदंश एकदां झाला म्हणजे प्रतिबंधकशक्ती उत्पन्न होत नाहीं.

**पू–प्रमेह** ह्मणजे लघ्वींतून पू जाणें. हा विकार उपदंशापेक्षां फार भयंकर आहे हा विकार कमी झाला तरी इंद्रियांचे आंतील त्वचेचा संकोच झाल्यामुळें, लघ्वीला नेहमीं त्रास होत असतो. स्त्रियांनाही हा विकार नवऱ्यांपासून होतो पुवामुळें स्त्री अंडावर परिणाम होऊन, त्यांच्यामध्यें गर्भधारणा होत नाहीं; यदाकदाचित् मूल झालें तर त्यांच्या डोळ्यांला इजा होते, पू येतो व त्यांचें जीवित कंटाळवाणें होऊन जातें. ज्याला हा विकार आहे त्यानें प्रसूतीच्या समयीं नर्सला अगर डॉक्टरला कळवल्यास प्रसूतीच्या समयीं मुलांच्या डोळ्यांवर पू–प्रमेहामुळें होणारा परिणाम टाळतां येईल.

**उपदंशः**–हा विकारही बाहेरख्यालीपणापासून होतो. पहिल्याप्रथम इंद्रियांची जागा लाल होते, नंतर त्याची लहान पुळी बनते व ती चरत जाऊन तिचा परिणाम सर्व शरिरावर होतो. ह्या व्रणांमध्यें ४ प्रकार आहेत. आरंभीं इलाज केला तर पुढें विकार वाढत नाहींत; नाहींतर, मेंदु, स्वरनलीका, दांत, नाक वगैरे इंद्रियांवर परिणाम होऊन हळुहळु सांधेही धरतात, हाडें ठिसूळ होतात, नाकांतून जो स्राव होतो. त्याला घाण मारते, व इतकी स्थिती होऊन जाते कीं मृत्यु केव्हां येईल याची तो वाट पहात असतो. शहरांसारख्या ठिकाणीं

नजर टाकलीं तर कितीतरी तरुण या विकारानें पछाडलेलें आढळतात ! क्षणीक सुखाकरितां आयुष्याचा नाश कसा होतो याची कल्पना कोणाला आरंभीं येत नाहीं. अलिकडे कोणचेंही वैद्यकीय पुस्तक पहा, उपदंश हें एक रोगांचें कारण मानलेलें आहे, यावरून या रोगानें सर्व देशांत कसा धुमाकूळ करून सोडलेला आहे याची कल्पना येईल. उपदंश विकाराचा संततीवरही परिणाम होतो. तो स्वतःच दुःख भोगत नसून आपल्या संततीलाही तें भोगावयास लावतो. बहुतकरून गर्भावस्थेंत अगर जन्मल्यानंतर उपदंशजन्य संतति राहत नाहीं; व जिवंत राहिल्यास तारुण्यांत गंडमाळा, रिकेटस्, मेंदुमध्यें विद्रधी, हाडांला व्रण अशा प्रकारचे विकार होतात. ह्या लहान मुलांचें चेहरे पाहिले म्हणजे एखाद्या म्हाताऱ्यासारखे दिसतात व त्यांचें शरिर म्हणजे एक हाडांचा सांपळा असावा असें दिसतें. मूल रडावयास लागलें म्हणजे मनाला एक प्रकारचा धक्का बसतो व वा उपदंशा ! तुला नमस्कार असो, असें म्हणण्याची पाळी येते. लहानपणांत अशी संतति मेल्याची पुष्कळ उदाहरणें सांपडतात. जी मुलें जगतात, त्यांचें गाल बसलेले, दांत वांकडे तिकडे व इतर इंद्रियांमध्यें व्यंग आढळतें. तोंड उघडून पाहिलें असतां जिभेच्या ठिकाणीं व्रण झालेले आढळून येतात.

**उपदंशाचा जन्मः**—उपदंशाचा जन्म धंदेवाईक स्त्रीसंयोगांपासून होतो हा स्पर्शजन्य विकार आहे. भावप्रकाश ग्रंथांत हा रोग फिरंगी लोकांनीं हिंदुस्थानांत आणला असा उल्लेख आहे नेपाळमधून, फ्रान्समध्यें फ्रेंच शिपायांनीं आणला असाही कांहीं लोकांचा समज आहे. पॅरिस या बाबतींत अग्रगण्य असल्यामुळें तेथील एक नामांकित वैद्य या विकाराबद्दल काय म्हणतो तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

आईबाप या विकाराचें विष मुलांमध्यें आणतात. हीं लहान मुलें जन्मताच अगर एक महिन्यानें त्यांच्या अंगावर उपदंशाचे परिणाम दिसतात. लेखकाला प्रॅक्टिसमध्यें एका कुटुंबाची जी कहाणी ऐकावयास मिळाली, ती जनतेपुढें नामनिर्देश न करतां ठेवली तर परिणामकारक होईल, या हेतूनें दोन शब्दांत देत आहे. या बाईला चार मुलें झालीं. पहिल्या महिन्यांतच सर्वांनीं राम म्हटला. प्रत्येक मुलांच्या अंगावर लाल चाकदळें व्रण होऊन तीं मरून जात असत. हें माझें मूल पांचवें आहे त्यांचें रक्षण करा असें रडत रडत तिनें सांगितलें. या मुलांमध्येंसुद्धां एक महिन्यानंतर डोळे लाल होऊन त्यांतून पू वाहूं लागला, व्रण

झालें, सुदाम्यासारखी काया झाली, व शेवटीं व्हावयाचें तें झालें. बाईला-नवऱ्याला उपदंश आहे; तो बाहेरख्याली आहे याची जाणीव जाहली. शेवटीं नवऱ्याला आपला विकार तिला कळवणें भाग पडलें. प्रसूतिच्या वेदना जिला होतात, तिलाच एखादें मूल आजारी अगर रडूं लागलें तर त्याच्या दुःखाची कल्पना येते. त्याचें संगोपन कसें करावें, याची जाणीव कुमारिकेनें कितीही दिली तरी तिचा कितीसा परिणाम होणार?

या विकाराचा प्रादुर्भाव कमी व्हावा म्हणून म्युनिसीपालिटीनें व्हेनेरियल क्लीनीकस् ठिकठिकाणीं उघडलेलीं आहेत. अशा एका कायद्याची जरूरी आहे कीं, धंदेवाईक स्त्रीनें डॉक्टरकडून तपासून घेऊन विकार नसल्याचें सर्टिफिकेट तिनें मिळवलें पाहिजे व पुरुषाचीही तपासणी त्याप्रमाणें झाली पाहिजे. या कामीं या धंदेवाईक स्त्रियांच्या ठिकाणीं कोणी अधिकारी इसम नेमल्यास या रोगाला आळा पडण्यास मदत होईल.

या विकारानें व्यक्तिचें नुकसान होतें त्याचप्रमाणें हळुहळु समाजाचेंही होतें. या रोगाच्या प्रतिबंधनाकरितां जर्मनीनें बरीच मजल पुढें मारलेली आहे. आठवड्यांतून अशा रोग्यानें डॉक्टरकडून तपासणी केलीच पाहिजे; परंतु कायदे जरी किती केलें तरी ते अपुरेच आहेत. रोग झाल्यानंतर ते बरें करीत रहाण्यापेक्षां तो प्रतिबंध कसा करतां येईल याची माहिती पाहिजे.

ज्याला इंद्रियविषय भोगण्याची संवय लागली तो आपलें चारित्र्य बिघडवून टाकतो व तें सुधारणें मग कठीण जातें. त्याच्या पुढें कितीही व्याख्यान दिलें तरी त्याचा उपयोग होत नाहीं. उपदंशाचा विकार बरे झालेले, पुनः औषध मिळतें, या समजुतीनें पुनः पुनः झक मारणारे असलेले आढळतात. तहान लागल्यानंतर विहीर खणणें मूर्खपणाचें आहे त्याचप्रमाणें रोग झाल्यानंतर औषध शोधित बसणें होय.

**शिक्षणः**—या विकाराचें प्रतिबंधन करणें, म्हणजे प्रथमपासून शिक्षण दिलें पाहिजे. ब्रह्मचर्य म्हणजे काय, तें पाळलें असतां कसें फायदे होतात, इंद्रियविषयक कार्यें कोणचीं यासंबंधीं माहिती दिली पाहिजे. त्याप्रमाणें चांगल्याच्या संगतींत मुलें राहतील याबद्दल व्यवस्था केली पाहिजे. प्रत्येक स्त्री ही आपली माता किंवा भगिनी आहे अशी भावना ठेवण्याबद्दल शिक्षण दिलें

पाहिजे. लहान मुलें नेहमीं चौकस असतात तीं आईबापांना नानातऱ्हेचे प्रश्न विचारून भंडावून सोडतात. कित्येकवेळां आईबापांनाही त्यांचे समाधान करतां येत नाहीं तेव्हां अशावेळीं त्यांचें समाधान होईल तसा प्रयत्न केला पाहिजे. खरें बोलणें, करारीपणा, आत्मविश्वास व मनांवर ताबा कसा ठेवतां येईल; याची त्यांना जाणीव करून दिली पाहिजे. चुकी जरी झाली तरी धाक न दाखवतां तो खरें बोलेल इकडे नेहमीं लक्ष दिलें पाहिजे. पुष्कळ आईबापांना मुलांना वेळीं अवेळीं मार देण्याची संवय जडलेली असते. परंतु या मारानें इष्ट परिणाम न होतां अनिष्टच परिणाम होतो.

शब्दानें जितकें काम होईल तितकें छडी मारून काम होणार नाहीं. शल्य शरिरांतून काढून टाकतां येतें; परंतु शब्दांचें शल्य जिवंत असेपर्यंत जात नाहीं इतकें तें चिरस्थायी बनतें. दुसऱ्याला संकटसमयीं मदत करणें स्वतः कष्ट होत असतांना सुद्धां दुसऱ्याच्या उपयोगी कसें पडतां येईल अशा प्रकारचे संस्कार त्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे. मनुष्याचा स्वभाव उदार बनणें हें त्यांच्या संस्कारांवर अवलंबून असतें.

चांगल्या गोष्टी करण्याबद्दल तुला मी अमुक अमुक बक्षीस देईन, अशा प्रकारचा मोह त्यांच्या मनावर करूं नये. अशा तऱ्हेच्या वर्तनानें तीं मुलें अप्पलपोटी, स्वार्थसाधु व हलक्या विचाराचीं बनतात.

सर्वांशीं प्रेमानें वागणें, नेहमीं सत्य बोलणें, दुसऱ्याला मदत करणें, मनाचा शुद्धपणा ठेवणें, वाईट मित्रांची संगत न करणें, आईबापांचें ऐकणें, ईश्वराविषयीं व देशाविषयीं प्रेम बाळगणें ह्या गोष्टीचें शिक्षण आरंभापासून दिलें तर तीं उत्तम प्रकारचीं नागरिक, स्वदेशभक्त झाल्याशिवाय रहाणार नाहींत. अशा तऱ्हेची मनाची ठेवण झाली, ह्मणजे कुविचार व वाईट संगत त्यांना कधीं लागणें शक्य नाहीं. अशा प्रकारची शिकवण देतांना शारिरीक सुधारणेकडे लक्ष दिलें पाहिजे. लहान मुलांच्या मेंदुवर शिक्षण घेतांना परिणाम होतां कामा नये. **शिक्षणपद्धति** अशी पाहिजे कीं मुलाला त्याचा बाऊ वाटतां कामा नये. बाप अशिक्षित असला तरी तो आपल्या मुलाला कशा प्रकारचें शिक्षण देतो ही गोष्ट लेखकाच्या डोळ्यांसमोर घडलेली आहे ती वरून वाचकांनीं बोध घ्यावा या हेतूनें लिहीत आहे. स्वतःच्या मुलांचें वय ७ वर्षांचें व त्याच्या काकांचें वय ७ वर्षांचें,

पण तो बापाच्या उतारवयांत झालेला व बुद्धीनें तीव्र असल्यामुळें दुसरींत लवकर गेला. अर्थात् सावत्र भावाला आपला मुलगा कां जात नाहीं, याबद्दल विषाद वाटला, ह्मणून त्याला मास्तरांची शिकवणी, स्वतःची शिकवणी व शाळा अशा प्रकारें १३ ते १४ तास त्याच्याकडून अभ्यास करून घेण्यांत येऊं लागला.

मुलाचें वय लहान असल्यामुळें त्याची खेळण्याकडे प्रवृत्ति असणार हें उघड आहे. अशा प्रकारें शिक्षणाचा परिणाम त्याच्या शरिरांवर झाला, मनावर एक प्रकारची धास्ती बसली व पुनः येरे माझ्या मागल्या याप्रमाणें स्मरण शक्तिवर परिणाम झाला. इतकें असून बापाच्या डोक्यांत याचीं कारणें येऊं नयेत याहून आश्चर्य तें कोणतें ? सूज्ञ मुलगा असता, तर वडीलांना आपण शिक्षण कसें घेतलेत हें विचारलें असतें. यावरून, वडिलपणा प्राप्त झाला ह्मणजे मुलांना वाटेल तसें आपण करूं ह्मटलें तर तें कसें जमेल ? प्रत्येकाला जर शहाणपण असतें, तर सगळेंच पदवीधर व सुशिक्षीत लोक सारख्या दर्जाचे झाले असते; सांगण्याचें तात्पर्य काय, ज्याला इंग्रजीमध्यें ( Cramming ) ह्मणतात असें शिक्षण अगर धाक असूं नये. अशा तऱ्हेच्या शिक्षणानें, मुलांला वडिलांचा आदर वाटत नाहीं, भीती वाटत नाहीं व पुढें आयुष्यांत तो उपयोगी पडेल किंवा नाहीं याचीही शंका असते. पुराणांतील महाभारत, रामायण वगैरे ग्रंथांतील गोष्टी सांगितल्यास मुलांना प्रसन्नता वाटून त्याचें शीलही चांगलें बनतें. मुलांला प्रत्येक गोष्ट चौकसबुद्धिनें समजून कशीं देतां येईल याचा प्रयत्न करावा. देवासाठीं सकाळीं फुलें काढण्यास सांगावें; व फुलें काढण्याची संवय मुलांना साहजिकच होत असते व फुलांच्या वासानें मनही प्रफुल्लित होतें.

**संगतिः**—मुल जसें मोठें होत जाईल तसें त्याची संगत कोणच्या प्रकारची आहे इकडे लक्ष ठेवावें. चांगले व वाईट मित्र कोणचे, त्यांच्या बरोबर कसें वागावें हें समजून सांगावें. घरांमध्यें चांगली स्वच्छता ठेवावी व तें लहान मुलांना आकर्षण होईल असें करावें. लहान मुलांना गाणें आवडतें तेव्हां बाजाची पेटी, सारंगी वगैरे वाद्यें घरांत बाळगावीं. घरांमध्यें पुस्तकांचा संग्रह असावा व तीं पुस्तकें, प्रवास, चरित्रें, बोधपर नीतिप्रद अशीं असावींत. प्रेमविषयक पुस्तकें त्यांच्या हातांत न जातील अशा प्रकारची खबरदारी घ्यावी. अशा पुस्तकांची एकदां चटक लागली ह्मणजे नीतिचीं पुस्तकें त्यांना आवडत नाहींत. बहकलेल्या तरुणीसारखीं पुस्तकें हातीं पडणें अल्पवयांत घातुक आहे. अशीं पुस्तकें अःढळ-

त्यांत अग्निसमर्पण करावींत. लहान मुलांना स्वच्छ कपडा, साधेपणा याची शिकवण द्यावी. त्यांना फॅशनेबल कपड्यांची संवय लागली कीं भावी काळांत ती घातुक झाल्याशिवाय रहात नाहीं. श्रीमंती कपड्यांवर नसून मनावर अवलंबून असते. हल्लींचें शिक्षण इतकें सदोष आहे कीं, त्यांतून पार पडलेल्यांना स्वतंत्रपणानें आपलें जीवित चालवतां येईल कीं नाहीं याचीच भ्रांती असते. परीक्षा पास झालारे झाला कीं, एखाद्या जागेकरितां हजारों अर्जदार तेथें हजर! काय ही आमची दैनावस्था! मॅट्रीक झाले तरी आपल्या वडिलांवरचा बोजा आह्मांला उचलतां येऊं नये व दुसऱ्याच्या तोंडाकडे मीठभाकरीकरतां जावें लागावें? ही शिक्षण पद्धति बदलेल त्याचवेळीं हिंदुस्थानांत सुधारणा होईल. लहान मुलांना जन्मापासून ज्याप्रमाणें शिक्षण द्यावें, त्याप्रमाणें त्यांचा स्वभाव बनत असतो. (Charity begins at home) स्वातंत्र्यवृत्तीच्या बाता मारणारांना गृहशिक्षण म्हणजे काय याची जाणीव व जगाचा अनुभव नसल्यामुळें पुढें पश्चाताप पावतात. सुखाची व्याख्या करणें फार कठीण आहे. कारण सर्व सुखाच्या पाठीमागें लागलेले आहेत; परंतु सुख न मिळतां दुःखच प्राप्त होतें. दुसऱ्यांचें वाईट न चिंतितां त्यांचें चांगलें कसें होईल, दुसऱ्याच्या उपयोगी आपल्याला कसें पडतां येईल अशा प्रकारचा निर्हेतुक बुद्धिनें नेहमीं प्रयत्न करणाराला खरें सौख्य ह्मणजे काय आहे हें समजून येतें. झाडाची डहाळी ज्यावेळीं कोवळी असते त्याचवेळीं ती वाकूं शकते, पण तीच जून झाली म्हणजे मोडते. त्याचप्रमाणें, लहान मुलांना जसें शिक्षण तुह्मी द्याल त्याप्रमाणें त्यांचें स्वभाव बनतात व ते पुढें उपयोगी पडतात; परंतु एकदां ती वेळ चुकली ह्मणजे त्या उपदेशाचा परिणाम झाडाच्या फांदीप्रमाणें झाला तर नवल तें काय?

---


# रोग विज्ञान

(ले०—डॉ. दा. वा. सांडू)

या पुस्तकांत सुमारें ९० रोगांची माहिती सोप्या भाषेत दिली असून, त्यावर अनुभविक व सुलभ असे औषधी उपायही सांगितलें असल्यामुळें पुस्तक संग्राह्य झालेलें आहे. केसरी, नवाकाळ, सुदर्शन, वि. वृत्त, बलवंत वगैरे प्रमुख वृत्तपत्रांचे उत्कृष्ट अभिप्राय. कि. ८८ पो. ख. निराळा.

**दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स, मुंबई नं. २**

# प्रकरण १५ वें

## एक अत्यंत घातुक संवय

डॉक्टर व रोगी यांचें नातें मित्रत्वाचें असतें. दवाखान्यांत येणारा प्रत्येक रोगी आपलें हृद्गत डॉक्टरला सांगत असतो. त्याच्या खरें बोलण्यावर व सांगण्यांवर त्याचें जीवित सर्वस्व अवलंबून असतें. याकरितां परस्परांचा विश्वास परस्परांवर पाहिजे. वैद्य व सुइण हिच्या जवळ कांहीं लपवून चालावयाचें नाहीं, अशा प्रकारची एक ह्मण आहे ती किती सार्थ आहे याचा अनुभव प्रत्येकाला ठाऊक आहेच. आजच्या प्रकरणांत जो विषय प्रतिपादन करावयाचा आहे तो विषय प्रत्येक तरुण स्त्रीपुरुषांनें लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

वर सांगितलेलें मित्रत्वाचें नातें या विकारांच्या वेळीं कोठच्या कोठें जातें. मुष्टिमैथुनाची संवय ज्याला लागली आहे, त्याचें जीवित फुकट जातें. आरंभाला ही संवय किती घातुक आहे याचा परिणाम पुढें काय होणार आहे याची कल्पना कोणाला नसतें. ही घातुक संवय एकदां जडली ह्मणजे ती कमी होणें अत्यंत कठीण आहे.

मुष्टिमैथुनाची संवय पुष्कळ लोकांना तारुण्याचा उगम झाला म्हणजे लागते. मुष्टिमैथुन ह्मणजे स्वहस्तानें जननेंद्रियांना चेतना देऊन वीर्यपात करणें. जगाच्या वातावरणांत प्रॅक्टिसमध्यें लेखकाला अशा दुर्दैवी तरुणांच्या हकिकती ऐकून मनांवर अत्यंत परिणाम झाला. अशा विकाराची माहिती वेळींच तरुण स्त्री पुरुषांच्या कानांवर अगर वाचण्यांत आल्यास त्याचा उपयोग होईल या हेतूनेंच हें स्वतंत्र प्रकरण लिहिण्यांत येत आहे. मुष्टिमैथून याला इंग्रजींत निरनिराळे शब्द आहेत. सेल्फपोल्युशन सेल्फआब्युज, मॅस्टरबेशन, ओनीअझम्, व्हॉलेंटरी पोल्युशन अगर एकांतवासांतील घातुक संवय ( Solitery Vice ) असें ह्मणतात. ही संवय एकदां लागली ह्मणजे तिला नियमबद्धता येत नाहीं; व विचार मनांत येण्याचा अवकाश कीं तें झाल्याशिवाय त्याला चैन पडत नाहीं. ही संवय बालपणापासून जडली ह्मणजे वृद्धावस्थेंपर्यंत टिकून राहते. ज्याला ही संवय

लागली तो नेहमीं गुपचुपपणें हें कृत्य करीत असतो व त्याला ह्या आपण अपराध करीत आहोंत ह्याबद्दल मन एकसारखें टोंचणी देत असतें.

हें कृत्य उघडपणें करीत असतां तो स्वतःला बिघडवतो व स्वतःच्या हातानें याप्रमाणें भावी आयुष्याचा नाश करीत असतो. एखाद्या सूज्ञ माणसानें हें करणें वाईट आहे म्हणून जरी सांगितलें तरी क्षणैक सुखाची लालसा लागलेल्या त्या तरुणांच्या मनांत ही गोष्ट गांवींही येत नाहीं. ही वाईट संवय ज्याप्रमाणें बालपणांपासून मुलांना लागते त्याचप्रमाणें मुलींमध्येंही आढळते. लहान मुलांमुलींमध्यें ह्या संवयीचें प्रमाण आपल्या इकडे जरी विशेषसें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं तरी या बाबतींत पाश्चात्य देश फार पुढें गेलेला आहे. या घातुक संवयीबद्दल नामांकित डॉक्टरांचीं मतें काय आहेत हें कळल्यास ज्यांना ही संवय लागलेली आहे, त्यांना त्याचा उपयोग होईल या हेतुनें देत आहे. एक प्रसिद्ध डॉक्टर म्हणतो, प्लेग, लढाई, देवी, यासारख्या सांथीच्या विकारानें मानव जातीचा नाश झालेला नाहीं इतका या घातुक संवयीनें झालेला आहे. दुसरा एक डॉक्टर म्हणतो, तरुण माणसाला नंतर जे कांहीं विकार होतात, त्याला अशा प्रकारची घातुक संवय हें एक कारण आहे. ही संवय मेंदूची शक्ति कमी करते व शरिराचा नाश करते. तारुण्यांत मनुष्य आल्यानंतर शरिरांमध्यें फेरबदल झाला पाहिजे तो न झाल्यास हें एक कारण आहे, असें समजून इलाज करावा. ही घातुकसंवय पूर्वींच्या कालांत नव्हती व आज तीं सुधारणेमुळें झालेली आहे, असें नसून ती अनादि कालापासून चालत आलेली आहे. हिपोक्रेटेस, मोसेस वगैरे लोकांच्या ग्रंथांत या विकाराचें वर्णन आढळतें. मुलगा व मुलगी तारुण्यांत आली म्हणजे प्रत्येक आईबापानें त्यांच्याकडे लक्ष दिलें पाहिजे, त्यांची संगत कोणत्या प्रकारची आहे, तीं पुस्तकें काय काय वाचतात, आपल्याला चुकवून एकांतवासांत काय करीत असतात, इकडे लक्ष पुरवलें पाहिजे.

**कारणें**:—मागील प्रकरणांत या कारणांचा समावेश करण्यांत आलेलाच आहे. आळशीपणा, शृंगारात्मक वाङ्मय, उत्तेजक, मसालेदार पदार्थ, नग्न स्त्री पुरुषांची चित्रें पहाणें, एकांतवासांत बसण्याची संवय वगैरे कारणें या संवयीला उत्तेजन देत असतात; परंतु याहीपेक्षां महत्वाचें कारण म्हणजे वाईट संगत व वाईट दाया ह्या होत. शहरासारख्या ठिकाणीं श्रीमंत लोकांकडे लहान मुलें

संभाळण्याकरितां दाया ठेवित असतात; त्या दाया बहुतेक अविवाहित अगर विधवा असतात. स्वतःचें मनोविकार शमन करण्याकरितां ह्या दाया, लहान मुलांचें इंद्रिय हलवित असतात. मुलाला बोलतां येत नसलें, तरी या कृतिचा मज्जातंतूवर परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. साहजिकच पाण्यासारख्या असणाऱ्या वीर्याचा स्राव अशा संवयीमुळें होत असतो; असें करण्यांत दायांना काय समाधान वाटणार असा साहजिकच प्रश्न उद्भवणार हें उघड आहे. परंतु पुरुष व स्त्री यांमध्यें अशा प्रकारची जात आहे. या जातीला नेहमीं असें पहाण्यांत अगर करण्यांत समाधान वाटत असतें. असें करण्यापासून त्या बाईला या लहान मुलांच्या आयुष्यावर केवढा आघात करीत असतो याची कल्पना नसते. जीं मुलें अत्यंत रडवीं असतात, तीं अशा संवयीमुळें तावडतोब गप्प बसतात. याकरितां मुलांनीं त्रास देऊं नये म्हणूनसुद्धां हा मार्ग आचरित असतात. लहान मुलें नेहमीं थकल्या भागल्याशिवाय झोपीं जात नाहींत. शहरांतले आईबाप काम करून थकलेले भागलेले घरीं येत असतात. घरांत आल्यावर अगर जेवतांना अशा प्रकारचें सुस्वर गायन कानांवर पडलें म्हणजे राग येतो व तीं लवकर झोपीं जावीं म्हणून काठीचा उपयोग करण्यांत येतो. अशावेळीं त्रास झाला तरी सहन करण्याची संवय करावी व त्यांना न मारतां सौम्य शब्दाची शिक्षा केलेली बरी. मारामुळेंसुद्धां ह्या संवयीवर विशिष्ट परिणाम होण्यास मदत होते. एकत्र बरींच मुलें खोलीमध्यें कोंडून ठेवणें ही चाल घातुक आहे.

इंद्रियांवर जी मागें पुढें होणारी त्वचा असते, ती जर घट्ट असली, तर ही संवय जडण्यास मदत होते. या चामडीच्या वारंवार होणाऱ्या संकोचनामुळें मज्जातंतु उत्तेजित होतात, त्यामुळें वीर्यस्राव आंतल्या आंत जमत जाऊन तो घट्ट होतो. त्यामुळें तेथें दाह होतो व एक प्रकारची खाज होत असल्यामुळें अशा प्रकारची संवय लागते. मुसलमानामध्यें सुंथा करण्याची रीत यामुळेंच पडली असावी असें वाटतें. ही संवय कशी लागते हें खालील उदाहरणावरून ध्यानांत येईल. एका शाळेमध्यें एक हुषार, तरतरीत, अंगानें मजबूत असा विद्यार्थी होता. कांहीं दिवसांनीं त्याच्या चर्येमध्यें व वागणुकींत फरक पडूं लागला. तो मुलांबरोबर मिसळत असे. पण त्याला हें व्यसन माहित नव्हतें. कांहीं मुलें अशा प्रकारें वर्तन करतांना आढळत असत, तरी त्याला त्याची कल्पना नव्हती

याची इंद्रियाची चामडी घट्ट झालेली होती, व हा आनुवंशिक विकार असावा अगर जात्याच आपलें इंद्रिय असें असावें असें त्याला वाटत होतें. मलावरोध, लघ्वीला वारंवार होणें, मसालेदार पदार्थ खाणें यामुळें त्याच्या इंद्रियांवर हळुहळू उत्तेजित परिणाम होऊं लागला व रात्रीं त्याला स्वप्नावस्था, लघ्वीच्यावेळीं धातु जाणें, अशाप्रकारचीं लक्षणें आरंभीं होऊं लागलीं. इंद्रियाच्या आंत पाहिलें असतां वीर्यस्रावाचा घट्टपणा आढळून येऊं लागला. तो काढून टाकण्याचा प्रयत्न करतां करतां मज्जातंतूच्या उत्तेजनामुळें, एक प्रकारें वासना होऊन त्याला त्यांत समाधान होऊं लागलें. अशा प्रकारें त्यांत मजा वाटत आहे म्हणून दिवसांतून ३–४ वेळां हा प्रकार होऊं लागला. ही संवय १२ व्या वर्षापासून सुरु झाली ती ४ वर्षेपर्यंत टिकली. १७–१८ वर्षांचा झाल्यानंतर या विकारांचीं पुस्तकें वाचण्यांत आलीं, व त्यामुळें आपण हें काय करीत आहोंत हें पाहून त्याला पश्चात्ताप झाला; परंतु लागलेली संवय एकदम जाईना, शेवटीं एका सूज्ञ डॉक्टराचा सल्ला घेतला. डॉक्टरसाहेबांनीं या विद्यार्थ्याचा इतिहास, त्याचे खाणें, संवयी वगैरे लक्षांत घेऊन यापुढें कसें वागावें या संबंधीं उपदेश केला त्यावेळीं त्याची स्थिती खालील प्रमाणें होती. वारंवार डोकें दुखणें, चित्त स्थिर नसणें, छातींत जळजळणें, अशक्तता, आळस, निरुत्साह वगैरे लक्षणें या संवयीमुळेंच झालेलीं आहेत याची जाणीव नसल्यामुळें या व्यसनांचा ३–४ वर्षांत मज्जातंतु व शरिर यांवर काय परिणाम झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. हें उदाहरण नमुन्याकरितां दिलेलें आहे. हें व्यसन कसें सुरूं होतें एवढेंच दाखविण्याचा लेखकाचा उद्देश आहे.

मलावरोध, मूळव्याध, मुतखडा, लघ्वीला वेळेवर न गेल्यामुळें होणारा मूत्राशयाचा दाह, भगेंद्र, स्थानिक अस्वच्छता, इंद्रियांच्या ठिकाणीं खरुज, यामुळें ही संवय जडते, मऊ गाद्यांवर निजल्यामुळें एक प्रकारचें अंतरावयांत रक्ताधिक्य होतें, व वरील कारणें असलीं म्हणजे त्याला मदत होते. पोटावर निजणें त्याचप्रमाणें खालीवर चढउतार करणें घोड्यावर बसणें ही सुद्धां ह्या संवयीला मदत करणारीं आहेत. लहान मुलें बाकांवर बसून पाय हलवूं लागलीं तर त्यांची आई त्याला घर कोसळेल, पाय हालवूं नकोस म्हणून धजावीत असते. त्यावेळीं मुलाच्या हें लक्षांत येत नाहीं; या म्हणींत अगर म्हणण्यांत किती सार्थकता आहे ती पहा. शरिररुपीं घरच त्या संवयीमुळें कोसळणार यांत संशय

नाहीं लहान वयांत तंबाखूचें व्यसन, साखरेचे पदार्थ, मसाले, दालचिनी, लवंगा, पेपरमीठ वगैरे अकालीं इंद्रियांना उत्तेजित करीत असतात आनुवंशिकपणा हेंही ह्या संवयीचें महत्त्वाचें कारण आहे. ज्यांच्या वडिलांना ही संवय असेल, त्यांच्या मुलाला ही संवय जडण्याचा संभव आहे, ज्यांना स्त्रीसंयोग फाजील करण्याची संवय झालेली आहे व स्त्रीशिवाय घटकाभर चैन पडत नाहीं असे लोकही या मार्गाला प्रवृत्त होतात अशीं कांहीं उदाहरणें दृष्टीस पडतात.

अंग मेहनतीची संवय, नेहमीं उघड्या हवेंत काम करणें, या संवयीच्या लोकांना इंद्रियविषयांची लालसा कमी असते असा अनुभव आहे.

वरील वर्णनावरून मुष्टिमैथुनाची संवय प्रत्येकाला तारुण्यांत जडते असें नसून ती लहान वयांत जडण्यांचा संभव असतो.

**लक्षणें:**-दोन प्रकारचीं असतात. ( १ ) स्वतःच्या मुलांकडे पाहतांना, त्याला अशा प्रकारची संवय असावी, असें धरून मनाचा ग्रह करून घेऊं नये; परंतु मुलें तारुण्यांत आलीं म्हणजे तीं कशी वागतात, तें काय करतात, त्यांची संगत कशी आहे इकडे लक्ष ठेवावें, म्हणजे त्यावरून जर ही संवय लागलेली असेल तर उघडकीस आल्याशिवाय रहाणार नाहीं. एखादा मुलगा हें कृत्य करतांना शोधून काढणें फार कठीण आहे; परंतु नियमानें एखाद्या इच्छित स्थळीं जाण्यांची संवय त्याला लागलेली असेल, तर त्यावरून त्याची दिशा कळूं शकते. रात्रीं झोपतांनासुद्धां कांहीं मुलांना ही संवय असते. ती संवय खालील लक्षणांवरून कळून येतें. झोपेंत साधारणपणें असणें, अंगावरचीं पांघुरणें ताबडतोब उडवून टाकणें, ८–१० वर्षांच्या मुलामध्यें त्याचे हात जननेंद्रियाच्या ठिकाणीं असून वीर्यपात झालेला आढळणें नाडीचे ठोके वाढणें, घाम येणें, व झोप येण्याचें सोंग घेणें, हीं लक्षणें आढळतात. मुलींमध्यें योनींच्या वरच्या बाजूस आर्द्रपणा त्याचप्रमाणें कपड्यावर डागही आढळतील. तारुण्याच्या पूर्वी अकालीं कपड्यांवर डाग आढळणें ह्या संवयीचें द्योतक आहे. अकालीं तारुण्यांतही संवय जडलेल्या मुलामुलींच्या इंद्रियांची साधारण वाढ झालेली पाहण्यांत येते. मुलीमध्यें योनीचा भाग साधारण फुगवट व प्रदरासारखे विकार आढळतात. ज्यांना ह्या संवयी लागलेल्या आहेत, त्यांच्या इंद्रियांची वाढ होत नाहीं. तीं गलित होतात व लग्न झाल्यास पश्चात्तापास कारण होतें.

आतांपर्यंत या विकाराचें जे वर्णन देण्यांत आलेलें आहे, त्याचा लेखकाला प्रत्यक्ष अनुभव नसला तरी संसारांत रहाणाऱ्या प्रत्येक सूज्ञ आईबापांना आपल्या मुलांच्या भावी आयुष्याकडे नजर द्यावी लागते, या हेतूनें पाश्चात्याच्या ग्रंथ वाचनानें बारकाईनें जी माहिती निरनिराळ्या पुस्तकांत सांगितलेली आहे तीच वाचकांच्यापुढें मांडण्याचा प्रयत्न केला आहे. वैद्यकीयदृष्ट्या ह्या विकाराचीं लक्षणें स्त्रीपुरुषांमध्यें कशीं आढळतात हा विचार पुढील प्रकरणावर सोपविणें बरें.

---


# दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स यांचा

## आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें,

## यांचीं कांहीं औषधें.

**बाळंत काढा**—नं. १ पहिल्या १० दिवसांत देण्याचा २० तोळे बा. ०-१४-०

**बाळंत काढा**—नं. २ दहा दिवसांनंतर देण्याचा ... ०-१४-०

**दशमूळ काढा**—त्रिदोष, ताप, खोकला वगैरे ... १—२-०

**महामंजिष्ठ काढा**—रक्तशुद्धीवर ... ... ... १—४-०

**द्राक्षासव**—सारक, पाचक, पौष्टिक... ... ... ०-१४-०

**च्यवनप्राश**—शक्तिवर्धक १ पौंड ... ... २—०-०

**सुदर्शन काढा**—कडकीवर ... ... ... १४-०-०

**नारायण तेल**—वातविकारांवर १ औंस ... ... ०—८-०

**कुमारी आसव**—श्वास, खोकल्यांवर ८ औंस ... १—०-०

**अश्वगंधारिष्ट**—शक्तिवर्धक ... ... ... १—४-०

पॅकींग टपाल खर्च निराळा पडेल.

**दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स, मुंबई नं. २**

# प्रकरण १६ वें.

—:o:—

## मुष्टिमैथुनाचे परिणाम.

मुष्टिमैथुनाची संवय कशी लागते, या संबंधींचें वर्णन मागील प्रकरणांत आलेलें आहे. ही संवय कशी घातुक आहे याचें शाब्दिक वर्णन झालें, त्याचा भावी आयुष्यांवर त्याचप्रमाणें शरिर प्रकृतिवर कसा परिणाम होतो याचा विचार करूं. या लक्षणांचा दोन प्रकारें विचार करतां येईल स्थानिक व सार्वदेहिक.

स्थानिक परिणाम म्हणजे त्या इंद्रियांमध्यें होणारा दाह होय. जननेंद्रियांला स्वतःच्या हातानें उत्तेजित केल्यामुळें, त्या भागांत एकप्रकारें रक्ताधिक्य ( Congestion ) होत असतें व त्यामुळें तेथील रक्तवाहिन्या जाड होत असतात. ज्यांना ही संवय अतिशय लागलेली आहे, त्यांच्या मूत्र मार्गाची अंतःत्वचा जाड होते व ही कायमची स्थिती होऊन जाते. ही अंतःत्वचा ( Mucus-membrane ) मूत्राशय, मूत्रपिंड, वीर्याशय, अंडाशय वगैरे यापर्यंत पसरलेली असल्यामुळें तो परिणाम या त्वचेंवरही होतो. यामुळें; जरी एका ठिकाणीं दाह अगर सुज आली तरी त्याचा परिणाम या इंद्रियांना भोगावा लागतो. अशा तऱ्हेनें शारिरीक दृष्टया कसा बदल होतो हें ध्यानांत येईल. रक्ताधिक्य बरेंच दिवस झाळें म्हणजे मूत्रमार्गाच्या ठिकाणीं सूज येऊन दाह सुरूं होतो. मूत्रमार्ग फार नाजुक असल्यामुळें होणारी पिडा फार वाढते व त्यामुळें वारंवार लघ्वीला जाण्याची बुद्धि होते. ही सूज आंतल्या बाजूपर्यंत पसरली तर मूत्रनलिका घालून लघ्वी काढणेंही कठिण जातें. वेदना एक सारख्या होत असतात. हें दुःख वरच्या बाजूला अगर इंद्रियांच्या टोंकाला होत असतें. लघ्वी होतांना जी तिडीक मारते ती तर असह्य होऊन जातें. ज्यांना पु–प्रमेह विकार झालेला असतो, त्याला या तिडिकीची कल्पना येईलच.

या सुजेच्या परिणामामुळें पुढें, मूत्रमार्गाचा संकोच ( Stricture ) होतो. ज्यांना धातुविकार बरेच दिवस आहे त्यांनासुद्धां हा त्रास जाणवतो

मूत्रमार्गाच्या आंतल्या बाजूस ग्रंथी आहेत, ह्या ग्रंथी गुदद्वाराच्या आंत बोट घालून पाहिलें तर हाताला लागतात. मूत्रमार्गाची सूज वाढली ह्मणजे ती या ग्रंथींपर्यंत येते व ह्या ग्रंथी मोठ्या होतात, एखादे वेळेस त्या ठिकाणीं क्षतही पडतें. हें क्षत पडतें त्यावेळीं उष्णता, दाह, गुदद्वार व शिश्न या ठिकाणीं दुखावा हीं लक्षणें होतात. वृद्धावस्थेंत ह्या गांठी बहुतकरून वाढतात व या वाढल्या ह्मणजे लघ्वीला त्रास होतो. मूत्राशयाच्या टोंकाच्या ठिकाणींच या ग्रंथी असल्यामुळें त्यांची वाढ झालेली असली, तर लघ्वी बाहेर सुटण्यास त्रास पडणार हें उघड आहे. ही सूज मूत्राशय, मूत्रपिंडापर्यंत वाढत गेली, लघ्वी साफ झाली नाहीं, तर अर्थातच विजातीय विषारी क्षार बाहेर पडत नाहीं, त्यामुळें पुनः या क्षारांचे रक्तांत भिश्रण होतें व या विषामुळें रोग्याला बेशुद्धि येऊन प्राण जातो डॉक्टर लोक याला युरेमिया पॉयझनींग म्हणतात. हा विकार ज्यांना मुष्टिमैथुनाची, त्याचप्रमाणें स्त्रीसंभोगाची संवय अमर्यादित आहे त्यांना होतो यावरून अशा संवयीचा परिणाम किती जाचक होतो याचा विचार निसर्गाचें नियम मोडणारांनीं करावा व वेळींच सावध रहावें.

मुत्रमार्गाचा संकोच झाला, ह्मणजे लघ्वी साफ होण्याकरतां मनुष्य जोर करतो, त्यामुळें गुदद्वाराच्या ठिकाणीं दाब वाढतो व यामुळें मूळव्याध व गुदद्वार बाहेर येणें हें विकार होतात. आरंभीं सांगितलेलेंच आहे कीं प्रोस्टेट ग्रंथीच्या जवळ वीर्याशय वगैरे जननेंद्रियें आहेत. याचाहि दाह सहाजिकच झालेला असतो, हें वाचकांच्या लक्षांत आलेलें असेलच. ही सूज वीर्याशयांत आली ह्मणजे ती वृषणापर्यंत वाढत जाते यामुळें चेतना फाजील वाढण्यास मदत होतें. वीर्याशयांचा दाह झाल्यामुळें वीर्याचा सांठा वृषणांत वाढत जातो, यामुळें वीर्यपात होऊं लागतो. वृषणांत दाह झाला ह्मणजे त्याचें कार्य वाढतें; वृषणामध्यें सूज असल्यामुळें तो दाबला असतां दुखावा होतो व त्या ठिकाणीं मऊपणा लागतो; यामुळें त्याचा आकार हळुहळु कमी होऊं लागतो.

वृषणांचा आकार कमी झाला ह्मणजे चेतनाशक्ति कमी होतें व नपुंसकत्व येतें. अशा प्रकारच्या नपुंसकत्वास वाटेल तेवढीं कामोत्तेजक औषधें घेतलीं तरी त्याचा उपयोग होत नाहीं. हें लोक नेहमीं जाहिरातींच्या पाठीस लागतात. व कामोद्दीपक जाहिरातींचीं कायमचीं गिन्हाइकेंच होतात असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. बहुतेक हीं औषधें उत्तेजक असतात. ज्याला नपुंसकत्व

शारिरीक दोषांमुळें व वरील कारणामुळें आलेलें असते तेथें उत्तेजक औषधें काय करणार? या वेड्यांना स्वतःला अक्कल नसतें, तें वैद्य व डॉक्टर नसल्यामुळें यांवर विश्वास ठेवण्यापेक्षां नाहींत, तर एखाद्या उंची औषधाच्या जाहिरातीवर विश्वास ठेऊन तीं औषधें घेतील, व प्रकृति जास्त बिघडवून घेतील. विचार करूं गेलें असतां निसर्गाच्या नियमानें नियमीत वागणाराला उत्तेजक औषधें घेण्याची जरूरी नसते; उत्तेजक औषधानें पैसा जाऊन शिवाय शरिराची खराबी जास्त होत जाते ती निराळी. विहरींत नाहीं तर पोहऱ्यांत कोठलें येणार, अशा प्रकारें त्यांची केवीलवाणी स्थिती होते ! फक्त एकाएकीं अकस्मात् होणाऱ्या गोष्टीच्या परिणामामुळें जो नपुंसकपणा येतो, तो मात्र उत्तेजक औषधानें कमी होतो.

कधीं कधीं मुष्टिमैथुनाच्या संवयीमुळें वृषणांच्या शिरांना सूज येतें, व त्यामध्यें पाणी होण्याचा संभव असतो. स्वप्नावस्था म्हणजे रात्रीं झोपेंमध्यें न समजतां वीर्यपात होणें. मुष्टिमैथुनाची संवय सोडण्याचा प्रयत्न केला म्हणजे कांहीं दिवस अशाप्रकारें वीर्यपात होत असतो. चहा अतिशय प्याला असतांसुद्धां स्वप्नावस्था होते. हा वीर्यपात रात्रीं कित्येकवेळां होतो, त्यामुळें पाय दुखणें, डोकें दुखणें, अंग मोडणें, स्मरणशक्ति कमी होणें, चित्तवृत्ति बावरल्यासारखी होणें, कोणी बोललें असतां तें सहन न होणें, एकाएकीं राग येणें, अग्निमांद्य, दृष्टि मंद होणें, अभ्यासांत लक्ष न लागणें, सुस्ती, झोंप एक-सारखी काढावीशी वाटणें, कमर मोडणें, हीं लक्षणें होतात. ज्यांना प्रेमविषयक कादंबऱ्या, त्यांमधील बायकांचें प्रेमालिंगन वगैरे गोष्टी वाचण्याचें व्यसन आहे, त्यांना झोपेंमध्यें, तशाप्रकारची स्वप्नें पडून वीर्यपात होतो. कांहीं कारणानें विवाहितांना ब्रम्हचर्य पाळण्याची पाळी आली तरीही हा विकार कधीं कधीं होतो. स्वप्नावस्थेला जी सुरवात होतें ती पहाटेच्या सुमारास अर्धवट झोंप असतांना होते. स्वप्न पडतें व वीर्यपात होतो. त्यावेळीं मनुष्य जागा होतो न होतो तोंच वीर्यपात होतो. लघ्वीला आलें असतां न जाणें, उशीरा जेवणें, उत्तेजक दारू व पेयें पिणें, यामुळें जननेंद्रियें उत्तेजित होतात. परंतु या सर्व कारणांपैकीं मुख्य कारण म्हणजे या विषयाचें वारंवार चिंतन करणें होय. कांहीं लोकांत रोज स्वप्नावस्था होतें कित्येकांत कांहीं दिवसाआड होते.

हा स्वप्नावस्थेचा परिणाम शरिरावर कमी जास्ती प्रमाणांत होत असतो. तारुण्यांत त्याचा परिणाम जाणवत नाहीं. व वर सांगितलेलीं लक्षणें ही त्याला

होत नाहींत. हा वीर्यपात हितावह आहे किंवा नुकसानकारक आहे याचा विचार केला ह्मणजे असें ठरतें कीं, जो तरुण आहे ज्याची प्रकृति चांगली आहे, ज्याला कोणताही रोग नाहीं, जो अविवाहीत आहे, अशा तरुणाला महिन्यांतून १–२ दां वीर्यपात झाला तर त्याचा परिणाम त्याला जाचत नाहीं. परंतु ब्रह्मचर्य पाळणाराला वीर्यपात का व्हावा असाही प्रश्न उद्भवतो. तर यांचे उत्तर त्याची वागणूक हें होय. मागें जीं कारणें सांगितली आहेत, तींच कारणें स्वप्नावस्थेला लागू पडतात.

इंद्रियांच्या ठिकाणीं असणारी सुज अशीच चालु राहिली तर त्यांच्या कार्यामध्यें कमकुवतपणा येतो, व त्यामुळें साधारण मनांत विचार येण्याचा अवकाश कीं, वीर्यपात तावडतोब होतो. लग्न झालेल्या मध्यें स्त्रीचा अल्प स्पर्श, त्याचप्रमाणें घोड्यावर बसणे, पाय इकडे तिकडे हालवणें, एवढ्या क्षुल्लक कारणानें वीर्यपात होतो. यांवरून इंद्रियें, त्यामधील रक्तवाहिन्या, मज्जातंतु किती शिथील झालेले असतात याची कल्पना होईल. वीर्यपात १ ते २ थेंबापासून १ तोळ्यापर्यंतही होऊं शकतो. वीर्याच्या रंगावरून त्याची परिक्षा करतां येते मनांत आल्यानंतर अगर वरील कारणानें जो वीर्यपात होतो तो अगदीं पाण्यासारखा असतो व त्यांमध्यें वीर्यजंतु आढळत नाहींत हें आपल्याला सूक्ष्मदर्शक यंत्राशिवाय जाणतां येत नाहीं. कधीं कधीं जो वीर्यपात होतो त्यामध्यें वीर्यजंतु आढळतात. इंद्रियविज्ञानशास्त्र दृष्ट्या विचार केला ह्मणजे वीर्य बाहेर टाकणारे, जे स्नायु आहेत त्याच्यामध्यें आलेली शिथीलता हेंही वीर्यपाताचें एक कारण होय. व ही स्थिती तेथें दाह झाल्यामुळें, व गुदद्वार अगर मुत्राशय यांचा दाब वीर्याशयांवर पडल्यामुळें होते हा दाह जर खोलपर्यंत गेलेला असला तर कधीं कधीं वीर्यबरोबर रक्तस्रावही होतो. स्त्रियांमध्यें ज्यांना ही घातुक संवय जडलेली आहे त्यांच्यामध्यें वरील लक्षणें होतात. वृषण बारीक होतात, इंद्रियांचा आकार लहान होतो, व यामुळें वीर्य उलट मुत्राशयांमध्यें जाऊन लघ्वीबरोबर बाहेर पडून जातें. लघ्वीमध्यें, एकादा पांढरापदार्थ पाहिला तर तें वीर्य आहे, अशी चुकीची समजूत पुष्कळ लोकांची आहे. मूत्राशयांमधून एक प्रकारचा चीकट पदार्थ अगर फॉस्फेट नांवाचे क्षार लघ्वीमधून कधींकधीं जात असतात. ज्यांना या संबंधानें कल्पना नसतें ते घाबरून जातात, व वीर्य जात आहे, अद्याप बंद होत नाहीं ह्मणून डॉक्टरांना सतावून सोडतात. वीर्य म्हणून जें समजतात तें खरोखर फॉस्फेटस असतात. वीर्याच्या नाशानें जसा शरिर प्रकृतिवर एकदम परिणाम होतो, त्याप्रमाणें

फॉस्फेट्समुळें होत नाहीं; परंतु ही गोष्ट त्यांना पटत नाहीं. भूक चांगली लागणें' शौचाला साफ होणें, काम वासना तृप्त करणें, वगैरे गोष्टी यांच्या व्यवस्थित होत असतात, त्यांना थकवा वाटत नाहीं, परंतु यांची ही समजूत त्यावेळीं वैद्याच्या पलिकडे गेलेली असते व यामुळें आज या डॉक्टरचें मत विचार, उद्यां त्या वैद्याचें पाय धर, परवा जाहिरांतीतील कामोद्दीपक गोळ्या खा, अशाप्रकारें वागून ते आपली प्रकृति बिघडवून घेतात. एकादेवेळीं कदाचित् लघ्वीमध्यें वीर्यजंतु सांडतात; परंतु वर दिलेली वीर्यपाताची लक्षणें जोंपर्यंत त्या व्यक्तिला होत नाहींत तोंपर्यंत त्यानें मनाला विनाकारण हळहळ लावून घेऊं नये, अशी त्यांना सप्रेम सूचना आहे. इंद्रियें आपली कार्यें करण्यास असमर्थ झाली म्हणजे त्यामध्यें येणारा ताठरपणा व पुरुषत्वाचे गुण नष्ट पावतात, व त्याचें जीवित कंटाळवाणें होऊन आपण केव्हां मरून जाऊं असें होऊन जातें, लेखकाला अशा प्रकारचे लोक त्याच्या प्रॅक्टीसमध्यें आढळलें आहेत; परंतु जेथें परमात्म्याच्या नियमानां झुगारुन, मागचा पुढचा विचार न करतां वाटेल तसें स्त्रीसेवन, अगर मुष्टिमैथुन करणाऱ्याच्या शरिरांमधील मुळचें तत्वच नाहींसे झालें तर औषधें तरी किती कार्य करणार ! इतर जीं लक्षणें असतील तीं तात्पुरतीं कमी होतील, परंतु इंद्रियांचा कमकुवतपणा औषधें कशी भरून काढणार ? ईश्वराची प्रार्थना व सेवा हेंच त्यांना अखेरचें औषध होय असें त्यांनीं खुशाल समजावें.

मज्जातंतूवर परिणाम झाल्यामुळें, डोकें दुखणें, पाठ दुखणें, पाठींत आग फिटस, अपस्मार, घटकेंत थंडी व उष्णता वाटणें, त्याचप्रमाणें अंगाची लाही होणे, अर्धांगवायु, कण्यामध्यें दुर्बलपणा आल्यामुळें, फार वेळ बसतां न येणें, ही लक्षणें होतात. एखादेवेळीं वेडही लागण्याचा संभव असतो. कित्येकवेळां अशक्ततेमुळें, त्याला कोणाशीं बोलावेसें वाटत नाहीं, तो हांसत नाहीं, स्वस्थ एकांतांत बसणें त्याला आवडतें व एखादेवेळीं जिवाला वैतागून आत्महत्या करण्यासही तो प्रवृत्त होतो. थोड्या फार फरकानें स्त्रियांमध्येंसुद्धां वरील लक्षणें होतात. विशेषतः त्यांचीं इंद्रियें निराळीं असल्यामुळें त्यांच्यावर काय परिणाम होतो, याचा विचार करूं. इंद्रियामध्यें रक्ताधिक्य होतें, त्याठिकाणीं सूज येते व त्यामुळें योनीच्या अंतःत्वचेमधून स्राव होऊं लागतो. हा स्राव प्रथमतः पाण्यासारखा असतो, व हा स्राव फारच दिवस चालू राहिला म्हणजे तो पुवासारखा होतो, व त्याला घाण मारूं लागते. आणि बरेंच दिवस चालू राहिला म्हणजे सूज गर्भाशयाच्या तोंडापर्यंत जाते.

गर्भाशयापर्यंत सूज गेली, म्हणजे अंतःत्वचेचा हळुहळु क्षय होतो. या रक्ताधिक्यामुळें महिन्यांची पाळी वेळेवर येत नाहीं, विटाळ आंत सांचून जातो गर्भाशयाचा व इंद्रियाचा आकार वाढतो, व यामुळें त्याच्या मानेमध्यें परिवर्तन ( Retro-Flexion ) होण्याचा संभव असतो.

मुष्टिमैथुनाची संवय लागलेल्या स्त्रीला पुरुषसमागमाची इच्छा वाटत नाहीं, व त्यामध्यें तिला समाधानही होत नाहीं व हीच गोष्ट पुरुषामध्यें आढळते. अशा स्त्रीला वंध्यत्व प्राप्त होतें. दुसरी महत्वाची गोष्ट, अशा मुलींच्या स्तनांची ज्याप्रमाणें वाढ व्हावी त्याप्रमाणें होत नाहीं व ते वयमानाप्रमाणें अगदीं लहान दिसतात. रक्ताधिक्य योनी ठिकाणीं झालें म्हणजे तेथें वारंवार खाज उत्पन्न होते व यामुळें तो भाग खाजविण्याची इच्छा साहजिक होते. खाजवतांना मज्जातंतु उत्तेजित होतात. एखादेवेळीं ही खाज इतकी असह्य होते कीं स्त्रीला लज्जा रहात नाहीं. स्त्रियांमध्यें सुद्धां पुरुषांप्रमाणेंच स्वप्नावस्था व वरील लक्षणें होतात. पुरुषांप्रमाणें, स्त्रियांमध्यें वीर्याचा नाश होत नाहीं, तरी प्रदराच्या विकाराचा परिणामही त्यांना त्याचप्रमाणें होतो. पुरुषांपेक्षां स्त्रियांवरच्या मज्जातंतूवर त्या नाजुक असल्यामुळें लवकर परिणाम होतो व त्यामुळें हिस्टेरीया वगैरे त्यांना विकार होतात. असो. वरील वर्णनांवरून साधारणपणें या तारुण्यांतील घातुक संवयीचे परिणाम स्त्रीपुरुषांच्या भावी आयुष्यांवर कसें होतात हें सुज्ञांचे लक्षांत येईल. ही संवय लागली असतां त्यांतून मार्ग कसा काढावा हें आतां पाहूं.

---

सर्व प्रकारचे मेंदूचें विकारांवर जगविख्यात झालेलें

**सर्वांत पहिलें सांड्र ब्रदर्स यांचें**

# ब्राह्मी तेल.

वापरल्यानें मेंदू शांत राहून झोंप चांगली लागते आणि स्मरणशक्ति वाढते.

वा. किं. १८२ ट. ख. निराळा.

**दत्तात्रय कृष्ण सांड्र ब्रदर्स, मुंबई नं. २**

# प्रकरण १७ वें

—:०:—

## उपाय योजना.

मागील प्रकरणांत मुष्टिमैथुन म्हणजे काय, त्यापासून शरीर प्रकृतीवर अपाय कसा होतो, याचें विवरण केलेंच आहे. हा रोग तरुण लोकांत फार फैलावत असल्यामुळें या रोगाचें वर्णन मुद्दाम जास्त देण्यांत आलें. ज्याला ही वाईट संवय जडलेली आहे, व जो या वाईट संवयीचे परिणाम भोगत आहे, त्याला या मार्गापासून प्रवृत्त करणें फारच कठिण आहे; परंतु रोग झाल्यानंतर त्यावर औषध घेत बसण्यापेक्षां रोग मुळांतच न होईल, या विकारांची संवय मुळींच जडणार नाहीं यासंबंधीं कशा प्रकारचें शिक्षण दिलें पाहिजे, याचा विचार आतां करूं.

बालपणापासून आपलीं मुलें चांगलीं आहेत असें धरून न चालतां लंहानपणापासून त्यांना चांगली शिस्त कशी लागेल इकडे लक्ष पुरवलें पाहिजे. वाईट संगत, त्याचप्रमाणें दुर्व्यसनी नोकरचाकर यांपासून त्यांना अलिप्त ठेवलें पाहिजे. कांहीं मुलांना इंद्रियांना हात लावण्याची संवय असते. जे सुज्ञ आईबाप असतात त्यांच्या लक्षांत येतांक्षणींच तावडतोब ते मुलांना रागें भरून, त्यांचें लक्ष दुसरीकडे वळवून त्या संवयीपासून त्यांना परावृत्त करीत असतात; परंतु आजच्या शहरांत रहाणाऱ्या तरुण स्त्री पुरुषांना हें माहिती नसतें. लहान मुलांना लघ्वीमधून खर जाते, व ही खर जाते त्यावेळीं मुलाला एक प्रकारची संज्ञा होत असते; हा विकार दृष्टोत्पत्तीस आल्यानंतर मुलांचें गोड, तिखट, मसालेदार खाणें व चहा तावडतोब बंद करून, त्याला नुसता दूध व भात खाण्यास द्यावा. शौचाला साफ होत नसेल तर एरंडेल द्यावें. मुलगा वयांत येईल त्यावेळीं इंद्रियांचीं कार्यें काय, त्यांच्या फाजील उपयोगामुळें शरिरांवर काय परिणाम होतो, याची जाणीव वेळींच करून दिली पाहिजे. आईबापांनीं या विषयांचें शिक्षण दिलें पाहिजे असें लेखकानें ओघानें म्हटलें खरें, परंतु प्रत्येकाचे आईबाप वैद्य अगर डॉक्टर नसतात; शिवाय शारिरीक इंद्रियाचें ज्ञान

समजून सांगणें आपल्या इकडे अश्लील समजलें जातें, शिवाय आपल्या दयाळू सरकाराने या प्रश्नाकडे लक्ष दिलेलें नाहीं. बरें लक्ष देण्याची जरुरी त्यांना काय? जितकी प्रजा दुर्बल असेल तितकी राजाची सत्ता अबाधित राहते. प्रत्येक स्त्रीपुरुष तारुण्यांत आला, म्हणजे निसर्गाच्या नियमाप्रमाणें जे कांहीं परिणाम व्हावयाचे असतात ते होत असतात; हे कां होतात यापासून फायदा कीं तोटा आहे, याचा विचार कोणी करीत नाहीं व हा विचार ज्यावेळीं मनांत येतो, त्यावेळीं, वैद्य व डॉक्टर हे कांहीं करूं शकत नाहींत, कारण आपल्याला असें होत आहे, हें सांगण्याची लाज वाटते; परंतु ही लज्जा केव्हांतरी सोडल्याशिवाय रहावत नाहीं; ज्या पुरुषांना नूतनच संवय लागली आहे, त्यांना ही संवय सोडणें आरंभीं सोपें जाईल.

हा विकार ज्या तरुणाला झालेला आहे. तो विकार अगोदर सुज्ञ वैद्य डॉक्टर यांच्या सल्ल्यानें बरा करणें हा प्रथम मार्ग होय. ज्या लहान मुलांना ही संवय नवीनच जडलेली आढळून येईल त्यांच्या मनांवर या संवयीचे भयंकर परिणाम होतात. त्यांना नानाप्रकारची चित्रें दाखवून व बोधपर गोष्टी सांगून मनांवर परिणाम करून त्यांचें मन निराळ्या विषयांत अगर कामांत गुंतवावें; काम इतकें पाहिजे कीं, त्याला त्या संवयीचा विसर पडावा व शरिराला थकवा यावा; थकवा आल्यानंतर झोंप येण्यास वेळ लागत नाहीं. काम अंग मेहनतीचेंच असावें. विश्वासु, वृद्ध, अशा माणसांची अशा प्रकारच्या संवयी असणाऱ्यांवर सारखी नजर असली पाहिजे. एका वेड्याच्या हॉस्पिटलमध्यें काम करणाऱ्या डॉक्टरनीं, ही संवय असलेल्या कांहीं वेड्यामध्यें, इंद्रियांच्या अंतःत्वचेला तार अडकवून ठेविली होती यामुळें पुष्कळ वेड्यांची ही घातुक संवय मोडली. परंतु हें कितपत शक्य आहे हें अनुभवानें ठरलें पाहिजे.

स्त्रियांमध्यें क्लीटोरीज (योनीच्यावर असलेला ग्रंथीयुक्त भाग) वर कॅरबॉलीक अॅसिडासारख्या दाहक औषधाचा १–१ थेंब लावले असतां, संवयी मोडल्याचीं उदाहरणें आहेत. ही वाईट संवय ज्याला जडलेली आहे, त्याला मागील प्रकरणांत लिहिलेल्या वर्णनावरून याचे परिणाम कळून येतील. याकामीं प्रत्येकानें स्वतःच विचार करून मार्ग आंखला पाहिजे. ह्या संवयी एकदम टाकणें अशक्य खरें; परंतु खालील प्रकारच्या गोष्टींचा मार्ग अवलंब केल्यास थोडेंबहुत यश आल्याशिवाय रहाणार नाहीं.

( १ ) ही संवय मी आजपासून सोडणार अशी शपथ मातापिता, कुलदेवता, अगर गुरु, यांची घ्यावी.

( २ ) संवय सोडतांना आजचा दिवस नको, उद्यां सोडूं असा विचार न करतां ताबडतोब त्या घटकेस विचार करून शपथ घ्यावी, कारण उद्यांचा दिवस कधींही संपावयाचा नाहीं.

( ३ ) आपल्याला सुधारलें पाहिजे, अशा प्रकारची टोंचणी सारखी मनांवर असूं द्यावी. वाईट विचारांना अवसर देऊं नये. मनांत पापी विचार आला व हातांतून जरी तो घडला नाहीं, तरी त्या विचारांचा परिणाम शरिरावर झाल्याशिवाय रहात नाहीं.

( ४ ) वाईट विचार मनांत येऊं लागले, म्हणजे ताबडतोब ते विचार चांगल्या मार्गाकडे वळतील, अशाकरितां नीतिपर पुस्तकें, पोथी, महाभारत, रामायण, अशा प्रकारच्या ग्रंथाकडे दृष्टी वळवावीं व त्यांचें मनन करावें.

( ५ ) एकांतवासांत कधींही बसूं नये. नेहमीं मंडळींत असावें, अगर कांहींना कांहीं कामांत असावें. एकांतवास असल्यास संवयीचा मोह पुनः जडण्याचा संभव असतो,

( ६ ) ब्रह्मचर्य कसें पाळावें, यासंबंधींची माहिती त्यासंबंधींची पुस्तकें विद्यार्थीधर्म वगैरे पुस्तकांत सांगितलेली आहे त्याप्रमाणें आचरण्याचा प्रयत्न करावा.

( ७ ) मन मोहांत न सांपडेल अशा प्रकारची वागणूक ठेवावी व त्यासंबंधीं त्या दयाघन प्रभूची अहर्निश प्रार्थना व चिंतन करीत असावें.

( ८ ) महात्मा गांधीं यानीं या विषयावर फारच सुंदर इंग्रजींत एक पुस्तक लिहिलें आहे तें अवश्य वाचावें; वर सांगितलेल्या नियमावर विश्वास ठेवावा व त्याप्रमाणें वागणूक ठेवण्याचा प्रयत्न करावा.

या संवयीपासून मुक्त होणें, हें त्या त्या व्यक्तिच्या नैतिक व मानसिक आचरणांवर अवलंबून आहे. अशा संवयीनें पछाडलेला मनुष्य नेहमीं दुर्मुख, कंटाळलेला, चंचल, कशाचीही आवड नसणारा व मनावरील ताबा गेलेला असतो. तेव्हां अशा तऱ्हेच्या वृत्तिपासून त्याचें परावर्तन केलें पाहिजे. त्याच्याशीं गोड बोलून त्याचें मन रंजन केलें पाहिजे, उत्साह उत्पन्न केला पाहिजे. अशा

व्यक्तिचा मेंदु नेहमीं विचारानें भरलेला असल्यामुळें त्याला एखाद्या विषयाची एकाग्रता होणें आरंभीं फारच कठिण जातें; ज्यांना एकाग्रता करतां येत नाहीं, अशांना १ ते २ तास, शिवलीलामृत, व्यंकटेशस्तोत्रासारख्या ईशलिलात्मक ग्रंथाचें अध्याय वाचण्यास सांगावेत.

पोथ्या, पुस्तकें वांचणें व त्यांत कालक्षेप करणें, यांत कांहीं अर्थ नाहीं, अशाप्रकारचे कांहीं सुशिक्षीत लोकांचे विचार आहेत; ज्याला ज्यांतील तत्व माहिती नाहीं, अशाचें समाधान करणें काम कठिण आहे; परंतु थोडक्यांत एवढें ह्मणतां येईल कीं, या मार्गावर विश्वास न ठेवणारांनीं रोज नियमानें निदान १ अध्याय कोणच्याही धार्मिक ग्रंथाचा वाचायचा नियम करावा. कालांतरानें त्याचें रहस्य ज्याचें त्याला कळून येईल. आपलें मन कधींही स्वस्थ नसतें, त्याला विसावा झोपेंत मिळेल तेवढाच, परंतु त्यांतही, कांहीं बडबडे लोक आपल्याला आढळतात. मनाला शांती आणणारें, एकाग्रता करणारे, ईशभक्ती शिवाय दुसरें साधन नाहीं. ईशभक्तिनें मन, बुद्धि, शरिर हें सुधारतें, दुसऱ्यांची दुःखें काय आहेत, हें आपल्याला कळतें व समाधान ही चीज काय आहे, सौख्य आपल्या-जवळ कसें बसलेलें आहे याची जाणीव होते.

व्यायाम करावा. व्यायामामुळें रुधिराभिसरण वाढतें. व्यायामांत नमस्कार येतात. सूर्याला नमस्कार घालणें, हें अगदीं सोपें आहे; त्याच्याकरितां लांब जावयास नको. रुधिराभिसरण वाढलें म्हणजे, एखाद्या भागांतील रक्ताधिक्यही कमी होतें. रक्ताधिक्य ज्या भागांत होतें त्या भागांतील मज्जातंतूची चेतना वाढते, व हेंच कमी झालें ह्मणजे चेतना कमी होते. मोकळया हवेंत लांब फिरत जाणें, डंबेल्स फिरवणें, होडींत बसून वल्हीं फिरवणें, हे व्यायाम चांगलें आहेत. व्यायाम थकवा येईल इतका करूं नये. चालतांना, व्यायाम घेतांना, जोडीची मित्रमंडळी असली तर मनही रंजतें व व्यायामाचा बोजाही वाटत नाहीं व एक प्रकारें मजेंत काल जाण्यास मदत होते.

अन्नासंबंधीं मागें वर्णन आलेलेंच आहे. परंतु थोडक्यांत पुनः एकदां सांगत आहे.

( १ ) पोटांत ताण बसेल एवढें जेऊं नयें. जड अन्न असेल, व भूक नसेल तर एकवेळ लंघन करावें. ज्यांचें तोंड स्वाधीन नाहीं, त्याला ब्रह्मचर्यही पाळणें कठीण आहे. जास्त खाणाऱ्या लोकांमध्यें स्वप्नावस्था हा विकार फार

आढळतो व होतो. नेहमीं दोन वेळां नियमीत जेवावें. अन्न साधें असावें. तें फार तेल व मसालेयुक्त नसावें. अन्न न पचल्यास, आंबट ढेंकर येतात, झोंप नाहींशी होते व वीर्यपात वारंवार रात्रींतून पुष्कळ वेळां होण्याचा संभव असतो. **भरल्या पोटावर निजूं नये** अशी जी आपल्यांत म्हण पडलेली आहे तिचा हाच उद्देश हें वाचकांच्या ध्यानांत येईल.

निरोगी माणसांना झोंप ७ ते ९ तास पुरेशी असते. लवकर झोंपावें व पहांटेस उठावें. पहांटेस उठण्याची संवय नसणाराला आरंभीं त्रास वाटेल खरा; परंतु संवय झाली म्हणजे त्याचें महत्व आपल्याला कळून येतें. झोंप जर अपुरी झालेली असेल तर जेवणापूर्वी अर्धा तास थोडी झोंप घ्यावी. जेवल्यानंतर ताबडतोब झोंपूं नये. आयुर्वेदानें शतपावली करावी असें सांगितलें आहे. झोंपतांना, प्रथम उजव्या कुशीला नंतर डाव्या कुशीला निजून आठ श्वास घ्यावें, त्याचप्रमाणें प्रत्येक बाजूला घ्यावेत, व नंतर झोंपी जावें, असें सांगितलें आहे. सुज्ञांनीं मुद्दाम वाग्भट, योगरत्नाकरामधील, दिनचर्या हें प्रकरण अवश्य वाचावें, व तें आजच्या काळाला किती अनुरूप आहे हें ताडून घ्यावें. झोंपण्यापूर्वी, लघ्वीला जाऊन यावें. मूत्राशय भरलेला असल्यास लघ्वीच्या दाबामुळें वीर्यपात होण्याचा संभव असतो. झोंपतांना पोटांवर निजूं नये. प्रथम डाव्या कुशीवर व नंतर उजव्या कुशीवर निजल्यामुळें अन्नाचें पचन होण्यास, त्याप्रमाणें अधोगतवायु आंतड्यांत जाण्यास प्रतिबंध होत नाहीं.

शिवरीच्या कापसाच्या गाद्या व उशा झोपावयास कधींही घेऊं नयेत. मऊ उशीमुळें डोकें गरम होतें, त्याचप्रमाणें मऊ गादीमुळें. इतर भागांनाही उष्णता वाढते, उष्णता वाढली म्हणजे परिणाम ठरलेलाच.

सकाळीं रोज स्नान करावें. स्नान चांगलें अंग चोळून चोळून करावें. थंड पाण्याचें स्नान चांगलें; परंतु ज्यांना आरंभापासून ऊन पाण्याची संवय आहे, अशा लोकांनीं थंड पाण्याचें स्नान एकदम सुरू केल्यास डोकें दुखतें सर्दी होते, याकरितां हळुहळु थंड पाण्याची संवय करावी. स्नानामुळें इंद्रियें उत्तेजित होतात, घाण बाहेर जाण्यास मदत होते व हुशारी वाटते. ताप, अजीर्ण, संग्रहणी असलेल्या लोकांनीं स्नान करूं नये.

मलावरोध टाळावा. शौचाला साफ होत नसेल तर एनीमा घ्यावा, अगर त्रिफळाचूर्ण रात्रीं झोपतांना गरम पाण्यांतून पावलीभार घ्यावें. गरम दुध

झोपतांना घेतल्यास शौचाला साफ होतें. रात्रीं झोपतांना १ तांब्या पाणी भरून चांगलें गाळून ठेवावें, व तें पाणी पहाटेंस जेवढें पिता येईल तेवढें प्यावें. त्यानें शौचाला साफ होतें. पोटावरून हात फिरवावा म्हणजे आंतड्याची गति वाढून मळ बाहेर पडण्यास मदत होते.

जाहिरातींतील कामोद्दीपक उत्तेजक औषधें वाचून त्यांच्या मागें न लागता, चांगल्या वैद्याचा अगर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. या विकारावर औषधेंही सांगतां आलीं असतीं, परंतु अशा प्रकारचे रोगी नेहमीं डॉक्टर अगर वैद्य यांच्या देखरेखीखालीं पाहिजेत; याकरितां चिकित्सा मुद्दाम टाळली आहे; परंतु आरंभीं दिलेल्या माहितीचा उपयोग करून त्याप्रमाणें वर्तणूक करण्याचा प्रयत्न जरी केला तरी पुष्कळांशीं तो विकार कमी होण्यास मदत होईल.

---


# लहानमुलांकरितां औषधें.

| | | |
|---|---|---|
| **अरविंदासव**—रिकेटस् मुडदुस, अशक्तता यांवर २। तोळे | | १—४—० |
| **कुमारी आसव**—यकृत, खोकला, छातीचे विकार यांवर | ,, | ०—१२—० |
| **बालकडू**—जन्मल्यापासून देण्यांस योग्य ... | ,, | ०—४—० |
| **बाळघुटि** ... ... ... | बाटली किंमत | ०—४—० |
| **बाळगोळी** ... ... ... ... | ,, | ०—४—० |
| **बालजीवन**—ताकद वाढवण्याकरितां ... | ,, | ०—१२—० |
| **द्राक्षासव** ... ... ... ... | ... | ०—१४—० |
| **चालार्क**—कृमींवर ... ... ... | ... | १—०—० |
| **कृमी काढा** ... ... ... ... | ... | ०—१४—० |

**दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स, मुंबई नं. २**

# प्रकरण १८ वें.

—:o:—

## तारुण्यांतील वागणूक.

तारुण्य हा प्रत्येकाच्या आयुष्यांत क्रांति करणारा काळ असतो. मनुष्य तारुण्यांत येऊं लागला म्हणजे त्याच्या स्वभावामध्यें फेरबदल होतो व खालीलप्रमाणें लक्षणें दृगोचर होत असतात. तारुण्याला सुरवात साधारणपणें ६ वर्षांपासून होते. खांदे रुंद होतात, आवाज बदलतो, उंची, वजन वाढतें हनुवटी, दाढी यांवर केंस येऊं लागतात. हे जे इंद्रिय विज्ञान शास्त्रदृष्ट्या फरक होतात त्याचा शरिरांवर केवढा तरी परिणाम होतो. जननेंद्रियांची वाढ होते, व मनोविकार जागृत होऊं लागतात. ज्यांचें आयुष्य ब्रह्मचर्यांत गेलें आहे, ज्याला मुष्टिमैथुनादिक वाईट संवयी लागलेल्या नाहींत, अशा व्यक्तिचे तरुणांचे विकार एकाएकीं प्रकोप होत नाहींत. तारुण्याला सुरुवात झाली, वय १६–१७ वर्षांचें झालें, म्हणजे हिंदुस्थानांतील आईबाप मुलगा लग्नाला लायक झाला असें समजतात; व केव्हां एकदां बाळ्याचें लग्न होऊन आपल्याला नातवंडें होतील अशा प्रकारची इच्छा बाळगित असतात. २१ व्या वर्षीं, साधारणपणें इंद्रियांची वाढ होते. यापूर्वी लग्न होऊन जर मुलें झालीं तर शरिर प्रकृतीनें तीं सुदृढ असत नाहींत. त्यांना कांहींना कांहीं तरी विकार जडलेला असतोच; तारुण्याला आपल्या इकडे गाढवपंचविशी ह्मणण्याची रीत पडलेली आहे; व विचारकरतां ती खरोखरच सार्थ आहे.

तारुण्यामध्यें पैसा हातांत असला, मित्रमंडळी व्यसनी भेटली म्हणजे नानाप्रकारचे ढंग सुचतात. अकालीं वीर्यस्राव करण्याची संवय लागते. उथळ पाण्याला खळखळ फार, या ह्मणीप्रमाणें, ज्याला स्त्रीसंयोगाची संवय लागली त्याची ताकद कमी होते; मज्जातंतू शिथील होतात, वीर्य क्षीण होते व त्यामुळें कामेच्छा फार वाढते. मनुष्य २१ वर्षांचा झाला ह्मणजे मनोविकार परिस्थितीच्या मानानें जागृत होत असतात; परंतु हे विकार ब्रह्मचर्य पाळणाराला ताब्यांत ठेवतां येतात. हे विकार जागृत झाले म्हणजे मनुष्य बेफाम होतो, त्याला

कांहीं सुचेनासें होतें. एकदां वाईट संगत लागली, म्हणजे वेश्यागमनाच्या मार्गाकडे प्रवृत्ति होऊन उपदंश, पूप्रमेह या विकारांची पैदास होते. स्त्रियांमध्यें-सुद्धां तारुण्यांत मनोवृत्ति जागृत होते, व त्यांना हिस्टेरियासारखे विकार सुरू होतात. ज्या मुलांना आरंभापासून **गृहशिक्षण** चांगलें आहे, अशीं मुलें सहसा वाईट मार्गांत जात नाहींत, कारण मनावर शिक्षणाचा परिणाम झालेला असतो, व आईबाप कसें वागतात याचे उदाहरण डोळ्यांसमोर रहातें. तारुण्यांत निदान १८ ते २५ वर्षांपर्यंत वडिल माणसांच्या देखरेखालीं प्रत्येक तरुण स्त्री पुरुष पाहिजे व त्यांच्या प्रत्येक कृतीकडे वडील माणसांनीं बारकाईनें लक्ष दिलें पाहिजे, कारण या वयांत वांकडे पाऊल पडण्याचा संभव असतो. ज्या मुलाला अपशब्द, शिव्या, देण्यांची संवय जन्मांपासून लागलेली आहे, तें बाद कोणच्या गुणांचें होणार हें सांगावयास नकोच. तारुण्यांमध्यें ईश्वरविषयक भक्ति भावाचा विशेष उपयोग होतो. अलिकडच्या काळांत ईश्वराची भक्ति करणे म्हणजे कालक्षेप करणें अशी पुष्कळांची समजूत झालेली आहे; शिवाय पाश्चात्य शिक्षणामुळें ईश्वरावरील निष्ठा नाहींशीं होऊन, यानें काय होणार आहे, अशा नाना प्रकारच्या शंकाकुशंकांनीं धर्मविषयक बाब म्हणजे थट्टेचा विषय झालेला आहे. धर्माच्या बाबतींत सैलपणा आमच्याच देशांत झालेला नसून तसा पाश्चात्य देशांतही झालेला आहे पैसा मिळविणें, खाणे, पिणें व मौज मारणें, या पलिकडे कोणाला कांहीं सुचत नाहीं. धर्माचें आसन डळमळलें आहें; म्हणून नानाप्रकारचीं संकटें आपल्यावर येत आहेत. ज्यांचें धर्माचें आसन स्थिर आहे, तो वाटेल तें संकट आलें तरी डगमगत नाहीं असा अनुभव आहे. एका नामांकित डॉक्टरचें असें म्हणणें आहे कीं, Of all helps which can be obtained, religious influences, through the sabbath school, Church, etc. are the greatest. आपल्याकडे चातुर्मासांत तरी निदान धार्मिक श्रद्धा विशेष आढळून येतें व या मासांत कथा, किर्तनें, वगैरे ऐकणारे पुष्कळ आढळतात. त्यांपासून काय फायदा होतो, मनाला शांति कशी मिळतें, तेवढ्यापुरतें सुखदुःख मनुष्य कसा विसरतो, हें अनुभवाशिवाय कळणें शक्य नाहीं. धार्मिक मनुष्याच्या हातून सहसा वाईट काम होत नाहीं. तो पापभिरु असतो, ईश्वर आपलें प्रत्येक कृत्य पाहत आहे अशी त्याला जाणिव असते व यामुळें त्याच्या मनाल

एक प्रकारचें बंधन असतें. पैसा आहे, परंतु जर धर्म नाहीं तर त्याला समाधान कधींही प्राप्त होत नाहीं.

तारुण्यांत मनोविकार जागृत होऊं लागलें, म्हणजे तरुण स्त्रियांकडे साहजिकच पहाण्याची प्रवृत्ति होते. इंग्रजी शिक्षण घेत असलेल्या मुली साधारणतः १४ वर्षांवरच्या असतात. हिंदुस्थानासारख्या उष्णदेशांत ऋतुस्राव लवकर सुरू होतो. त्यावेळीं स्त्रियांमध्यें मनोविकार जागृत होत असतात. आईबापांनीं अशा प्रसंगीं मुलींवर कडक लक्ष ठेविलें पाहिजे. शाळेंत जाणाऱ्या मुलांमुलींच्या शाळा जवळजवळ असतात, नेहमीं ठराविक गाडीला ठराविक वेळेला एकमेकांची गांठ पडण्याचा संभव असतो. दोघेही तरुण असतात, फॅशनला बळी पडणारी मुलगी, नेहमीं दर दिवशीं निरनिराळीं पातळें नेसत असते, कांहीं पातळें इतकीं पारदर्शक असतात कीं तिचें सर्वांग दिसण्याचाही संभव असतो. तारुण्यांत तरुण स्त्री पुरुषांचे विचार चंचल असतात, त्यांना मागचा पुढचा विचार नसतो, चटोर कादंबऱ्यांचें व्यसन लागतें, कादंबरीप्रमाणें नायक व नायिका बनून, प्रेमाचा स्वाद एकदां तरी घ्यावा, अशाप्रकारचे विचार मनांत येत असतात. हे विचार येऊं नयेत ह्मणून जरी प्रयत्न केला तरी सहसा ते मनांतून जात नाहींत तारुण्याचा काळ फार प्रखर असतो. या काळांत आई–बापांनीं आपल्या मुलींचें कोड नानाप्रकारच्या फॅशनच्या कपड्यांनीं, पावडर्सनीं, पुरविणें अत्यंत घातुक आहे. अशाप्रकारच्या संवयीनेंच, पुष्कळ तरुण स्त्री पुरुषांचा अधःपात झालेला आहे. आईबाप आपला मुलगा व मुलगी शाळेंत जाऊन शिक्षण घेत आहे असें समजत असतात. फार काय, पुष्कळशा मुलींना त्यांच्या स्वतःच्या अभ्यासाचीं पुस्तकें आणणें जड वाटतें व तें काम एखाद्या रामाकडे ( गड्याकडे ) सोपवलेलें असतें. इतका नाजुकपणा एवढ्या वयांत कांहीं सुशिक्षित आईबाप आपल्या मुलीला शिकवीत असतात. जिला आपली स्वतःची २।४ पुस्तकें जड वाटतात, ती आपला संसार तो काय करणार व गृहिणी पदाला काय लायक होणार ! पतीला मदत करण्याची अलीकडील सुशिक्षित स्त्रियांची भावना बदललेली आहे. तात्पर्य काय, तरुण स्त्री पुरुषांनीं नेहमीं साधा, चटोर नसणारा आपल्याकडे कोणाची दृष्टी न जाईल असा पोषाख करावा, ह्मणजे वांकडें पाऊल पडण्याला त्याचप्रमाणें मनोविकार उद्दीपन होण्याला वाव मिळणार नाहीं.

तारुण्यांत शर्यत, जुगार वगैरेचें व्यसन लागतें; इतर लोकांना पैसे मिळतात, हे पाहून मोह उत्पन्न होतो, तेव्हां यांपासून सावध रहावें.

ज्यांना आपले मनोविकार ताब्यांत ठेवतां येत नाहींत त्यांनीं लग्न करणें-चांगलें. लग्न करण्याची घाई करूं नये; घाई केल्यानें पश्चात्ताप झाल्याशिवाय रहाणार नाहीं. लग्न करताना खालील गोष्टी लक्षांत ठेवाव्यात.

( १ ) लग्न करतांना आपण स्वतः कसे आहोंत याचा विचार केला पाहिजे. प्रामाणिकपण, कोणच्याही कामाबद्दल आवड, शुद्ध विचार, चांगली वागणूक व समाजामध्यें आपल्याला मान मिळेल अशाप्रकारची वर्तणूक ज्यांची असेल, त्याला लग्न करण्यास हरकत नाहीं.

( २ ) आपलें वर्तन चांगलें रहावें अशी इच्छा बाळगणाराला उंची, फॅशनेबल कपड्यांची जरूरी नाहीं. कपड्यावरून मनुष्याचा स्वभाव ठरत नाहीं. साधे कपडे, साधी रहाणी, धर्मावर विश्वास, खरें बोलणें, इतरांबद्दल प्रेम आदर बाळगणें, ह्या गोष्टी समाजात मान मिळण्यास कारणीभूत होतात.

( ३ ) ज्या मुलीला फॅशनची नाटकें, सिनेमा पहाण्याची चटक लागलेली आहे, जिला स्वतःच्या सौंदर्याचा अभिमान आहे. अशा मुलींशीं विवाह न करणें चांगलें. अशा मुली नैतिक व शारिरीक दृष्ट्या कमी दर्जाच्या ठरतात. पुष्कळ लोकांची अशी समजूत असते कीं, एखाद्या मुलीशीं संबंध करणें, ह्मणजे बाजारांतील वस्तु विकत घेणें, अशी त्यांची भावना असते. यामुळें मुलीच्या स्वरूपांकडे तिच्या घराण्यांतील वागणुकीकडे लक्ष न देतां, पैशांचें पाठबळ किती आहे यांवर मुलीची परिक्षा होत असते. त्याचप्रमाणें मुलीचे आई-बाप, एखादा इंग्लंडचा पदवीधर असला व तो कितीही व्यसनाधीन असला तरी कर्ज काढून वाटेल तो हुंडा देऊन अशाच्या पदरीं स्वतःची मुलगी बांधण्यास कमी करीत नाहींत. असे विवाह झाल्यास लग्न करणारे बाजूला रहातात, व पतीपत्नींना जन्मभर दुःखात काळ काढावा लागतो. लग्नाचा उद्देश आपल्या मनुस्मृति-कारांच्या मताप्रमाणें वंशाची वाढ करण्याकरितां व गृहस्थाश्रमांचीं कार्यें अबाधित चालण्याकरितां लग्नाची जरूरी आहे. गृहस्थाश्रमांसारखा श्रेष्ठ आश्रम दुसरा कोणचाच नाहीं. ह्याच आश्रमांमध्यें सर्वांचे आदरातिथ्य करतां येतें, परस्परांना मदत करतां येतें. परंतु अलिकडे लग्न हा थट्टेचा विषय झालेला आहे. लग्न झालें

म्हणजे ब्रह्मचर्य पाळण्याची जरूरी नाहीं अशी प्रत्येक तरुणांची प्रामाणिक समजूत झालेली असते. वयांत आल्यावर स्त्रियांमध्यें मनोविकार जागृत होतात, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी समागम करण्यासंबंधीं आपल्या शास्त्रकारांनीं नियम सांगितलें आहेत, त्या नियमानुसार वर्तन केलें पाहिजे. ऊंस गोड लागला, म्हणून मुळांसहित खाण्याचा प्रयत्न केला म्हणजे तोंडांत माती जाण्याची ज्याप्रमाणें पाळी येतें, त्याचप्रमाणें तरुण स्त्रीपुरुषांनीं जर मनावर ताबा ठेवला नाहीं, तर परस्परांच्या प्रकृतीवर परिणाम होतो, व तो दोघांनाही जाचल्याशिवाय रहात नाहीं. तेव्हां प्रत्येक तरुण पुरुषानें मनोविकारांवर ताबा ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आरंभीं आरंभीं हें कठीण जाईल, परंतु त्याचा इष्ट फायदा कालांतरानें कळून येईल. पशुतुल्य वर्तन करणें अत्यंत वाईट आहे. ज्याचे मनोविकार ताब्यांत रहात नाहींत, त्यांना आपण पशूचें उदाहरण देतो; परंतु खरोखर आपली ही चूक आहे. गाय, बैल वगैरे पशुंकडे आपण पाहिलें, तर संयोग झाल्यानंतर कोणीही पुनः तिकडे ढुंकून पहात नाहीं, ही गोष्ट मानवी प्राणी अमलांत कितपत आणतो याचा विचार प्रत्येकानें करावा. धर्मेच, अर्थेच, कामेच, म्हणून लग्नांत आपले पुरोहित, सप्तपदीच्या वेळीं परस्परांकडून शपथ घेत असतात ही शपथ पाळण्यास अगर त्याप्रमाणें वर्तन करण्यास दोघेही तरुण स्त्री पुरुष मनानें सुसंस्कृत पाहिजेत, हें आपोआपच सिद्ध होतें; परंतु याप्रमाणें वागणारी किती जोडपीं आपल्याला आढळतील ? ' कामेच ' म्हणून जो नियम आहे, तेवढा मात्र तंतोतंत पाळणारे आपल्याला पुष्कळ आढळतील. याचा बारकाईनें विचार केला म्हणजे असें आढळून येतें कीं आपली सर्व समाज रचनाच बिघडलेली आहे; ही ज्यावेळीं सुधारेल, त्याचवेळीं तरुण स्त्री पुरुषांना सौख्याचा खरा मार्ग आढळून येईल.

महाराष्ट्रांतील उच्च दर्जाचीं देशी औषधें
तयार करणारा कारखाना
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
कारखाना, चेंबूर जि. ठाणें,
दुकान—ठाकुरद्वार, मुंबई नं. २

# प्रकरण १९ वें

## वृद्धावस्था.

कोणतीही व्यक्ति यौवनावस्थेंत आली म्हणजे स्वभावांत, कृतिंत फरक पडतो, त्याचप्रमाणें वृद्धावस्थेची गोष्ट आहे. वृद्ध कोणाला म्हणावें हें प्रथमत: ठरवणें कठीण आहे. साधारणपणें आपल्या इकडे अदमासें ५० वर्षांचें वय झालें म्हणजे वृद्धावस्थेची लक्षणें सुरू झालीं असें समजण्याची रीत आहे. आजकालच्या तरुणांकडे पाहिलें तर म्हातारपणाचीं चिन्हें ३०–३५ वर्षांच्या आंतच दिसूं लागतात, व ही म्हातारकळा लपावी म्हणूनच फॅशन म्हणून मिशा काढीत असतात. वृद्धावस्था लवकर येणें, हें आनुवंशिक व त्याचप्रमाणें आपल्या वागणुकींवर अवलंबून असतें. मनुष्य म्हातारा झाला म्हणजे इंद्रियें हळुहळु आपलीं कामें करण्यास निर्बल होतात. निसर्गाच्या नियमानुसार ज्यानें आपला काळ घालविलेला असतो, त्यांची जिवनशक्ति मजबूत असते व त्यामुळें हा काळ त्याला सुखानें घालवतां येतो. एखाद्या श्रीमंताचा मुलगा तारुण्यांत पैसा पुष्कळ हातांतीं असला म्हणजे चैनींत व नानाप्रकारच्या व्यसनांत काळ घालवतो व शेवटीं पैसा खलास झाला म्हणजे हीनस्थिति प्राप्त होऊन दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावें लागते; त्याचप्रमाणें, वृद्धावस्थेंतील गोष्ट आहे. आपल्या इंद्रियांचा फाजील उपयोग, नानाप्रकारची व्यसनें, उत्तेजक खाणें वगैरे गोष्टी तारुण्यांत ज्यानें नियमीत प्रमाणांत पाळलेल्या नसतात, अशांचा हा म्हातारपणांचा काळ दु:खाचा गेला तर त्यांत मोठेसें नवल नाहीं. म्हातारपणांत प्रत्येकजण सुख दु:ख वगैरे परिस्थितींतून गेलेला असल्यामुळें, सूज्ञ व अनुभवी झालेला असतो. त्याला आपली शरिराची स्थिती कशी आहे, हें समजत असतें व त्याप्रमाणें तो आपली वागणूक ठेवीत असतो. मनुष्य वृद्ध झाला म्हणजे त्याला समाजामध्यें मान मिळतोच; परंतु नुसतें म्हातारपण प्राप्त होऊन भागत नाहीं. वृद्धावस्था म्हटली म्हणजे सर्व इच्छा पुऱ्या झालेल्या असतात, मनांवर ताबा असतो व विषयवासना ही कमी झालेली असते विषयसेवन जास्त करण्यानें मानसिक व शारिरीक असा दुहेरी परिणाम, प्रकृतीवर होतो. म्हातारपणांत जीवनशक्तिचा क्षय जितका

कमी होईल, तितका करण्यांचा प्रयत्न केला पाहिजे. इंद्रियविज्ञान शास्त्रदृष्ट्या अशा वयांत तरुण मुलींशीं, त्याचप्रमाणें मोठ्या मुलींनीं तरुणांशीं विवाह करणें अत्यंत घातुक आहे. अशा प्रकारच्या लग्नांचे दुष्परिणाम झालेले आढळतात. म्हातारपणांत विषयवासना असली तरी तरुण स्त्रीशीं तुलना केली असतां ती अगदीं कमी असतें असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. शिवाय अशा तऱ्हेचें लग्न करणारे वृद्ध वर वहुतेक बायकांचे गुलाम बनून ती नाचवील त्याप्रमाणें यांची वागण्याची तयारी असते. मनांत इच्छा नसतांनासुद्धां, उसनें प्रेम आणून तिचें कोड कसें पुरवतां येईल इकडे त्यांचे नेहमीं लक्ष असतें; इतकें करून ती परपुरुषांकडे जाईल कीं काय याची धास्ती असतेच. अशा वयांत स्त्रीसंयोगाचा परिणाम अत्यंत वाईट होतो. खरें पाहिलें असतां अशा तऱ्हेचीं लग्नें परस्परांना अहितकारक होतात. वयमानाप्रमाणें दोघांची वागणूक, स्वभाव यांत महदंतर असतें. तरुण पत्नी व एक जगांत अनुभव घेऊन इंद्रियें शिथील झालेला वृद्ध वर याचा हा सांधा जुळावा कसा ? परंतु हिंदुस्थानांत अशा तऱ्हेचीं लग्नें नेहमीं होत असतात व त्याचा इष्ट व अनिष्ट परिणाम आढळून येतो. पतीची सेवा करणें, मग तो पति कसाही असो, त्याला देव मानून आमरण त्याची सेवा करणें हें आपल्या स्त्रियांच्या हाडींमासीं खिळलेलें तत्व आहे. **गरीबी हें तत्त्व** या मुळाशीं असल्यामुळें जरठांचें व अल्पवयी कुमारिकांचे विवाह आपल्याकडे होत असतात. विवाह झाल्यानतर हें लोक वाइलवेडें बनून जातात, व त्यांची प्रत्येक कृति हास्यास्पद होऊन जाते; याकरितां अशा वयांत विवाह करणें चांगलें कीं वाईट हें ज्यानें त्यानें मनांशीं ठरवावें. वृद्धावस्थेंत मज्जातंतू शिथील झालेले असतात, रक्तवाहिन्या जाड झालेल्या असतात, व यामुळें अर्धांग वायुसारखा विकार केव्हां होईल याचा नेम नसतो. ज्यांची विषयवासना तृप्त झालेली नाहीं ( ही विषयवासना मुळांतच कृत्रिम असते ) अशा लोकांबद्दल प्रख्यात डॉ. गार्डनर म्हणतातः—

Each time that he allows himself this gratification is a pellet of earth thrown upon his Coffin.

अशांचे विवाह नेहमीं गरीब मुलींशीं होत असतात. कांहीं मुलींचे बाप इतके हलक्या मनाचे असतात, कीं एखादा संपत्तिवान नवरा पाहून ते आपल्या पोटच्या गोळ्याची किंमत बाजार भावाप्रमाणें वाढवित असतात. मुलींना हिंदु

समाजांत मत कांहींच नसल्यामुळें त्या दीन गाईप्रमाणें ज्याच्या हवालीं कराल त्यांच्याबरोबर रहाण्याची त्यांची तयारी असते. वृद्धावस्था ही स्थिती अत्यंत कठीण आहे; यावेळीं मुलांचे व वडिलांचे विकार पटणें अत्यंत कठीण असतें. वयामध्यें, परिस्थितीमध्यें अंतर असतें यामुळें वडिल माणसाचे अनुभवजन्य विचार असले तरी ते आरंभीं पटत नाहींत; यांत कोणांचा दोष नसतो. परिस्थिती व अनुभवाप्रमाणें विचारांत फरक पडत असतो हें कांहीं आईबापांनीं लक्षांत बाळगलें पाहिजे. मुलें आपले ऐकत नाहींत, त्यांना आपली पर्वा नाहीं आपल्याबद्दल आदर नाहीं, त्यांना प्रेम वाटत नाहीं, अशा तऱ्हेनें कमकुवत मनाचे आईबाप आपल्या मनाची समजूत करून घेत असतात; परंतु काल बदलत चालला आहे याकडे नजर टाकली व त्याप्रमाणें प्रत्येक आई-बापांनीं वर्तन ठेवलें म्हणजे मनाला त्रास न होतां, उरलेल्या आयुष्याचा काल सुखांत जातो: आज मुलें असतात, तींच पुढें आई-बाप झालीं, म्हणजे त्यांना आपण म्हणतों तें खरें कीं खोटें, हें आपोआप समजून येईल. अशा विचारानें जे आपलें वर्तन ठेवतात, त्यांना सौख्य मिळतें व मनाला विनाकारण त्रास होत नाहीं. तारुण्यांत ज्यांच्या हातून बाहेरख्यालीपणा, फाजील होऊन सर्वसाधारण आरोग्याच्या नियमांचें ज्याच्याकडून स्त्रीसंयोग, अतिक्रमण झालेलें असतें त्यांच्या प्रोस्टेट ग्रंथींचा दाह होतो, त्या मोठ्या होतात, यामुळें लघ्वी व शौचाचा नेहमीं त्रास होतो व म्हातारपणांतील काळ दुःखांत जातो. काम, क्रोध, लोभ मदादि षड्रिपु यांचें प्राबल्य या वयांत निसर्गाच्या नियमांप्रमाणें कमी झालें पाहिजे, परंतु यांच्या उलट आपल्याला स्थिती आढळून येते. म्हातारपणां जाणारा वडिलांचा काळ सुखांत जावा अशी प्रत्येक मुलाची इच्छा आपल्या आईबापाबद्दल असते, ही गोष्ट नाकबूल करून चालणार नाहीं. परंतु या सुखाची कल्पना प्रत्येक आईबापाची निराळी असूं शकेल. ज्यांनीं आपलें तरुणवय नानातऱ्हेच्या संकटाशीं परिस्थितीशीं, विसावा न घेतां घालविलें, त्यांना विश्रांति घेण्याचा काळ, परमात्म्यानें आणून दिला, तरी भोगणें हें ज्यांच्या त्यांच्या नशिबावर अवलंबून असतें. ऐन उमेदींत ज्याला विश्रांती घेतां आली नाहीं. त्याला ह्या वयांत विश्रांती घेणें दुःखदायक वाटतें. व विश्रांतीमध्यें सौख्य वाटत नाहीं. सुखाच्या कल्पना प्रत्येकाच्या निरनिराळ्या असतात व त्याप्रमाणें प्रत्येक व्यक्ति वागत असते. जें एकाच्या दृष्टीनें दुःख असेल, तें दुसऱ्याच्या दृष्टीनें सौख्य असूं शकेल. कोणचेंही काम परिस्थिती अनुरूप असतां ज्याला दुसऱ्यावर टाकतां येत नाहीं यावरून

त्या कामामध्यें त्याला सौख्य वाटत असलें पाहिजे हें सिद्ध होत नाहीं काय ? फार काय, अशा माणसांना कितीही सांगितलें तरी पटावयाचें नाहीं; व ती आपलें सोडावयाचे नाहींत; सौख्य नशिबीं नसल्यास सुखाचा मार्ग शोधून काढला अगर दाखवला तर नाहीं नाहीं त्या अडचणी मार्गांत येऊन उभ्या राहतील, तेव्हां हें असेंच चालावयाचें असें प्रत्येक तरुणानें समजून स्वस्थ रहाणें या पलिकडे दुसरा माग नाहीं. एकत्र कुटुंबपद्धति मोडल्यामुळें स्वतंत्र तऱ्हेनें राहणारीं कुटुंबें आपल्याला शहरांच्या ठिकाणीं आढळतात. ह्या कुटुंब पद्धतीमुळें जो तो आपणास स्वतंत्र समजत असतो. म्हातारपणांतील स्थिती लहान मुलांसारखी असते. मुलांची जोपासना ज्याप्रमाणें करावी लागते त्याचप्रमाणें या वयांत आपल्या आई-बापांची आपल्याला करावी लागते.

अलिकडच्या काळांत म्हातारी माणसें कमी पहावयास मिळतात. **ज्यांच्या कुटुंबांत आईबापांचे छत्र आहे त्यासारखा कोणी भाग्यवान् नाहीं.** वृद्धावस्थेंत लग्न करणाराची काय स्थिती होते, हें वर दाखविलेंच आहे. अशा तऱ्हेचे विवाह रुढ झाल्यामुळें साहजिकच पुनर्विवाहाचा प्रश्न डोकावूं लागला आहे.

लग्न होऊन २ महिने झालें नाहींत, तोंच, मुलीला वैधव्यदशा प्राप्त झालेली असतां, एखाद्या जरठ बापानें, स्वतःला मुलगी शोभेल अशा मुलींशीं काम वासनेकरितां विवाह करणें ही गोष्ट हिंदुधर्माला लांछनास्पद नाहीं काय ? शहरासारख्या ठिकाणीं जेथें जागेची अडचण आहे, अशा दोन खोल्यांमध्यें जेव्हां अशा तऱ्हेचीं कुटुंबें आपल्याला आढळतात, व जागेच्या अभावास्तव वैधव्यदशा प्राप्त झालेल्या मुलीला तेथेंच एका बाजूला निजणें भाग पडतें, त्यावेळीं स्वतःच्या बापाच्या ह्या लीला पाहून तिच्या मनावर काय परिणाम होत असेल ? आह्माला पुत्रसंतति नाहीं, इस्टेटीला वारस नाहीं, याकरितां उतार वयांत लग्न करणें भाग पडलें, आमच्या मित्रमंडळीचा आग्रह ह्मणून या फंदांत आम्हीं पडलों वगैरे लंगड्या सबबी हे लोक नेहमीं पुढें आणत असतात; परंतु उतार वयांत इच्छाशक्ति कमी झालेली असते, वीर्यांमधील प्रजोत्पादक धर्म नष्ट झालेला असतो, असें शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झालेलें आहे, तेव्हां सुदैवानें संतति झाली, तर ती कशी टिकाऊ होणार याचा विचार ज्याचा त्यांनीं करावा. असो. अशा तऱ्हेचें जे विवाह करतात, ते पुनर्विवाहाला काय उत्तर देतील ? स्त्रियांच्यामध्यें पुरुषांपेक्षां आठपट कामवासना जास्त असते. व लज्जेमुळेंच त्यांना स्वतःवर ताबा राखतां येतो; ह्मणून उलट

जरठांनीं मात्र वाटेल तितके विवाह करणें शास्त्रसंमत आहे आणि तरुण विधवांनीं मात्र तो विचारसुद्धां मनांत आणूं नये काय ?

उतार वयांत लग्न करणें म्हणजे आपण महत्पाप करित अहोंत असें समजलें पाहिजे. सुदैवानें अशा विधुरांची पत्नी अगोदर गत झाली तर महद्भाग्य समजलें पाहिजे; परंतु हिंदुसमाजाच्या दुर्दैवानें तसें प्रकार घडत नाहींत. लग्न होऊन २–४ वर्षें होत नाहीत, तो त्यांच्या नशींबीं वैधव्यदशा येते. अकालीं वैधव्य आलेल्या, तारुण्यानें मुसमुसलेल्या स्त्रीवर ब्रम्हचर्याची जबरदस्ती करणें, व चुकून वाईट पाउल पडून संबंध कुटुंबाला ज्यावेळीं खालीं मान घालण्याचा प्रसंग येतो त्यावेळीं दोष कोणाचा याचा सूक्ष्म दृष्टिनें प्रत्येकानें मनांशीं विचार करावा. स्वतःला मुलें व मुलीं मोठीं असतां कोणच्याही **जरठानें** कांहीं दलाल लग्न जमवून देत आहेत म्हणून **उरकून घ्यावें** अशी मनाची भ्रामक समजूत करून घेणें चुकीचें आहे. विषयवासनेच्या तृप्ति करतांच लग्न करून एखाद्या अल्प–वयांतल्या तरुणीचें संबंध आयुष्य आपण कसें फुकट दडवित अहोंत, व आलस्य देखत तिला वाममार्गाला नेण्यांचे महत्पुण्य आपण कसें आचरित अहोंत, या सर्व गोष्टींचा अगोदर पूर्ण विचार करून मग खुशाल लग्न करून हिंदुधर्माचें नांव अशा दुष्कृतिनें उज्वळ करावें, यासारखी दुसरी लांछनास्पद गोष्ट ती कोणती ?

शास्त्रांचा प्रश्न सोडून दिला तरी वयस्थानांप्रमाणें अकालीं वैधव्यता प्राप्त झालेल्या स्त्रीला कामेच्छा कशी दाबतां येणार ?

या करतांच शास्त्रकारांनीं अशा स्त्रियांना कडक नियम सांगितले आहेत, परंतु आजच्या विपरित स्थितींत ते कसे पाळले जाणार ? म्हणून याचा परिणाम गर्भपात, बाळहत्या यांत होतो व अशी स्त्री समाजाला कालिमा लावणारी व दोषास्पद ठरते, व पुरुष मात्र नामानिराळा राहून मजा पहात असतो.

वृद्धावस्थेत वैद्यकीय दृष्ट्या विवाह करणें कधींही इष्ट नाहीं. विवाहामुळें जीं कांहीं ५।१० वर्षें या जगांत काढावयाचीं असतील, तीं कमी होऊन, उलट, स्वतःच्या प्रिय पत्नीला अकालीं व तारुण्यांत वैधव्यदशा प्राप्त करून दिल्याचें मात्र पाप मिळतें. **पुनर्विवाह रूढ होऊं नये, अशी इच्छा बाळगणाऱ्या जुन्या लोकांनीं त्याचप्रमाणें समाजसुधारकांनीं जोंपर्यंत हे जरठ विवाह थांबविले नाहींत, व जरठांनीं ही स्वतः वानप्रस्थाश्रम स्वीकारला नाहीं, तोंपर्यंत पुनर्विवाह, बालहत्या, गर्भपात ह्या**

**गोष्टी अखंड चालू रहाणार व याबद्दल समाजानें कोणाला दूषण देण्यांत अर्थ नाहीं. हें खुशाल धरून चालावें.**

वृद्धावस्थेंत प्रकृति चांगली रहावी याकरितां खालील नियम पाळावेत.

( १ ) उघड्या हवेंत फिरावे. खिडक्या उघड्या ठेवाव्यात. व्यायाम, श्वासोश्वास व प्राणायाम करावा.

( २ ) ताज्या पालेभाज्या, भात, चपाती, फळफळावळ, निरसें ताजें दूध घ्यावें. अन्न चांगलें चर्वण करून खावें.

( ३ ) रोज स्नान करावें. शरिर प्रकृति व हृदयाची शक्ति चागली असेल तर कडू निंबाचा (अंगाला तेल लावून) वाफारा घ्यावा; यामुळें विजातीय द्रव्यें बाहेर पडण्यास मदत होते.

( ४ ) मलावरोध दूर करावा. त्याकरितां रात्रीं १ कप दूध, अगर मुइ-मुगाचे दाणे खावेत व त्यावर पाणी घ्यावें. शौचाला साफ न झाल्यास पहाटेस २–३ कप पाणी पिऊन एक झोंप घ्यावी.

( ५ ) निदान आठवड्यांतून एकदां शौचाला साफ होण्याकरितां एरंडेल तेलाचा जुलाब घ्यावा.

( ६ ) अंगांत पातळ स्वच्छ कपडा घालावा.

( ७ ) निवांत हवा येत असेल अशा खोलींत निजावें; खिडकीसमोर न निजतां खिडक्या उघड्या ठेवून अंगावर हवा न येईल अशा बेतानें निजावें.

( ८ ) आठवड्यांतून निदान १ दिवस विश्रांती घ्यावी त्या दिवशीं नेहमींच्या धर्मकृत्या पलिकडे कांहीं करूं नये.

( ९ ) मागल्या गोष्टीचा विचार, त्याप्रमाणें पुढें कसें होईल, याची हुरहुर मनांत लावून घेऊं नये. कर्णाला कटु अशा गोष्टी ऐकूं नयेत. व तोंडानें बोलूं नयेत. ज्या गोष्टी होणाऱ्या आहेत त्या कधीं चुकावयाच्या नाहींत.

( १० ) ब्रह्मचर्य जितकें पाळतां येईल तितकें चांगलें.

( ११ ) चहा, कॉफी, धुम्रपान यांत मितपणा असावा.

( १२ ) जेथें हवा उष्ण असेल, दूषित असेल तेथें जाऊं नये.

( १३ ) शरिरांत कांहीं पिडा असल्यास, तात्पुरतें कांहीं औषध घेऊन निसर्गाच्या नियमानें वागावें.

# प्रकरण २० वें

## ऋतुस्राव.

—:०:—

भावी पिढी सुदृढ व्हावी, आपलीं मुलें चांगली गुटगुटित दिसावींत, अशी कोणाची इच्छा असणार नाहीं ? हरविलास सारडा, रिटायर्ड सबजज्ज, यांचें जें शारदा बिल नुकतेंच पास झालें, त्याचा उद्देश हाच असावा हें सूक्ष्म विचार करणाराला आढळून येईल. १४ वर्षांच्या खालीं मुलींचें लग्न होऊं नये. शहरांसारख्या ठिकाणीं कालानुरोधानें, आपोआप सर्व गोष्टी होत आहेत. तेव्हां या बिलाची आवश्यकता नाहीं, हें आपोआप सिद्ध होते. उच्च जातींतील विवाह १४ वर्षांच्या पुढें झालेले आढळतात; परंतु कांहीं अशा जाती आहेत, कीं त्यांच्यामध्यें मुलांमुलींचीं लग्नें पाळण्यांत होत असतात. अशा लोकांना हें बिल आरंभीं जाचक वाटलें, तरी त्याबरोबर १० पुनर्विवाह करण्याची ही मोकळीक त्यांच्या जातींत आढळते. ही गोष्ट विसरून चालावयाची नाहीं. हें बिल बालविवाहाचे अनिष्ट परिणाम टाळण्याकरितां उपस्थित झालेलें आहे. बालविवाह अनिष्ट, प्राढ विवाह इष्ट, त्यामुळें फायदा अगर तोटा कालांतरानें समाजाला कळून येईल; परंतु भविष्यकालावर लक्ष ठेवणाराला हे परिणाम पहातांना शास्त्रीयदृष्ट्या स्त्रियांच्या शरिराची मजबुती, कोणच्या कारणांवर अवलंबून आहे हें कळलें म्हणजे हा प्रश्न आपोआप सुटणार आहे कोणच्याही प्रश्नाला दोन बाजू असतात, प्रत्येकजण आपली बाजू खरी ह्मणून स्वतःचे मुद्दे मांडित असतो. आपलें सर्व धर्मशास्त्र आरोग्याच्या पायावर रचलेलें आहे. आमचा धर्म आह्मी पाळीत नाहीं, तेव्हां आमचें आरोग्य चांगलें रहात नाहीं. **पुरुषांनीं एकवेळ धर्म सोडला तरी चालेल, परंतु स्त्रियांनीं जोंपर्यंत धर्माचें ह्मणजे पर्यायानें आपलें अरोग्य शाबित ठेवलें आहे. तोंपर्यंत कोणचेंही राष्ट्र जोमदार राहील हें निःसंशय समजावें.** परंतु अशी स्थिती आज किती स्त्रीपुरुषांमध्यें आढळून येईल ? स्त्रियांवर पुष्कळ गोष्टी अवलंबून आहेत. त्यांचें आरोग्य चांगलें राहिलें तर गृहस्थाश्रमाचीं सर्व कार्यें

सुरक्षित पार पडणार व संसार सुखाचा होणार, व हें ज्ञान मुलींना १३–१४ वर्षांपासूनच मिळालें तर लग्न झाल्यानंतर त्याचा इष्ट परिणाम घडणार. पुरुष तारुण्यांत आला म्हणजे ज्याप्रमाणें फेरफार होतात, त्याचप्रमाणें मुली १३–१४ वर्षांच्या झाल्या म्हणजे गर्भाशयांमधून एक प्रकारचा दर अठ्ठावीसाव्या दिवशीं स्राव सुरू होतो, त्याला ऋतुस्राव ( Menstruation ) असें ह्मणतात. आपल्या देशांतील हवामान उष्ण असल्यामुळें ११ व्या १२ व्या वर्षीसुद्धां हा स्राव झाल्याचें पहाण्यांत येतें; परंतु ह्या वयांत स्राव सुरू होणें आरोग्यदृष्ट्या हानिकारक आहे. पुष्कळ मुलींना हें काय आहे याची जागीव नसल्यामुळें त्या घाबरून जातात व त्यामुळें स्रावाच्या कार्यांत व्यत्यय येण्याचा संभव असतो. प्रत्येक सूज्ञ आईनें मुलीला यासंबंधींचें ज्ञान अवश्य दिलें पाहिजे. यांवरच प्रत्येक मुलींचे व विवाहीत स्त्रीचें भावी आयुष्य सुखकारक जाणें अवलंबून असतें. स्त्रियांमध्यें पुष्कळ विकारांचें मूळ पाहूं जातां **ऋतुस्राव नियमीत न जाणें** हें असतें. मुलगी वयांत आली असें आपण ह्मणतों, त्यावेळीं तिच्या इंद्रियांमध्यें खालीलप्रमाणें फेरफार होत असतात. मांड्या जरा मोठ्या होतात, पोटाचा आकार वाढतो, स्तनाची वाढ होते व तिला एक प्रकारची लज्जा वाटूं लागते. कांहीं मुलींमध्यें, रजःस्वला होण्याच्या वेळीं, मेंदूवर परिणाम होतो, व त्या तिरसट व रागीट बनतात. १४ वर्षांच्या पूर्वी, एखाद्या मुलीला स्राव सुरू होणें हें लक्षण चांगलें नसतें, व अशा मुलीला वृद्धावस्था लवकर येते. अशा वेळीं ही पाळी लांबवण्या-करितां उघड्या हवेंत फिरणें, स्नायूंना काम पडेल असे खेळ खेळणें, फळफळावळ, दूध, चपाती, अशांसारखे सात्विक पदार्थ खाणें, मांसल पदार्थ वर्ज्य करणें वगैरे गोष्टी अमलांत आणल्यास अकालीं होणारा स्राव कमी होतो. पुष्कळ वेळां असेंही होतें कीं मुलगी १५–१६ वर्षांची होते, परंतु रजःस्वला होत नाहीं; तेव्हां स्त्रीअंड अगर गर्भाशयामध्यें कांहीं दोष आहे असें समजून तज्ज्ञ अशा स्त्री डॉक्टरकडून परिक्षा करून घ्यावी, व औषधोपचार चालू करावा.

ज्या तरुण मुलीला नियमीत ऋतुस्राव होत आहे. तिनें खालील गोष्टीकडे अवश्य लक्ष द्यावें. ह्या गोष्टी नेहमीं चार दिवसच पाळावयाच्या असतात.

( १ ) सर्दी होईल, अशा ठिकाणीं जाऊं नये. अंगाला घाम आलेला आहे व वारा अंगावर घेतला, तर अंगावर कांटा येऊन, गर्भाशयांतील, रक्त-वाहिन्याचा संकोच होतो, व त्यामुळें स्राव जाणें कमी होतें अगर बंद होतें.

( २ ) अंग मेहनतीचें काम करूं नये. विश्रांती घ्यावी. रागाऊं नये. अभ्यास, राग, दुःख त्याचप्रमाणें आनंदानें बेहोष होऊन जाणें, ह्या गोष्टी करूं नयेत.

( ३ ) मन आनंदी, शांत राहील असें वर्तन नूतन स्राव होणाऱ्या पहिल्या पाळींच्या वेळीं घरांतील मंडळीनें ठेविलें पाहिजे. या गोष्टी साधारणतः विवाहीत मुलींमध्यें पतीच्या घरीं, पहिल्या खेपेस ज्यावेळीं स्त्री रजःस्वला होते, त्याचवेळीं विशेषतः पाळण्याची रीत आहे. स्राव कसा होत आहे, यापासून अपाय होईल किंवा काय, अशा प्रकारचें कुविचार मनांत आणूं नयेत.

( ४ ) शाळेंत जाणाऱ्या मुली, ज्यांना अभ्यासाची गोडी लागलेली आहे, त्या या काळांत खुशाल अभ्यास करीत असतात, फार काय विटाळ वगैरे न मानतां खुशाल शाळा. कॉलेजमध्यें जात असतात, व स्रावाचा प्रतिबंध व्हावा म्हणून स्पंज वापरीत असतात; परंतु यापासून भावि आयुष्यावर परिणाम होतो.

( ५ ) कमर घट्ट न आंवळणें, जागरण न करणें या गोष्टी पाळल्या पाहिजेत.

हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें रजःस्वला स्त्रीनें ३ दिवस निराळें बसलें पाहिजे, व तिच्याशीं संबंध ठेऊं नये, अशी जी रीत पूर्वापार चालत आलेली आहे, ती किती उत्तम व पाश्चात्य शास्त्रदृष्ट्या आरोग्यकारक आहे, हें एका डॉक्टराच्या खालील उताऱ्यांवरून सूज्ञ वाचकांच्या ध्यानांत येईल. प्रसूतिच्या वेळीं, या स्त्रियांना त्रास होत नाहीं अशा स्त्रियांना मूल झाल्यानंतर होणारे विकार ही सहसा होत नाहींत. याला कारण म्हणजे, ऋतुस्रावाच्या वेळीं त्या विश्रांती घेतात हें होय.

One reason of this is the preservation of their sexual health by rest during menstrual period.

जंतु शास्त्राच्या दृष्टीनेंसुद्धां, आपली रीत, शास्त्रीय आहे हें सिद्ध होतें. विटाळ मानण्याचें खूळ आपल्या समाजांत आहे असें समजणाऱ्या समाज-सुधारकांना वरील एका डॉक्टराचा उतारा पुरेसा आहे.

विटाळशी स्त्रीची सावली, जर सर्पावर पडली, तर त्याचे डोळे जातात, त्याचप्रमाणें मंत्राचे जप करणारेसुद्धां तिचा शब्द ऐकून स्नान करून त्या वेळेपर्यंत

अन्न सेवन करीत नाहींत हें आपल्या ऐकण्यांत येते, यावरून विटाळशीपणाचें महत्व किती आहे हें अपोआप सिद्ध होतें.

ज्या स्त्रिया विटाळ मानीत नाहींत, खुशाल क्लब, व्याख्यानें, नोकरी, शाळा अगर कॉलेजमध्यें जातात, त्यांना वर दिलेल्या कारणांमुळें, नेहमीं गर्भाशयाचे विकार होतात असा अनुभव आहे.

आयुर्वेदानें शुद्ध आर्तव जाणण्याची चिन्हें खालीलप्रमाणें दिलेली आहेत.

जें आर्तव बुळबुळित नसून, दाह व शूळ विरहीत असतें, तसेंच प्रत्येक महिन्यांतून २८ व्या दिवशीं सुरुवात होऊन ५ दिवस नियमीत वहातें, जें मध्यम असतें, त्याला शुद्धार्तव म्हणतात. विटाळ पुष्कळ होत असेल तर तो पहिले तीन दिवस होतो, मध्यम असल्यास ५ दिवस स्राव होतो, तर कित्येकांत १६ दिवस-पर्यंत थोडा थोडा स्राव होत असतो. आर्तव जर शुद्ध असेल तर त्यापासून बळ, वर्ण, शुक्र व पुष्टि इत्यादि गुणांचा त्यांना लाभ होतो.

( ६ ) लघ्वीला व शौचाला होईल त्यावेळीं त्याचा वेग दाबून ठेऊं नये. कित्येक मुली वेग आला असतां जात नाहींत, यामुळें पोट फुगणें, थकवा येणें हातपाय दुखणें, बेंबीच्या व इंद्रियाच्या ठिकाणीं पीडा. लघ्वीला वारंवार झाल्या-सारखें वाटणें, डोकें दुखणें वगैरे लक्षणें होतात; याकरितां, औषधानें जरी हीं लक्षणें तात्पुरतीं कमी झालीं तरी वेग येईल, त्यावेळीं नियमीत शौचाला व लघ्वीला जावें व टाळाटाळ करूं नये.

ज्या मुलीला निसर्गाचे वेग पाळतां येत नाहींत, तिच्या तोंडाला व श्वासाला घाण येतें, शिवाय मळाच्या दाबामुळें गर्भाशयाच्या स्थानांमध्यें फरक होण्याचा संभव असतो.

कपड्यांच्या घट्टपणांमुळें ओटींमधील इंद्रियें आंवळलीं जातात, त्यामध्यें रक्ताधिक्य होतें, यामुळें. पाळी येतांना नेहमीं त्रास होतो; ह्मणून लुगडें वगैरे नेसणें तें अगदीं कमर आवळून नेसूं नये. प्रत्येक तरुण मुलीनें नेहमीं महिन्याची पाळी कशी येत आहे, इकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे. आरंभापासून पहिलीं दोन वर्षें महत्वाचीं असतात, तेव्हां हीं दोन वर्षें व्यवस्थितपणांत गेलीं, गर्भाशयाचा व स्त्रीअंडाचा विकार झाला नाहीं, तर खात्रीनें भावी आयुष्य सुखांत जाईल असें खुशाल धरून चालावें; याकरितां प्रत्येक सूज्ञ आईनें आपल्या

मुलीला स्राव कसा जातो, त्याचा रंग कसा आहे, तो किती दिवस जातो पोटांत, ओटींना अगर कमर वगैरे दुखते किंवा काय हें विचारून त्याप्रमाणें औषधोपचार, रहाणी, खाण्यापिण्यांत फेरफार केले पाहिजेत.

आतां शाळेंत जाणाऱ्या मुलीसंबंधीं पाहूं या. स्त्रीशिक्षण प्रचारांत आल्यामुळें पुष्कळ स्त्रिया सुशिक्षित होऊन बाहेर पडत आहेत ही आनंदाची गोष्ट होय. प्रचलित देण्यांत येणारें शिक्षण, यामध्यें गृहशिक्षणांचा अभाव असल्यामुळें, अशा स्त्रिया मॅट्रिक अगर एम्. ए झाल्या तरी संसाराला नालायक बनतात असा अनुभव आहे. स्त्री स्वातंत्र्याच्या वल्गना प्रत्येक सुशिक्षित स्त्री वर्गाकडून भाषण व लेखद्वारा जनतेपुढें येऊन पुरुषांच्या गुलामगिरींतून मार्ग कसा काढावा यासंबंधानें चर्चा चालू आहे. जें शिक्षण मनाची कुसंस्कृती पालटतें, हिंदी स्त्रियांचीं कर्तव्यें काय आहेत याची जाणीव देतें तें खरें स्त्री शिक्षण होय.

# प्रकरण २१ वें

## वरसंशोधन

ज्या स्त्रिया शिक्षणसंपन्न होतात, त्या बहुतेक कुमारिका असतात. शिक्षण पुरें झाल्यानंतर पुढचा मार्ग म्हणजे सभा, क्लबस्, व्याख्यानें ह्यांना हजर रहाणें होय. येथें नानातऱ्हेचे लोक येतात. त्यांच्या ओळखी होतात व ज्याप्रमाणें मित्र मिळतात, त्याप्रमाणें वर्तनही हळुहळु बनत जातें. सुशिक्षित मुलींचे आईबाप, मुलींच्या शिक्षणांच्या मानानें अशिक्षित असतात, व त्यांना आपली मुलगी ह्मणजे स्वर्गदेवता वाटते. ते तिचे नानातऱ्हेचे कोड, फॅशन्स पुरवीत असतात व शेवटीं मोहाला बळी पडून एखाद्या भिन्न धर्मीय किंवा भिन्न जातिय गृहस्थाशीं सुधारणा, व्यक्तिस्वातंत्र्य या पाश्चात्य, गोंडस दिसणाऱ्या तत्वाखाली विवाहबद्ध होतात, अगर पश्चात्ताप पावतात. अशा प्रकारचे विवाह, समाजाच्या दृष्टीनें फायदेकारक होतील किंवा नाहींत याचा

विचार शेवटीं स्वतंत्रपणें करण्याचा विचार आहे. तूर्त परिस्थिती कशी निर्माण होते, व त्याचे परिणाम कसे होतात, एवढेंच फक्त दाखवायचें आहे. ज्यांचें शिक्षण थोडक्यांत झालेलें असतें, अशा मुलींचे विवाह लवकर होतात, व अशा स्त्रिया शिक्षणानें कमी दर्जीच्या ठरल्या, तरी जुन्या पद्धती सोडून वागत नाहींत.

मुलींचें वर्तन कसें आहे, हें आईबापांच्या वागणुकीवरून समजून येतें. ज्याला उत्तम पगार आहे, ज्यांच्या पदरीं नोकरचाकर, आचारी वगैरे माणसें पुष्कळ आहेत, अशा कुटुंबांमध्यें या सुशिक्षित मुलींचा प्रवेश झाला तर जड जात नाहीं; परंतु महिन्याला ६० रुपये मिळणाऱ्या बी. ए. इसमाशीं, सुशिक्षित स्त्रीनें विवाह केला तर तो बिचारा चहा पलिकडे स्वयंपाक शास्त्राचें ज्ञान नसणाऱ्या स्त्रीशीं संसार कसा काय थाटणार ? अशी परिस्थिती सुशिक्षित कुटुंबांत आढळून येते. आचारी मिळत नाहींत व जोडप्यांला खाणावळीच्या डब्यांवर दिवस काढावे लागतात. सुशिक्षीत स्त्रीला जेवण करणें कमी दर्जाचें वाटतें व ही समजूत दृढ झालेली आपल्याला आढळून येते. आपल्याकडील विवाह बहुतेक आईबाप ठरवितात. २५–३० वर्षांपूर्वी आईबापांनीं कुल, शील, मुलगी, पत्रिका पहावी व लग्न जमवावें, नवऱ्यानें फक्त अक्षता टाकण्यास उभें रहावें अशी पद्धति होती. बालविवाह होत असल्यामुळें, मुलीला नवरा म्हणजे काय याचें ज्ञानही नव्हतें; व दुर्दैवानें वयांत येण्यापूर्वींच जर तिचा नवरा वारला तर तिनें आपलें आयुष्य दुःखांत, ईशचिंतनात घालवावें असें होतें, पण आज स्त्री पुरुष शिक्षण घेत असल्यामुळें परस्परांना चांगलें किंवा वाईट हें समजण्याची अक्कल आली आहे; यामुळें नवऱ्याला स्त्री पसंत करण्याचा हक्क सुद्धा आईबापांकडून प्राप्त झालेला आहे. कांहीं आईबाप मुलाला अगर मुलीला मनच नाहीं असें समजून आपले हक्क लग्नाच्या वेळीं बजावित असतात. हाही काळ पालटत आहे. कालाप्रमाणें आईबापांची जरूरी कांहीं तरुण स्त्री पुरुषांना न भासून ते आपले विवाह स्वतंत्रपणें उरकून घेत आहेत. आमच्या देशांतील मुली कितीही शिक्षण घेऊन विद्वान् झाल्या तरी पाश्चात्य स्त्रियांप्रमाणें, त्या उल्लु, धीट, नवऱ्यांशीं फटकून वागणें, काडीमोड करणें वगैरे धाडस सहसा त्यांच्या हातून होणार नाहीं. परंतु हें सर्व आनुवंशिक संस्कार, गृहशिक्षण यांवर अवलंबून आहेत हेंही त्यांवरोबरच लक्षांत ठेविलें पाहिजे.

ज्या जुन्या पद्धतीच्या घरांत वाढलेल्या आहेत त्यांचे विवाह आईबापांच्या आज्ञेनुसार होतीलच परंतु जी सुशिक्षित स्त्री आहे जिला स्वतःचा नवरा पसंत करण्याची इच्छा आहे तिला कांहीं सूचना देणें जरूर आहे.

( १ ) पतीची निवड करतांना, त्याच्याबरोबर आपला संसार सुखाचा जाईल किंवा नाहीं याचा विचार केला पाहिजे. एखादा मनुष्य विद्वान् असतो परंतु त्याचें खासगी वर्तन चांगलें नसतें, तेव्हां नुसत्या विद्वत्तेवर न भाळतां वर्तन व शील पाहून नंतर लग्न करावें.

( २ ) आईबापांची परवानगी घेऊन त्याचप्रमाणें, आपल्या मैत्रिणींची मतें घेऊन नंतर संमति द्यावी.

( ३ ) लग्न झाल्यानंतर पतीला सुख होईल, पतीचा वंश आदर्शभूत होईल असें वर्तन ठेवावें. आपला सासुसासरा, दीर वगैरे वडील मंडळीचा मान ठेवावा.

( ४ ) अंतःकरण नेहमीं उदार ठेवावें. क्षुद्रबुद्धि बाळगूं नये.

( ५ ) लग्नाची एकदम घाई करूं नये. फॅशन्समुळें एखादेवेळीं पती निवडण्यांत चूक होते, व सर्व जन्मभर पश्चात्तापांत काढावा लागतो.

लग्न कोणत्याप्रकारचें चांगलें हें ठरविण्याकरितां पोलंडमध्यें विवाहसंस्था स्थापन होऊन त्यांनीं तीन प्रकारचे विवाह ठरवले, व त्या विवाहांचा परिणाम पुढें काय झाला हें कळण्याकरितां वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेला एक उतारा देत आहेः—

उत्तम विवाह प्रकार—पोलंडमधील ‘ विवाहसाहाय्यकारी संस्थेचे ’ अध्यक्ष लिहितात कीं, “ आतांपर्यंत आमच्या संस्थेनें चाळीस हजारांपेक्षां अधिक लग्नांचे योग जुळवून आणले आहेत. या सर्व लग्नाच्या बऱ्यावाईट परिणामाचें आम्ही अत्यंत सूक्ष्म निरीक्षण करून कोणत्या प्रकारच्या लग्नाचें काय परिणाम झाले या संबंधाच्या अनुभवाचीं आम्ही काळजीपूर्वक कोष्टकें बनविलीं आहेत व त्यामुळें विलक्षण अनुमानें निघत आहेत, त्यांचा विवाह करूं इच्छिणारांनीं विचार करण्यासारखा आहे. सध्यांच्या युरोपमधील विवाहाचे मुख्य ३ प्रकार आहेत. ( १ ) एक केवळ नवरानवरीच्या स्वयंपसंतीनें होणारें स्वयंवर, ( २ ) दुसरा त्यांच्या पसंतीबरोबरच आईबापांची संमति मिळून झालेले विवाह व ( ३ )

तिसरा आईबापांनीं स्वतः आपल्या मुलामुलींसाठीं नवरी किंवा नवरा यांचीं, कुलशील पाहून निवड करून त्या योजनेस आपल्या मुलांची संमति मिळविणें व असा विवाह घडवून आणणें. या तीन प्रकारच्या विवाहांपैकीं पहिल्या प्रकारानें झालेल्या विवाहामध्यें शेंकडा सत्तर विवाह काडी मोडून आणि भांडणें होऊन मोडले जातात. मधल्यां प्रकारच्या विवाहामध्यें काडी मोडण्याचें प्रमाण त्यापेक्षां कमी असतें; आणि जे विवाह आपल्या मुलींसाठीं कुलशील व दोन्ही कुटुंबांची आर्थिक परिस्थिति पाहून आईबापांनीं घडवून आणलेले असतात त्या विवाहांमध्यें काडी मोडण्याचें प्रसंग फार कमी ह्मणजे शेंकडा ५ सुद्धां नसतात. ह्मणजे शेंकडा ९५ कुटुंबें आनंदांत असतात. यासाठीं **कुटुंबस्वास्थ्याच्या दृष्टीनें आईबापांनीं कुलशील पाहून आणि आपल्या मुलांमुलींचें हित दृष्टीसमोर ठेवून घडवून आणलेले विवाह पुष्कळ निर्दोष असतात, यांत शंका नाहीं.** ” युरोपांतील किंवा पोलंड देशांतील लोकांनीं हा शोध नवीन लावला आहे असें नाहीं, तर हिंदु व हिंदी लोकांच्या दूरदर्शी पूर्वजांनीं पूर्वींच श्रुति-स्मृतींतून हें अनुभविक मत प्रगट केलें आहे; पण आज मात्र मतस्वातंत्र्याच्या गोंडस नांवाखालीं तिसरा विवाह प्रकार नष्ट होत चालला असून दुसऱ्याची पुष्कळ व पहिल्याची थोडी चलती चालू आहे.

वरील उताऱ्यांवरून आपलें मत बनवून तरुण स्त्रीपुरुषांनीं त्यापासून बोध घ्यावा.

आरंभींच्या वर्णनांवरून तरुण स्त्री वयांत आली असतांना पहिलीं २ वर्षें आर्तव कशा प्रकारचें जातें, इकडे अवश्य लक्ष ठेविलें पाहिजे व पाळी आली असतां विश्रांती घेतली पाहिजे, मग शाळेंत जाणाऱ्या मुली असोत; अगर कामांवर जाणाऱ्या मास्तरणी असोत, ज्यांना भावी आयुष्य सुखांत जावें अशी इच्छा असेल त्यांनीं हिंदु धर्मानें सांगितलेला नियम अवश्य पाळला पाहिजे यासंबंधीं दोन्हीं वैद्यकदृष्ट्या एकच मत आहे. आर्तवाचें महत्व किती आहे हें आपल्या मुनींनीं वैद्यक ग्रंथांत हजारों वर्षांपूर्वीं लिहून ठेवलेलें आहे, तें किती सार्थ आहे, हें भावप्रकाशकार यांच्या वर्णनावरून आढळून येईल.

“ ज्या दिवशीं आर्तवाचा स्राव सुरू होईल, त्या दिवसांपासून प्रत्येक स्त्रीनें पुढील नियमांचे अगत्यपूर्वक पालन करावें. चटईवर निजावें. पतीचें मुख

पाहूं नये. अश्रुपात करूं नये. अन्न सात्विक असावें, नखें काढणें, अंगाला तेल, उटी लावणें, काजळ घालणें, स्नान, दिवसा झोंप घेणें, धांवणें, मोठा शब्द ऐकणें, फार हंसणें, बोलणें, श्रम करणें, नखानें उकरणें, वारा घेणें, ह्या गोष्टी करूं नयेत. जी रजःस्वला स्त्री अज्ञानानें चुकून अथवा लोभामुळें निषिद्ध वस्तूंचें सेवन करील, तिचें प्रायश्चित्त गर्भाला व स्वतःला भोगावें लागेल. मुंबई-मध्यें शाळेंत जाणाऱ्या मुली विटाळ मानीत नाहींत व बाहेर बसत नाहींत, ह्या रीति गांवढळ आहेत, असें समजून वागत असतात; परंतु याचें फळ समजून उमजून मिळत असतें, व यामुळेंच शहरांत गर्भाशयाचे विकार, ऋतुस्राव बरोबर न येणें, या तक्रारी हमेश प्रत्येक कुटुंबांत आढळतात आतां लग्न झाल्यानं र कसें वागावें, याची चर्चा पुढील प्रकरणांवर ढकळणें भाग आहे.

---

# प्रकरण २२ वें

—:०:—

## गर्भवंती स्त्रीची वागणूक

एखाद्या कुमारिकेचा विवाह झाला म्हणजे आरंभीं तिला आपण नव्या जगांत आलों असें वाटतें. शारदा बिलाच्या योगानें १४ वर्षांच्या खालीं विवाह होणें शक्य नाहीं हें उघड झालें. शारदा बिलामध्यें स्त्रीसंयोगा-संबंधीं नवऱ्यांवर कडक नियम घातलेले आहेत.

शारदा बिलाच्या विरुद्ध असणारा जुना वर्ग यांचें विचार पुष्कळ तरुण ( नव्या ) विचारांच्या सुधारकांना पटले नाहींत, तरी त्यांची जी दुसरी बाजू आहे तीसुद्धां विचारांत घेण्यासारखी आहे.

शारदा बिलाचे प्रवर्तक, श्रीयुत हरविलास यांनीं हिंदुधर्मावर घाला घातला आहे, अशी समजूत जुन्या लोकांनीं करून घेऊं नये. श्रीयुत हरविलास यांनीं हिंदुसुपिरियॉरिटी या पुस्तकांत हिंदुधर्माचें श्रेष्ठत्व प्रत्येक बाजूनें दर्शविलेलें आहे, अशांवर मागचा पुढचा विचार न करतां दोन्ही बाजू विचारांत न

घेतां तोंडसुख घेणें शहाणपणांचे लक्षण नाहीं. तुम्हीं शारदा बिल अमलांत आणा अगर न आणा किती मुलींचे विवाह हल्लीं १४ वर्षांच्या खालीं झालेले आढळतील, ही गोष्ट जर सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे तर हें बिल, हिंदुधर्मावर घाला घालणार असा समज कां करून घ्यावा ? कोणचीही सुधारणा अगर कायदा अमलांत येतांना जरी आरंभी विरोध भासला तरी तो विरोध हळुहळु कमी होतो असा अनुभव आपल्याला नेहमीं येतो. विवाह होण्याकरितां ज्या दुसऱ्या हुंडा वगैरे अडचणी आहेत, त्या दूर केल्या म्हणजे प्रौढ विवाहाचे प्रसंग आईबापांवर येणार नाहींत. तेव्हां तरुणांनीं या कामांत पुढाकार घेतला पाहिजे. स्त्रीशिक्षणाच्या योगानें होणारे विवाह, यांच्यामध्यें हुंड्याची अडचण न येतां, थोडक्या पैशांत विवाह लावणारे व करणारे समाज अस्थित्वांत येत आहेत, तेव्हां हुंड्याची बाब काळाच्या ओघाबरोबर हळुहळु ओसरून जाईल अशी आशा बाळगण्यास पुष्कळ जागा आहे, लग्न झाल्यानंतर पतीनें आपल्यावर प्रेम करावें, आपल्या गरजा पुरवाव्यात. आपलें कोडकौतुक करावें, अशी प्रत्येक आर्य स्त्रीची इच्छा असते. व ही इच्छा पार पडण्यास, पत्नीनेंही नवऱ्याची काळजी घेतली पाहिजे. पतीची प्रकृति चांगली राहील, त्याला राग न येईल, याकरितां जेवणामध्यें मसालेदार, तेलकट पदार्थ न घालतां सात्विक वृत्ति नेहमीं राहील अशा प्रकारचें अन्न शिजवलें पाहिजे. लग्न झालेल्या स्त्रीचे हक्क काय आहेत, लग्न झालेल्या स्त्रीचें काम म्हणजे जेवण करणें, व बाळ संगोपन करणें, एवढ्याच गोष्टी आहेत किंवा काय अशा प्रकारचे प्रश्न आधुनिक सुशिक्षित स्त्रीच्या डोक्यांत नेहमीं घोळत असतात. व्यक्ति स्वातंत्र्याच्या कल्पना गोंडस दिसल्या, तरी स्त्रियांचे हक्क मागणाऱ्या सुशिक्षित स्त्रीला, स्वतःच्या घरांत हक्क नसतात काय ? हक्क मिळविण्यास त्याप्रमाणें पात्रता अंगीं असावी लागते.

कॉलेजमध्यें आयुष्य कंठीत असणाऱ्या स्त्रीला घरांमध्यें रहाणें कमीपणांचें वाटतें, व आपल्या विचारांना चालना देण्याला स्थळ म्हणजे कॉलेज लाईफच होय, असें वाटण्याचें कारण म्हणजे अशिक्षीत स्त्रियांशीं तिचा संबंध हेंच होय, हें नुकतेंच एका कॉलेजमधील तरुण युवतीनें आपलें मत १३ आक्टोबर १९२९ च्या वुइकली टाइम्समध्यें लिहीलेलें आहे. लेखकाला प्रत्येक तरुण विवाहीत स्त्री-पुरुषांचा संसार कसा होईल, आर्य संस्कृति म्हणून प्रतिपादण्यांत येणारीं मतें बाधक कशी होणार नाहींत, अशा तऱ्हेनें विचार करावयाचा असल्यामुळें, पाश्चात्य

स्त्रियांच्या कल्पना कितीही उच्च भासल्या तरी मागे पुढें आपल्या संस्कृतीला धोका दिल्याशिवाय रहाणार नाहींत, अशी त्याची पक्की खात्री आहे. स्त्री सुशिक्षीत झाली, तिचें लग्न झालें, पतीची, मुलाबाळांची जोपासना करणें, अतिथीचा सत्कार करणें वगैरे गोष्टी तिला करतां आल्या तरच तिच्या शिक्षणाचा कांहीं उपयोग आहे व तिलाच गृहदेवता हें नांव शोभण्यासारखें आहे. आरंभीं पतीला मदत करण्याकरितां ह्मणून नर्सिंग, डॉक्टर शिक्षक वगैरे शाखेचें शिक्षण घ्यावयाचें व शिक्षणाचा उपयोग, मी तुमच्यावर अवलंबून नाहीं, पटत नसेल तर मी स्वतंत्र राहीन, मला काय कमी आहे, असें पतीला सांगण्याकडे त्याचा उपयोग करावयाचा कीं, आदर्शभूत गृहदेवता होण्याकरिता करावयाचा याचा विचार सुशिक्षीत स्त्रियांनीं करावा व मग लग्न करावें. लग्न केल्यानंतर पतीची सेवा करणें, त्याचा मार्ग चुकत असेल तर सौम्य, नाजुक शब्दांनीं त्याला वळणावर आणणें, प्रेमानें दोन शब्द बोलणें, आपल्या घराण्याची किर्ती राखणें, व ती वाढविणें, हाच शिक्षणाचा खरा उपयोग आहे, व हेंच प्रत्येक आर्य स्त्रीचें भूषण आहे असें समजलें पाहिजे. पतीला वळणावर आणण्यांत स्त्रियांच्या शब्दांत जी जादू असते, तशी पुरुषांमध्यें नसते, याचा अनुभव संसारी माणसाला आहेच. कनक-कांता या दोन शब्दांच्या मागें सर्व जग लागलें आहे, व तें मिळण्याकरतां प्रत्येकजण नानातऱ्हेचे मार्ग काढून तें मिळविण्याची खटपट करीत असतो.

शारदा बिलाच्या योगानें ऋतुस्राव स्त्रीला सुरूं असणार हें उघड आहे. लग्न झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं त्याचा परिणाम ह्मणजे स्त्रीला गरोदरावस्था प्राप्त होणें हें होय. मूल होणें कांहीं स्त्रियांना ओझें वाटतें. कामवासना तृप्त झाली पाहिजे, परंतु मुलांचे लोढणें नको, याकरितां संतति नियमनाचे उपायही अमलांत येऊं पहात आहेत. दिवसेंदिवस नानातऱ्हेनें सुखसोईच्या साधनामुळें दारिद्यावस्था वाढत आहे, तेव्हां संतति कमी असली तर बरी, हें कोणीही ह्मणणार हें उघड आहे; परंतु श्रीमंतांनीं वाटेल तेवढे नवस केले तर मुलें होत नाहींत व गरीबाला मुलें वाटेल तेवढीं होत असतात, यांचीं कारणें काय, याचा कोणी विचार केलेला आहे काय ? यासंबंधीची अत्यंत महत्वाची नाजुक माहिती स्वतंत्र प्रकरणांत पुढें देण्यांत येईल.

गरोदरपणांचीं चिन्हें:—विटाळ बंद होतो, कित्येक स्त्रियांमध्यें बाळंत होईपर्यंत स्राव चालू असतो. हा स्राव फक्त पहिल्या दिवशींच होत असल्यामुळें

त्याची विशेष काळजी बाळगण्याचें कारण नाहीं. पहिला महिना भरला, व दुसऱ्या महिन्याची सुरुवात झाली, तर पहिल्याच आठवड्यांत ओकारी, मळमळ सुरू होते व उलटी कांहीं केल्या कमी होत नाहीं. उलटी करीतां सुतशेखर मात्रा आल्याचा रस व खडीसाखर लिंबाच्या रसांतून घ्यावी. आमांशयाच्या ठिकाणीं मोहरीचें प्लॅस्टर ठेवावें. कोकमाचें सार, अगर लिंबाचें सर्वत घ्यावें; एवढ्यानें नच शमल्यास डॉक्टरचा सल्ला घ्यावा. दुसऱ्या महिन्यांच्या शेवटीं स्तनाचा आकार वाढूं लागतो, ते दाबले असतां घट्ट लागतात, व स्पर्श केल्यास स्त्रीला त्रास होतो. स्तनांची बोंडी काळी दिसूं लागते, व तिच्या भोंवतीं काळा व्यास दिसतो; त्याला इंग्रजींत एरी ओला म्हणतात.

स्तनाच्या भोंवतीं सूक्ष्म पुळ्या उत्पन्न होतात. मलावरोधाचा विकार असतो, तिचा चेहरा काळसर दिसतो.

ओटीचा भाग फुगवट दिसूं लागतो. तिसऱ्या चौथ्या महिन्याच्या सुरवातीस श्रवण नळीका लावून पाहिली असतां गर्भाच्या हृदयाचे ठोके ऐकावयास मिळतात. गर्भाची हालचाल आईला यावेळीं भासूं लागते, व आपण जर पोटावर थाप मारली तर आपल्याला आढळून येते. याला इंग्रजींत क्वीकनींग म्हसतात. यानंतर आईची प्रकृति सुदृढ असेल तर गर्भ हलुहलु वाढूं लागतो व पोट मोठें दिसूं लागते. गर्भ जर मजबूत असेल, तर गर्भाशयाचा आमांशयावर ( Stomach ) दाब पडून उलटी व मळमळ हीं लक्षणें होऊं लागतात.

कित्येक स्त्रियांमध्यें पहिलें ४ महिने प्रदराचा विकार आढळतो. ९ महिने पुरे होण्याच्या पूर्वी गर्भ ओटीमध्यें येतो, व त्यामुळें आमांशयावरील दाब कमी होतो. ज्यांना गरोदरपणाची कल्पना नसते अशा तरुण युवती घाबरून जातात, व आपलें हें जीवावरचें संकट आहे असें मानतात. निसर्गाच्या नियमांप्रमाणें वागणाऱ्या स्त्रीला बाळंतपण त्रासाचें जात नाहीं, व त्रासही होत नाहीं. बाळंतपण म्हणजे पुनर्जन्म समजण्याची समजूत हमेश होणाऱ्या अपघातामुळें मानण्याची रीतच पडलेली आहे, व हें कांहीं अंशीं खरेंही आहे. गरोदरावस्थेंत खालीलप्रमाणें वागल्यास प्रसूति सुलभ होईल, या हेतुनें वागणुक खालीलप्रमाणें ठेवावी.

( १ ) जिला गर्भ राहिला असेल अशा स्त्रीनें आरंभापासूनच चांगले अलंकार घालावेत. मन सुप्रसन्न ठेवावें, गुरु, ब्राह्मण, देव यांचें पूजन करावें. मनाला आवडणारे मधुर, स्निग्ध, पातळ, हलके असे पदार्थ सेवन करावेत.

( २ ) व्यायाम, लंघन, जागरण, शोक, मलमूत्रांचा अवरोध होऊं देऊं नये, फार वेळ उकीडवें बसणें करूं नये.

( ३ ) दुर्गंध, मनाला शिसारी येईल अशा वस्तु पाहूं नयेत व वास घेऊं नये, डोळ्याला भेसुर अशा कोणच्याही वस्तु पाहूं नयेत, अप्रिय असे शब्द कानानें ऐकूं नयेत.

( ४ ) शिळे, वाळलेले, पुनः ऊन केलेले अन्न खाऊं नये.

( ५ ) एकटें बाहेर जाऊं नये, वड, पिंपळ अशा झाडांखालीं बसूं नये, फार मोठ्यानें बोलूं नये.

( ६ ) नुसत्या सतरंजीवर निजूं नये, उंच उशी घेऊं नये.

( ७ ) अंगाला तेल लावूं नये.

( ८ ) मोसंबी, डाळींबे, टोमॅटो, द्राक्षें हीं फळें नेहमीं खावींत.

( ९ ) जेवणाच्या पूर्वी २ तास १ ते २ कप तापवून निवालेलें पाणी प्यावें.

( १० ) गरोदरावस्थेंत चहाची संवय असलेल्या बाईने चहा अजीबात सोडावा, व त्याबद्दल गरम गरम पाणी प्यावें ह्मणजे चहाची लज्जत कमी होईल. जी बाई चहा सोडणार नाहीं तिच्या गर्भावर वाईट परिणाम होतो, मुलाला दूध पचत नाहीं, व रिकेटससारखे विकार मुलांना होतात.

( ११ ) ज्यांना सकाळच्या वेळीं मळमळ, ओकारी हीं चिन्हें होतात, त्यांनीही चहा घेऊं नये.

( १२ ) कमर घट्ट आवळूं नये.

( १३ ) रोज उघड्या हवेंत व्यायाम घ्यावा. रोज -॥- ते १ मैल फिरून यावे पोटांतील स्नायुला काम पडावें, ह्मणून जुन्या बायका, विहिरीवरून पाणी काढणें, दळणें, कांडणें, ह्या गोष्टी गर्भवतीबाईकडून करवीत असत. उद्देश हा कीं, स्नायूला काम पडलें ह्मणजे त्यांच्यामध्यें, रुधिराभिसरण ताकद वाढून प्रसूतिच्या वेळीं त्रास होत नाहीं.

आजची परिस्थिती उलट झालेली आहे पीठ वगैरे गिरणीच्या द्वारें तयार होऊन मिळतें व नळाचें पाणी आयतें मिळत असल्यामुळें, ज्याप्रमाणें श्रम

व्हावयास पाहिजेत त्याप्रमाणें होत नाहींत. गर्भवती स्त्रीला कामचलाखपणा ( Activity ) पाहिजे. जी श्रीमंतीच्या नादांत, स्वस्थपणें पडून, ऐष आरामांत राहील, तिच्या कपाळीं, बाळंतपणांचा त्रास आहे असें समजून रहावें. गरीबाची स्त्री जर पाहिली, तर बाळंत होईपर्यंत बिचारी काम करीत असते, व यामुळें तिला नर्स मीडवाईफ लागत नाहीं, उणीव जी कांहीं असते ती पोटभर खावयास मिळत नाहीं. स्नायूंना काम मिळत असल्यामुळें, तिचें बाळंतपण सुखाचें होतें.

पोटाचा आकार मोठा दिसूं नये, व बाहेर जातांना लोक हंसतील याची लाज वाटते ह्मणूनच कीं काय कित्येक स्त्रिया कमरेभोंवती घट्ट पट्टा बांधतात; परंतु ही लाज नडल्याशिवाय रहात नाहीं, व एखादेवेळीं प्रसूतिसमयीं मृत्यु येण्याचा संभव असतो.

गरोदर स्त्रीनें रोज स्नान केलें पाहिजे. व इंद्रियें नेहमीं पाण्यानें धुऊन स्वच्छ राखलीं पाहिजेत.

निसर्गाच्या नियमानें पाहिलें, ह्मणजे प्रसूति सुखरूपपणें व्हावी अशी विधात्यानें योजना केलेली असते. गरोदरपणांत स्त्रीला काम करूं न देणें, हें श्रीमंतीचें लक्षण नसून तिला पुढें त्रास होणारें लक्षण आहे, असें समजून महिन्यापर्यंत तिला काम करण्यास हरकत नाहीं, असें समजावें.

जन्माला येणाऱ्या बालकावर तीन प्रकारें परिणाम होत असतो.

( १ ) स्त्रीपुरुषांचें वीर्य; ( २ ) आईची प्रकृति ( ३ ) आईची सभोंवतालची परिस्थिती.

संयोगाच्यावेळीं स्त्रीपुरुषांचे जे विचार असतात, त्यांचा परिणाम गर्भावर होत असतो. दोघांची प्रकृति चांगली असली, त्यावेळीं सुविचार असले, तर बालक चांगलें निपजणार हें उघड आहे. परमेश्वरानें जन्म देण्याचें आपल्या हातांत ठेविलें आहे, व वेदांताच्या दृष्टीनें हें खरें आहे, तरी मनुष्याला सद्विवेक बुद्धि देऊन तो नामानिराळा राहिलेला आहे. गरोदरपणांत आईची परिस्थिती, नातेवाईकांची वागणूक ज्याप्रमाणें असेल, त्याप्रमाणें गर्भावर परिणाम होतो; याकरितां आरंभीं सांगितल्याप्रमाणें प्रत्येक कुटुंबांतील माणसांनीं वर्तन ठेवलें पाहिजे

गर्भवती स्त्रीनें जेणेंकरून थकवा येईल असें काम करूं नये.

मुलें रडवीं होणें, त्यांपासून मातापितरांना त्रास देणें, याचा पूर्वजन्मार्जित कारणांशी संबंध होत असला, तरी वर दिलेल्या गोष्टींचा विशेषें करून परिणाम होतो, ही गोष्ट प्रत्येकानें ध्यानांत ठेविली पाहिजे.

२ ते ३ वर्षें प्रत्येक मुलाच्या जन्मामध्यें अंतर असावें अशा प्रकारची वर्तणूक स्त्रीपुरुषांनीं ठेविली पाहिजे. ज्यांना वर्षाला मुलें होतात, त्यांच्या आईची प्रकृति कितपत निरोगी असते, हें कोणाला सांगावयास नकोच. गरोदरपणांत चक्कर, अंधेरी, डोकें दुखणें, पाय सुजणें हीं लक्षणें कमी जास्त प्रमाणांत होतात तिकडे अवश्य लक्ष पुरवलें पाहिजे.

दारु पिणाराचीं मुलें, कांहीं वर्षांनीं दारूबाज होतात, व शिवाय, ग्रंथी वाढणें, क्षय, अपस्मार, मेंदूचा दाह, वेडेपणा, हे विकार त्यांना होतात.

---

**गर्भिणी गर्भरक्षकः**—गरोदरावस्थेंत १ ल्या महिन्यांपासून चालू केल्यास गर्भाशयाला ताकद येते व त्यामुळें प्रसूतिला त्रास होत नाहीं.

बा. किं. १। रुपया.

**गर्भपालरसः**—गर्भाला ताकद देणारें असून अपुरे महिने जाणाऱ्या स्त्रीला योग्य. सकाळीं व सायंकाळीं एक एक गोळी मनुकाच्या काढ्यांतून देणें.

तो. किं. २ रुपये.

**ब्राह्मी तेलः**—जागरण करणारे नट, सिनेमा ॲक्टर्स, मेंदूचे काम करणारे, जज्ज, क्लार्कस यांना अत्यंत उपयोगी. मेंदू शांत राहून झोंप चांगली लागते.

बा. किं १८२.

**अश्वगंधारिष्टः**—धातुक्षीणता, स्वप्नावस्था, काम केल्यास थकवा वाटणें, अशक्तता यांवर मज्जातंतुना ताकद देऊन शक्ति वाढवते.

किं. १। रुपया.

**सांडू ब्रदर्स, मुंबई नं. २**

# प्रकरण २३ वें

## स्त्रियांची वृद्धावस्था

—:०:—

वृद्धावस्थेंत पुरुषाची स्थिती काय होते याचें वर्णन मागें आलेलेंच आहे. स्त्रियांची प्रकृति नेहमीं त्यांच्या ऋतुस्त्रावावर अवलंबून असते. साधारणपणें स्त्रियामध्यें ३२ ते ३५ वर्षेपर्यंत प्रजोत्पादन होऊं शकतें. रजःस्त्राव १३ वर्षांपासून सुरू होतो, तो ४५ वर्षेपर्यंत चालू रहातो. स्त्री जोंपर्यंत नियमीत रजःस्वला होत आहे, तोंपर्यंत प्रजा होण्याचा संभव जास्त असतो. ही गोष्ट आनुवंशीकपणावरही अवलंबून आहे. कोणत्याही नियमाला ज्याप्रमाणें अपवाद असतो, त्याप्रमाणें या गोष्टीलाही अपवाद आहेच. रजःस्त्राव नक्की केव्हा बंद होईल हें सांगतां येत नाहीं, व तें प्रत्येक स्त्रीच्या प्रकृतीवर अवलंबून असतें. रजःस्त्राव बंद झाला, म्हणजे यौवनावस्थेच्या उलट स्त्रियांच्या प्रकृतिमध्यें फरक होत असतो. स्त्रीअंड, गर्भाशय, यांचा आकार कमी होऊं लागतो, ( atrophy ) व खालील प्रमाणें चिन्हें होऊं लागतात. पाळी वेळेवर येत नाहीं, स्त्राव जसा व्हावा तसा होत नाहीं, मज्जातंतूंस शिथीलता येते व प्रकृति क्षीण होऊं लागते. आमाशय, मूत्राशय, आंतडीं, यांचीं कामें बरोबर होत नाहींत, भूक न लागणें, शौचाला, लघ्वीला जातांना त्रास होणें, अंगावर खरूज होणें, पित्ताच्या गांधी, विशेषतः चेहेऱ्यावर कांहीं स्त्रियांमध्यें, मिशा व ओठाच्या जागीं केंस येतात कपाळ दुखणें, घाबरटपणा, दमा लागणें, चेहरा तकतकीत लाल होणें, हात, पाय, कमर, मांड्या दुखणें, हीं लक्षणें होतात. एखादेवेळीं चेहरा लाल होतो, व घाम सुटतो, सुख वस्तु स्त्रियांमध्यें चरबी वाढते, चालतांना दम लागतो, तहान फार लागते व थकवा फार येतो

झोपेमध्यें घाम फार येणें, व नंतर अंगाची आग होणें, डोकें गरम होणें, वगैरे लक्षणें होतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, प्रत्येक इंद्रियांच्या स्थितींवर प्रकृतिमध्यें चलविचल होत असते. पुष्कळ स्त्रियांमध्यें ह्या वयांत गर्भाशयाच्या तोंडाजवळ दुष्टव्रण ( Cancer ) झालेले आढळतात. जिला मुलें

फार झालेलीं आहेत, प्रसूतिच्या समयीं गर्भाशयाच्या भागाला ताण पडून जखम झालेली आहे, व त्यासंबंधीं विशेष काळजी बाळगलेली नाहीं, अशांना हा विकार विशेष होतो. या वयांत खालीलप्रमाणें प्रत्येक स्त्रीनें वागलें पाहिजे:—

बऱ्याच हिंदु स्त्रिया लाजाळु असल्यामुळें आपलें दुःख नेहमीं लपवित असतात. व ताकद असेंपर्यंत तें भोगित असतात. श्वेतप्रदराचे विकार, पाळीसाफ न येणें वगैरे चालू असते. पुरुष समागमामध्यें नियमीतपणा नसतो, यामुळें असणारा गर्भाशयाचा विकार, रजःस्राव बंद झाला म्हणजे या वयांत जाचक होतो. तरुणपणांत ज्या स्त्रीनें व पतीनें, योग्य तऱ्हेची काळजी बाळगली आहे, औषधोपचार केले आहेत. अशा स्त्रियांचें म्हातारपण सुखाचें जातें.

( १ ) वृद्धपणांत कोणचेंही काम फार थकवा न येईल. मनाला त्रास न होईल, असें केले पाहिजे; मन नेहमीं उल्हासित राहील, अशा तऱ्हेनें घरांतील मंडळीनीं वागलें पाहिजे.

( २ ) अन्नामध्यें फेरफार करावा. चहा, कॉफी, या वयांत पिऊं नये. सात्विक अहार ठेवावा. परंतु ह्या गोष्टी तरुणपणाच्या वागणुकीवर सर्वस्वी अवलंबून असतात.

( ३ ) उघड्या हवेंत व्यायाम घ्यावा. चालतां येत नसेल, अंग स्थूल असेल तर मोटारनें फिरून यावें. मलावरोध असेल, तर तो दूर करण्याकरितां एनीमा घ्यावा अगर कोमट पाणी झोपतेवेळीं घ्यावें. औषध घ्यावयाचें असल्यास त्रिफळाचूर्ण २ ते ३ चमचे गरम पाण्यांतून झोपतेवेळीं घ्यावें. कांहीं स्त्रियांमध्यें २–३ दिवस सारखें शौचास होत नाहीं त्यांनीं पॅरफीन लिक्वीड घ्यावें.

( ३ ) घाम फार येत असेल त्यांनीं, पाठीला थंड पाण्याच्या घड्या ठेवाव्यात, व समुद्रस्नान करावें, अगर आंवा, सुंठ, राख एकत्र मिळवून अंगांस चोळावीं.

( ५ ) वृद्धावस्थेंत अशक्ततेमुळें स्वभाव चिरचिरा बनलेला असल्यामुळें सुनबाई काय करते, आपल्या मुलांबरोबर गुलगुल गोष्टी कशा करिते वगैरे क्षुद्र गोष्टींकडे पहाण्याचा कल क्षुद्र वृत्तीच्या स्त्रिया करित असतात अशा वर्तनापासून फायदा न होतां उलट मनाला त्रास होत असतो; शिवाय मजा अशी होते कीं, आजच्या सुनबाई पुढें मागें सासुबाई होणार असल्यामुळें आपल्याला

होणाऱ्या त्रासाचें उट्टें ती आपल्या सुनबाईवर काढीत असते, अशा प्रकारें बीज वाढत असतें. तेव्हां प्रत्येक सासुबाईनें व सुनबाईनें आनंदानें व समाधानांत रहावें.

ईश्वराच्या कथा, पुराण कीर्तनें ऐकावींत, व संसारांतील मन काढून तें पती सेवेकडे व ईश्वराकडे लावावें तरच आयुष्य सुखावे जाईल हें सांगावयास नकोच.

# प्रकरण २४ वें.

—:o:—

## विवाहीत स्त्रीपुरुषांची वागणूक

समाजाच्या स्वास्थ्याकरितां विवाहीत स्त्रीपुरुषांनीं कशाप्रकारें वागलें पाहिजे, याची माहिती पुष्कळांना नसते. विवाहिक जीवन सुखाचें जाण्याकरितां, मुलांचे अवडंबर वाढूं नेय व चैन तर चालू रहावी अशाकरितां निरनिराळे मार्ग निघत आहेत, व या मार्गांचा प्रसार दोन्ही बाजूंचा विचार न करतां आमचे-कांहीं समाज-सुधारक लोक नानाप्रकारें दुबळ्या तरुण लोकांवर लादत आहेत, असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. **खाना पिना और मजा करना**, हें तत्व आर्यसंस्कृतीचें नसून, पाश्चात्यांचें आहे. पाश्चात्यांची प्रत्येक गोष्ट आरंभीं फायद्याची दिसली, तरी परवशता वाढवणारी आहे, हें प्रत्येक स्त्रीपुरुषानें जाणून आपला मार्ग आंखणें सुविचाराचें आहे. आपल्या जीवनाला, आपल्या अस्तित्वाला, आधारभूत असलेलें शुक्र, याचा व्यय वाटेल तसा केला तर शरिरावर परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. शुक्र अगर वीर्य (Semen) याचें महत्व, प्रत्येक वैद्यकाला माहित आहे. वीर्याबद्दल, भावप्रकाशकार ह्मणतात “ शुक्र हें स्फटिकासारखें, स्वच्छ, तेजस्वी, पातळ, ओशट, मधुर व वासही मधुर असून प्रजोत्पादन करणारें असतें हें बल व पुष्टि करणारें असून गर्भोत्पादक आहे, व जिवाचा आश्रय असें त्याला दुसरें नांव आहे. वीर्याबद्दल डॉ. गार्डनर काय ह्मणतात तें पहा:—

"The sperm is the purest extract of blood." Nature in creating it has intended it not only to communicate life but also to nourish the individual life. In fact the reabsorption of the fecundating liquid impresses upon the entire economy, new energy, and a virility which contributes to the prolongation of life.

यावरून वीर्याची योग्यता किती आहे, हें सूज्ञांच्या ध्यानांत येईल. जननेंद्रियांचा उपयोग किती प्रमाणांत केला पाहिजे, यालासुद्धां नियम आहे. **विवाह झाला म्हणजे स्त्रीसंयोग केलाच पाहिजे, हें एक रोज खाणेंपिणें ज्याप्रमाणें आपण करतों, त्याप्रमाणें एक कृत्य आहे, असें समजणें चुकीचें होईल.** शहरांत रहाणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषांची, भूक, चव, वागणूक, त्याचप्रमाणें इंद्रियांचीं कार्येंही बदललेलीं आहेत. जननेंद्रियांचीं कामें काय याचा विचार करतांना आपल्याला पशु व प्राणीमात्रांकडे वळलें पाहिजे मनुष्य अगर प्राणी जगांत आला त्याचा नाश केव्हां तरी ठरलेलाच आहे. उत्पत्ति जर ठरलेली आहे तर त्याबरोबर नाशही ठरलेला आहे. ही उत्पत्ति कशी होते, याचा विचार आपण करूं.

स्त्रीअंडांत असणाऱ्या बीजांची वाढ व पूर्णावस्था, ही ठराविक कालीं होत असते. मासे, पक्षी, हे आपलीं अंडीं वर्षांतून एकदां बाहेर टाकतात. हा काल, प्रत्येक प्राणीमात्रांमध्यें निराळा असून ठराविक असतो, व या ठराविक कालांतच नर व मादी यांचा संयोग होऊन, प्रजोत्पादन होत असतें.

( १ ) प्रजोत्पादन याचा उद्देश जीं मरण पावतात, त्यांची जागा पुन: भरून काढण्याकरितां होय.

( २ ) मनुष्याखेरीज इतर प्राणीमात्रांत प्रजोत्पादनाचा ठराविक काल असतो; व तो काल समजण्याचें ज्ञान त्यांना असतें

( ३ ) स्त्री बीजें ज्यावेळीं पक्क होऊन बाहेर पडतात त्याचवेळीं नराचा संयोग झाला तर गर्भधारणा होते. स्त्रियांमध्यें रज:स्वला झाल्यानंतर कामेच्छा वाढलेली असते. व हीच वेळा नेहमीं, गर्भधारणेकरितां प्रशस्त मानलेली आहे.

प्राणीमात्र हा नियम नेहमीं पाळत असतात व यामुळें त्यांचा एकदां झालेला संबंध सहसा फुकट जात नाहीं असें आढळून येतें. सुधारणेमुळें, मनुष्य प्राण्यांची स्थिती अगदीं बदललेली आहे. निरनिराळ्या चटकदार, प्रेमविषयक कादंबऱ्या, स्त्रियांची मोहक चित्रें, सिनेमा वगैरे कारणानें इंद्रियांची चेतनशक्ति वाढून अकाळीं वीर्यपात करण्याची संवय जडलेली आढळून येते. ज्यांची कामेच्छा वाढलेली असते, ज्यांना स्त्रीसंयोगाशिवाय चैन पडत नाहीं त्यांनीं हें आयुष्य कमी करण्याचें व समाजांवर एक प्रकारचें संकट आहे असें समजलें पाहिजे.

आपले शास्त्रीय ग्रंथ पाहिलें असतां, वंश चालू ठेवणें हा एक विवाहाचा मूळ उद्देश आहे; परंतु हा उद्देश कितपत राखला जात आहे? चहा व मसालेदार पदार्थ यांचा मज्जातंतूवर कसा परिणाम होतो, हें मागें सांगितलेलेंच आहे. अशा प्रकारच्या पदार्थांनीं अवेळीं इच्छा वाढून वीर्यपात होण्यास मदत होते. कांहीं पुरुषांची अशी समजूत असते कीं, रोज स्त्रीसंयोग केला पाहिजे, व हें आपलें कर्तव्य आहे असें ते समजत असतात. परंतु या कामांत जी व्यक्ति नियमीतपणा पाळणार नाहीं तिच्यावर अनिष्ट परिणाम मागें पुढें झाल्याशिवाय रहात नाहीं. याचा विचार करूं लागलें म्हणजे दोष पतीवर येतोच. आरंभीं विवाहीत स्त्री पुरुषांना अंगांत ताकद असतें म्हणून कांहीं वाटत नाहीं, व त्याचें परिणाम मदांध झालेल्या तरुणाला दिसत नाहींत. मज्जातंतूंची उत्तेजक शक्ति वारंवार वाढवल्यानें त्याचप्रमाणें वीर्याचें स्खलन केल्यानें, शरिरावर हळुहळु परिणाम होत असतो. लग्न होईपर्यंत ब्रह्मचर्य ज्या स्त्री पुरुषांनीं पाळलें आहे, अशांचें लग्न झाल्यानंतर, प्रत्येक रात्र विलास करण्यांत जाऊं लागली, तर स्त्रीपेक्षा पुरुषांवर त्याचा परिणाम जास्त झालेला आढळतो. तरुण स्त्रीपुरुष, भूक लागली असतां जसें जेवतों, त्याप्रमाणेंच हें आहे असें समजून वागत असतात, व शेवटीं ज्यावेळीं ताप, उष्णता, अग्निमांद्य, मलावरोध, कमर दुखणें, ही लक्षणें होतात व वैद्य अगर डॉक्टरकडे जाण्याची पाळी येते, त्यावेळीं, हें आपल्याच कर्मामुळें झालें आहे, याची जाणीव होते. एखादा मल्ल, आपले स्नायु मजबूत होण्याकरितां, व्यायाम घेतो, व दंड मजबूत करतो, त्याचप्रमाणें स्त्रीसंयोग फाजील केल्यामुळें आपली शक्ति वाढेल अशी चुकीची परंतु प्रामाणिक समजूत कित्येकांची असते. स्त्रीसंयोग करतांना प्रत्येकवेळीं मज्जातंतूंना धक्का पोंचत असतो, वीर्याचा नाश होत असतो, व त्याचा इतर इंद्रियांना परिणाम भोगावा लागतो; यामुळें कांहीं

दिवसांनीं म्हातारपणांची चिन्हें दिसूं लागतात, व जननेंद्रियांचे विकार हळुहळु सुरूं होतात.

**विषयासक्तीचे परिणाम:**—अग्निमांद्य, नेहमीं कांहीं ना कांहीं तरी तक्रार असणें, आपल्याला कांहीं तरी होत आहे असें वाटणें, डोक्यांमध्यें एकसारखे विचार चालणें, एकाग्रता न होणें, कोणी बोललें असतां सहन न होणें, स्वप्नावस्था, स्त्रीचा स्पर्श अगर तो विचार आला असतां वीर्यपात होणें, काम करण्याबद्दल आळस वाटणें, कडकी, अशक्तता, वाढत जाणें, ही लक्षणें होतात.

मनुष्यांचें वीर्य जसजसें क्षीण होत जातें, तशी त्याची इच्छा वाढत जाते, व याचा परिणाम शेवटीं क्षयासारख्या विकारांत होतो.

**क्षयाचीं कारणें:**—बाहेरख्याली व विवाहीत लोक जे अतिशय स्त्रीसंग करतात, त्यांना क्षय होतो. आनुवंशिकपणा हेंही क्षयाचें कारण जरी मानण्यांत आलेलें आहे, तरी आजकालचे पुष्कळ तरुण स्त्री पुरुष, अकालीं वीर्यपात करून क्षयानें मरण पावलेले आढळतात.

वृद्ध मनुष्यांच्या तरुणपणांतल्या वागणुकीमुळें, प्रोस्टेट ग्रंथी वाढतात, व त्यामुळें लघ्वीचा नेहमीं त्रास होत असतो. पुरुषांच्या प्रकृतिवर परिणाम होतो, त्याप्रमाणें स्त्रियांवरही होतो.

प्रत्येक विवाहीत तरुण पुरुषानें स्वतःची बायको केवळ विलासाचें साधन आहे असें समजूं नये. स्त्रियांना प्रेमाची जरूरी असते. तुम्हीं ज्याप्रमाणें संवय लावाल त्याप्रमाणें त्या मागचा पुढचा विचार न करतां वागत असतात. अविवाहीत स्त्रियांमध्यें, वाईट मार्गाला लावणारा जर कोणी असेल तर तो पुरुषच होय, असें आढळून येतें कामविकार ही चीज अशी आहे कीं तुम्हांला तिच्यावर ताबाही ठेवतां येतो व ती स्वैरही सोडतां येते.

स्त्रियांमध्यें अतिशय संयोगामुळें पुढील विकार होतात. पाळीच्या वेळीं रक्त फार जाणें, कष्टार्तव, पाळी नियमित न देणें, प्रदर, गर्भपात, गर्भस्राव, गर्भाशयाचें तोंड वांकडें होणें, गर्भाशयाच्या आंत क्षत होणें, हीं लक्षणें होतात. परंतु आपली चूक कोणी कबूल करीत नाहीं. व हिला काम फार पडतें, सर्दींत थंड पाण्यांत वावरल्यामुळें ही आजारी आहे, अशा प्रकारचीं कारणें सांगण्यांत येतात

गर्भपात, गर्भस्राव, अकालीं प्रसूति, बाळंतपणा, त्यामध्यें प्रत्येक पुरुषानें ब्रह्मचर्य पाळलें पाहिजे.

ज्या स्त्रीला गर्भपाताची संवय लागली आहे तिनें जर १ वर्षपर्यंत ब्रह्मचर्य पाळलें नाहीं, तर वारंवार त्याच महिन्यांत गर्भपात झाल्याचीं उदाहरणें पुष्कळ आढळतात. नवरा औषधपाणी करीत असतो, व नशिबाला दोष लावीत असतो. खरें पाहिलें असतां, वारंवार होणाऱ्या गर्भपातांवरून गर्भाशयाला, ९ महिन्यांचा गर्भ आंत राहण्याची ताकद नाहीं हें सिद्ध होत नाहीं काय ? गर्भाशयाचें स्नायु अशक्त झाल्यामुळें गर्भाशयाचें संकोचन ज्याप्रमाणें व्हावें त्याप्रमाणें होत नाहीं; यामुळें पुनः गर्भस्थापना होण्यास वेळ लागत नाहीं. औषधाबरोबर ब्रह्मचर्य पाळलें पाहिजे तें कोणी पाळावें ? अशा स्थितींत ज्या पतीकडून ब्रह्मचर्य पाळलें जात नाहीं, त्यांनीं मोठमोठ्या डॉक्टरांची कितीही औषधें घेतली तरी कांहीं फायदा होणार नाहीं हें पूर्ण लक्षांत ठेवावें.

कांहीं विवाहीत स्त्रीपुरुष ह्मणत असतात कीं, आम्ही अजूनपर्यंत ब्रह्मचर्य पाळलें असतां आतां जो विवाह केला तो ब्रह्मचर्य पाळण्याकरितां कीं काय ? ही अनिवार इच्छा वारंवार होण्याचें कारण मलावरोध होय. मलावरोध दूर केला म्हणजे अकालीं होणारी कामेच्छा कमी होते, ( मलावरोधामुळें कसा परिणाम होतो हें मागें सांगितलेंच आहे ) परंतु त्याबरोबर पत्नीची इच्छा आहे किंवा नाहीं याचा विचार करावयास नको काय ? डॉ. मेरी स्टोपस आपल्या ( Married love ) पुस्तकांत लिहितात, प्रत्येक पुरुष संयोगासमयीं, आपल्या पत्नीचा विचार घेत नाहीं व आपली इच्छा पूर्ण झाली, ह्मणजे तिच्याकडे ढुंकूनही पहात नाहीं. ज्यावेळीं पतीची इच्छा पुरी होते, त्यावेळीं स्त्रीची इच्छा जागृत होते, व त्यावेळीं ती पूर्ण न झाल्यामुळें स्त्रियांना पाळीच्या वेळीं पोटांत दुखणें वगैरे विकार होतात, असें त्यांनीं स्पष्ट ह्मटलेलें आहे; शिवाय स्त्रियांमध्यें ही इच्छा केव्हां केव्हां जागृत असते, याचें कोष्टकही त्यांनीं दिलेलें आहे, व त्यावरून आपल्या मुनींनीं जे कांहीं दिवस वर्ज्य सांगितले आहेत, ते किती बरोबर आहेत याची खात्री पटते.

या कामीं पुरुष जातीपेक्षां पशु किती तरी सूज्ञ आहेत असेंच ह्मणावें लागेल. समाज-सुधारक या कामीं नियम नसावेत असें प्रतिपादन करीत असतात. रानटी लोक असतात ते गरोदरपणांत स्त्रीसंयोग करीत नाहींत; फार काय, एक आफ्रिकन जात आहे. ती मूल अंगावर दूध पीत आहे, तोंपर्यंत संयोग करणें लाजिरवाणें समजते. ज्या मुलखांत गरोदरपणांत स्त्रीसंयोग करणें

ह्मणजे जन्माला येणाऱ्या मुलाची हेळसांड करणें समजतात; परंतु कित्येक सुधारणावादी याचा कांहीं विचार करीत नाहींत. मेडीज व पर्शीयन यांचा असा कडक कायदा होता कीं, गरोदर अगर बाळंत झालेल्या स्त्रीशीं संयोग करणाऱ्या पुरुषाला पाठीवर १०० फटके व दंड करण्यांत येत असे. वरील उदाहरणांवरून सुधारणावादी समजणारे आह्मी लोक जगाच्या मागें किती आहोंत हें सिद्ध होतें.

गरोदरावस्थेंत अगर बाळंतपणांत स्त्रीसंयोग करणें शास्त्रीयदृष्ट्या अनिष्ट आहे. मज्जातंतूच्या उत्तेजनानें, गर्भाला पोषण होणारें रक्त निराळ्या कामीं खर्च होत असतें, व यामुळें प्रसूतिच्या वेळीं व गर्भावर परिणाम होतो. गरोदरपणांत सहाजिकच स्त्रियांना इच्छा नसते, तेव्हां यांत मार्ग कोणचा काढावा हा प्रश्न शिल्लक रहातो.

ब्रह्मचर्य पाळलें पाहिजे, मनामध्यें इंद्रिय विषयक विचार येऊं न दिले, तर ताबा मिळवतां येतो. आपल्याला एकदां सत्य समजून आलें कीं, अशा स्थितींत संयोग करणें गर्भाला व बाईला घातुक आहे, तर त्यांच्या सुखाकडे न पहातां, आपण स्वार्थाच्या दृष्टीनें तिकडे दुर्लक्ष करणें योग्य होईल काय?

यासंबंधीं, डॉक्टरांचीं भिन्न मतें आहेत, कांहींनीं ४ ते ६ महिनेपर्यंत संयोग करावा असेंहि सांगितलें आहे, व कांहींनीं त्यांच्या उलट लिहिलेलं आहे.

कांहीं स्त्रियांमध्यें पुरुष समागमापासून एक प्रकारची भीति उत्पन्न होते त्याचा शारीरिक व मानसिक परिणाम त्यांना आयुष्यभर भोगावा लागतो. ब्रह्मचर्य पाळणें मनुष्याला कांहीं कठीण नाहीं, ब्रह्मचर्य पाळणारानें, उत्तेजक खाणें पिणें व इंद्रियविषयक विचार वर्ज्य करून मन इतर व्यवसायांत गुंतवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

संतति नियमन ( Birth Control ) मुलें होऊं नयेत ह्मणून अलिकडे कांहीं कृत्रिम आधुनिक साधनें अमलांत येत आहेत, व तीं पुरवण्याचा मक्ता मुंबईमधील एका प्रोफेसरसाहेबांनीं घेतलेला आहे. ह्या प्रश्नाचा शारिरीक व नैतिक दृष्ट्या विचार केला पाहिजे.

फाजील संततीमुळें गरीबी वाढत आहे, व जिला दरवर्षीं मुलें होत असतात त्या स्त्रीची प्रकृति बिघडते, तिला क्षयासारखे विकार होतात, तेव्हां वरील मार्ग सोईचा आहे, अशा प्रकारची विसारसरणी आपल्यापुढें मांडण्यांत येते; पण

निसर्गाच्या क्रियेला विरोध केल्याचा परिणाम शारिरीक व मानसिक दृष्टीनें सुखावह न होतां हानिकारकच होतो ही गोष्ट त्याबरोबर लक्षांत ठेवली पाहिजे.

गर्भ उत्पन्न होण्यास पुरुषाचें वीर्य व स्त्रीबीजांची जरूरी लागते. यांचा संबंध होतांच, गर्भधारण होते, त्यांमध्यें जीव असतो व अशा कित्येक जीवांची हत्या आपल्या हातून होईल, याचा विचार करावा. व अशा तऱ्हेच्या अपूर्णावस्थेंत असणाऱ्या बीजांचा प्राण घेणें योग्य आहे काय ? मुल मारणें पाप आहे काय ? अर्धवट ज्याचा जन्म झाला आहे, त्याचा नाश करणें, खुनीपणाचें कृत्य नव्हे काय ? अशा प्रकारचें पाप डोक्यावर घेण्यास कोणाची तयारी आहे काय ? किंवा आपण जें करतों तें बरोबर करतों असें सदसद्विवेक बुद्धीला पटतें आहेना ? विचारांती अशा बीजापासून होणाऱ्या भावी संततीचा आपण कसा खून करीत आहोंत, हें आपोआप सिद्ध होतें; ह्मणून कृत्रिम उपायाच्या वेळीं स्त्रियांनीं नवऱ्याच्या पाशवी इच्छेला बळी पडतां कामा नये. पाश्चात्य राष्ट्रांत अशामुळेंच काडीमोडीचे खटले कोर्टांत येत असतात. हिंदुस्थानांत स्थिती उलट आहे. येथें पतीच्या प्रत्येक इच्छेला पत्नीनें मान दिला पाहिजे. स्त्रिया सुशिक्षित होत आहेत, व हा प्रश्न कालानुसार पुढें सुटेलच. संतति नियमन करतांना पुरुषांचा वीर्य क्षय होईल, स्त्रियांना गर्भाशयाचे व्रण ( Cancer ) होतील, व वीर्यक्षयामुळें फुप्फुस क्षयासारखें विकार होऊन प्रौढ विधवांची संख्या वाढेल याचा कोणी विचार केला काय आहे ? संतति नियमनाचा प्रश्न प्रत्येक कौटुंबिक डॉक्टर व वैद्य याजकडे सोंपविला पाहिजे. डॉक्टर वैद्यांसारखा योग्य सल्ला दुसरा कोणी देणार नाहीं; शिवाय आपल्यांतील किती स्त्रिया हा मार्ग आचरण्याचा प्रयत्न करतील ? तर याला उत्तर ह्मणजे मनावर ताबा व ब्रह्मचर्य पाळणें हें होय. रोज स्त्रीसंयोग करणाराला त्यापासून समाधान न होतां उलट त्रास होईल. याकरितां महिन्यांतून २-३ वेळांपेक्षां जास्त स्त्रीसंयोग करण्यानें अपाय होईल. इंद्रिय विषयवासना तृप्त करणें. हें आपल्या धर्माचें ध्येय नसून पाश्चात्याचें आहे, परंतु अशा प्रकारचें रहाणें फार कठीण आहे, असें ह्मणणारे पुष्कळ आढळतात. ज्यांना हा नियम पाळतां येत नाहीं, त्यांनीं खुशाल औषधें घ्यावींत, आपलें शरीर रोगी बनवावें, व प्रत्येक साथीला आजारी पडावें. स्त्रीपुरुषांनीं एका बिछान्यावर न निजतां स्वतंत्र निजावें. **एकत्र निजणें केव्हांहि आरोग्य दृष्ट्या वाईट आहे,** व शिवाय स्वतंत्र निजल्यानें मनोविकार उद्दीपन होण्यास अशा प्रकारें आळा

पडतो. संतति नियमनासंबंधीं डॉ. गार्डनर ह्मणतात " It is undeniable that all the methods employed to prevent pregnancy are physically inqurious. " वीर्यासंबंधीं आरंभीं आर्यवैद्यकांचें व पाश्चात्यांचे एक मत कसें आहे हें दाखविलेलेंच आहे. आज पुष्कळ तरुण व शोकीन मंडळी कामवासना तृप्त करण्याकरितां नानाप्रकारचीं उत्तेजक औषधें, पेयें घेतात, व जीवनशक्तिचा क्षय करून घेतात. ही जीवनशक्ती ज्या विवाहित जोडप्यांनीं शाबुद ठेवलेली आहे त्यांचे दिवस सुखाचे जातात, व त्यांनाच संसारांत स्वार्थ व परमार्थ साधतां येतो.

---

# प्रकरण २५ वें

## बालहत्या व गर्भपात

—:o:—

बालहत्या व गर्भपात या दोन्हीं गोष्टी हिंदुस्थानांतील प्रत्येक व्यक्तीच्या वाचण्यांत व पाहण्यांत येतात. ज्या स्त्रिया विधवा असतात; ज्यांना अकाली वैधव्य आलेलें असतें अशा दुर्दैवी स्त्रिया, पुरुषांच्या पाशवी विकारांस, त्याचप्रमाणें स्वतःची कामवासना तृप्त करण्यास बळी पडत असतात. स्त्रीच्या पोटांत अपूर्णावस्थेंत गर्भ असतां त्याचा नाश करण्याकरितां नानाप्रकारच्या औषधोपचारांनीं त्याचा प्राण घेणें, हा शारिरीक, नैतिक दृष्ट्या व ईश्वराच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा गुन्हा आहे. औषधोपचारानें गुन्हा जिरला गेला, गर्भपात झाला तर अब्रु शाबीत राहून 'समाजांत उजळत्या तोंडानें मिरवतां येतें अशा तऱ्हेची दुर्दैवी बालकें पंढरपूरच्या वाळवंटांत म्युनिसीपालिटीच्या कचऱ्याच्या पेटींत पडलेलीं आढळतात. वा समाजा ! अशा तऱ्हेच्या कृतीनें हिंदुधर्माचा मोठेपणा, त्याचें तेज कायम ठेवणार काय ? अशा तऱ्हेचें अत्याचार आम्हाला डोळ्यानें पहातांना लाज वाटू नयेना ? पाश्चात्य लोक यावर टीका करतात तें बरोबर नव्हे काय ? शिवाय अशा तऱ्हेचा कोणचा समाज अगर देश उदयास येणार आहे ? पंढरपूरला प्रार्थना समाजानें चालविलेलें अनाथाश्रम खरोखर

भूषणास्पद आहे. सुशिक्षीत समाजाकडून जोंपर्यंत विधवा विवाहाला मान्यता मिळत नाहीं, तोंपर्यंत वांकडे पाऊल पडणाऱ्या स्त्रीला गर्भपाताला उद्युक्त होऊं न देतां, अशा दुर्दैवी बालकांची जोपासना आश्रमाकडेच करण्याची व्यवस्था करावी. धंदेवाईक डॉक्टर वर्गांना अशा प्रकारच्या औषधांची माहिती विचारण्याकरितां पुष्कळ लोक येत असतात व त्यावेळीं कायदा भयंकर असल्यामुळें व सद्विवेक बुद्धिला तो मार्ग पटत नसल्यामुळें कोणीही औषध देण्यास प्रवृत्त होत नाहीं, व शेवटीं ती दुर्दैवी स्त्री, रस्त्यांवर बसणाऱ्या वैदु स्त्रियांकडून जालीम उपायानें हत्या करून घेतें. या स्त्रिया अशा कामांत एक्सपर्ट असतात व अशा संबंधीचा फायदा घेऊन पैसा वाटेल तसा उकळित असतात. दुर्दैवी स्त्रीच्या पोटांत असलेल्या अज्ञानी बालकाचा प्राण त्याचा कांहीं अपराध नसतां, आपल्याकडून घेतला जावा, ही गोष्ट प्रत्येकाच्या मनावर शहारे आणणारी नाहीं काय ? दुर्दैवी समाजा, हिंदुधर्माचे, श्रेष्ठत्व अशा कर्मांनींच लयाला जात आहे. विधवा स्त्रियांचा, पुनर्विवाह शास्त्रानें विषिद्ध ठरवला आहे. त्यांनीं लग्न करूं नये, ज्यांच्याशीं एकदां आपलें तनमन धन अर्पण झालें, अशा पतीशीं आजन्म जिवंत असेंपर्यंत एकनिष्ट रहावे, हें तत्व चांगलें नाहीं असें कोण म्हणेल ? शिवाय विधवाविवाहासंबंधीं एका डॉक्टरचें असें म्हणणें आहे कीं, अशा स्त्रीपासून होणारीं मुलें, पहिल्या पतीसारखीं दिसतात, व हेंहीं एक कारण असावें असें मानण्यास हरकत नाहीं. विधवाविवाहाचा प्रश्न उद्भवण्यास कालाचाही बदल झालेला आहे. एकत्र कौटुंबिक पद्धति मोडल्यामुळें तरुण व तरुणी स्वतंत्र रहात असल्यामुळें, स्त्रीशिक्षणाचा प्रसार, मनावर बिंबविण्यांत आलेलें स्वतंत्र विचार, ह्या हल्लींच्या सर्व गोष्टींचा, पूर्वीच्या व हल्लींच्या परिस्थितीशीं विचार केला पाहिजे. पुर्नविवाह, उच्च जाती समजल्या जाणाऱ्यांमध्यें रूढ नाहीं. ज्या स्त्रीला आपल्या मनांवर ताबा राखतां येत नाहीं, अशा स्त्रीला समाजानें हेटाळणी न करतां लग्नाला परवानगी दिली तर आपल्या धर्माला धक्का बसेल अशी शंका बाळगणारांना, पुनर्विवाह करून देणें हें बाळहत्या व गर्भपात यापेक्षां उत्तम नाहीं काय ? एकपत्नी व्रत व एकपती व्रत आजन्म पाळणारीं स्त्रीपुरुषें समाजाला केंव्हांही आदर्शभूत होत असतात, व अशा तऱ्हेनें पुर्नविवाह करणाऱ्यांचा दर्जा समाजामध्यें कमी दर्जाचा ठरतो, परंतु कोणचीही सुधारणा आरंभीं कडु भासते, व अंगवळणीं पडली म्हणजे त्यांचे मनाला कांहीं वाटत नाहीं. कांहीं वर्षां-

पूर्वी होणारे पुनर्विवाह याबद्दल जर सूक्ष्म दृष्टिनें समाजाकडे नजर टाकली तर हा फरक सहजच दिसून येतो.

आईला ३।४ महिनें गेले असतां गर्भाची हालचाल कळते, व अशा वेळीं मूल पाडण्याकरितां जीं औषधें देण्याची योजना करतात त्याला बालहत्या ( Infanticide ) म्हणतात. १–२ महिनेच गेले असल्यास त्याला गर्भपात म्हणतात. ( Abortion ) आपल्या पोटांत वास करणाऱ्या मुलाला कोणत्या स्त्रीला तें पाडून टाकावें असें वाटत असेल ? पण अब्रूसाठीं विधवा स्त्रिया अशा प्रकारची कृत्यें करण्यास उद्युक्त होतात. अशा प्रकारची कृत्यें आजच नवीन होत नसून, मागेंही ह्या गोष्टी चालत असत, हें खालील वर्णनांवरून आढळून येईल.

रोमन्स, मेडिज, कॅनेनीटस, बेबीलोनीयनस, ह्यांच्यामध्यें बालहत्या करण्याची चाल होती. चीन लोकसुद्धां रस्त्यांवर मुलें टाकून देत असत, आज चीनमध्यें अशा तऱ्हेच्या मुलांची जोपासना करण्याकरितां हॉस्पिटल्स निघालेलीं आहेत. दक्षिण अमेरिकेंत ओव्हीडो म्हणून जात आहे. मुलें होऊन शरीर बिघडून जाऊं नये म्हणून बालहत्या करणें त्यांस कांहीं वाटत नसे. पॅराम्बीयन म्हणून जात आहे, ती १ मुलांपेक्षां जास्त मुलें झाल्यास मारून टाकित असत. उत्तर अमेरिकेमध्यें इन्डियन स्त्रिया पहिला मुलगा १० वर्षांचा होईपर्यंत मध्यंतरीं जीं मुलें होतील तीं मारून टाकीत असत.

मॅडागॅसकार बेटांमधील लोक अशुभ अशा दिवसांवर मुलांचा जन्म झाला तर मारून टाकितात. पूर्वकालिन राष्ट्राच्या चालींचा निष्कर्ष काढला म्हणजे असें आढळतें कीं, मुलांचा त्रास कमी व्हावा व तीं बेताचीं असावीं असें त्यांना वाटत असे. व हीच विचारसरणी आज निराळ्या तऱ्हेनें शास्त्रीय तत्वांला चिकटून पुढें येत आहे. ओघानें जी पुनर्विवाहाची विचारसरणी आरंभीं मांडण्यांत आली, तिचा उद्देश व आजच्या सुशिक्षीत समाज पुढाऱ्यांचे विचार जनतेला कळावेत, या हेतूनेंच मांडण्यांत आले आहेत.

बालहत्या व गर्भपात यांचीं कारणें:—वांकडे पाऊल पडणें ( २ ) गर्भपाताचा त्रास ( ३ ) प्रवासांत जातांना अडचण नसावी. यांच्या मुळाशीं कारण म्हणजे विषयवासना हें होय, व मूल जोपर्यंत पोटांत हाललेले समजत नाहीं,

तोंपर्यंत गर्भपात करणें म्हणजे आपण जीव घेत नाहीं वगैरे कल्पना बाळगणें चुकीचें होय. हा गर्भपात नानाप्रकारच्या दाहक औषधांनीं करण्यांत येतो, त्यामुळें याचा परिणाम मुलांवर त्याचप्रमाणें स्त्रीच्या प्रकृतीवरही होतो. प्रसूतीच्या वेळीं जितका त्रास होत नाहीं, त्याच्या शतपटीनें यामध्यें त्रास होतो. गर्भाशयाला चिकटणारी गर्भाची आवरणें सुटून जाणें, म्हणजे अपक्व गुलाबाची कळी बळजबरीनें उघडणें होय; गर्भाचीं आवरणें रक्तवाहिन्या तुटतात; कळा प्राणांतिक येतात, व रक्तस्राव कांहीं केले तरी लवकर बंद होत नाहीं, व आईच्या मनांवर होणारा परिणाम सर्व आयुष्यभर त्रास देत असतो, शिवाय कांहींना कांहीं तरी आजार मागें लागतोच. पुष्कळ वेळां अशा प्रयोगामध्यें मरणच येण्याचा संभव असतो. १ गर्भपाताचें दुःख १० प्रसूतिबरोबर आहे. एक नामांकित डॉक्टर म्हणतातः—

The efforts to avoid propagation are ten-thousand fold more disastrous to the health and constitution, to say nothing of the demoralization of mind and heart, which cannot be estimated by red cheeks or physical vigour

दुसरी गोष्ट अशी आहे कीं हे गर्भपाताचे प्रयोग नेहमींच सिद्धीस जातात असें नाहीं, यासंबंधीं कसे परिणाम होतात, हें अमेरिकेंत घडलेल्या खालील गोष्टीवरून आढळून येईल. एका बाईला मुलें बरींच झालेलीं होती, व आतां मुलांची जरूरी नव्हती. परंतु तिच्या दुर्दैवानें गर्भावस्था प्राप्त झाली. हें टाळण्याकरितां ती गर्भपात तज्ज्ञाकडे गेली. तज्ज्ञानें, एक प्रकारच्या हत्यारानें प्रयत्न केला परंतु यश न येतां शेवटीं, ही गरोदरच नसावी असें मत पडून त्यानें तिला जाण्यास सांगितलें. ९ महिन्यानंतर रितसर मुलगा झाला परंतु मुलाचा डोळा गेलेला होता, मेंदूला व्रण झाला होता, यामुळें तें मूल कांहीं दिवसांनी वेडें आहे असें सिद्ध झालें. कित्येक वेळां असें पहाण्यांत येतें कीं मूल १ वर्षाचें आई अशक्त, व बाळंतपणांतून उठलेली असल्यामुळें मूल होणें, अगर गरोदरावस्था रहाणें, साहजिकच नकोसें वाटणार हें उघड आहे. मूल अंगावर दूध पीत असतां, स्त्रियांना कामवासना नेहमीं उत्पन्न होत असते, ह्मणून त्याचा फायदा घेऊन पुरुषानें अशा वेळीं समागम केल्यास गर्भाशयांचे अपूर्ण

संकोचामुळें बहुधा पुन्हा गर्भधारणा होते. अशा वेळीं, नुकत्याच बाळंत झालेल्या, मूल अंगावर पित असलेल्या आईची स्थिती कशी असते पहा; तिला तें मूल नकोसें होतें, त्याचा द्वेष वाटावयास लागतो, मनावर परिणाम झाल्यामुळें अन्नावरील इच्छा नाहींशी होते, अशक्तता जास्त येते अर्थात्च याचा सहाजीकच गर्भावर परिणाम होऊन गर्भ अशक्त होतो. अशा तऱ्हेनें नको असणारें मूल जन्माला आल्याबरोबर तें अशक्त, किडकोडींत, रडकें असलें तर दोष कोणाचा ? याकरितांच गर्भवती स्त्रीला चांगल्या प्रकारें वागवून तिच्या मनाला समाधान होईल, अशा प्रकारची वर्तणूक तिच्याशीं ठेविली पाहिजे. पण या शास्त्राधाराचा उद्देश न कळल्यामुळें अशा प्रकारचीं मुलें, जन्माला येतांच तीं त्रास देतात; रात्रंदिवस आईबापांना त्रास देऊन जाग्रण करीत असतात व शेवटीं अल्पायु होऊन मातापितरांना छळून परलोकीं जातात तेव्हां हा दोष कोणाचा, याचा आईबापांनींच विचार करावा. मनोविकार ताब्यांत ठेवितां येत नाहींत, ते अशा प्रकारचे मार्ग शोधित असतात व शेवटीं पश्चात्ताप पावतात. याला मार्ग कोणचा त्याचा विचार करूं. बाळहत्या, गर्भपात, या सारख्या गोष्टी समाजांतून, जाणें ह्मणजे सुदिनच समजला पाहिजे. फॅशनला लोलुप झालेल्या स्त्रीनें जीव म्हणजे काय, जीवांचे महत्व काय, आपण निरपराधी बालकांचे ज्यापैकीं एखादें बालक. राष्ट्रोद्धार अगर समाज सुधारणावादी होणारें असूं शकेल अशा बालकांचे खून करीत नाहीं काय, असा प्रत्येक विवाहीत स्त्रीनें विचार करावा अंगावर मूल जोंपर्यंत दूधपीत आहे, तोंपर्यंत समागम करूं नये. व पतीनेंही अशासंबंधीं खबरदारी घ्यावी. मूल मारण्याकरितां होणारें उपाय दोघांच्या प्रकृतीला अपायकारक असतात.

पुरुषजातीचा विचार केला, तर आपल्याला ४०-४५ वर्षांचें आपण जरी झालों, मुलें झालेलीं असलीं, २-३ बायका मेल्या असल्या तरी बायकोशिवाय चैन पडत नाहीं, व पुनः आपण विवाहाला उद्युक्त होतों, ही आपली स्वार्थी दृष्टि नव्हे काय ? पुरुष जातीची जर ही गोष्ट आहे, तर ज्या स्त्रीला, १४-१५ वें वर्ष लागलें नाहीं, अगर पतीसुख जिनें पाहिलें नाहीं, अशा स्त्रीला जन्मभर ब्रह्मचर्य पाळण्याची सक्ति कितपत शक्य आहे याचा वाचकांनीं विचार करावा. विधवा स्त्री झाली, म्हणजे भाऊ, बहीण, भावाची बायको तिला, कम नशिबाची कमी दर्जाची लेखत असतात, व पांढऱ्यापायांची म्हणून हिणवीत

असतात. **सुज्ञांनीं असा विचार करावा, कीं कोणच्या आर्यस्त्रीला, आपला नवरा मरावा व लोकांनीं पाडून बोलावें अशी इच्छा असेल ?**

निसर्गाच्या नियमाप्रमाणें, अशा स्त्रियांमध्यें कामवासना जाग्रत होत असते, व ही शमविण्याकरितां मग कितीही कमी दर्जाची व्यक्ति असो, त्यांकडून आपले मनोविकार त्या शमन करतांना आढळतात, व हा गुपचुपीचा परिणाम गर्भावस्थेंत होतो. विवाहित स्त्रियांमध्यें मुलें होत नाहींत, व विधवा स्त्रीयांना हटकून मुलें होतात, त्यांचीं कारणें काय आहेत, याचा उहापोह पुढील प्रकरणांत येईल.

थोडक्यांत असें म्हणता येईल कीं, गर्भावस्था होण्याला ज्या कारणांचा अभाव विवाहीत स्त्रियामध्यें आढळतो ती कारणें विधवा स्त्रियामध्यें तयार असतात. समाजामध्यें राहणारांना अशी उदाहरणें नेहमीं आढळतात व त्यांचा परिणाम बालहत्य', गर्भपात यामध्यें होतो. ज्या स्त्रीला ब्रह्मचर्य पाळणें शक्य असेल, त्यांचें तेज, त्यांचीं वागणूक, समाजाला उदाहरण देण्यास आदर्शभूत होते, परंतु अशा स्त्रिया आपल्याला किती आढळतील ? तेव्हां अशांचा विवाह करून देणें व हे अनाचाराचे मार्ग बंद करणें योग्य नव्हे काय ? परंतु—कालावरच सर्व अवलंबून आहे, व कालच हें सर्व ठरवील असें अनुभवानें ह्मणावें लागेल.

---


## शक्ति वाढवणारीं औषधें

**पुर्णेंदुरस:**—मज्जातंतु शिथीलता, अशक्तता यांवर १ तोळा किं. १२ रुपये.
**पूर्णचंद्रोदय:**— ... ... ... ४० रुपये.
**नागाच्या गोळ्या:**— ... ... १ तोळा ६ रुपये.
**सुवर्णराज वंगेश्वर:**— ... ... १ तोळा ६ रुपये.
**धातुपौष्टिक गोळ्या:**— ... ... बा. किं. १ रु.

**द. कृ. सांडू ब्रदर्स,**
**आर्यौषधी कारखाना, चेंबूर, मुंबई नं. २**

# प्रकरण २६ वें.

—:o:—

## गर्भधारणा

मुलांची आवड कोणाला नसते ? तर सर्वांना असते असेंच ह्मणतां येईल. मुलें असलीं म्हणजे घरांत शोभा असते, संसार सुखाचा वाटतो, व बोबड्या बोलांनीं श्रमांचा परिहार होतो. मूल होणें अगर न होणें, हें ईश्वराच्या आधीन आहे. ज्याला मुलें हवींशी वाटतात, ज्यांच्या घरांत अपार संपत्ति असते, पैसा खर्च कसा करावा, यांचीच चिंता असते, आपला वंश कायम रहावा, संसार आनंदाचा व्हावा, ह्मणून एखादें मूल असावें अशी स्वाभाविक इच्छा असते; परंतु ईश्वरी संकेत असा आहे कीं, त्यांना तो मुलें द्यावयाचा नाहीं तर ज्यांच्या घरांत अठरा विश्वे दारिद्र्य आहे, पगार पोटापुरताच मिळून संसार कसा तरी ढकलत चालला आहे, या महिन्याची गांठ पुढल्या महिन्याला पडण्याची पंचाईत अशा लोकांना मात्र भरपूर मुलें देत असतो. ईश्वराला आपण दोष देणें चुकीचे आहे, आपण जन्म घेतांना पूर्वजन्मार्जित पापपुण्याचे गठडें बरोबर आणित असतों, व त्यांचें फल या जन्मांत भोगावयास मिळतें, व या जन्मांत बरें वाईट करूं त्याप्रमाणें पुढील जन्मांत फळ मिळतें, ही गोष्ट अक्षरशः अनुभवानें खरी ठरलेली आहे ही गोष्ट खोटी ह्मणावी, तर आपल्याला एकाच वेळीं जन्मणारीं मुलें, एकच ठिकाणीं रहाणारे लोक, कोणी दुःखी, कोणी सुखी असे कां आढळतात ? सर्वांची स्थिती सारखी कां नाहीं, तर याला समाधानकारक उत्तर ह्मणजे **पूर्वकर्म** असेंच ह्मणणें ओघानें प्राप्त होतें. ही झाली वेदान्ताची भाषा, आपल्याला ही भाषा दुःखांत सुख देणारी आहे ह्मणून तिचें वर्णन करण्यांत आलें. आतां शास्त्रीयदृष्ट्या मुलें न होण्यास काय कारणें असावी याचा विचार करूं. मुलें होण्याचा प्रश्न केव्हां उद्भवतो ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. लग्न होऊन बरेच दिवस झालेले आहेत, वयही उतार होत चाललें आहे अशावेळीं मूल नाहीं ह्मणून मनाला वाईट वाटतें; जीला ४-५ मुलें झालेलीं आहेत, तिलाहि जास्त मुलें असण्याचा कंटाळा आलेला असतो. मुलें चांगली अगर वाईट हा प्रश्न जरी बाजूला ठेवला तरी उतारवयांत, सर्व प्रकारची

सुखें प्राप्त असतां, घरांमध्यें गोजिरवाणें मूल नाहीं, याचा मनावर अत्यंत वाईट परिणाम होतो. प्रत्येकाला मूल व्हावें अशी इच्छा नैसर्गिकच असते. स्त्रियांचा स्वभाव आपण लहानपणांपासून पाहिला, तर जात्याच त्यांना मुलांची आवड असते. लहान मुली कपड्यांच्या अगर कचकड्यांच्या बाहुल्यांवर नानाप्रकारचे अलंकार घालून त्या मढवीत असल्याचें पाहण्यांत येतें, व हीच आवड लग्न झाल्यानंतर मुलांच्या पुढील आवडीच्या रूपानें दृगोचर होत असते.

आपलें इतकें वय झालें तरी मूल कां होत नाहीं, याची माहिती कोणाच्याही नसते. शेजारणीचें मूल पाहिल्याबरोबर आपल्याला मूल नाहीं याची मनांत खंती वाटते, व याकरितां नानाप्रकारें अशा स्त्रिया नवस देवीला, देवाला करीत असतात. बायकांचा स्वभाव जात्याच संशयी असल्यामुळें आपल्यास आतां मूल होत नाहीं म्हणून पती दुसऱ्या स्त्रीशीं लग्न करील किंवा काय ही भिती त्यांच्या मनांत नेहमीं वास करीत असते. तरुण स्त्रियांना कुमारिका असतांना जी स्वतःच्या इंद्रियांच्या कार्यांची माहिती पाहिजे असते, त्याचें ज्ञान मुळींच नसल्यामुळें आरंभीं महिन्याची पाळी बरोबर येते किंवा नाहीं इकडे लक्ष नसतें. मूल जन्माला येणें, गर्भ स्थापना होणें, म्हणजे काय, तर पुरुषांच्या वीर्यजंतूचा व स्त्रीच्या बीजाचा संबंध झाला पाहिजे, हें जोंपर्यंत होत नाहीं तोंपर्यंत गर्भधारणा होणें शक्य नाहीं. अतिखाणें व +++ जाणें, हें ज्याप्रमाणें आहे, त्याचप्रमाणें अतिशय स्त्रीसंयोग करणेंही चांगलें नाहीं. तारुण्यांत वीर्यपतन जास्त झालें असल्यास त्याचा परिणाम भावी आयुष्यांवर होतो. स्वतःच्या समाधानीकरतां पुष्कळ स्त्रीसंयोग करीत असतात, त्यावेळीं स्वतःच्या स्त्रीचा विचार मनांत घेतला जात नाहीं, यामुळें कार्य व्हावें तसें होत नाहीं. जननेंद्रियांचा फाजील उपयोग केल्यास त्याचा अनिष्ट परिणाम परस्परांना भोगावा लगतो.

संतति न होण्यास पुढील कारणें आहेत. जन्मताच इंद्रियामध्यें असणारे व्यंग. इंद्रिय, गर्भाशय, स्त्रीअंड, बीजवाहकनलिका. त्याचप्रमाणें पुरुषांमध्यें, शिश्न, शुक्रवाहकनलिका, यांमध्यें कांहीं रोगामुळें होणारे फेरफार, हीं होत. याचे स्थूलदृष्ट्या ४ भेद होतात. ( १ ) स्थानिक ( २ ) स्त्रीचें प्रकृतिमध्यें बिघाड असणें ( ३ ) नवऱ्यांच्या प्रकृतींत बिघाड असणें ( ४ ) अतिशय स्त्रीसंयोग ( ५ ) शारिरीक व्यंग, ( ६ ) अंगांत चरबी असणें.

वर दिलेलीं कारणें स्थूलदृष्ट्या दिलेलीं आहेत. या विषयाचा उहापोह बारकाईनें करणें शक्य नसल्यामुळें, साधारण कल्पना यावी, याच हेतूनें हें

प्रकरण लिहिण्यांत आलेलें आहे. जे पुरुष नेहमीं स्त्रीसंयोग करतात, त्यांच्या वीर्यामधील शक्ति कमी होते, व त्यामुळें अशांपासून गर्भ धारणा झाल्यास, गर्भाची वाढ ३-४ महिन्यांपुरतींच होऊन, गर्भस्राव, गर्भपात यासारखे विकार होतात. मागील प्रकरणांत, स्त्रीसंभोगाच्यावेळीं, ज्या गोष्टींची आवश्यकता सांगितली आहे ती नेहमीं संयोग करणारांमध्यें आढळत नाहीं. कित्येकवेळां पुरुषांचें वीर्यजंतू योनीमधील स्रावांमध्यें मरून जातात, यामुळें गर्भधारणा होत नाहीं. वीर्यामध्यें, एक प्रकारचा जंतू आहे, ज्या जंतूच्या आस्तित्वावरच गर्भधारणा होते. हा जंतू ४०-४० वर्षांपर्यंत आस्तित्वांत नसतो, व या कित्येकांमध्यें उतारवयांत उत्पन्न होतो, हें आपल्याला उतारवयांत कांहीं लोकांना मुलें होतात यावरून आढळून येतें. स्त्रीला दर महिन्याला रजःस्राव साफ होणें यांवर सर्व अवलंबून आहे. भूमि जर शुद्ध नसेल तर तेथें बीज कसें रुजणार; हें उघड आहे. शिवाय लग्नाच्या वेळीं आद्य अंत्य, मध्य नाडी म्हणून वधूवरांची प्रकृति जुळवितांना पहाण्यांत येतात. ह्या नाड्या इंद्रियांची कमी जास्ती उंची दाखवितात. स्त्रियांच्यामध्यें, प्रदर, गर्भाशयाचें मुख आडवें होणें, श्वेतप्रदर, वगैरे विकार असले तर गर्भाशयामध्यें अशक्तता येते, व यामुळें पुरुषबीजाचें आकर्षण ज्याप्रमाणें व्हावें, त्याप्रमाणें होत नाहीं. पुरुषांमध्यें उपदंश, प्रमेह, धातुविकार, कडकी, हे विकार असल्यास वीर्यामध्यें पातळपणा येऊन तें गर्भधारणा करण्यास नालायक असतें. स्थूल शरिर, मेद, चरबी अंगामध्यें झाल्यास, संभोगाच्यावेळीं, प्रतिबंध होतोच जिला पाळी येत नाहीं, तिच्या स्त्री अंडांमध्यें चरबी उत्पन्न होते, आर्तव बाहेर न गेल्यास तें शुद्ध रक्तांत मिनून नानाप्रकारचे रोग होतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, परस्परांच्या इंद्रियांची तपासणी, पुरुष व स्त्री डॉक्टरकडून घेऊन त्यांवर कांहीं महिने, औषध घेऊन, ब्रह्मचर्य पाळलें पाहिजे. ईश्वराची आराधना केली पाहिजे, व आपल्या स्वतःच्या डॉक्टरजवळ लपवून न ठेवतां जें होतें तें सांगितलें पाहिजे. ह्या गोष्टी विश्वासाच्या आहेत, व त्या विश्वासानें व गुप्तपणानेंच पार पाडल्या पाहिजेत प्रजोत्पादन करणें हें शास्त्र आहे; परंतु इच्छा नसतां परस्पर पतीपत्नीची प्रकृति चांगली असतां ज्यांना दरवर्षी मुलें होत आहेत, त्यांना या शास्त्रांची किंमत न वाटणें साहजिकच आहे अशा प्रकारची माहिती मांडणें अगर देणें याला कायदा आड येत असल्यामुळें, स्थूलदृष्ट्या शक्य तेवढी माहिती खालीलप्रमाणें देण्यांत येत आहे

संतति होण्यांस वैद्यकीय शास्त्रदृष्ट्या खालील गोष्टींची आवश्यकता असतें. (१) वैयक्तिक शक्ति ( Individual electricity. ) ( २ ) रसायनीक शक्ति ( Chemical electricity. ) ( ३ ) घर्षणांमुळें होणारी शक्ति ( Frictional electricity. )

प्रत्येक मनुष्याचा प्राणी या दृष्टिनें विचार केला म्हणजे प्रत्येकांमध्यें स्वतःची अशी अदृश शक्ति असते. ह्या शक्तिच्या जोरांवर दुसऱ्याच्या मनावर ताबा मिळवतां येतो. ह्या शक्तिची वाढ कमीजास्ती होणें हें ज्याच्या त्याच्या नैतिक आचरणांवर अवलंबून असतें. मेस्मरीझम करणारा इसम ज्याचें मन दुर्बळ आहे, त्याच्यावरच आपला अंमल गाजवूं शकतो व आपल्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास भाग पाडतो. सभेंमध्यें भाषण करणारे पुष्कळ असतात, परंतु त्यामध्यें एखाद्याचीच छाप श्रोत्यांवर पडत असते. वैयक्तिक शक्तिचें उदाहरण घ्यावयाचें ह्मणजे आपले परम पुज्य पुढारी **महात्मा गांधी** हे होत.

शरिर प्रकृति नाजूक असली तरी अंतरांमध्यें वास्तव्य करणारी शक्ति सर्व जगांवर कशी छाप पाडूं शकते, हें **महात्मा गांधींकडे** पाहिलें असतां कळून येते. अशाचप्रमाणें प्रत्येकांमध्यें थोडी बहुत शक्ति तीन प्रकारें प्रदर्शित करतां येते. स्पर्श, दृष्टि व प्रकृति.

स्त्रीपुरुष एकत्र झालें असतां परस्परांमध्यें असणारी शक्ति जागृत होते व ह्यामुळेंच आलिंगनानें परस्परांना एक प्रकारचें सौख्य वाटत असतें. ही शक्ति परस्परांमध्यें भिन्न असेल तर त्याचा परिणाम चांगला होतो. विद्युत प्रवाह सुरु करावयाचा असला तर पॉझीटीव्ह व नीगेटीव्ह तारांची योजना करावी लागते, त्याचप्रमाणें स्त्रीपुरुषांचे आहे.

**रसायनिक शक्तिः**—( Chemical-Electricity ) असिड व अलकलीन पदार्थांचा उपयोग झाला म्हणजे विद्युत शक्ति उत्पन्न होत असते. योनीमध्यें होणारा स्राव क्षारयुक्त ( Alkali ) असतो. पुरुषांच्या मधून वाहणारें वीर्य अम्ल ( Acid ) असतें. स्त्रीपुरुष संयोग होतांना व गर्भधारणेला या दोन्ही गोष्टींची अनुकूलता पाहिजे असतें. यांचा एकाच वेळीं संबंध येतो त्याच वेळीं गर्भधारणा होते व परस्परांना समाधान वाटतें.

**घर्षणानें होणारी शक्तिः**—( Frictional Electricity ) हातांवर हात चोळला असतां, हात गरम होतात हें प्रत्येकाला ठाऊक आहेच; त्याचप्रमाणें पुरुषांचे इंद्रिय व स्त्रियांमध्यें असणारी योनी यांचे घर्षण झाल्यामुळें एक प्रकारची शक्ति उत्पन्न होत असतें.

गर्भधारणा होण्यास परस्परांची सम्मति, गर्भाशयाचे मुख व पुरुषांचे इद्रिय, यांचा संबंध शिवाय वरील तिन्ही गोष्टींची आवश्यकता असते, ह्या सर्वांचा एकाचवेळीं योग घडून येतो त्याचवेळीं संतति होते.

---

# प्रकरण २७ वें

## स्त्रियांचे कांहीं रोग व चिकित्सा

आपल्या शहरांत रहाणाऱ्या हिंदु समाजांची स्थिती पाहिली तर आरोग्यानें सुखी अशी कुटुंबें थोडीं आढळतील. कांहींना कांहींतरी रोग प्रत्येकाला असतोच. अजूनपर्यंतच्या वर्णनांवरून सामाजिक चालीचा शरिर प्रकृतींवर कसा परिणाम होतो, हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. आपल्या स्त्रिया नेहमीं कां आजारी असतात, त्यांना नेहमीं रोग काय असतात, यांचेंच फक्त विवरण करण्याचा विचार आहे. या लेखमालेचें धोरण आरोग्यशास्त्र हें असल्यामुळें यामधील रोगांची विचारसरणी अस्तित्वांत असलेल्या पुस्तकापेक्षां भिन्न असणार हे उघड आहे पुष्कळ कुमारिका, स्त्रिया, यांना रजोदर्शनांचे महत्व न कळल्यामुळें बेफिकीर असतात व त्याचा परिणाम, गर्भाशयाचे, स्त्री अंडांचे रोग होऊन भोगावा लागतो. पहिलीं २–३ वर्षें या बाबतींत विशेष काळजी बाळगली पाहिजे, याकरितां स्राव कमी होत आहे, पोटांत दुखतें किंवा काय वगैरे पाळीच्या वेळीं होणाऱ्या लक्षणांकडे आरंभापासून आईबापांनींही लक्ष ठेविलें पाहिजे.

दुसरें कारण अतिशय पुरुष समागम, विवाहीत स्त्रियांमध्यें व कुमारिकांमध्यें मुष्टिमैथुन, श्वेतप्रदर, विषयवासनासंबंधीं विचार, यामुळें सुद्धां वरील विकार होण्याचा संभव असतो.

( ३ ) मलावरोध, वेळच्यावेळीं शौचाला न जाणें, ही वाईट खोड असते. मलावरोधाची संवय, ज्या स्त्रियांना काम नसतें, ऐषआरामांत रहाण्याची व पिष्टमय तेलकट पदार्थ खाण्यांची संवय असते, अशांना असते. रोज सकाळीं उठल्याबरोबर, प्रथम शौचाला गेलें पाहिजे आरंभीं संवय नसतांना त्रास होईल, परंतु अशा प्रकारची संवय ठेवावी. पहांटेच्या सुमारास ४–५ कप पाणी, व रात्रीं झोंपतेवेळीं ४–५ कप पाणी पिण्यानें शौचाला साफ होण्यास मदत होते. मलावरोधामुळें मलाच्या दाबामुळें ओटींतील इंद्रियांमध्यें रक्ताधिक्य होतें, शौचाला कुथतांना जोर करावा लागतो. आंतड्यामध्यें मलाचे खडे झाले असल्यास, गर्भाशय व स्त्रीअंड यांच्या स्नायुवर ताबा पडतो, व यामुळें तीं इंद्रियें स्थानच्युत होण्याचा संभव असतो.

( ४ ) साधारण दुखणें झाल्यास, औषध घेणें ही अत्यंत वाईट संवय आहे. शौचासाठीं व अन्नपचन होण्यास वारंवार औषध घेतल्यामुळें औषधांची संवय जडून परस्वाधीन जीणें होऊन जातें.

( ५ ) कमर घट्ट करणें, यासंबंधीं शरिरशास्त्राची माहिती लक्षांत घेतली पाहिजे. यकृत, प्लीहा, पंक्तिआश्च, आमांशय, हीं जवळजवळ एका रेषेंत असतात. मोठ्या आंतड्यांचा मधला भाग हाही आमांशयाच्या जरा खालीं असतो. मूत्रपिंड, यकृताच्या खालीं आंतल्या बाजूस असतात. ओटींजवळच्या भागांत ह्मणजे बेंबीच्या खालीं लहान आंतडीं, मूत्राशय, गुदाशय, प्रोस्टेटग्रंथी ही असतात. यावरून महत्वांची अशी यकृतादि इंद्रियें, कमरेच्या जवळच येतात, व ही एक प्रकारच्या बंधनांनीं ( अंतत्वचेच्या घड्या होऊन बनलेलीं ) राहिलेलीं असतात. कमर घट्ट आंवळून नेसल्यानें, उरोदरपटल जो असतो, त्याच्या हालचालीमध्यें व्यत्यय येतो, हीं इंद्रियें, दाबलीं जातात, यामुळें त्यांच्या कार्यांत सहाजिकच व्यत्यय येतो, यामुळें कमर बारीक व पोट पुढें आलेलें अशी स्थिती होते. उंच टांचाचे बूट वापरणें, यामुळें सुद्धां कमरेमध्यें अशक्तपणा येतो. परंतु फॅशन पुढें शरिराच्या सौंदर्याची पर्वा बाळगणारांना, हा उपदेश न रुचला तर आश्चर्य मानण्याची जरूरी नाहीं. जननेंद्रियांचे सर्व विकार स्त्रीअंड व गर्भाशय यामध्यें होणाऱ्या रक्ताधिक्यामुळें होतात. स्त्रीअंडांच्या ठिकाणीं दुखणें, पाठींत दुखणें व या मज्जातंतूच्या परिवर्तनामुळें इतर भागांतही दुखूं लागतें.

गर्भाशयाचे विकार ज्यांना असतात, अशा स्त्रियांनीं पाळीच्या वेळीं विश्रांती घेतली पाहिजे. ज्या विश्रांती घेणार नाहींत त्यांचें भावी आयुष्य, रोगांत गेलें तर दूषण कोणास देऊं नये. विटाळशी बाईनें ४ दिवस विश्रांती घ्यावी व दूर बसावें, ही हिंदुधर्माची चालू असलेली रीती किती शास्त्रानुसार आहे हें सूज्ञ सुशिक्षीत स्त्रियांच्या ध्यानीं येईलच. आमांशय, आंतडीं, स्थानच्यूत झालेलीं असतील त्यांनीं पोटावर कपडा बांधावा.

**योनीमार्गाचा दाह**—( Vaginitis ) पुरुषांना ज्याप्रमाणें लघ्वींतून पुप्रमेहामुळें जातो, त्याचप्रमाणें स्त्रियांमध्यें, इंद्रियांच्या अंतत्वचेचा दाह झाल्यामुळें पुवांसारखा स्राव जातो सूज, ताप, लघ्वीची व त्या भागाची आग, रंग हिरवट, अशा प्रकारचीं लक्षणें होतात, मुष्टिमैथुन, गर्भाशयांच्या आंत दाहक औषधें लावणें, मैथून अगर उपदंश हीं कारणें होत.

**चिकित्सा:**—त्रिफळ्याचा काढा ४ चमचे २ औंस गरम पाणी यांमध्यें मिळवून डुश दिला असतां दाह कमी होतो. किंवा पोटॅश परमॅंगनेट (१–५००) यानें धुतलें असतां कार्य होतें.

**योनीमुखाशीं होणारा शूळ:**—( Vaginismus ) इंद्रियमुखाचा दाह झाल्यामुळें एक प्रकारची पीडा उत्पन्न होते, व ही पीडा राहून राहून होत असते. इंद्रियमार्गाचा दाह, अंतःत्वचा कोरडी पडणें, मूत्रमार्गाच्या ठिकाणीं लहान ग्रंथी उत्पन्न होणें, भगंदर, हिस्टेरीया, जननेंद्रियांच्या ठिकाणीं खरूज हीं कारणें होत. खाज, आग व एकप्रकारची वेदना होत असते व त्यामुळें जीव कंटाळल्यासारखा वाटतो. ही खाज गर्भाशयांपर्यंत वाढत गेली तर पुवांसारखा स्राव होऊं लागतो वरीलप्रमाणें डुश रोज घ्यावा व बाहेर जंतुनाशक मलम लावावें. ( केरबॉलीक सोपचा उपयोग करुं नये. )

**गर्भाशयांचा दाह:**—( Inflammation of the womb ) पाठीमध्यें दुखणें, बेंबीच्या खालीं दुखणें, हातानें ओटीच्या ठिकाणीं दाबलें असतां नरमपणा भासणें, पोट जड वाटणें अगर आंत कोणी ओढतें आहे असें वाटणें, लघ्वीला वारंवार होणें, श्वेतप्रदर, डोकें दुखणें व अशक्तता हीं लक्षणें होतात. फाजील मैथुन, गर्भप्रतिबंधक इलाज, लुगडीं वगैरे घट्ट नेसणें, गर्भपात, बाळंतपणांत विश्रांती न घेतां, घरकामांत लागणें, प्रसूतिच्या वेळीं गर्भाशयाच्या मानेजवळ इजा होणें, इंद्रियाच्या माथभागाचा दाह, ही कारणें होत.

प्रसूति अवस्थेंत शिथील झालेला गर्भाशय पूर्व स्थितीवर यावा, ह्मणून पोटावर घड्या बांधीत असतात, या घड्या चांगल्या प्रकारें बांधल्या गेल्या नाहींत, व गर्भाशयाचें पूर्ण संकोचन होऊन पूर्व स्थितीवर तो आला नाहीं, तर दाह होण्याचा संभव असतो. आजची परिस्थिती आपण पाहिली ह्मणजे नव्या तरुण स्त्रीयांमध्यें हीच स्थिती आढळतें. **बाळंत झाल्यानंतर निदान एक वर्षभर स्त्रीनें विश्रांती घेतली पाहिजे, व पुरुष समागम मूल अंगावर पीत आहे तोंपर्यंत होऊं नये असा निसर्गाचा नियम असल्यामुळें व हा नियम आमच्याकडून पाळला जात नसल्यामुळें प्रथमच प्रसवती झालेल्या स्त्रिया बाळंतरोग, क्षय यानें मृत्यूच्या मुखीं पडत असतात** तेव्हां सुज्ञ पतीनें घरांत जर वडील मंडळी नसली, तर खाणावळीचा रस्ता एक वर्ष धरावा ह्मणजे पतीचे व लहान बालकांचें आरोग्य राखल्याचें व संसार आनंदांत चालवण्याचें श्रेय मिळेल यांत शंका नाहीं.

**चिकित्सा:**—या विकारांवर बाळंतकाढा दशमुलारिष्ट वगैरे आयुर्वेदिक औषधें आहेत. परंतु सुज्ञ अशा वैद्य अगर स्त्री डॉक्टरकडून तपासून घेऊन नंतर औषध घेणें.

रोगांचीं लक्षणें सुरूं झालीं, ह्मणजे आपल्याला काय झालें हें ,समजावें याकरितांच मुद्दाम ह्या रोगांचा समावेश या प्रकरणांत केलेला आहे.

**नष्टार्तव:**—पाळी न येणें ( Amenorrhoea ) निरोगी अवस्थेंत होणारा रजःस्राव दर २८ व्या दिवशीं झाला पाहिजे. साधारणतः वय १२ ते १४ वर्षं झालें ह्मणजे रजःस्राव होण्यास सुरुवात होते. कित्येक तरुण स्त्रीयांमध्यें १८-१९ वर्षं जरी झालें तरी स्राव येत नाहीं, तर कित्येकामध्यें अगोदरच स्राव सुरू होतो, व नंतर बंद होतो. हा स्राव कां बंद होतो व मुळींच येत नाहीं यासंबंधीं पुष्कळ कारणें आहेत. ताप, अशक्तता, श्वेतप्रदर यामध्यें स्राव होण्याचें बंद होते. पाळी नियमीत येणें, यांवर सर्व गोष्टी अवलंबून आहेत, परंतु इतर वर दिलेल्या कारणांचा, बंदोबस्त झाल्याशिवाय पाळी येणें शक्य नाहीं, परंतु ही गोष्ट पुष्कळांना कळत नसते, व यामुळें, अशा प्रकारची मंडळी, पाळी यावी म्हणून, नानाप्रकारच्या औषधांचा उपयोग करतात, व त्याचा परिणाम स्त्रीयांना भोगावा लागतो. ज्यांना पाळी येत नाहीं, अशा

कांहीं स्त्रियांमध्यें नाक, त्वचा व पोट यांमधून नियमीत रक्तस्राव होत असतो. स्त्री अंड, गर्भाशय, अगर योनीमार्ग, यांमध्यें अडथळा त्यांना आल्यास स्राव होत नाहीं.

**लक्षणें:**—दर महिन्यास, ओटींमध्यें कळा, दुखावा, व बैचन होतें, ४–५ दिवसानंतर हीं लक्षणें हळुहळु कमी होतात.

**चिकित्सा:**—ज्यावेळीं अशा प्रकारचीं लक्षणें होतात, त्याचें कारण शोधून औषधोपचार केला पाहिजे. पौष्टिक, पचण्याला हलकें, व्यायाम, उघड्या हवेंत सहल करणें, हें उपाय करावेत. रात्रीं झोंपतांना बेंबीच्या खालचा भाग, तेल लावून पाण्यानें शेकावा. हा शेक १५ मिनीटेंपर्यंत घ्यावा नंतर थंड पाण्यांत फ्लानेलचा फडका भिजवून त्यांमधील पाणी काढून तो अर्धवट सुका करून बेंबीवर बांधावा. हा कपडा कमरेभोंवती २–४ वेळां गुंडाळतां येईल इतका लांब असावा. सकाळीं काढून टाकावा, नंतर टॉवेल थंड पाण्यांत भिजवून तो भाग त्यानें जरा मर्दन करावा. दिवसा सुका फ्लानेलचा कपडा बांधावा. याप्रमाणें पाळी येईपर्यंत केल्यास ही व्यथा दूर होण्यास मदत होते; त्याचप्रमाणें अगदीं गरम पाण्यांत ( १०० ते १०४ उष्णतामान ) पाय बुडवून ठेवलें असतां ओटींमध्यें रुधिराभिसरण वाढून फायदा होतो.

**अति आर्तव जाणें:**—( Menorrhoegia ) या स्थितींमध्यें पाळीच्या वेळीं पुष्कळ विटाळ जातो, लुगडीं रक्तानें भिजून जातात, गर्भाशयामध्यें खुरपल्यासारखें वाटतें, डोकें दुखतें, चैन पडत नाहीं, अंगांतील रक्त कमी झाल्यामुळें अशक्तपणा वाढतो, कमर गळल्यासारखी होते, चक्कर येते भूक लागत नाहीं, व पांडुरतां येतें. ३–४ महिन्यांचा गर्भपात अगर गर्भस्राव झाला ह्मणजे सुद्धां अशा प्रकारची स्थिती होते. पुष्कळ बायका लाजेनें हा विकार पतीला त्याच प्रमाणें डॉक्टरला सांगत नाहींत व याच विकारानें मृत्युमुखीं पडतात.

**चिकित्सा:**—विटाळ सुरु झाला ह्मणजे स्वस्थ पडून राहिलें पाहिजे. गरम पाण्याचा एनिमा, योनीद्वारें दिला पाहिजे, ह्मणजे स्राव बंद होण्यास मदत होते नष्टार्तवमध्यें सांगितल्याप्रमाणें, पाळी पुन: येईपर्यंत उपचार करावेत. गर्भाशयांमध्यें कांहीं ग्रंथीची वाढ झाल्यास स्राव कांहीं केल्या बंद होत नाहीं अशा वेळीं डॉक्टरला आणून उपचार करावेत. बेंबीच्या खालीं बर्फाची पिशवी ठेवावी. तांदुळाची अगर साबुदाण्याची पेज, दूध, मोसंबीचा

रस याप्रमाणें आहार ठेवावा. भाकरी, चपाती सारखें जड अन्न खाऊं नये. मैथुन वर्ज्य करून ब्रह्मचर्य पालन करावें.

**पाळीच्या वेळीं पोटांत दुखणें:**—यांत पाळीच्या वेळीं पोटांत दुखतें, स्राव साधारण दिसला असा होतो, स्राव फक्त पहिल्या दिवशीं होतो व तीनही दिवस बंद रहातो; किंवा स्राव चार दिवस होतो, परंतु कळा अत्यंत लागतात. स्त्री अंडांचा दाह, गर्भाशयामध्यें रक्ताधिक्य, गर्भाशयाचे परिवर्तन, गांठ वगैरे पुष्कळ कारणें आहेत.

पोटांत दुखूं लागेल त्यावेळीं, कमरे खालचा भाग गरम पाण्यांत बुडवून, ओटीचा भाग चोळला असतां फायदा होतो. पाण्याची पिशवी अगर बाटलीनें कमरेचा भाग व ओटीचा भाग शेकला असतां कळा कमी होतात. इलेक्ट्रीसीटी, रेडीयम या ट्रीटमेंटनें फायदा होतो. आयुर्वेदांतील प्रताप लंकेश्वर मात्रा सकाळ सायंकाळीं आल्याचा रस व खडीसाखर यांमधून घेतली असतां पुष्कळ आराम वाटल्यांचीं उदाहरणें आढळतात. परंतु कोणचेंही औषध देतांना तपासणी करून देणें चांगलें.

**स्त्री अंडाचा दाह**—( Ovarianirritation ) वंक्षण संधीच्या ठिकाणीं दुखणें. चालतांना, उभें रहातांना कळ येणें. राहून राहून कळा वाटणें, ही लक्षणें होतात. पाळीच्या वेळीं हींच चिन्हें वाढतात, थंडीताप येतो, व स्त्रीअंडांच्या ठिकाणीं सूज येतें. मुष्टिमैथून, पाळीच्या वेळीं थंडपाणी पिणें अगर, स्नान करणें, प्रेमाची निराशा, लग्न मोडणें, गर्भपात, मलावरोध, गर्भाशयामध्यें स्थित्यंतर होणें, अफूची संवय व संतति प्रतिबंधक उपाय हीं कारणें होत. चिकीत्सेच्या दृष्टिनें विचार केला तर या इंद्रियांमध्यें रक्ताधिक्य झालेलें असतें, आंतडी ढिलीं झालेलीं असतात, म्हणून विश्रांती घेतली पाहिजे, मलावरोध दूर केला पाहिजे, चितस्थिर, व शरिर प्रकृति सुधारेल अशा प्रकारें तज्ज्ञांकडून औषधांची योजना झाली पाहिजे. स्त्रीअंडाचा दाह जास्त वाढल्यास पुढीलप्रमाणें लक्षणें होतात. दोन्हीं मांड्यांत दुखणें, व कळा पायापर्यंत वाढतात. पाळीच्या वेळीं ज्या बाजूला दाह असेल त्या बाजूच्या स्तनांत दुखावा होतो, शौचाला होतांना त्रास होतो, बेचैनपणा, उलटी व थोडा तापही येतो. पाळीमध्यें थंड पाण्याचें स्नान करणें म्हणजे इंद्रियाला इजा करणें होय. दुखण्याच्या ठिकाणीं शेक करावा, डुश घ्यावा.

**वायुगोळा:**—( Cellulitis ) गर्भाशयांच्या अंतरत्वचेमधील दाहा-मुळें गर्भाशयाचें संकोचन होऊन जो शूळ उत्पन्न होतो, त्याला वायुगोळा ह्मणतात. थंडी भरून ताप येणें, ओटींमध्यें कळा येणें, उलटी, मळमळ, लघ्वीला जातांना कळा मारणें. शौचाच्या वेळीं त्रास होणें, व रक्तस्राव जास्त होणें हीं लक्षणें होतात; एखादे वेळीं हें रक्त आंतल्या आंत सांचून मूत्राशय अगर आंतडीं या ठिकाणीं गळूं उत्पन्न होतात. गर्भाशयाच्या संकोचनामुळें त्याचें स्थान बदलण्याचा संभव असतो. ( Displacement ) प्रसूति, गर्भ-पात, गर्भाशयाचा दाह, थंड पाण्याचें स्नान, गर्भाशयाच्या तोंडाला दाहक औषधें लावणें, प्रमेह अतिमैथुन, व पेसरी या कारणांमुळें हा शूळ उत्पन्न होतो. प्रतापलंकेश्वर, एक्स्ट्रॅक्ट अर्गट, यांचा चांगला उपयोग होतो.

**फलबीज वाहक नलिकांचा दाह:**—( Salpintes ) हा विकार नवऱ्यांला पू प्रमेह, उपदंश, हा विकार झाल्यास संयोगामुळें स्त्रीला होतो. डॉक्टरला दाखवून चिकित्सा करणें चांगलें.

**गर्भाशय बाहेर येणें:**—( Prolapsus of the uterus ) मूत्राशय व गुदद्वार या ठिकाणीं आग होणें, पाठ तोडल्यासारखीं वाटणें हीं लक्षणें चालतांना व उभें राहिले असतां वाढणें स्राव जास्त होणें व होतांना कळा मारणें, श्वेतप्रदर, डोकें दुखणें, घाबरेपणा, कोणचेंही काम करण्यास निरुत्साह वाटणें, मलावरोध व अशक्तता वाटते एखादे वेळीं गर्भाशय आंतल्या आंत उलटा होतो व शस्त्रक्रियेची जरूरी लागते. नाच, ( Dancing ) कमर घट्ट करणें, रज:स्वला असतांना थंड पाण्याचे स्नान करणें, मुष्टिमैथुन, जड ओझें उचलणें, प्रसूतीच्या वेळीं हलगर्जीपणा, मूल बाहेर येण्याच्या वेळीं इंद्रिय व गुदद्वारमधील ( Perineum ) भाग फाटणें, अगर स्थानिक विकार हीं कारणें होत. गर्भाशयाच्या स्थान बदलण्यांवर निरनिराळीं नांवें आहेत व जवळ जवळ वरील प्रमाणेंच लक्षणें कमी ज्यास्ती होतात. पाठीमागें जर गर्भाशय वळला असेल, तर कमरेंत सारखें दुखणें सुरूं असतें, त्याला बाह्य इलाज कांहीं केला तरी कमी होत नाहीं. पुढच्या बाजूला असेल तर वारंवार लघ्वीला होणें, व ओटींमध्यें कळा हीं लक्षणें होत असतात.

**चिकित्सा:**—सूज्ञ शस्त्रवैद्याकडून गर्भाशय मूळ स्थितींत ठेवला पाहिजे, व तो चांगल्या स्थितींत रहाण्याकरितां पोटावर पट्टा बांधला पाहिजे

स्त्रीअंड, मूत्राशय हींही स्थानच्युत होतात, व त्यांचीं लक्षणें जवळजवळ तशींच असतात, व त्यांचीं वरीलच कारणें असतात. हे विकार शस्त्रक्रियेशिवाय सुधारत नाहींत.

**वंध्यत्व**—( Sterility ) लग्न झाल्यानंतर कांहीं स्त्रियांना वरीच वर्षें मुलें होत नाहींत. गर्भाशयांच्या मार्गाचा संकोच, गर्भाशय जागेवर नसणें, अति आर्तव जाण, गर्भाशयांमध्यें सूज, प्रदर, पुप्रमेह ( पतीपासून झालेला ) विकार वगैरे कारणानें मूल होत नाहीं व झाल्यास अकालीं मरतात.

**चिकित्सा:**—तज्ज्ञांकडून परिक्षा करून, रोगनिवारक व पौष्टिक औषधें घेतलीं असतां फायदा होतो.

**कामवासना वाढणें:**—( Nymphomania ) स्त्री अंडांमध्यें रक्ताधिक्य झाल्यास, कादम्बऱ्या, प्रेमविषयक वर्णनें वाचल्यास, मैथुनेच्छा फार वाढते.

**चिकित्सा:**—तळलेले तेलाचे पदार्थ वर्ज्य करणें, एकांतवासांत न रहाणें, व सात्विक आहार, चांगल्या स्त्रियांचा समागम, व रोगाचें कारण दूर केलें असतां इच्छा कमी होतें थंड पाण्यांचें स्नान १५ ते २० मिनिटें रोज ओटीचा भाग चोळून चोळून केलें असतां, रक्ताधिक्य कमी होतें व फायदा होतो.

**स्तन विद्रधी:**—( Abscess of the breast ) लहान मूल दूध पितांना स्तनांच्या अग्राला जखम होऊन त्या जागीं सूज उत्पन्न होते. ठणका लागतो ताप येतो, व सूज पिकल्यास पू होऊन शस्त्र क्रिया करणें भाग पडतें.

**चिकित्सा:**—बाहेरून दशांग लेप गरम करून लावावा अगर लीनीमेंट बेलाडोना व टिंक्चर आयोडीन यांचे मिश्रण करून वर लावावें. थंडी भरून ताप आला म्हणजे पू झाला असें समजून कांद्याचें अगर हरबऱ्याच्या पिठाचें पोटीस लावावें

**बसतांना दुखणें**—( Painfull sitting ) कमरेच्या मागच्या खालच्या भागांत उठतांना अगर उभे रहातांना कळा येतात, स्त्री अंडाचा विकार, बाळंतपणाच्या वेळीं झालेला त्रास, किंवा कमरेच्या बाजूला पडल्यास अशा प्रकारची पिडा होत असते.

**चिकित्सा**—तेल लावून तो भाग शेकावा, बाम लावावा, गरम पाण्यांत कपडा भिजवून शेकावा, पुनः थंड पाण्यानें कपडा भिजवून दुखाव्याच्या जागीं ठेवावा; अशा प्रकारें सकाळ सायंकाळ अर्धा ते एक तास केल्यास दुखावा कमी होतो. एरंडेल सुंठीच्या काढ्यांतून घ्यावें, व पोटांत गुग्गुळ, तूप व मधांतून घ्यावा.

**मूत्रमार्गाच्या आंत ग्रंथी उत्पन्न होणें**:—लघ्वी होतांना आग होणें, आंत फोडल्यासारखी पीडा होणें, एकसारखें आंत पीडा होणें ही लक्षणें असतात. समागम झाल्यास ही पीडा जास्त होते हें दुःख वारंवार होत असल्यामुळें, मनाला एकसारखी चिंता लागते व त्यामुळें मज्जातंतूवर परिणाम होऊन अशक्तता वाढते. स्थानिक परिक्षा केली असतां आंतील ग्रंथी वाढलेल्या आढळतात व त्यांचा आकार वाटाण्या एवढा मोठा व रंग लालभडक असा दिसतो या ग्रंथी कापल्या असतां पुनः पुनः वाढतात. वीजेनें ह्या जाळल्यास, अगर डाग दिल्यास कमी होतात.

**मूत्राशयांचे विकार**—(Disorders of Bladder) लघ्वी वारंवार होणें, लघ्वी कोंडणें, लघ्वी झाल्यानंतर कळा, अशा प्रकारच्या लक्षणांनीं व या विकारांनीं पिडलेल्या बऱ्याच स्त्रिया आढळतात. गर्भाशयाचा विकार असल्यास त्या विकाराचा परिणाम मूत्राशयाला भोगावयास लागून अशा प्रकारचीं लक्षणें होतात. अशा प्रकारचा विकार झाल्यास डॉक्टरचा सल्ला घ्यावा.

**मलावरोध**—( Constipation ) पुष्कळ स्त्रियांमध्यें हा विकार आढळतो वेळच्यावेळीं वेग आला असतां शौचाला न जाणें, व शरिराला मेहनत नसणें, त्याचप्रमाणें फाजील खाणें हें होय. मलावरोधामुळें, मलाच्या दाबामुळें, इतर बाजूच्या इंद्रियांवर दाब पडून, त्या त्या इंद्रियांच्या कार्यांत व्यत्यय येऊन विकार होतात. ज्या बाईला शौचाला होत नाहीं, तिनें प्रथम या विकाराकडे लक्ष दिलें पाहिजे.

( १ ) नियमीतपणें उठल्यानंतर अगोदर शौचाला जावें, व हा नियम नेहमीं पाळावा.

( २ ) वेग आल्यावरोबर, आळस न करतां ताबडतोब जावें.

( ३ ) ताजीं फळें, भाजीपाला, खाण्यांत जास्त यावा

( ४ ) रात्रीं झोंपतांना १ औंस पॅरफीन लीक्वीड, अगर पेट्रोलगार घ्यावें.

( ५ ) जिला हें घेणें कंटाळवाणें वाटत असेल, त्या बाईनें रोज रात्रीं २–४ पेले पाणी प्यावे व पहाटेसही त्याप्रमाणें घ्यावें, याप्रमाणें वागले असतां नियमीत शौचाला होऊं लागतें.

( ६ ) वेळेवर शौचाला न झाल्यास एनीमा घ्यावा.

( ७ ) रोज पहांटेस उठून १ तास पायानें सहल करावी.

( ८ ) पोटाच्या स्नायूचे व्यायाम आहेत, त्याची माहिती तज्ज्ञांकडून करून घेऊन ती अमलांत आणावी.

( ९ ) शौचाच्या वेळीं पोटावर सारखा खालीं वर हात फिरला असतां, मळ बाहेर पडण्यास मदत होते.

( १० ) १ तांब्याभर पाणी रोज प्यावें.

( ११ ) मलावरोध होऊन मळ बाहेर पडण्यास अडचण पडत असेल तर वैद्याचा सल्ला घ्यावा.

( १२ ) शौचाला निदान दोनदां साफ होते अशा स्त्रियांची प्रकृति निरोगी आहे असें समजून चालण्यास हरकत नाहीं.

**पांडुरोगः**—( Chloroses ) त्वचा, पांढरी, पिंवळ सर होते, चालतांना दम लागतो, खाल्लेलें पचन होत नाहीं, जुलाब होतात, पाळी बरोबर येत नाहीं, व जीर्णज्वर, मलावरोध बाळंतपणा, रक्तस्राव जास्त जाणें, हीं लक्षणें होतात. तेलकट पदार्थांचे सेवन व मैथुन हीं कारणें होत. यांवर मंडुर भस्मांचा उपयोग चांगला होतो. पाठीच्या मधोमध, गरम पाण्यानें सकाळीं उठल्याबरोबर स्पंजींग करावें. यकृत, व पोट या ठिकाणीं शेक घ्यावा.

फळफळावळ, ताज्या पालेभाज्यांचे रस, व ताक पिण्यास घ्यावें. रोज ३ ते ४ मोसंबीचा रस घेतला असतां भूक चांगली लागते, रक्त वाढतें, अशक्तपणा कमी होतो. सकाळच्या उन्हांत बसण्याचा नियम करावा.

**प्रसूतिच्या वेळीं होणारे विकारः**—मुल येतांना, जर दाईनें काळजी घेतली नाहीं, तर गर्भाशयाच्या व योनी मार्गाजवळ जखम होऊन ( Haces

tions ) सुतिका ज्वरासारखे विकार होतात. तेव्हां अशा प्रकारची स्थिति आढळल्यास तावडतोब डॉक्टरला दाखवून इलाज करावा.

**गुदद्वार व इंद्रिय यांमधील भगंदर:**—बाळंतपणाला वेळ लागला, मूल येतांना त्रास झाला तर गुदद्वार व इंद्रियमार्ग यांमधील पडदा फाटून, तेथें चार पडते, व मुत्राशय व गुदाशय याठिकाणीं, छिद्र पडून त्यांतून चिकट असा स्राव सुरु होतो. अशा वेळीं, इंद्रियमार्गानें गरम पाण्याची पिचकारी दिली असतां हें छिद्र बंद पडतें. परंतु यावर अवलंबून न रहातां शस्त्र वैद्याला दाखवणें बरें.

गर्भाशयांच्या आंत मोड, अगर गांठ उत्पन्न होते, त्याला इंग्रजीत पॉलीपस व टयुमर असें म्हणतात. गर्भाशयांच्या मुखाशीं व्रण झालेला असला. व तिकडे दुर्लक्ष झालें तर त्याचें दुष्ट ( Cancer ) व्रणांत रुपांतर होतें. ओटींत पीडा, रक्त, पू दुर्गंधीयुक्त स्राव जाणें, प्रकृति ढासळणें, अपचन हीं लक्षणें होतात. हा व्रण कितीही उपचार केलें तरी कमी होत नाहीं. २–३ वर्षांत रोग्याचा मृत्यु होतो वांकेरींचें भातें अगर कापूर भेंडीचे पाळ उगाळून लावलें असतां व पोटांत घेतले असतां फायदा होतो. हा विकार ४० वर्षांनंतर होतो. यावर रेडियम ट्रीटमेंटचा कांहींसा फायदा होतो.

**गर्भाशय व स्त्री अंड यांची वाढ न होणें:**—ऋतुस्राव ज्या वयांत झाला पाहिजे, तो न झाला तर वरील इंद्रियांची वाढ झालेली नसावी असें समजलें पाहिजे. अशा स्त्रियांमध्यें पुरुषांप्रमाणें हनुवटीवर केस येऊं लागतात व त्या पुरुषाप्रमाणें दिसतात. या विकारांची योग्य परिक्षा करून औषध देणें चांगलें. **स्त्रीअंडाची ग्रंथी:**—( Ovarian tumour ) एखादा स्त्रीअंडाला विकार होऊन त्याची वाढ होते. हा शस्त्रक्रियेशिवाय विकार कमी होत नाहीं.

**गर्भाक्षयांच्या मुखांच्या ठिकाणीं क्षत पडणें:**—( Strictun of the neck of the womb ) पाळी ज्यावेळीं येतें, त्यावेळीं आंतल्या बाजूला दुखावा होतो व थोडें रक्त येतें. डॉक्टरचा सल्ला घ्यावा.

**मूत्रपिंडाची वाढ:**—जिला पुष्कळ मुलें झालेलीं असतात, ज्या बांध्यानें लहान ठेंगू असतात. त्यांच्या उजव्या बाजूचा मूत्रपिंड मोठा झालेला असतो. पाठीवर निजलें असतां आढळून येत नाहीं. डॉक्टरचा सल्ला घ्यावा.

**पोट शिथील होणें:**—जिला पुष्कळ मुलें झालेलीं असतात अशा स्त्रियांचें पोट सुटतें; व तें शिथील होतें. पोटांची आवरणें शिथील झाल्यामुळें, खालीं असणारीं इंद्रियें, स्थानच्युत होण्याचा संभव असतो. ओटींतील इंद्रियांवर आंतड्यांचा दाब पडतो व त्यांचाही वरील प्रमाणेंच परिणाम होतो.

पोटांवर स्प्रींगचा पट्टा बांधला असतां फायदा होतो.

**हायमेन पडदा:**—पुरुषांचा समागम झाला नाहीं, अगर जिला पाळी आली नाहीं, अशा तरुण युवतीमध्यें हा पडदा, अर्धवट फाटलेला असल्यास आर्तवाला प्रतिबंध होतो. तें आंतल्या आंत सांठून जातें, व यामुळें इंद्रियमार्ग अजिबात बंद होण्याचा संभव असतो. अशी स्थिती असेल त्यावेळीं शस्त्रवैद्याचा सल्ला घ्यावा.

**हिस्टेरीया:**—हा मानसिक विकार आहे, लहान मुलांना आंकडी येते त्याप्रमाणें स्त्रियांमध्यें फेंफर येतें, या विकारांची पुष्कळ कारणें आहेत. मुष्टिमैथुन, एकसारखे विचार करणें, मज्जातंतू शिथीलता, वय झालेलें असतां, लग्न न होणें, विवाहीतांमध्यें कामवासना तृप्त न झाल्यामुळें सुद्धां हा विकार होतो.

**चिकित्सा**—मन शांत राहील असे इलाज करावेत.

हिस्टेरीया येत आहे असें पाहून जळजळीत सळई करून डाग देतो असें म्हणून भिवावें. कांदा अगर अमोनिया हुंगण्यांस द्यावा. कस्तुरी सकाळ सायंकाळीं -॥- तें १ गुंज मधांतून घ्यावी. तूप, दूध, भात, चपाती अशा प्रकारचा सात्विक अहार ठेवावा. ईश्वराचें ध्यान करावें.

वर दिलेल्या अजूनपर्यंतच्या वर्णनांवरून सामान्य वाचकांना आपल्याला होणाऱ्या रोगांचे ज्ञान व्हावें, एवढ्याच हेतूनें हल्लीं आढळणाऱ्या रोगांचे वर्णन दिलेलें आहे. रोगांचे ज्ञान झालें म्हणजे आरंभीं होणाऱ्या साधारण रोगांच्या लक्षणांची उपेक्षा करण्याची व पतीला न सांगण्याची हाडीमासीं खिळलेली संवय आपोआपच दूर होईल अशी अपेक्षा आहे.

# प्रकरण २८ वें

—:०:—

## पुरुषांचे कांहीं रोग व चिकित्सा

स्त्रियांच्या सामान्य विकारांचा उहापोह मागील प्रकरणांत करण्यांत आलेला आहेच आतां पुरुषांना कोणते रोग होतात यांचा विचार करूं. आयुर्वेदानें सप्तधातूंना महत्व दिलेलें आहे, या सप्तधातु ह्मणजे, रस, रक्त, वसा, मज्जा, शुक्र अस्थि वगैरे होत. ह्यापैकीं कोणच्याही एका धातूचा क्षय झाला तरी आयुष्य क्षीण होण्यास कारण होतें, व मृत्यू अकालीं येतो. कालाकडे दृष्टि टाकली ह्मणजे वयांत येणारीं तरुण स्त्रीपुरुषें अकालीं मरण पावत असलेलीं आपण पुष्कळ पहातों, व वृद्ध माणसें कोणचीही सांथ आली, तरी त्यांतून बचावून सुटतात, याचा खोल विचार केला ह्मणजे परिस्थितींतील स्थित्यंतर हे होय. अकालीं वीर्यपात, अतिशय स्त्रीसंग, बकालीं रहाणी, शुद्ध हवेचा अभाव वगैरे कारणें आयुष्य क्षीण करण्यास मदत करीत असतात. जननेंद्रियांचा वाजवीपेक्षा फाजील उपयोग केला असतां, काय लक्षणें होतात याची माहिती मागील प्रकरणांत आलेली आहे. तरुण वय असतें, आपल्याला एखाद्या सामान्य इंद्रियांमध्यें पीडा होत असली, ह्मणजे आपण त्याबद्दल बेफिकीर असतों. अग्निमांद्य, लघ्वीला जातांना आग होणें, अशक्तपणा, गळल्यासारखें वाटणें, वारंवार शौचाला जावें लागणें, मलावरोध, आंबट ढेंकर येणें, झोंप न लागणें, अशा प्रकारचीं लक्षणें आपल्याला होत असलीं तर, आजचा दिवस जाऊं दे, उद्यां पाहूं, ह्मणून आपण स्वस्थ बसतों व जास्त झालें, आपल्याला सहन होत नाहीं तेव्हां वैद्य व डॉक्टरचा दवाखाना आपण शोधावयास लागतों. रोगांचें मूळ खोलांत गेलेलें नसलें फक्त स्थानिक कारणांचा बंदोबस्त करून भागत असलें, तर रोग्यानें आपलें नशीब चांगलें आहे असें समजून ईश्वराचे आभार मानावें; परंतु अशीं उदाहरणें क्वचितच आढळतात. या होणाऱ्या रोग्यांच्या लक्षणाकडे दुर्लक्ष करून जीवनशक्तिचा क्षय होईपर्यंत प्रत्येकजण दुःख भोगित असतो, व अर्थातच अशा रोगांवर तावडतोब औषधानें

गुण आला नाहीं तर आज हा डॉक्टर उद्यां तो डॉक्टर असें फिरून स्वतःचा आत्मविश्वास व डॉक्टरचा विश्वास असें दोन्ही विश्वास रोगी गमावून बसतो, व अकालीं प्राणत्याग करून मागें राहिलेल्या आपल्या आप्तेष्टांनां दुःख सागरांत लोटून देतो. आपल्या पाठीमागें मुलानें संभाळावें व त्याप्रमाणें तो संभाळीत आहे हें पाहून व इह यात्रा आनंदानें संपवून त्या जगन्नियंत्या प्रभूकडे सुखासमाधानानें जावें, अशी प्रत्येक वृद्ध आईबाप इच्छा करीत असतात; परंतु ही इच्छा आजची तरुणपिढी त्यांना पार पडूं देत नाहीं असें अनुभवास येतें. ज्या आईबापांना मुलांची क्रिया करण्यांचा प्रसंग येतो अशा प्रकारचीं दुर्दैवी कुटुंबें हिंदुस्थानांत पुष्कळ आढतात, यावरून समाजाचा ऱ्हास होत आहे, सुधारणा सुधारणा ह्मणून आह्मीं मागचा पुढचा विचार न करतां वाटेल त्या पाश्चात्य ढंगांचा आह्मीं अंगिकार करीत आहोंत हें यावरून सिद्ध होत नाहीं काय? देशांतील मृत्यूसंख्येची वाढ होत आहे, यावरून राज्यकर्त्यांची आपल्याबद्दलची कळकळ किती वरपांगीं आहे हें आपोआप सिद्ध होतें. असो. वेळ आली म्हणजे आपोआप बरें होईल, त्याची काळजी आजपासून कशाला करावयाला पाहिजे. असें समजणें मुळांतच चूक आहे. निसर्ग ( Nature ) बरें करील, पण वेळ ( Time ) प्राणहानी करील, हें तत्व लक्षांत बाळगून प्रत्येक मनुष्यानें आपला आयुष्यक्रम आंखला पाहिजे. एखाद्या भागांत रक्ताधिक्य ताप, सूज, येणें यांची ठराविक मुदत असते, व ह्यांमध्यें कांहीं ढवळाढवळ केली नाहीं, पथ्य, पाळलें, म्हणजे निसर्गाच्या मदतीनें रोग कमी अपोआप होतो; परंतु त्याच्या उलट, जे धातुक्षीणतेमुळें जुने रोग झालेले असतात, त्या रोगांमध्यें इंद्रियांच्या कार्यामध्येंही फेरबदल झालेला असतो, व त्यामुळें ते बरे होण्यासही पुष्कळ काल लागतो, अगर एखादेवेळीं रोग बरा होत असतां, जीवनशक्ति ( Vitality ) जर क्षीण झालेली असली तर औषधांचा उपयोग न होतां रोगी एकाएकीं मरून जातो. **ही जीवनशक्ति, अगर आयुर्वेदांच्या भाषेंत ह्मणावयाचें ह्मणजे ओजस तत्व शरिरांत जोंपर्यंत शिलुक आहे, तोंपर्यंतच औषधाचें कार्य होत असतें, व ह्या ह्मणण्याची सत्यता एखादा रोगी सर्वांशीं चांगल्या प्रकारें बोलत असतो, व एकाएकीं, प्राण सोडतो अशा प्रकारच्या उदाहरणांवरून पटतें.** बऱ्याच दिवसाच्या रोगांचा असा होणारा परिणाम वाचून वाचकांच्या मनाला भिती वाटण्याचा संभव आहे, परंतु याच्या उलट साधारण दुखण्यांचा मोठासा बाऊ करून, घरांतील सर्व मंडळीना घाबरून

सोडणारेही कांहीं लोक आहेत. या प्रकरणांत येणारे विकार सामान्य वाचकांना कळावेत, व त्यांपासून वेळींच सावध रहातां यावें, हाच त्यांची येथें चर्चा करण्याचा उद्देश आहे

**धातुविकार:**—लघ्वी होतांथा अगर शौचाच्या वेळीं वीर्य जाणें म्हणजे धातु जाणें अशा प्रकारची स्थिती पुष्कळ तरुणवर्गांत आढळते. परंतु हें खरो-खरच वीर्य आहे कीं इतर विकार हें सामान्य माणसांला समजत नाहीं. वीर्य म्हटलें म्हणजे त्यांमध्यें वीर्यजंतु पाहिजेत, ह्या वीर्यजंतूची परीक्षा सूक्ष्मदर्शक यंत्राशिवाय होणें कठीण आहे. आपल्याला वीर्य जात आहे किंवा नाहीं हें खालीं लिहिलेल्या खऱ्या व खोट्या प्रकारांवरून समजून येईल.

**चिन्हें:**—डोकें दुखणें, स्मरणशक्ति कमी होणें, एकाग्रता न होणें, मन चंचल होणें, लक्षांत न रहाणें, बहिरेपणा वाढणें, सुस्ती, एकसारखे विचार चालणें, डोळयांपुढें ढग दिसणें, दमा लागणें, अंग जड, अगर छातीमध्यें कांहीं विकार झाला आहे, असें वाटणें, आंबट ढेंकर येणें, पोटांत जडपणा, जेवल्या-नंतर सुस्ती येणें, त्वचा रुक्ष होणें, मुंग्या येणें, पेटके येणें, मान जड वाटणें, दृष्टीमंद होणें, उत्साह कमी होणें, विशेषतः सकाळीं कमर दुखणें, भास्ती वाटणें, वेड लागणें, आत्महत्येचें विचार मनांत येणें, अंगांला कळा लागणें, चेहरा लाल होणें, राग येणें, छातींत धडाका वाढणें, शरिर सुकत जाणें. नपुंसकत्व, त्वचा निळसर काळीं होणें, वृषणांमध्यें दुखावा, व कळा येणें, लघ्वी होतांना कळा व आग होणें, लघ्वी झाल्यानंतर कळ येणें, एकाएकीं इंद्रियांमध्यें ताठर-पणा येणें, मांड्या गळणें, अर्धांगवायु, न समजतां वीर्यपात होणें, क्षयाचीं सर्व लक्षणें, कपड्यांवर डाग पडणें, हीं लक्षणें आढळून येतात मज्जातंतू शिथीलता मुदतीचा ताप आल्यानंतर आलेली अशक्तता, फुफुसांचा क्षय, मूळव्याध, अगर गुदमार्गाचा विकार यामध्यें हा विकार नेहमीं आढळतो. आनुवंशिकपणा हे सुद्धां या विकारांचे एक कारण आहे

**खोट्या वीर्यपातांची लक्षणें:**—( False-spermatrrhoca ) लघ्वीच्या अगर शौचाच्या वेळीं वीर्याचे १–२ थेंब पडणें, म्हणजे आपल्याला धातु जात आहे हें समजणें चुकीचें आहे. अशा प्रकारचा वीर्यपात, ज्याला पुप्रमेहचा विकार झालेला आहे, व तो साफ बरा झाला नाहीं, अगर जुना पुप्रमेह असला तर होतो. वरील प्रकारचा वीर्यपात, अतिमैथुन, मलावरोध,

लघ्वी फार वेळ कोंडून ठेवणें, अशा वेळीं होतो, व हा कधीं तरी होतो, नेहमीं होत नाहीं. प्रोस्टेट ग्रंथीला कांहीं पीडा अगर मूत्रमार्गामध्यें विकार असल्यास वीर्यपात होतो. पुप्रमेहामध्यें, मूत्रमार्गाच्या अंतःत्वचेचा संकोच होऊन (Gleet) वीर्यपात होण्याच्या वेळीं अगर लघ्वी होण्याच्या वेळीं होणारी पिडा रोग्याला असह्य होते. अशा प्रकारचे रोगी आढळल्यास, त्यांच्या खाण्यापिण्यांकडे, व्यायाम, ब्रह्मचर्यपणा वगैरे गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे वीर्यपात होऊं लागला म्हणजे, मज्जातंतुवर परिणाम होतो, मज्जातंतुवर परिणाम झाल्यामुळें त्याचें परिवर्तन इतर इंद्रियांवर होतें, व तीं इंद्रिये आपलीं कामें करण्यास निर्बल होतात. व यामुळेंच पचनेंद्रियें, हृदय, फुप्फुस, व यांवर परिणाम होऊन, आरंभीं दिलेलीं लक्षणें हळूहळू होऊं लागतात.

**धातुक्षीणता:**—( Seminal weakness ) ज्यांना तरुणपणांत मुष्टिमैथुनाची संवय लागलेली आहे, अशा लोकांची विवाह झाल्यानंतर केविलवाणी स्थिती होऊन जातें.

वीर्यपात न समजतां झोपेमध्यें होत असतो, व त्यामुळें, स्वतःच्या स्त्रीशीं संयोग होण्यापूर्वीच वीर्यपात होतो. मुष्टिमैथुनाशिवाय, संगति. खाणें, पिणें, रहाणें, या गोष्टींतही विचार केला पाहिजे. रात्रीं झोपेमध्यें स्वप्नावस्था होणें म्हणजे जननेंद्रियांवरचा मज्जातंतूचा दाब शिथील झालेला आहे हें उघड सिद्ध होतें. मेंदु अगर मज्जातंतु यांचा जननेंद्रियांवर जरी ताबा असला, तरी मनांत विचार आल्या असतां शरिराच्या चांगल्या स्थितींत वीर्यपात होऊं शकत नाहीं.

अजीर्ण, पोट जड होणें, मूत्राशय भरलेला असणें, उष्णता यामुळें सुद्धां जननेंद्रियांवर दाब पडून चेतना होण्यास मदत होतें. तात्पर्य काय, अशा तऱ्हेचे न समजतांना अगर मनांत विचार आला असतांना, प्रेमविषयक कादंबऱ्या अगर चित्रें पाहिलीं असतां ज्यांचें वीर्यस्खलन होतें, त्यांनीं या जगांत दिवस थोडे राहिलेले आहेत असें समजून रहावें.

**लक्षणें:**—कमर गळल्यासारखी वाटणें, वारंवार एकसारखें डोकें दुखत असणें, अशक्तता, डोक्यांवर दाब आहे असें वाटणें, मनाची विचाराची चंचलता, कानामध्यें आवाज होणें, धास्ती वाटणें, लघ्वीला वारंवार जाण्याची इच्छा होणें, कामवासना वाढणें, स्वप्नावस्था, समजणें अगर न समजणें, वृषणांमध्यें दुखावा, ओढा लागल्यासारखा वाटणें, अशा तऱ्हेनें पुष्कळ प्रकारचीं

लक्षणें होत असतात. त्याला आपलें शरिर, काचेचे केलेलें आहे, व आपण कोठें पडूं" अशा तऱ्हेची स्थिती असलेले तरुण लोक आपली ही स्थिती कोणाला कळवीत नाहींत, व जाहिरातींतील स्तंभक व उत्तेजक औषधांच्या मागें लागतात व जास्त प्रकृति बिघडवून घेत असतात. तेव्हां ज्या तरुणांना हा विकार सुरू झाला असेल त्यानें खालील गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. वीर्यपात होतो, तो कितीदां होतो, वीर्यपात झाल्यास अस्वस्थता उत्पन्न होते किंवा काय, वरील दिलेल्या चिन्हांपैकीं किती लक्षणें आपल्याला होत आहेत, याचा विचार प्रथम केला पाहिजे. महिन्यांतून १-२ वेळां स्वप्नावस्था झाली, तर उष्ण, चहा, मसालेदार पदार्थ खाण्यांत आलेले आहेत असें समजून तें बंद करणें, व ह्या शिवाय डॉक्टरचा सल्ला घेणें चांगलें.

**पथ्य:**— साधें अन्न खावें मसालेदार पदार्थ वर्ज्य करावेत. जलद जेवूं नये, त्याचप्रमाणें पोटाला ताण बसेल इतकें व अवेळीं जेऊं नये. खातांना अन्न चर्वण करून खावें. मांस खाऊं नये. चपाती कोंड्यासकट खावी. पिकलेलीं फळें खावींत. तंबाखु, चहा कॉफी वर्ज्य करावींत.

**व्यायाम:**—डंबेल्स, जोड्या, यांचा नियमीत व्यायाम घ्यावा. १ ते २ मैल पायानें रोज सहल करावी. व्यायाम करणें तो थकवा येईपर्यंत करावा. ह्यानें झोप येण्यास मदत होते.

**मानसिक:**—मनांमध्यें विषयवासनेचें विचार येऊं देऊं नयेत. संध्याकाळची वेळ, मनाला उत्तेजक अशा खेळांमध्यें व नाटक, सिनेमा वगैरे पाहण्यांकडे वेळ घालवूं नये. मलावरोध दूर करावा. रोज ७ ते ८ ग्लास पाणी प्यावें. पाणी पिणें तें जेवणाच्या पूर्वी २ तास व जेवणानंतर ३ तास याप्रमाणें घ्यावें. सकाळीं उठल्यावर आयुर्वेदानें उषःपान करण्यास सांगितलेलें आहे तेंही या दृष्टिनेंच आहे. या विकारांत हिप बाथचा चांगला उपयोग होतो परंतु त्याची माहिती प्रत्यक्ष करून घेऊन नंतर घेण्यास सुरुवात केली पाहिजे.

**स्वप्नावस्था:**—( Diural-Losses ) जागें असतांना, जो वीर्यस्राव होतो त्याला स्वप्नावस्था असें म्हणतात. लघ्वीला जातांना अगर लघ्वी झाल्यानंतर अगर शौचाच्या वेळीं वीर्यस्राव होतो. अशा वेळीं जो स्राव होतो, त्या स्रावांमध्यें वीर्याचा अंश क्वचितच आढळतो. परंतु अशा प्रकारचा स्राव

कित्येकांना होतो, व आपल्याला धातु बरेच दिवस जात आहे असा समज होऊन काळजी बाळगत असलेले पुष्कळ लोक आढळतात.

हें वीर्य आहे कीं इतर स्राव आहे, हें सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं तपासून पाहिलें असतां, व वरील लक्षणांचा विचार केला असतां समजून येईल. या स्रावांमध्यें पुष्कळ तऱ्हा असतात. वाचकांच्या सोयींकरितां खालील प्रकार देत आहें:—

( १ ) स्वच्छ, चिकट, अंड्यांमधील बलकांप्रमाणें, लघ्वीपूर्वी व नंतर होणारा, व इंद्रियांना उत्तेजीत करणारा, अशाप्रकारचा स्राव, मूत्रमार्गाच्या ठिकाणीं असलेल्या प्रोस्टेट ग्रंथीमधून होत असतो, व निरोगी अवस्थेंत अशा प्रकारचा स्राव होतो. हा स्राव जास्तच होऊं लागला, तर मूत्रमार्गाच्या त्वचेचा दाह आहे असें समजून इलाज करावा.

( २ ) स्वच्छ, चिकट, स्राव वीर्याशयामध्यें (Seminal Vesicles) होत असतों. वीर्याशयांमध्यें कांहीं कारणानें दाह झाल्यास अगर मूत्राशयाचा दाब पडल्यास, शौचास होतांना अशा प्रकारचा स्राव होत असतो.

( ३ ) दुधासारखा, १ ते २ थेंब अगर १ ग्राम पर्यंत, लघ्वीच्या आरंभीं, शेवटीं होणारा स्राव, यामध्यें वीर्य जंतु विशेष करून आढळतात. मूत्रमार्गानें होणारे हे सर्व प्रकारचे स्राव, यामध्यें ही जास्ती प्रमाणांत वीर्य जंतु आढळतात, व त्याला कारणें काय तीं मागें सांगितलेलीं आहेत. लघ्वी कांचेच्या पेल्यांत धरून पाहिली असतां त्यांमध्यें निरनिराळे क्षार ( फॉस्फेटस, युरेटस, म्युकस ) आढतात व हे कोणकोणते आहेत त्यांची परीक्षा करून ठरवतां येते.

**लक्षणें:**—हा स्राव बरेच दिवस चालू राहिला म्हणजे इंद्रियांची शक्ति कमी होते, स्नायु ढिले होतात, नपुंसकत्व, मज्जातंतु क्षीणता होऊन वेड लागण्याचाही संभव असतो. लघ्वीला, आग, तिडीक मारणें, हीं चालू असतात व मूत्रमार्गाच्या स्नायुंच्या शिथीलतेमुळें, मूत्रमार्ग बंद न होतां आपोआप वीर्य स्राव होतो. धातु क्षीण होऊं लागली म्हणजे पचन क्रिया मंद होते व अग्निमांद्याचा विकार सुरू होतो. अग्निमांद्याचा विकार जडला म्हणजे इतर इंद्रियेंही निर्बल होतात.

या विकारांचे इतकें पृथःक्करण करण्यांचे कारण म्हणजे पुष्कळ मंडळींना विकारांचें दुःख कळत नाहीं. वरील वर्णन ज्याला लागू पडत असेल, त्यानें विचार न करतां, आपला ज्याच्यावर विश्वास असेल असा वैद्य अगर डॉक्टर यांचा सल्ला घ्यावा व औषधोपचार सुरू करावा.

**प्रोस्टेट ग्रंथीचा आजार:**—( Diseased prostate ) या ग्रंथीला इजा झाली आहे किंवा नाहीं, हें गुदद्वारांत बोट घालून वर फिरवलें असतां दुखावा उत्पन्न झाला तर या ग्रंथीला सूज आली आहे असें समजावें. या ग्रंथीला सूज आली असतां, मांड्या, गुदद्वारांच्यामध्यें पीडा होते, व उठतांना बसतांना त्रास होतो. हा विकार जे अतिशय स्त्रीसंग करतात त्यांना होतो. त्याचप्रमाणें स्वप्नावस्था ज्यांना वारंवार होत आहे अशानाही हा विकार होतो. पुप्रमेहामध्यें, पू जर आंत राहिला, पू जाण्याकरितां मूत्रमार्गानें उष्ण औषधांची पिचकारी घेण्यांत आली, सर्दी, ओलांत बसणें, यामुळें ही सूज वाढण्यास मदत होते. गुदद्वारांमध्यें जडपणा वाटणें, लघ्वीला होत आहे असें वाटणें, लघ्वी झाल्यानंतर कळा लागणें, हीं लक्षणें होतात. हीच सूज जास्त प्रमाणांत बरेच दिवसांची असेल, तर एखादा दगड फोडतात त्याप्रमाणें भयंकर कळा लागतात, रोगी बेचैन होतो, मल बाहेर पडण्यास प्रतिबंध होऊन लघ्वी बंद होते, ताप येतो, व्यायाम, त्याचप्रमाणें फार तिखट पदार्थ खाण्यांत आल्यास त्रास फार होतो. म्हातारपणांत, ही ग्रंथी मोठी ( Enlargement ) झालेली असते, त्यामुळें लघ्वीला, शौचाला होतांना वारंवार त्रास होत असतो. मलावरोध, लघ्वी साफ न झाल्यामुळें पोटांत वायु जमतो, शौचाला कुंथल्यामुळें, आंतडें शिथील होऊन तें बाहेर येतें, थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे वृद्धावस्थेंतील हा विकार जीव वैतागून सोडतो.

**चिकित्सा**—चहा, कॉफी, उत्तेजक मसालेदार पदार्थ वर्ज करावेत, ब्रह्मचर्य पाळावें, मलावरोध दूर होण्याकरितां एरंडेल सुंठीच्या काढ्यातून घ्यावें. पुनर्नवा व शिलाजीत पोटांत घ्यावा. मुख्य मार्गाच्या संकोच ( stricture of urethra ) पुप्रमेहाचा विकार ज्यांना होतो, त्यांना निसर्ग, हा विकार बंद झाल्यानंतर, आपली जाणीव रहावी ह्मणूनच कीं काय, मूत्रमार्गाचा संकोच करून टाकतो, यामुळें अशा प्रकारची बाहेरख्याली मंडळी या विकारानें मरेपर्यंत पिडलेली असते. औषधें घेतलीं ह्मणजे तात्पुरतें बरें वाटत असतें. मुष्टिमैथुन करणारे त्यांनासुद्धां हा विकार होतो

**मूत्रमार्गाचा संकोच:**—मूत्रमार्गांत दुखावा, वारंवार लघ्वीला जावेसें वाटणें, व लघ्वीची धार सुरु होणें, न होणें, अंडामध्यें पीडा, गुदद्वाराची आग, लघ्वी अजीवाद बंद होणें, हीं लक्षणें होतात. या विकाराच्या रोग्यामध्यें, लघ्वी मधील विजातीय असणारे क्षार बाहेर पडून जात नाहींत, यामुळें मुत्राशयांत राहून जातात. मुत्राशयांत राहिल्यानंतर ते त्या ठिकाणीं दाह उत्पन्न करतात, दाहाचें परिवर्तन पू होण्यामध्यें होतें; अशाप्रकारें या क्षाराचे खडे, मुत्रमार्गांत अडकून, त्या मार्गाचा दाह होऊन पू तयार होतो. यावरून मूत्रमार्गाचा संकोच झाला ह्मणजे, इतर कसे विकार उत्पन्न होतात, याची कल्पना वाचकांना येईलच.

**मणिकोशाचा संकोच:**—( Phimonsis ) शिश्नाच्या अग्रभागी जीं त्वचा असते तिला मणिकोश ह्मणतात. मुसलमानांमध्यें सुंथा करण्याचा विधी आहे, तो म्हणजे ही त्वचा कापणें हाच होय. ही त्वचा मागे पुढें होत असते. कित्येक मुलांमध्यें जन्मांपासून ही त्वचा आकुंचित झालेली असते. मूत्रमार्गाची सूज, क्षत, पूप्रमेह, या कारणानें या त्वचेचा संकोच होतो. पुप्रमेहामध्यें पू आंत राहिल्यामुळें, त्या जागीं छिद्र पडतें, व लघ्वी होण्यास त्रास होतो.

**चिकित्सा:**—शस्त्र वैद्याला दाखवावें. शुगरलेडचें लोशन करून घडी ठेवली असतां सूज कमी होते.

**मणिकोशाचा उर्ध्व संकोच:**—( Paraphimosis ) ही त्वचा, एखादे वेळीं, मण्यांवर चढून, त्याचा फांस पडतो, व त्यामुळें, मूत्रमार्गाचें तोंड, सुजून जातें, त्वचा मागें झाली नाहीं तर क्षत पडतें, व फार पीडा होते. उपदंश, पूप्रमेह हीं या विकारांचीं कारणें आहेत.

**चिकित्सा:**—वरीलप्रमाणें अंडकोशामध्यें पाणी होतें ( Hydrocele ) हें वृषणांच्या आंत कोथळी असते, त्याला कांहीं इजा झाल्यास सूज येऊन त्यांत पाणी जमूं लागते. हें बरेच दिवस राहिलें तर वृषणांचा क्षय होतो, व चालतांना त्रास होतो. डॉक्टरला दाखवून इलाज करावा.

**शिरांमुळें होणारी वृषणवृद्धि:**—( Varicocele ) वृषणामध्यें वीर्यवाहिन्याच्या शीरांचा दाह झाल्यामुळें सूज येते. वृषण मोठा होतो. यामध्यें पाणी नसतें, परंतु यांचे रूपांतर पाण्यांत होण्याचा संभव असतो. निजल्यावर व दाबल्यावर आकार कमी होतो. पट्टा बांधावा अगर शिलारस लावावा. हा

विकार पुरुषांमध्यें फार आढळतो. हा विकार जुना झाला म्हणजे आंतल्या बाजूला घट्टपणा येतो, शिरा जाड होतात. मांड्या, वंक्षणसंधी, वृषण यांमध्यें दुखावा सुरू होतो. उभें राहिलें असतां, अगर काम करीत असतांना कोणी खेंचतें आहे असा भास होत असतो. थंडीपेक्षां उन्हाळ्यामध्यें फार त्रास होतो. जास्त चालणारे, व सतत उभें राहून काम करणारे यांमध्यें हा विकार विशेष आढळतो. शौचाला जातांना ज्यांना जोर करावा लागतो, त्यांनाही हा विकार होतो. नेहमीं डाव्या बाजूचा वृषणालाच विकार होतो. लंगोट अगर पट्टा बांधला असतां विकार जास्त न होण्यास मदत होते.

**नपुंसकत्व:**—( Impotency ) मैथुन, फार स्त्रीसंग, मुष्टीमैथुन. निसर्गाच्या विरुद्ध कामवासना तृप्त करणें, यामुळें इंद्रियांमधील चेतना नाहींशी होते. स्त्री समागम करतांना, तावडतोब वीर्यपात होणें, व इंद्रिय शिथील होणें, हीं आरंभी लक्षणें होऊं लागतात. जननेंद्रियांमधील असणाऱ्या मज्जातंतूंचा क्षय वरील कारणामुळें झाल्यामुळें हा विकार होतो; शिवाय मूत्रमार्गाची आग, धातु जाणें, हीं लक्षणें चालूच असतात.

**चिकित्सा:**—औषधें घेणें तीं वैद्याच्या सल्ल्यानें घ्यावींत. कामोत्तेजक, उत्तेजक, औषधें आरंभीं घेऊं नयेत. वीर्य उत्पन्न कसें होईल, मज्जातंतूंना जेणेंकरून ताकद येईल, अशा प्रकारचीं औषधें घ्यावींत. उत्तेजक औषधांचा परिणाम तात्पुरता बरा वाटला तरी त्यांपासून नुकसान होतें. व ही गोष्ट पुष्कळांना कळत नसल्यामुळें अशा प्रकारचीं औषधें घेऊन पुष्कळ लोक प्रकृति बिघडवून घेतात. हळुहळु मज्जातंतूंना ताकद आली म्हणजे अपोआप, इंद्रियांना ताकद येते. थंडपाण्याचें स्नान करावें. थंडपाण्याचा एनीमा घ्यावा.

**पूयमेह**—( Gonorrhoea ) जे पुरुष बाहेरख्याली असतात, त्यांना धंदेवाईक स्त्रियांकडून ह्या विकारांची बाधा घडते. या विकारांसारखा भयंकर दुसरा रोग नाहीं. हा रोग तात्पुरता बरा वाटला तरी त्याचे विष वंशपरंपरागत चालू असतें हें विष अत्यंत जहाल असल्यामुळें, शरिरांतील, मूत्रमार्गांतील पेशींचा ( Tissues ) क्षय करतें, आरंभीं मूत्रमार्ग बिघडतो, व नंतर शिश्नापर्यंत तो विकार पसरतो. रोगांच्या कमी जास्त मानानें मणीकोशाचा संकोच होण्याचा संभव असतो. क्षय व इतर विकार होतात. मूत्रमार्गांतून येणारा पु, मूत्राशय, मूत्रपिंड, वीर्यवाहिन्या, वृषण, यांमध्यें जाऊन, तीं तीं इंद्रियें बिघडतात; प्रोस्टेट

ग्रंथी बिघडतात. विकार जुना झाला म्हणजे बरें होणें कठिण पडतें, व रोग्याला औषधावरच जिवीत काढावें लागतें. पुप्रमेहाचा परिणाम प्रसूति होतांना मुलांच्या डोळ्यांवर ( Gonorrhoeal Infection ) होतो, व मुलें आंधळीं होण्याचा संभव असतो. स्त्रियांमध्यें ह्या विकारांचा परिणाम स्त्रीअंड, फलवाहक नलिका, यांवर होऊन ओटींमध्यें गलु होण्याचा संभव असतो. विवाहीत स्त्रियांमध्यें पतीपासून हा विकार होऊन वरील विकार होतात। कपड्याला पुप्रमेहाचा पू वगैरे लागल्यास तें विष पसरण्यास मदत होते.

**लक्षणें:**—धंदेवाईक स्त्रींशीं समागम केल्यानंतर तीन दिवसांनीं लक्षणें होऊं लागतात. शिश्नाच्या तोंडाच्या ठिकाणीं खाज, आंत चावल्यासारखें होणें, लाल होणें, त्वचा उघडली असतां, रंगरहित चिकट स्राव जमलेला आढळतो. हा स्राव वाढत जाऊन त्यांचे चिकट, दुर्गंधयुक्त अशा पूवांमध्यें रूपांतर होते. लघ्वीच्या वेळीं त्रास होतो. २–३ दिवसांनंतर ही लक्षणें वाढून, शिश्न सुजणें, चामडी मागेपुढें, होण्यास त्रास पडणें व पुवाचा रंग; हिरवा पिवळा, असा होतो, हा स्राव संबंध दिवस चालू राहून, कपडे खराब करतो, व लघ्वीला प्रत्येक वेळीं त्रास होतो औषधोपचार वेळेवर केला तर ५–६ आठवड्यांत विकार कमी होतो; परंतु असे लोक क्वचित्च आढळतात. हे रोगी जुन्या परम्यानें ( Gleet ) नेहमीं पिडलेले असतात. परम्यांचा विकार जरी कमी झाला तरी हा रोग आपलें अस्तित्व, तो मार्ग संकोच करून लघ्वीचा त्रास उत्पन्न करीत असतो.

**चिकित्सा:**—बाहेरख्याली इसमानें संयोग केल्यानंतर, शिश्न, तावडतोब, पोटेशपरमनेटलोशननें धुवून टाकावें. लिथीया वॉटर व दुध मिळवून तीन दिवस घ्यावें. बेफिकीर राहूं नये. परंतु असें लोक, लाजेनें स्वतःच इलाज करीत असतात, व जास्त झालें म्हणजे डॉक्टरकडे जात असतात. हा विकार झाल्यानंतर तो कायमचा बरा होतो किंवा नाहीं हें ठरवणें अत्यंत कठिण आहे. हे विष कालांतरानें रक्तद्वारें फिरून इंद्रियें बिघडवीत असतें. विकार जरी कमी झाला तरी विष प्रोस्टेट ग्रंथींमध्यें शिल्लक असतें व तें मैथुन, दारू, वगैरे जास्त केल्यास पुन: प्रगट होतें. पू प्रमेह हें पुष्कळ विकारांचे कारण अलीकडे मानण्यांत आलें आहे व याचा प्रसार किती आहे हें म्युनिसीपालिट्या: व्हेनेरीयल क्लीनीक कमिशने, वगैरे वगैरे नवीन होणाऱ्या चळवळीपासून सुज्ञ जनतेला कळण्यासारखें

आहे. ज्याला पूप्रमेहाचा विकार झाला आहे, अशा शहाण्यानें विवाह करण्याच्या भानगडींत पडूं नये. पाश्चात्यांमध्यें या विकारांच्या लोकांची लग्नारंभीं परिक्षा घेण्याची चाल आहे. परंतु अशा प्रकारची पद्धत आपल्याकडे अमलांत आणणें म्हणजे, प्रौढ विवाहाच्या चळवळीला मार्गे खेंचल्यासारखें होणार आहे. ज्याला हा विकार झाला आहे, त्यानें स्वतः पेटन्ट औषधें घेण्याच्या भानगडींत न पडतां डॉक्टरचा सल्ला घ्यावा. कारण अशा व्यक्तीनें ईश्वराचा व मानव जातीचा एक प्रकारें गुन्हा केलेला असतो.

**संधिवात:**—पूप्रमेहाचें विष शरिरांत पसरले म्हणजे संधिवात होतो, सांधे आंखडून जातात, हृदयांच्या पडद्यांना विकार होता, व यांतून रोगी बरा झाला तरी व्यंग राहून जातें.

**मृदुव्रण:**—( Soft chancre ) हा व्रणही पूप्रमेहाच्या जातींतील आहे, व बाहेरख्याली लोकांनाच हा विकार होतो. या व्रणामध्यें ४ प्रकार आहेत. मृदुव्रण, दुष्टव्रण, प्रसारीव्रण, कठिण व्रण. आरंभीं असतांना विकार स्थानिक असतो. शिश्नाच्या चामडीच्या आंत व्रण असतो. हा सासर्गिक व प्रसारी असल्यामुळें, दुर्लक्ष केलें तर तो भाग सडण्याचा जास्त संभव असतो. एकादे वेळीं इंद्रिय कापण्याची पाळी येते. व्रण संधिमध्यें, व्रणांवरोवर गांठ ( Bubo ) येते, हा व्रण दावला असतां मृदु लागतो म्हणून त्याला मृदु व्रण म्हणतात. ज्या व्रणाच्या कडा कठिण असतात, त्याला कठिण व्रण म्हणतात.

**चिकित्सा:**—डॉक्टरला दाखवणें हाच मार्ग उत्तम आहे.

**उपदंश:**—( Syphilis ) उपदंशाच्या तीन अवस्था आहेत.

पहिली, दुसरी व तिसरी. वर जो व्रण सांगितला आहे त्याचे बरोबर बदही हो त, ही प्रथमावस्था समजावी. हे स्थानिक आहेत. दुसऱ्या अवस्थेंत व्रण झाल्यानंतर २–३ महिन्यांत त्वचा, तोंड, नाक, डोळे, सांधे, हाडांचे विकार, यांवर उत्पन्न होतात, याला सार्वदेहिक अगर द्वितीय अवस्था म्हणतात.

तिसऱ्या वर्गाचीं चिन्हें कांहीं लोकांना जाणवतात, व त्यांचा स्थूलदृष्ट्या द्वितीयावस्थेंतच समावेश करण्याची रीत पडलेली आहे.

**मृदुव्रण व कठिणव्रण यांमधील फरक:—.**

( १ ) मृदुव्रण ( Soft chancre ) १–२ दिवसांत अगर आठवड्यांत होतो.

( २ ) इंद्रिय सोलले जाऊन चीर पडते व क्षत होतें.

( ३ ) दाबून पहातां नरम असतो.

( ४ ) कांठ, उंच, वसकट, मृतमांसाचा थर व घट्ट पू निघतो.

( ५ ) व्रण झाल्यानंतर पुष्कळ क्षतें होतात.

( ६ ) लस लागल्यास व्रण उत्पन्न होतो.

( ६ ) बंद होतात व ते पिकतात.

( ८ ) पीडा, सूज व भरण्यास विलंब लागतो

( ९ ) क्षताचा परिणाम स्थानिक असतो, शरिरांवर परिणाम होत नाहीं.

( १ ) कठीण व्रण ( Hard chanere ) १ पासून तीन आठवड्यांत होतो

( २ ) पुळया होऊन क्षतें होतात.

( ३ ) सुरुवातीस व्रण तळांशी कठीण लागतो.

( ४ ) क्षत लहान कांठ वाळलेला, सपाटी लाल व लस पातळ असते.

( ५ ) क्षत एकच असते.

( ६ ) लस लागल्यास व्रण होत नाहीं.

( ७ ) बंद होतात व पिकत नाहींत.

( ८ ) पीडा, सुरू नसतात व व्रण लवकर भरतो.

( ९ ) परिणाम सार्वदेहिक होतो. ज्यांना उपदंशाचा विकार झाला आहे त्यांच्या रक्तवाहिन्या जाड होणें, ( ArterioScelorosis ) मेंदुमध्यें गळूं होणें ( Brain Syphilis ) अर्धांगवायु, कलायखंज ( Loco—Motor-ataxia ) वगैरे विकार होतात.

हा विकार तरुणांमध्यें त्याचप्रमाणें सुखवस्तु श्रीमंत गृहस्थांमध्यें फार बोकाळत चालला आहे, व त्याचा परिणाम त्यांच्या स्त्रियांना भोगावा लागतो. या विकारांचे महत्व कळावें, म्हणून आरंभींच्या इतर विकारांपेक्षां या रोगांचें जास्त वर्णन मुद्दाम देण्यांत आलेलें आहे.

**आनुवंशिक उपदंशाचा परिणाम:**—( Hereditary syphilis ) बापाला उपदंशाचा विकार होतो, हें विष स्वतःच्या स्त्रीच्या अंगांत जातें

व आईच्याद्वारा निरपराधी बालकाला याचा प्रसाद मिळत असतो. लहानपणीं विषांचीं लक्षणें आढळलीं नाहींत तरी तारुण्यांत लक्षणें जाणवूं लागतात. पुष्कळ वेळां उपदंशांचे विष ज्या स्त्रीच्या अंगांत असतें तिचीं मुलें ९ महिने पूर्णच होऊं देत नाहींत. पुष्कळ वेळां गर्भपात अगर गर्भस्राव होत असतो शिवाय यांतून मूल जन्मास आलें तर, रिकेट्स्, डोकें मोठें, कणा वांकडा, छाती आंत बसलेली अशा प्रकारचें पाप्यांचे पितर जन्मास येते.

हाडें व दांत यांमध्यें विशेषतः आरंभीं व्यंग आढळून येतें. सहा महिन्यांच्या आंतच बहुतेक मुलें मरतात. थोडक्यांत, सांगावयाचें ह्मणजे समाजाला अधोगतीस नेणारा, नाश करणारा व बिघडवणारा हा विकार आहे. उपदंशजन्य आईबापांचे मुलांच्या अंगांवर व्रण झाल्यास, ते विकार फैलावण्यास मदत करीत असतात. अशा मंडळींना महारोग्यासारखें, गांवाबाहेर वसतिगृह काढून दिलें पाहिजे.

**चिकित्सा:**—या विकाराची चिकित्सा येथें लिहीणें म्हणजे धोक्याचें काम आहे. ज्यांना हा विकार झाला, त्यानें ताबडतोब, डॉक्टरकडे जाऊन लाज न धरतां इलाज करावा. २४ तासांत गुण, २ दिवसांत बरा, असें ह्मणणाऱ्या व सांगणाऱ्या भोंदु, लबाड चिकित्सकांवर विश्वास ठेऊं नये. हा विकार १–२ दिवसांत बरा होण्यासारखा नसून २–३ महिने सारखें औषध घेतल्यास बरें होण्यांची अशा आहे. कोणच्याही डॉक्टरनें, तूं बरा झालास असें ह्मटल्याशिवाय औषध बंद करूं नये. ब्रह्मचर्य पाळावें. निदान संततिकरतां व स्त्रीच्या सुखा-करितां समागम करूं नये.

मनुष्यांना साधारणतः जे मुख्य रोग होतात, त्याचे वर्णन वर देण्यांत आलेलें आहे, परंतु एवढ्यांवर भागणार नाहीं हें लेखक जाणून आहे. इतर रोगांची माहिती वाचकांना वैद्यकीय पुस्तकें वाचलीं असतां आढळून येईल, फक्त जगाच्या वातावरणांत हिंडतांना जगाच्या वहिवाटीनुसार जे रोग वारंवार पहाण्यांत येतात, त्याचाच उपक्रम मुद्दाम या प्रकरणांत करण्यांत आला आहे.

# प्रकरण २९ वें

—:०:—

## स्त्री पुरुषांची शारीरिक रचना

**सुप्रजा निर्माण शास्त्र**—(Eugenics) व संतति नियमन यासंबंधीचे मार्ग, जातिबंधनें मोडणें अशा प्रकारच्या नव्या नव्या चळवळी पाश्चात्याच्या संगतीमुळें आमच्या देशांत आल्या आहेत. आजचें युग शास्त्रीय असल्यामुळें, रुढिबंधनाची सबब पुढें मांडणें म्हणजे वेड गावून पेडगांवाला जाण्यासारखें आहे. या विषयांची चर्चा वाचकांपुढें करण्यापूर्वी पुरुष व स्त्री यांची शारिरीक रचना, स्वभाव, हें त्या जगन्नियंत्या प्रभूनें कसें निर्माण केलें आहे, याचा विचार करूं. डॉ. हॅविलॉक एलिज, यांनीं अशा विषयांवर ७ भागाचे एक पुस्तक लिहिलें आहे, त्यांत पुरुष व स्त्री म्हणून जो एक भाग आहे त्याच्या आधारें पुढील वर्णन लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पुरुषांपेक्षां स्त्रियांचा मेंदु लहान असतो. मेंदूचा आकार हा शरिराप्रमाणें, लहान मोठा असतो. पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या अंगांत जास्त चरबी असते. मुलापेक्षां मुलींमध्यें मेंदूची वाढ जलद होत असतें. ५५ वर्षांनंतर मेंदूचें वजन कमी होत जातें. स्पर्शज्ञान हें पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्यें जास्त असतें. पुरुषांपेक्षां स्त्रीया प्रकृतीनें नाजूक असल्यामुळें, साधारण दुखणें त्या सहन करतात, असें जरी भासलें तरी त्याचा परिणाम त्यांच्यावर जास्त होतो. सेंटसारखा वास, जर उग्र असला तर पुरुषांचे डोकें फिरून जातें, परंतु स्त्रियांना अशा प्रकारचे वास जास्त आवडतात. रुचीच्या बाबतींतही पुरुषापेक्षां स्त्रियांचा नंबर पहिला लागतो. पुरुषांपेक्षां स्त्रियांचे कान फार तीक्ष्ण असतात. स्त्रियांमध्यें, बाळंतपणा वगैरे कारणांमुळें नजरेवर परिणाम होतो, व पुरुषांचे तर डोळेंच बिघडून जातात. मुलापेक्षां मुलींची स्मरणशक्ति चांगली असते, व त्या पुरुषांपेक्षां जास्त बुद्धिमान् असतात. मुलांपेक्षां मुली लवकर भाषण करूं शकतात. कोणच्याही गोष्टीचा परिणाम मुलांपेक्षां मुलींवर लवकर होतो. श्वासोश्वास, पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्यें जास्त होतात, स्त्रियांचें स्नायु पुरुषांसारखें मजबूत नसतात.

**हृदयः**—लहानपणांत मुलांमुलींच्या हृदयांचा आकार व वजन सारखें असतें. १४ ते २४ पर्यंत मुलींमध्यें त्याची वाढ होतें, व पुरुषांमध्यें २० वर्षांनंतर आकारांत फेर पडत असतो. पुरुषांमध्यें लहानपणांत असलेल्या हृदयांचा आकार १३ पट वाढतो.

**पोट व अन्नमार्गः**—अन्नमार्ग स्त्रियांमध्यें मोठा असतो व आमाशयाचा आकार शरिराच्या ठेवणीवर अवलंबून असतो. प्लीहा व यकृत यांचा पुरुषांपेक्षां मोठा आकार असतो. गळयाच्या खालीं असणारी ग्रंथी ( Thyroid gland ) पुरुषापेक्षां मोठी असतें. स्त्रियांमध्यें या ग्रंथीचे तीन भाग पडतात व यामुळेंच या ग्रंथीला होणारा विकार स्त्रियांमध्यें ( Goitre ) जास्त आढळतो. ही ग्रंथी पाळीच्या वेळीं कामवासना व गरोदरावस्था यांमध्यें वाढत असते.

**स्वर नलिकाः**—( Larynx ) पुरुषांमध्यें मोठी असते, व ती तारुण्यांत आल्यानंतर वाढते, याचवेळीं घसा फुटला अशी म्हणण्याची रीत पडलेली आहे. स्त्रियांमध्यें तारुण्याच्या वेळीं ह्या नलिकेमध्यें फेर होतो परंतु तो विचारांत घेण्यासारखा नसल्यामुळें त्यांच्या आवाजांत बदल होत नाहीं.

पुरुषांचे रक्तामध्यें स्त्रियापेक्षां जास्त लाल रक्तकण असतात. पुरुषांच्या १ क्युबिक मीलीमीटर रक्तामध्यें ५ लाख रक्तकण असतात व स्त्रियांमध्यें ४ लाख असतात.

नाडीच्या वेगाची तुलना केली असतां स्त्रियांमध्यें पुरुषांपेक्षां १ मिनीटाला ६ ते १० पट ठोके जास्त असूं शकतात. गर्भावस्थेंत ह्या नाडीच्या ठोक्यावरून पुरुष कीं स्त्री आहे हे ओळखतां येतें. साथीमध्यें स्त्रिया पुरुषांपेक्षां जास्त टिकाव धरूं शकतात. कॅनसर म्हणून जो दुष्ट व्रण आहे, तो स्त्रियांना फार होतो. पुरुषांमध्यें अशा प्रकारचें व्रग, तोंड, अन्ननलिका, मान, घसा, या ठिकाणीं विशेष होतात.

लहानपणांत ( सारख्याच वयांचे ) मुलगे मुलीपेक्षां मोठे दिसतात, त्यांचे एखादें पौंड वजन व उंची जास्त असते छाती मोठी असते, पुरुषांपेक्षां स्त्रियांचे बाहु व पाय आंखूड असतात, धडाचा आकार ( Trunk ) लांब, व मान आंखूड असते; व यामुळेंच स्त्रिया बसल्या असतां पुरुषांपेक्षां उंच दिसतात.

घरांमधील काम पुरुषांपेक्षां स्त्रिया चांगल्या करूं शकतात. स्नायूंचीं शक्तिचीं कामें पुरुषांना जितकीं साधतात तितकीं स्त्रियांना साधत नाहींत. डाव्या हातानें काम करणें ( ज्याला आपण डावकुरा असें ह्मणतो, ) असें लोक पुरुषांमध्यें फार आढळतात. बहिरेपणा पुरुषांमध्यें जास्त असतो. पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्यें छातीचा आकार लहान असतो ( Shorter ) यावरून पुरुषांमध्यें, छाती मोठी व पोट लहान व स्त्रियांमध्यें पोट मोठें व छाती लहान म्हणण्याची रीत पडलेली आहे. ओटीचा भाग ( Pelvis ) स्त्रियांचा पुरुषांपेक्षां जास्त रुंद व खोलगट असतो.

स्त्रियांचा स्वभाव, जात्याच गरीब, लाजाळू व धाडसी नसतो; प्रसंगानुसार विरुद्ध गुण स्त्रियांमध्यें आढळतात. पाश्चात्य शिक्षणानें, हळुहळु स्त्रियांची वृत्ति पालटत आहे, व या शिक्षणांच्या योगानें समान हक्कांचें खुळ त्यांच्या डोक्यांत शिरत आहे. याचा परिणाम पुढें काय होणार हें भविष्य कालावर सोपवलेलें वरें. या प्रकरणांत दिलेल्या स्त्री व पुरुष, यांचा शारिरीक दृष्टया प्रत्येक बाबतींत कसा फरक नैसर्गिक रित्याच पडलेला आहे, हें वाचकांच्या ध्यानांत येईलच.

" प्रीतीविवाहामुळें युरोपांत दुष्परिणाम घडून आले आहेत. स्त्रिया माता होण्यास नालायक होत चालल्या आहेत प्रिती विवाहांत घटस्फोट फार होतात. घटस्फोटाशिवाय आपल्या देशांत प्रितीविवाह घडवून आणतां आले तर आणावेत अमेरिकेंत व युरोपांत प्रीतीविवाहाचे हें धोरण यशस्वी झालें नाहीं. स्त्रियांनीं नोकऱ्या कोणत्या कराव्या, धंदे कोणते करावे व त्याकरितां शिक्षण कोणतें असावें याचा आपण विचार केला पाहिजे स्त्रीपुरुषांत शास्त्रीयदृष्टया शारिरीक फरक आहे कीं नाहीं ? आपल्या स्त्रिया पाश्चात्यप्रमाणें पुरुषी न होतां उत्तम गृहिणी व माता झाल्या पाहिजेत. आपल्या प्राचीन ऋषींनीं १० उपाध्यायांबरोबर एक आचार्य १०० आचार्यांबरोबर एक पिता व १००० पित्याबरोबर एक माता या प्रमाणें मातेचें महत्व सांगितलें आहे. युरोपांतही १०० शिक्षकांबरोबर एक माता समजतात. स्त्री ही पुरुषाची अर्धांगी आहे गृहिणी व माता ह्या कल्पना युरोपापेक्षां आपल्या देशांतील फार उच्च आहेत. मुलाच्या मनाला जन्म देणारी माताच असते. जिजाबाईनें आपल्या मुलाच्या मनाला कसा जन्म दिला तें आपणास माहीत आहे. वडील क्लबांत जा त, खेळतात, यामुळें मुलांकडे पहाण्यास त्यांना वेळ सतो.

-

गृहिणीची व मातेची योग्यता फार मोठी आहे. गृहस्थाची गृहिणी हा ‘ डायनोमा ’ आहे. स्त्रिया जेव्हां पुरुषांना त्यांच्या कार्यात आपली ही विद्युच्छक्ति देतील तेव्हां देश जागा होईल. ह्मणून सर्व स्त्रियांना १४ वर्षेपर्यंत शिक्षण दिलें पाहिजे. स्त्रियांनीं घरांत बसूं नये. त्यांना कार्य करण्यास अनेक कर्तव्यक्षेत्रें आहेत. शाळा, रुग्णालयें, राजकारण, धर्मकारण, रणांगण वगैरे अनेक मोठमोठीं क्षेत्रें आहेत. तशीच अर्थोत्पादक सूत, शे‌ काम, दूध दुभतें, गायन–वादन वगैरे क्षेत्रें आहेत. कचेऱ्या, कारखानें, गिरण्या यांत स्त्रियांचें स्त्रीत्व हरण होते.

प्राचीन आर्यांचा जीवनक्रम अति उत्तम होता. ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम वानप्रस्थ व सन्यास असे चार आश्रम आहेत. ब्रह्मचर्य म्हणजे विद्याश्रम स्त्रियांना पूर्वी मौंजी बंधन असावें असें वाटतें १६ ते १८ वर्षांपर्यंत स्त्रियांनीं या आश्रमांत शिक्षण घ्यावें १४ ते २० या वयांत त्यांनीं गृहस्थाश्रमांत शिरावें. चार वर्षांच्या क्रमानें चार मुलें झाल्यावर तिनें सेवाश्रमांत शिरावें व पुढें वाटल्यास संन्यासिनी व्हावें. मुलें झालीं नाहींत तर वंश कसा टिकेल ? राष्ट्र कसें जिवंत राहील ? प्रत्येक विवाहित स्त्रीनें चार तरी मुलें निर्माण करावी म्हणजे दोन तरी जिवंत राहतील. आपल्या देशांत लक्षावधि पुरुष अविवाहित अशा स्थितींत राहिलें तर समाज कसा चालणार व यांत जर कांहीं सुधारणा केली नाहीं तर ४६५ वर्षांत तो समूळ नष्ट होईल असें श्रद्धानंदादिकांच म्हणणें आहे.

गृहस्थाश्रम ह्मणजे स्त्रियांना कांटेरी कुंपण नव्हे. इच्छा असेल तर ह्या आश्रमाचा त्यांना सदुपयोग करून घेतां येतो. युरोपांत आपल्याप्रमाणें गृहिणी गृहस्थाश्रमाची स्थिति नाहीं. हिंदुस्थानांत विवाह हा विधि दैवी मानला आहे. तो कुटुंबाकरितां व प्रजेकरितां आहे. युरोपांत विवाह हा करार आहे. तो वाटेल तेव्हां मोडतां येतो. आपली विवाहपद्धतकलम करण्याप्रमाणें आहे. ८।९ वर्षाच्या सुमारास मुलीचें लग्न होई व ती नवीन कुटुंबांत मिळून जाई. २५–३०–५० वर्षांची वधू असण्यापेक्षां १५–१६ वर्षांची कोणालाहि बरी वाटेल. लग्नानंतर कुटुंबाकरितां वधूनें वराच्या घरीं वागलें पाहिजे. वधू नित्य कुटुंबांतच राहावी. तेथें तिला सेवाधर्माचें, मातृपदाचें, बालसंगोपनाचें शिक्षण मिळावें. कुटुंब ह्मणजे ‘ समाजसेवा संस्था ’ आहे. युरोपांत मुलें वडिलांना वृद्धाश्रमांत टाकतात. मातांना कोठल्या तरी आश्रमांत ठेवतात. ख्रिसमसमध्यें त्यांना थोडीं फुलें पाठविलीं, मधून केव्हां तरी समाचार घेतला कीं काम संपलें ! असा प्रकार युरोपांत कुटुंब-संस्थेचा आहे

कुटुंब हें एक राज्य आहे. तें उत्तम कसें चालेल याचा विचार केला पाहिजे. कुटुंब नसेल तर आपणाला अन्न उत्तम कसें मिळेल ? कुटुंब व्यवस्था मोडली तर त्या जागीं हॉटेलें येतील, व हल्लीं हॉटेलें वाढत आहेत. अमेरिकेंत २।३ वर्षांपुरतें लग्न करावें असें स्त्रीपुरुषांस वाटूं लागलें आहे. पति-पत्नीसारखें एकत्र राहणें त्यांस आवडत नाहीं. नवऱ्यानें केव्हां तरी मठांत यावें व नित्य घरीं रहाण्यांत मुलांना शिस्त लागत नाहीं म्हणून मुलेंहि बालसंगोपन संस्थेंत टाकावीं, तेथें त्यांची जोपासना व्हावी. व इकडे पति-पत्नींनीं मोकळे राहून देशसेवा, समाजसेवा करावी; अशा गोष्टी कित्येक स्त्रिया आज विलायतेंत प्रतिपादीत आहेत. स्त्रीपुरुषांची शास्त्रीय व्याख्या काय ? हल्लीं जगांत पुरुषी स्त्रिया व बायकी पुरुष निर्माण होत आहेत. स्त्रियांमध्यें अन्तःकरण हें प्रधान तर पुरुषांत बुद्धि प्रधान आहे. मूळ परमेश्वर अर्ध-नारीनटेश्वर होता. पुढें त्याचीं दोन निरानिराळीं स्त्री व पुरुष अशीं अंगें होऊन त्यांनीं एकमेकांना पूरक व्हावें अशी व्यवस्था झाली. तिच्या अन्तःकरणांत प्रेम जास्त तर पुरुषाच्या मस्तकांत बुद्धि जास्त असा फरक नैसर्गिक झाला. मस्तकरूपी पुरुषांनीं अन्तःकरणरूप स्त्रियांना हलवून सोडावें ह्मणजे त्यांचा प्रभाव तुह्माला समजेल.

कोणी ह्मणेल कीं स्त्रीपुरुषांतील भिन्न गुण हे काल्पनिक आहेत; पण असें नाहीं. एलिस व हॉल यांनीं आपापल्या ग्रंथांतून याचें विवेचन केलें आहे. पुरुषांत लढण्याची वृत्ति नैसर्गिक आहे तर स्त्रींत सेवावृत्ति आहे. पुरुषांत तर्क, बुद्धि, शक्ति, साहस उद्यम, चिकित्सा हे गुण आढळतात तर स्त्रींत प्रेम, दया, सेवा, सहानुभूति इत्यादि गुण दिसतात. शेक्सपिअर, कालिदास, गडकरी यांच्या नायिका पहा म्हणजे आपणास हा सिद्धांत पटेल. कांहीं म्हणतात स्त्री-पुरुषांत जसे शारीरिक भेद असले तरी मानसिक गुणांत नाहींत, पण ही चूक आहे. शरीराप्रमाणें मनांत, बुद्धींत, भावनांत भेद असावयाचेच. डॉ. लिट्मन यांनीं ८००० मुलांच्या प्रश्नपत्रिका तपासून हा सिद्धांत प्रस्थापीत केला आहे.

स्त्रियांना घरांत डांबून ठेवावयाचें आहे, त्यांना मुलें सांभाळावयास लावावयाचें आहे, ह्मणून पुरुष हे स्त्रीपुरुषगुणांत हा फरक करतात असें कांहींचें म्हणणें आहे. पण ही चूक आहे. १९११ सालीं विलायतेंतील प्रसिद्ध डॉ. अॅडॉमिची शिक्षण-कमिटीपुढें साक्ष झाली. तींत त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, मुलांमुलींत मानसिक व शारीरिक फरक आहेत. ग्रांथिक रसांचे सत्वांश मनुष्याच्या

रक्तांत फरक उत्पन्न करतात. स्त्रीपुरुषांत अनेक प्रकारच्या ग्रंथी आहेत. स्त्रीमध्यें कांहीं विशिष्ट ग्रंथींची वाढ न झाली तर ती पुरुष बनते. त्याचप्रमाणें पुरुषांत न झाली तर तो स्त्री होतो. स्त्रीच्या रक्तांत पाण्याचा अंश असतो पुरुषांत तो कमी असतो. मुलगी मुलापेक्षां ३–४ वर्षें लवकर वयांत येतें. त्याला अनुसरून त्याचा विवाहकाल ठरविला आहे. कांहीं झालें तरी स्त्रीपुरुषभेद विसरून चालणार नाहीं. दोघांच्या रक्तांतहि असाच फरक आहे.

स्त्रियाचें जघन, ऊरु वगैरे भाग १३ ते २० वर्षांपावेतों वाढून पूर्ण होतात, त्याची वाढ पूर्ण झाली पाहिजे. निसर्गाला अविवाहित स्त्री माहिती नाहीं. स्त्रियांमध्यें विवाहापर्यंत पुढील कार्याला योग्य अशा सर्व शक्ति संग्रहीत झाल्या पाहिजेत. मुलाचे दांत तर आईच्या दुधावर अवलंबून असतात. युरोपांतहि स्त्रिया अबला असें डॉक्टर समजतात. त्या घरांत प्रबला व धुरंधर असतात. रजोवस्थेमुळें त्यांचें काम करण्याचे दिवस पुरुषापेक्षां कमी आहेत. एलिस व हॉल यांनीं स्त्रियांची रजोवस्था म्हणजे लहानसा आजारच म्हटला आहे. स्त्रियांच्या हातून चोऱ्या, खून वगैरे गुन्हे या अवस्थेंतच होतात. या अवस्थेंत त्यांनीं पुरुषांच्या सान्निध्यांत राहूं नये. इंग्लंडांत या अवस्थेंत गायिका काम करीत नाहींत. स्त्रियांना गुन्ह्यांची माफी करण्याबद्दल वकील जज्जांना विनवितात, पण कांहीं जज्ज अद्याप शिक्षा कमी करीत नाहींत. उद्योगधंद्यांत सांपडलेल्या स्त्रिया या अवस्थेंत निरोगी असत नाहींत. रजोवस्थेचा उपयोग हिंदु, पारशी, यहुदी वगैरेनीं विश्रांति घेण्याकडे केला आहे. पण हल्लीं आपण स्त्रियांना या अवस्थेंतही कामाला लावतों. रोग्यांकडून काम करून घेण्याप्रमाणें तें अनिष्ट आहे.

मुलामुलींचा विकास निराळा आहे. याकरितां भिन्न शिक्षणाची स्वतंत्र विद्यालयें असावीं. हें मत युरोपांत फार वर्षांपासून झालें आहे प्रो. कर्व्यांच्या महिला विद्यापीठानें हेंच ध्येय पुढें ठेवलेलें आहे. हें मत आहे. जिला माता होणें आहे तिनें १८–१९ वर्षांपर्यंत आपला शिक्षणक्रम पूर्ण करून विवाह करावा असें डॉ. केनेली ( आयर्लंड ) यांचें मत आहे.

कांहीं स्वातंत्र्य-समता-बंधुतावाद्यांचें मत असें आहे कीं, स्त्रीपुरुष हीं समसमान आहेत, उभयतांना आत्मा आहे तो भिन्न नाहीं स्त्रियांनाहि पुरुषांप्रमाणेंच शिक्षण घेणें व नोकरी करणें वगैरे योग्य आहे. पुरुषांनीं त्यांना दास्यांत ठेविल्याचा हा परिणाम आहे. त्यांनीं दास्य झुगारून दिल्यास त्या पुरुषांप्रमाणें

समर्थ होतील. त्यांना मताधिकार मिळाला ह्मणजे त्या सर्व मोठमोठ्या संस्थांतून कामें करण्यास लायक होतील, पण हें मत चुकीचें आहे. वास्तविक स्त्री ही स्त्री आहे ह्मणूनच पुरुष तिच्याकडे निराळ्या दृष्टीनें पाहतो, ती स्त्री म्हणूनच तिला मत देतों नाहीं तर दिलें नसतें.

स्त्रीच्या रक्तांत पाण्याचा अंश जास्त असल्यामुळें तिला थकवा फार लवकर येतो. बाळंतपणामुळें, कामामुळें, मानसिक व शारीरिक श्रमामुळें त्यांना ताण फार पडतो, रजोवस्थेमुळें तिचे वर्षातील कामाचे दिवस ३१५ तर पुरुषांचे ३६५ आहेत. स्त्रियांना पुरुषांपेक्षां अधिक विश्रांति पाहिजे असेंहि मत आहे.

स्वयंनिर्णयाचें तत्व अवलंबिलें तर एक पतिपत्नीव्रत नाहींसें होईल. व्यक्ति समाजाकरितां आहे हें विसरतां उपयोगी नाहीं. हल्लीं सहशिक्षण हा स्वर्ग वाटतो त्यांत तोटे नाहींत असें वाटतें; पण हॉल, लिंडसे हे त्याच्या अगदीं उलट आहेत. ११ वर्षांपर्यंत मुलामुलींना एकत्र शिक्षण दिलें तरी चालेल, पण पुढील उच्च शिक्षण अगदीं निरनिराळें पाहिजे. असें त्यांचें स्पष्ट मत आहे. कै. प्रो. चिपळुणकर यांनीं आपल्या पुस्तकांत वरील प्रकारची मतें, प्रतिपादन केलेली आहेत.

# प्रकरण ३० वें

—:०:—

## आमची सद्यःस्थिती

गरीब, दुबळें, हिंदुस्थान आज १०० वर्षे होऊन गेली, तरी ब्रिटीश अमलाखालीं नांदत आहे. राजकीय दृष्ट्या विचार केला, ह्मणजे आमच्या राजकर्त्यांच्या दृष्टीनें अद्याप आह्मीं आपलें राज्य संभाळण्यास लायक झालों नाहीं अशा प्रकारचें सर्टिफिकेट, पार्लमेंटमध्यें केव्हांही हिंदुस्थानला सवलती द्यावयाचा प्रश्न आला ह्मणजे वरील ठराविक उत्तर मिळावयाचें हें ठरलेलें असतें, असें धरून चालण्यास हरकत नाहीं. कायद्याच्या जोरावर स्थापलेलें राज्य कायद्यानेंच उलथून पाडलें पाहिजे; वरकरणीं हें तत्व गोंडस दिसलें, तरी बोलेल तो करील काय, ही ह्मणच प्रत्ययास येते व याचा अनुभव

संसारामध्यें प्रत्येकाला येतोच. आपल्या राज्यकर्त्यांनीं आमच्या गुणाची पारख केलेली आहे, आह्मी दुबळें लोक अहोंत, आमच्या अंगांत, काडी उचलण्याची ताकद नाहीं, हें त्यांनीं, पूर्णपणें ओळखून आम्हांला दिवसें दिवस परावलंबी कसें करतां येईल, अशा प्रकारची सुधारणा ( कुधारणा ) ते घडवून आणीत आहेत. व आह्मी त्यांचें खुशाल अंधानुकरण चालविलें आहे ! लो. **टिळक, महात्मा गांधी**, यांसारख्या विभूतींनीं, दुबळ्या हिंदवासी यांचे डोळे, उघडून, आपण कोणत्या स्थितींत आज अहोंत याची जाणीव करून दिली, या तरुण पिढीचे विचार रहाणारे निःसत्व लोक कितपत टिकाव धरणार ? असो. ही स्थिती आमची कां झाली, याला आपलें भाग्य समजलें पाहिजे स्वराज्य ही वस्तु मागून, अर्ज करून, लांबलांब भाषणांनीं मिळत नसून ती मनगटांच्या जोरावर मिळवावयाची असतें आपला जोर काय आहे हें दाखविण्यास अंगांत शक्ति पाहिजे. ही शक्ति आपल्या अंगांत आहे काय ? एखादा मुसलमान आपल्या अंगावर आला, तर आपण घाबरून दरवाजे कोंडून आंत वसतो ही गोष्ट, रोजच्या व्यवहारांतली आहे तर ज्यांच्याजवळ विज्ञानें दारुगोळा बॉंब वगैरे आधिभौतिक सामुग्री असून, परकीय राजसत्ता हें कारण असलें, तरी वैद्यकीय दृष्ट्या जी दुसरीं कारणें आहेत याचा विचार करूं. आपण सर्व परीनें दुबळे झालेले आहोंत. त्याला कारण सध्यांची राजकीय व सामाजिक परिस्थिति आहे. वैद्यकीय दृष्ट्या विचार करूं लागलें म्हणजे आपलें आयुष्य दिवसें दिवस क्षीण होत आहे असें आढळून येतें. आपल्या वाडवडिलांची जी कणखर प्रकृति होती त्यांच्या अंगांत कष्ट करण्याचें जें सामर्थ्य होतें व आहे, तें आपल्यांत आढळत नाहीं, व आपल्यांत जें सामर्थ्य असतें तें आपल्या मुलांत आढळत नाहीं. यांवरून हिंदुस्थानाची भवितव्यता काय आहे, व स्वराज्य मिळालें तरी आपण तें कितपत टिकविणार हा एक महत्वाचा प्रश्न आहे. याला कारणें कशीं कशीं [illegible]त गेलीं आहेत तें पाहूं.

( १ ) **प्रकृति बिघडण्याची कारणें:**—शहरांत रहाणें, अस्वच्छता, शुद्ध हवचा अभाव, गिरण्यामुळें बदलणारे वातावरण, हवेंमध्यें वारंवार बदल होणें वगैरे

( २ ) **निसर्गाच्या विरुद्ध असणाऱ्यासवयीं:**—अन्न न खाणें, व्यायाम न करणें, फिरावयास न जाणें, कपडे, पोटांमध्यें दारू, तंबाखु, अफु, पेटंट औषधें, वगैरे जाणें.

( ३ ) गरीबी.

( ४ ) अज्ञान.

( ५ ) उपदंश, पूयप्रमेह विकार.

( ६ ) लढाई.

( ७ ) **अनुवंशिकपणाः**—( Heredity )

खेडेगांव व शहर यांची तुलना करावयाची ह्मणजे, ४ दिवस मुंबई सोडून एखाद्या बाहेरगांवीं जावें, ह्मणजे शरिरावर मनावर कसा फरक होतो, हें ताबडतोब समजून येतें. शहरांत रहाणारा वर्ग म्हणजे नोकरी पेशाचा मध्यम वर्ग, होय. पगार कमी, जागेला भाडें फार, शुद्ध हवेचा अभाव, यांमुळें, ऑफिसमधून घरीं विश्रांती घ्यावयाची ह्मटली, तर त्याचा फायदा मिळत नाहीं. घरें सुद्धां अशा प्रकारचीं बांधण्यांत आलेलीं आहेत, कीं, त्यामध्यें वारा येईल तर शपथ, बरें शुद्ध हवेच्या ज्या जागा आहेत, तेथें भाडें फार, यामुळें मध्यमवर्गाची कुचंबणा झालेली आहे. या लहानशा अपुऱ्या जागेंत वाऱ्याची उणीव, स्वयंपाक घरांतील धुर, यांचा परिणाम फुफ्फुसांवर होऊन क्षयासारखा दुर्धर विकार प्रत्येक कुटुंबांत खिळून राहिलेला आहे.

आजकाल नोकऱ्या मिळणें सुद्धां दुर्घट झालेलें आहे. आमची दैन्यवस्था इतक्या खालच्या कोटिपर्यंत गेलेली आहे कीं, एखाद्या शिपायाची जागा खालीं झाल्यास, मॅट्रिक पास झालेल्या शेंकडों उमेदवारांची त्या जागेवर उडी पडत असते.

पूर्वीच्याकाळीं अमुक शिक्षण घेतलें म्हणजे ४०-५० रुपयांची नोकरी मिळणें फारसें कठिण नव्हतें. आतां गरजा थोड्या व मागणी फार अशी स्थिती झालेली आहे यामुळें, शिक्षण कोणतें घ्यावें व न घ्यावें, अशा प्रकारचा प्रसंग प्रत्येक आईबापांवर आलेला आहे. जे कांहीं हिंदी लोक थोडेंसे शिक्षण घेऊन सुदैवानें मोठ्या जागेवर आहेत, त्यांच्याकडून त्यांच्या हाताखालच्या नोकरांशीं होणारी वागणूक पाहिली तर खाटीक एकवेळ बरा असें म्हणण्याची पाळी येते. साहेबांचीं हांजीं हांजीं करण्यांत ज्यांचा जन्म गेला, व ज्या हांजीं हांजीपणामुळें, पगारांत वाढ झाली, अशा आपल्याच भाईबंदांनीं, अधिकार प्राप्त झाला

असतां, दुर्दैवानें नोकरी पेशा, प्राप्त झाला म्हणून त्यांना, वर्मी लागेल, असे शब्द ऐकण्याची रोज महिन्याचे तीस दिवस पाळी यावी ना ?

आपण कोणच्या स्थितींत होतों, याची जाणीव या अधिकाऱ्यांनीं विसरावी काय ? हा प्रश्न येथें उद्भवण्याचें कारण, म्हणजे आजची नोकरीपेशा वर्गाची खालावलेली स्थिती हेंच होय.

शहरांत पाण्यापासून तो अन्नापर्यंत प्रत्येक गोष्ट शुद्ध स्वरूपांत न मिळतां कृत्रिम स्वरुपांत मिळत आहे. जास्त फायदा मिळण्याकरितां, दूध घट्ट रहावें व जाड दिसावें म्हणून, बारीक ॲसिडसारख्या जंतुनाशक द्रव्याचे पुडेच्या पुडे, दुध विकणारा वर्ग, हमेशा दुधामध्यें वापरित असतो. अशा प्रकारचें दूध, आमच्या लहान मुलांना देण्यांत आलें त्यांपासून उलटी झाली यकृताचा विकार, मलावरोध झाला, तर दोष कोणाचा ? आईबाप, शुद्ध दुध म्हणून जास्त किमतीला मिळणारें दुध विकत घेत असतात, व त्याचा परिणाम अशा भलत्या प्रकारें होत असतो, चांगले शुद्ध दुध मिळत नाहीं, मिळाल्यास तें पचत नाहीं, म्हणून परदेशी मिळणारे दुधाचे डबे, यांवर लहान मुलांचे पोषण करावें लागतें, हें दुध कांहीं मुलांना मानवतें, तर पुष्कळ मुलांना अपायकारक होतें. गोरक्षण संस्थेसारख्या संस्थेनें, हा प्रश्न हातांत घेऊन, थोडीबहुत सोय केलेली आहे; त्यांतल्या त्यांत ही समाधानाची गोष्ट होय.

शुद्ध दूध मिळत नाहीं, चांगलें दूध मिळण्यास पुरेसा पैसा नाहीं, तेव्हां दुधा ऐवजीं ती जागा चहानें व्यापलेली आहे. चहा हें उत्तेजक पेय आहे, तें पौष्टीक अन्न नव्हें. काम करून थकवा आल्यास थोडावेळ मज्जातंतूंना वारंवार उत्तेजन मिळत असल्यामुळें त्यांची ताकद स्वाभाविक कमी होते, ते निर्बल व चंचल होतात, व त्याचा वीर्यावर अत्यंत घातुक परिणाम होतो. चाहा पिणारे तरुण स्त्री पुरुष वर्ग यांचीं मुलें पाहिली असतां, मेंदुनें तरतरीत पण शरीरानें जरत्कारु दिसतात यांचें कारण हा चहा होय. गर्भावस्थेंत चहाचें विज आईच्या द्वारें मिळत असतें, व या मुळेंच पुष्कळ मुलांना दुध पिण्याचा कंटाळा येतो, व तीं चहा करितां हट्ट घेतात, म्हणून तरुण आईबापांना त्यांचें कौतुक वाटत असतें, परंतु अपल्याना चाहा स्वतःच्या मुलांची जीवन शक्ति कमी करित असतो याची जाणीव कोणालाही नसते. जीवन शक्तीचा क्षय झाल्यामुळें, व तो अशा कारणांनीं होत असल्यामुळें, हवेमध्यें थोडा फेरफार झाल्यास सर्दी, न्यूमोनिया, अतिसार

होण्यास वेळ लागत नाहीं, शिवाय घराची स्थिती कशी असते व तीं कां असतें हें वर सांगितलेलें व आहे.

मध्यम वर्गाच्या लोकांची ही स्थिती झाली, आतां गिरणीमध्यें काम करणाऱ्या मजुरांची स्थिती पहा. सूर्य प्रकाश दिसूं लागतो न लागतो तोंच कामावर जाण्याची पाळी येते, व सूर्यास्ताला घरीं येण्याची पाळी येते. गिरणीमधील काम करण्याऱ्या मजुरांचे दर महिन्यांला वजन घ्यावयाचा प्रयत्न कोणी केला तर तें घटत जात असल्याचें आढळून येईल. उन्हाळ्याच्या दिवसांत तर शरिरांतून घाम येत असतो. गिरणी मजुरांना, पगार जरी किती मिळाला तरी श्रमपरिहार करण्याकरितां व यंत्राचा कानावर होणारा आवाज घालवण्याकरितां मदिरापानाची जरूरी भासते. अशा लोकांना दारु सोडा हा उपदेश करणें सोपें आहे, परंतु उपदेशक तशा प्रकारचें काम करील तर हे लोक दारू कां पितात हें त्यांना समजून येईल. गिरणींतिल मजुरांचे तास कमी केल्याशिवाय व त्याच्या राहणींत सुधारणा घडवून आणल्याशिवाय दारूचें व्यसन कमी होणार नाहीं. आधींच पगार बेताचा व त्यांतून बराचसा पैसा दारुपायीं खर्च होत असल्यामुळें एखाद्या लहान खोलीमध्यें ४–५ कुटुंबें एके ठिकाणीं रहात असतात, मजुरांचीं घरें, म्हणजे क्षय, महामारी, विकारांची माहेर घरेंच होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. बिचाऱ्यांना १२ तास अंग मोडून काम करावें लागत असल्यामुळें शरिराला थकवा येत असतो व झोपेंही चांगली मिळत नसते, या झोपेमध्यें दूषित वायु नाकांच्या द्वारें जात असतात, व क्षयासारखे विकार होत असतात. निरनिराळ्या कादंबरीकारांनीं, मजुराची स्थिती वर्णन केलेली आहे, परंतु ज्याला त्याच्या या स्थिती अनुभव आहे, तो म्हणेल ह्या गिरण्या नकोत व नोकरीही नको, आपली ऑफिसमधील ६०–१०० ची नोकरी बरी.

या मजुर लोकांच्या बायकांची स्थिती पाहिली, म्हणजे, खरोखरच दया येते. नवऱ्याबरोबर, त्याही कामांवर जात असतात, शिवाय नानाप्रकारचे मोह त्यांच्यापुढें असतात; नानाप्रकारच्या लोकांशी गांठी पडतात यामुळें त्या नीतीभ्रष्ट झाल्या तर नवल नाहीं. नवरा दारुबाज असतो यामुळें यांचे पटत नाहीं, अशाप्रकारें संसाराचें मातेरें होत असतें. विचारे म्हातारे आईबाप आपला मुलगा गिरणींत काम करीत आहे, ६०–७० रुपये मिळवीत आहे, तेव्हां अखेरच्या दिवसांत मदत करील म्हणून कष्ट करीत असतात, व आशा बाळगत असतात,

परंतु पैसे बाजूला राहून कर्जाचें बोजे मात्र उलट तो उभारित असतो. **महात्मा गांधीचा** यामुळेंच गिरणीच्या कापडावर कटाक्ष आहे. गिरणीचें कापड चांगलें मिळतें, पण त्या बरोबर किती मजुरांचे अमूल्य आयुष्य त्यांत खर्च होत असतें, यांचा कोणी विचार करीत नाहीं, व हा विचार आमच्या मनांत आला असतां तर आज ही दशा कां आली असती ?

न.कऱ्या मिळत नाहींत, आमच्या देशांतील चांगलीं चांगलीं धान्यें, तांदुळ, गहूं, परदेशाला जात आहे व आम्हांला जीवनीय तत्वें ( व्हीटेमीन्स ) कमी असलेला गहुं, पॉलीश केलेला रंगूनचा तांदुळ खावा लागत आहे. अशाप्रकारचें निःसत्व अन्न आम्हांला कितीशी ताकद देणार ! शिवाय, दारू, चहा, मसालेदार पदार्थ खाण्यांची चटक लागल्यामुळें आमाशय बिघडून जाऊन अग्निमांद्यासारखे विकार जडत आहेत. नळाच्या पाण्यांत, हवेंत, चुना हें तत्व ( Calcium ) नैसर्गिकच कमी असल्यामुळें, व पाणी सांठवलेलें असल्यामुळें, शौचाची तक्रार शेंकडा ९९ लोकांना जडलेली आढळून येते. सिनेमा, नाटकें, यामुळें जाग्रण करणारे लोकही पुष्कळ आहेत. पुरेशी झोंप न मिळणें, हेंही प्रकृति बिघडण्याचें कारण आहे. तात्पर्य काय शहरांतील लोक नानाप्रकारच्या चैनीच्या, सुधारणेच्या मागें लागत असल्यामुळें, व दिवसें दिवस परावलंबी जीवित होत असल्यामुळें, गरिबी वाढत आहे. सगळ्यांचें सोंग करतां येतें पैशांचें सोंग आणतां येत नाहीं पैसा हातांत नसला, वेळेवर अन्न मिळत नसलें, म्हणजे, वाईट फंदांत पडण्याची वृत्ति बनते लबाडी, चोरी, व्यभिचार, या मार्गाच्या खोलांत गेलें असतां, गरिबी हेंच आढळून येतें. गरिबीमुळेंच चांगली माणसें वाईट मार्गास लागतात. अनुवांशिकपणा हेंही त्यामध्यें महत्वाचें कारण आहे.

ह्या गरिबीमुळेंच, उपदंश, क्षय, पू प्रमेह हे विकार पसरत आहेत. पुरेसा पैसा मिळत नाहीं, जागेचे भाडें फार, म्हणून बिऱ्हाड करतां येत नाहीं, नानातऱ्हेचीं उत्तेजक पेयें पिण्यांत आल्यामुळें, मनोविकार अकालीं उद्दीपीत होत असतात, व हे मनोविकार शमन करण्याचें साधन म्हणजे धंदेवाईक स्त्रिया, यामुळें नानाप्रकारच्या रोगांचा फैलाव कसा झपाट्यानें होत आहे याचें वर्णन मागें आलें आहेच.

गरिबी हा रोग हिंदुस्थान देशांत वाढल्यामुळें, संतति कमी कशी करावी अशा प्रकारचे प्रश्न उद्भवलें तर नवल नाहीं व याचे इष्टानिष्ट परिणाम जरी जाणवलें

तरी चालतील; पण संतति न होण्याचा मार्ग बरा असेंच प्रत्येकाला वाटलें तर त्यांत नवल नाहीं. हल्ली मजा अशी झालेली आहे कीं, ज्याला मुलीं आहेत त्याचें काम कठीण आहे. मध्यम स्थितीच्या लोकांची स्थिती कशी आहे हें वर आलेलेंच आहे; अशा लोकांच्या नशीबी, मुली जसल्या तर बिचारे हुंड्याच्या नांवाखालीं चिरडून जातात. लग्न म्हणजे परस्परांचें कुटुंब, यांची संघटना करणें, हा होय. परंतु हा उद्देश, मुलीच्या बापाला पिळून काढणारा वरपक्ष कितपत सिद्धीस नेतो हें उघड दिसत आहे. व अशामुळेंच आजच्या खर्चाच्या बाबी वगळून नूतन तरुण जोडपीं, एखाद्या समाजाचा आश्रय करीत असतांना आढळलेले दिसतात. हुंडा न घेणें, याबद्दल उपदेश करणारे पुष्कळ आढळतात, व हुंडा हें नांव बदलून, आमच्या मुलाला शिक्षणाला तेवढा पैसा खर्च झाला, त्याला विलायतला जायचें आहे, वगैरे पोकळ सबबी पुढें ठेऊन निराळ्या प्रकारानें पैसा काढित असतात; यामुळें मुलीचा बाप होणें कोणाला आनंददायक वाटत असेल या हुंड्यामुळें, पुष्कळ मुली बरीच वर्षें अविवाहीत रहतात, व एखादे वेळीं चुकून वांकडे पाऊल पडून, मातापितरांना मान खालीं घ्यावयाची पाळी येते. यामुळें मध्यम वर्गाची स्थिती अत्यंत केविलवाणी झालेली आहे. घरांत मुलगी वाढलेली असते, शहरांतील, नानाप्रकारच्या अगडबगड जातींत वस्ती करावी लागते, व आतां या मुलीला घरीं ठेऊन करावयाचें काय, म्हणून शाळेंत जाणें, हा एक मार्ग नवीन आंखला गेला आहे. स्त्रीया सुशिक्षित झाल्या, त्यांना आपलें हिताहीत कळूं लागलें, शिक्षणामुळें स्वतःच्या पायावर उभें राहावयास आलें म्हणजे त्यांची त्यांनाच आपली स्थिती कळूं लागते व मग विचाराना निराळी दिशा लागून मिश्रविवाहासारखे प्रश्न त्यांच्या मध्यें डोकावूं लागतात.

स्वतःच्या जातीमध्यें लग्न करावयाचें म्हणजे हुंडा आड येतो. तो देण्याची आपल्या आईबापांना ताकद नाहीं हे शिक्षण घेतलेल्या स्त्रीला कळत असतें, तेव्हां हुंडा न घेतां, दुसऱ्या जातीमधील ज्यांच्याशी आपलें प्रेम जडलें आहे अशांशी विवाह केल्यास काय वाईट असा प्रश्न साहाजिकच मनांत येतो? अविवाहीत रहा पण लग्न करुं नका, असा उपदेश तारुण्यांत आलेल्या स्त्री-पुरुषांना रुचेल काय? समाज सुधारणा, समाज सुधारणा म्हणून घोष करणें सोपे आहे, परंतु ती कृतींत आणणें कठिण आहे पुढील काळ हा असा यावयाचा आहे जुनी पिढी अशा प्रकारच्या सुधारणांना आरंभीं आरंभीं नांवें ठेवतील, व शेवटीं हेंच

बरें असें ह्मणण्याची पाळी येईल. रोगांचें मूळ काय तें शोधून न काढतां बाह्य लक्षणांवर औषध देणारा डॉक्टर जसा फसतो, व रोग बरा करूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें, आमच्या हिंदुधर्मांच्या विवाहाची स्थिती झालेली आहे. मध्यमवर्गी अगर कोणच्याही वर्गाचें उदाहरण घ्या, एखादा माणूस आजारी पडला, अगर महिन्यांची १५ तारीख होऊन गेली म्हणजे पैशांची तारांबळ काय उडते, दुसऱ्यांच्या तोंडाकडे कसें बघण्याची पाळी येतें वगैरे गोष्टी हरहमेशा पहाण्यांत येतात व घडत असतात.

अशा स्थितीमुळेंच अविवाहीत मुली शहरांत वाढलेल्या फार दिसत आहेत. समजते पण उमजतें नाहीं अशी स्थिती मुलामुलींचें आईबाप यांची झालेली आहे. गरिबीचे प्रमाण वाढत आहे, पाऊस पडावा त्याप्रमाणें पडत नाहीं, घरांची भाडी फार ह्मणून चांगल्या जागा मिळत नाहींत, नोकऱ्या मिळत नाहींत यामुळें आपला प्रपंच कसा चालेल याची चिंता प्रत्येक कुटुंबवत्सल मनुष्याला लागलेली असते. नुकतेंच सौ. शारदाबाई दिवाण ( M. A. ) या विदुषीनें, देशांत लहान मुलांची मृत्युसंख्या इतर देशांपेक्षां जास्त आहे, यांचे कारण आईबापांना शिक्षण नसतें, स्त्री शिक्षण वाढल्याशिवाय, ही मृत्युसंख्या कमी होणार नाहीं, याकरितां दर वर्षी बेबी वुइकसारख्या चळवळी करून शिक्षण दिलें पाहिजे असें सांगितलें. व्याख्यात्या ह्या विदुषी विद्वान् आहेत, श्रीमंत कुलांत जन्मलेल्या आहेत, तेव्हां प्लॅटफॉर्मवर उपदेश करण्याचें काम सोपें आहे, स्त्रियांना शिक्षण दिलें पाहिजे, शिशुसप्ताहासारख्या चळवळी चालविल्या पाहिजेत असें व्यास-पीठावरून सांगण्यांत येतें. परंतु मृत्युसंख्या वाढण्यांचे कारण जें गरिबी त्यांवर उपाय मात्र कोणाला सुचत नाहीं. ही गरिबी हा गरिबीचा रोग हिंदुस्थान देशाला नडत आहे; स्वतःच्या देशांत आह्मांला पुरेसें वस्त्रप्रावरण अन्न मिळूं नये यापेक्षां शोचनीय व हीन स्थिती दुसरी कोणची आहे? मातृप्रेम हें खरें जिव्हाळयाचें प्रेम असतें, त्यांत स्वार्थ नसतो, स्वतःचे पोट उपाशी राहिलें तरी माता, आपल्या मुलचे लाड, कौतुक पुरवित असते, मातांना आपली मुलें कशी चांगली राखावी हें नैसर्गिकच कळत असतें, परंतु कळून उपयोग काय? पैशाशिवाय सर्व कांहीं फुकट आहे, नुसतें दरवर्षी बेबीवुइकसारखे शो करून लहान मुलांचे पोषण होणार नाहीं, व त्यांची मृत्युसंख्याही कमी होणार नाहीं, तेव्हां गरिबी दूर करण्याचा मार्ग ह्मणजे स्वराज्य हें होय हें अपोआप सिद्ध होतें स्वराज्याशिवाय सर्व गोष्टी फुकट आहेत

परंतु स्वराज्य मिळण्यापूर्वी आपल्या हातून काय होण्यासारखें आहे याचा उहापोह करून हें प्रकरण संपवूं: सावकार खोत व कुळें यांचा प्रश्न अत्यंत बिकट झालेला आहे. मुंबईच्या कांहीं मूठभर बेजबाबदार पुढाऱ्यांनीं मजुरांमध्यें क्रांतिकारक तत्वें पसरवून या लोकांची दिशा भूल केलेली आहे. यामुळें खेडेगांवात असणाऱ्या कुळांना, सावकार ह्मणजे कोण, त्याला आपण पैसे परत कां करावेत, त्यांचे व्याज कां द्यावें अशा प्रकारचे वेड डोक्यांत भरल्यामुळें सावकाराला व खोताला बुडवणें हें आपण महत्कार्य करीत आहोंत, अशी त्याची समजूत झालेली आहे. टाळी एका हातानीं वाजत नाहीं, सर्वच सावकार चांगले असतात असें लेखकांचे ह्मणणें नाहीं; परंतु पुष्कळशा कुळांना, सावकाराचा पैसा फार काय व्याज देणें, जिवावर येतें. खेडेगांवातील सावकार अगर खोत हा कुळाला प्रत्येक कामांत लग्नाला अडीअडचणीच्यावेळीं मदत करीत असतो. परंतु हें तत्व त्यांच्या गांवींही नसल्याचे अलिकडे सिद्ध होत आहे.

सावकाराला बुडवावा कसा, हाच प्रश्न पैसे घेतांना अगोदर डोकावूं शकतो. कांहीं सावकार, यमाचे दुसरे अवतार समजण्यास हरकत नाहीं, परंतु ह्या गोष्टी, दोघांनींही समजून उमजून विचार करून, सलोख्यानें केल्या तर देशांवर एक प्रकारें उपकार केल्यासारखें होईल.

कोकणातील, लोक निरुपयोगी असल्यामुळें, भांडण करून कोर्ट व वकील यांचे सांजसकाळ उंबरठे झिजविणें, म्हणजे एक धार्मिक बाबच समजतात असें ह्मटल्यास अतिशयोक्ती होणार नाहीं. ४ रुपयांचा दावा असल्यास इरीनें पेटून ५०० ते ६०० पर्यंत कर्ज काढून खर्च करण्याची प्रत्येकाची प्रवृत्ति आढळून येते. इंग्रजीत एक ह्मण आहे कीं, आळशी इसमाच्या डोक्यांवर नेहमीं सैतान बसून त्याला नानातऱ्हेचे ढंग करण्यास शिकवीत असतो, खेडेगांवाची स्थिती अशीं झालेली आहे. खावयाला दुसरें अन्न नाहीं, परंतु कोर्टांत खोटे कज्जे लढवण्याची हौस फार अशा प्रकारचीं माणसें, खेडेगांवांत ४ दिवस हवापालट करण्यास गेलेल्या शहरांतील माणसांला आढळून येतील, आपलें नाक कापून दुसऱ्याला अपकुशन होत आहे; त्यांचें नुकसान होत आहेना, होऊं द्या आपल्या नाकांचे महत्व कांहीं नाहीं? काय ही आपल्या लोकांची प्रवृत्ति हीन झालेली आहे? देशाचें पाऊल मागें पडण्यांत, देशाची पिछेहाट होण्यास, ही सर्व वरील कारणें आहेत. मध्यम वर्गाची स्थिती, खेडेगांवांतील लोकांची स्थिती, शहरांत

शहाण्या लोकांची स्थिती कशी झालेली आहे, तें वरील वर्णनावरून तुमच्या ध्यानांत येईलच. आतां श्रीमंती ज्याच्याजवळ आहे, पैसा मुबलक आहे, त्याचा पैसा, गरीबाला धर्म करण्याकडे जाणार नाहीं, तर नानाप्रकारच्या व्यसनांत, व चैनबाजींत जाइल, फार काय, अशा तऱ्हेचे लोक, स्वतःच्या चैनी चालविण्यांत कर्ज करून, आपल्या नोकरांचे पगारही वेळेवर देणार नाहींत, नोकरानें पाहिजे तर हवा खाऊन रहावें. तूं नाहीं तर तुझा + + दुसरा हें प्रत्येक मालकानें आपल्या स्थिती वरून अनुमान केलेलें असतें, तात्पर्य काय आज पैसा दुर्मिळ झालेला आहे, गरिबीचें प्रमाण दिवसें दिवस वाढत आहे व यामुळेंच, मानवी कृत्यें काय, देशाकरितां काय केलें पाहिजे, हा मंत्र कोणाला सुचला तरी रुचत नाहीं.

एक काळ असा होता कीं इंग्रजी शिक्षण घेतलेल्या इसमाला नोकऱ्या मिळत असत. यामुळें नोकरी करणें सुखाचें असें वाटून प्रत्येकजण तात्पुरतें लिहीणें वाचणें सोडून उच्च शिक्षणाच्या मागें लागला. पुढें वडिलाचा धंदा, मुलांना आवडेनासा झाला

वडिलांची लाइन व्यापाराची तर मुलगा वकिलीची परिक्षा देत आहे: यामुळें, पूर्वापार चालत आलेले धंदे मागें पडत चालले. कौटुंबिक व्यवस्था बिघडत चालली. मुलाला नोकरी, शहरामध्यें असल्यामुळें त्याला आपलें बिऱ्हाड स्वतंत्र करणें भाग पडलें. अशाप्रकारें, एकत्र कौटुंबिक पद्धति मोडत चालली. तारुण्य, पगार पुरेसा, शहरांतील नानाप्रकारच्या चैनीचीं साधनें, यांची चटक या सर्वांचा परिणाम शरीर प्रकृतीवर हळुहळू होऊं लागला तर नवल नाहीं.

अंगांत शहाणपणा असला तरी जगाचा अनुभव नसलेल्या स्त्रीपुरुषांवर या वयांत दाब नसल्यास त्यांचें संसाररूपी तारू कोठें झुकून जाईल याचा नेम नाहीं. स्वातंत्र्याची चटक लागली ह्मणजे वडील माणसांचा मान कसा ठेवावा, मुलें झाल्यास त्यांचें संगोपन कसें करावें आजारी झाल्यास मदत कोठून मिळवावी वगैरे गोष्टींची संकटसमयीं शहरवासी मंडळींना आठवण होते. त्यावेळीं वडील मंडळींची किंमत कळत असते. व्यवहार ह्मणजे काय याची जाणीव अपोआप अशा प्रसंगाला होत असते. आज जगांतील वातावरण इतकें दूषित झालेलें आहे, कीं, कोणाला कोणाची पर्वा नाहीं. आपण कायते शहाणें अशी घमेंड प्रत्येकाला झालेली असते. सद्दीचा जोर जोपर्यंत असतो तोंपर्यंत हातांतील कोणतेही काम फलद्रुप होत असतें.

आज धर्म ह्मणजे काय हें कोणाला माहिती नाहीं, जो तो पैशाच्या जोरावर, थोड्याशा इंग्रजी शिक्षणावर इतरांना, आपल्या नातलगांना तुच्छ लेखित असतो आपल्या वडिलोपार्जीत गोष्टी सुटल्या, व भलताच मार्ग परिस्थितीमुळें आक्रमण करावा लागल्यामुळें आमची प्रत्येक बाब सिद्धीस जात नाहीं. पाया ढांसळला तर वरील घर कितीसें शाबूत राहणार हा प्रश्न आहे धर्म हा आरोग्याच्या पायावर रचलेला आहे, समाज सुव्यवस्थित चालावा, म्हणून चातुर्वर्णाची उत्पत्ति आहे, हें ध्यानांत न घेतां, जाती सर्व मोडाघ्यात, आम्हीं सर्व एकच आहोंत अशा तऱ्हेचीं मतें प्रस्थापित करणारे संघ स्थापन होत आहेत. समता बोलणें सोपें परंतु जग हें समतेच्या तत्वांवर रचलेलें नाहीं हें कोणाच्या लक्षांत येत नाहीं समतेच्या तत्वावर जर जग असतें, तर प्रत्येक मनुष्यांमध्यें, फरक कां आढळतो याचा कोणी विचार केलेला आहे काय ? हाताचें काम पायानें होत नाहीं, अगर डोळ्यांचें काम कानानें होत नाहीं, हीं जर स्वतःच्या शरिरांतील इंद्रियांची कार्यें निराळी आपण प्रत्यक्ष पहातों तर, सर्वत्र समता असावी अशा प्रकारची वेडसर तत्वें समाजांमध्यें पसरविणें ह्मणजे समाज जास्त बिघडवणें होय. आपले राज्यकर्ते ह्मणतात, हिंदुमुसलमानांची एकी नाहीं, म्हणून, तुम्ही एकी करा म्हणजे स्वराज्य उद्यां तुह्मांला देतों. हें म्हणजे ज्याप्रमाणें हास्यास्पद आहे, त्याचप्रमाणें हा समता संघाचा उपक्रम आहे. जगांमध्यें स्थिती कशी चालली आहे, आपण, सर्वजण, एकाच माळिकेंत गुंतलेलें आहोंत याचा कोणी विचार करीत नाहींत. जातीभेद अस्पृश्यता, हीं स्वराज्याच्या आड येणारी तत्वें नाहींत, तर नुसती दिशाभूल करणारी ढोंगे आहेत. आजचें मरण उद्यांवर ढकलण्यासारखें हें आहे. तात्पर्य काय, अशा नानातऱ्हेच्या चळवळी, नानातऱ्हेचें पक्षभेद, यामुळें हिंदुस्थान सुखी होणार नाहीं. तर तो मार्ग निराळाच आहे. आपण स्वतःच्या पायांवर उभे राहिल्याशिवाय कोणचीही गोष्ट साध्य होणार नाहीं, व स्वराज्य मिळणार नाहीं. जोंपर्यंत प्रत्येक बाबींत आम्हांला दुसऱ्यांवर, परराष्ट्रांवर अवलंबून रहावें लागत आहे, तोंपर्यंत हिंदुस्थान देशाची गरिबी सारखी वाढत जाणार, रोगराई वाढणार, आयुष्य कमी होणार, व ह्या गोष्टी सूर्यप्रकाशा इतक्या स्पष्ट दिसत आहेत. आज जी स्थिती प्राप्त झालेली आहे, ती आपल्या दैवानें प्राप्त झाली आहे, ईश्वरानें इतरांच्या दुःखाची कल्पना येण्याकरितां आपल्याला बुद्धि दिलेली आहे, तेव्हां हेही दिवस दिवस जातील, अशी त्या दयाळू परमेश्वरांची प्रार्थना करून असलेल्या स्थितींत समाधान मानून

रहाणें, याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. राष्ट्राची भवितव्यता काय आहे व ती ठरवावयाची कशी हें एका डाक्टरांच्या पुराव्यावरून ध्यानांत येईल:—

राष्ट्राची शारिरीक संपत्ति सुधारण्याला खालील गोष्टी अमलांत आल्या पाहिजेत.

( १ ) साधी वागणूक व साधी रहाणी.

( २ ) शुद्ध हवा, शुद्धपाणी, व्यायाम, उघड्या हवेंत नियमानें फिरणें

( ३ ) मद्यपानांपासून अलिप्त रहाणें.

( ४ ) सशक्त, कुलीन स्त्रीपुरुषांचे विवाह वेळींच करणें

( ५ ) स्त्री पुरुषांची प्रकृति तपासून लग्न करणें.

( ६ ) डॉक्टरकडून शाळेंतील मुलाची तपासणी करून त्याप्रमाणें आईबापांना मदत करणें.

( ७ ) धंदेवाईक स्त्रियांना शहराच्या बाहेर काढणें.

( ८ ) आपल्या देशांतील, धान्यें, खाण्याचे पदार्थ, हे परदेशी न पाठवतां आपल्या लोकांना स्वस्त व भरपूर प्रमाणांत कसे मिळतील याची तजवीज अगाऊ करून नंतर इतर देशांकडे लक्ष देणें.

( ९ ) परस्परामध्यें प्रेमभाव वाढवावयाचा प्रयत्न करणें.

( १० ) मीठावरील कर अजिबात बंद करणें.


## उपदंश, व्रण यांवर

| | | | |
|---|---|---|---|
| **उपदंश कुठार:—** | ... | ... | बा. किं. १ रुपया |
| **महामंजिष्ठ काढा:—** | ... | ... | ,, ,, १। रुपया |
| **सिद्ध तेल:— ...** | ... | ... | ,, ,, ६ आणे |
| **व्रणांवर बुकी:—** | ... | ... | ,, ,, ४ आणे |
| **व्रणांवर मलम: ..** | ... | ... | ,, ,, ४ आणे |
| **आत्यादि तेल:—** | ... | ... | ,, ,, ४ आणे |

**द. कृ. सांडू ब्रदर्स,**

**आर्यौषधी कारखाना, चेंबूर, मुंबई नं. २**

# प्रकरण शेवटचें

## पतिपत्नींची वागणूक

मागील प्रकरणांत सांगितल्यावरून साधारणतः आपल्या देशांची स्थिती दिवसेंदिवस कशी होत चालली आहे, व त्यामुळें आपल्या शारिरीक व सांपत्तिक या दोन्हीं गोष्टींचा ऱ्हास कसा होत आहे हें सुज्ञांच्या ध्यानांत येईलच. ( Poverty ) ही आपल्या जन्मासच पुरवलेली आहे तेव्हां गरिबी पोटाशीं कवटाळून नुसतें भागणार नाहीं, तर यांतून मार्ग शोधून काढला पाहिजे. सर्व देशांचें लक्ष या मार्गाकडे लागलेलें आहे, व त्याप्रमाणें प्रयत्न चालले आहेत. हे मार्ग ह्मणजे सुप्रजा निर्माण करणें व संतति नियमन हे होत, सुप्रजा निर्माण करणें यामध्यें मुख्यतः तीन गोष्टीचा समावेश होतो.

( १ ) निरोगी स्त्री पुरुषांचे विवाह, चालू विवाह स्थिती बदलणें, व संततिनियमन करणें.

( २ ) आजारी, व्यंग असलेल्या, आनुवंशिक विकारग्रस्त अशा स्त्रीपुरुषांचे विवाह होण्यास बंदी करणें.

( ३ ) उपदंश, पूप्रमेह यासारख्या विकारांचा प्रतिबंध करणें.

सुप्रजा निर्माण करतांना आनुवंशिकपणाचें महत्व विशेष आहे. संतति चांगली होण्यास स्त्रीपुरुषांची प्रकृति चांगली सुदृढ पाहिजे; त्यांच्या वंशांमध्यें उपदंश, पूप्रमेह, फीट्स्सारखे विकार नसले पाहिजेत आपल्याला माहिती आहे कीं, शेतकरी जमिनीमध्यें बीं पेरतांना त्यांमधील चांगलें बी निवडून नंतर त्याची पेरणी करीत असतो ही माहिती आमच्या पूर्वजांना होती, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पाश्चात्यांनीं शोध लावल्यानंतर ते शोध, आपल्या शास्त्रांत आहेत किंवा नाहींत याची तुलना नंतर करावयाची, अशा प्रकारची आमची स्थिति झाल्यामुळें आमचें ते स्वत्व आह्मी गमावून बसलों आहोंत. चरक. सुश्रुत, वाग्भट, मनुस्मृति वगैरे आर्यग्रंथ पाहिलें असतां स्त्रीपुरुषांचे विवाह

करतांना त्यांची वय, प्रकृति, शील, शिक्षग इकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे हें खालील उताऱ्यावरून ध्यानांत येईल.

उन षोडश वर्षायाम् प्रातःपंचविंशतम् ।
य॒याघते पुमान्गर्भं कुक्षि स्थसःविपध्यते ॥

जातो वा न चिरंजीवे ज्जीवेद्ध दुर्बेलोंद्रियः तामा दत्यंत बालायां गर्भादानं न कारयेत.

पूर्ग षोडश वर्षा स्त्री पूर्ण विंशेन संगता ।
शुद्धे गर्भाशये मार्गे रक्ते शुक्रेऽनिलेहदि ॥

वर्यिवंतं सुतं सूतं सूते न तो न्यूना द्वयोः पुनः ।
रोगयत्या युरधन्यो वा गर्भो भवति नैववा ॥

( १ ) १६ वर्षांपेक्षां कमी वयाची स्त्री व २५ वर्षांपेक्षां कमी वयाचा पुरुष यांचा संबंध झाला असतां, गर्भाशयांतच बीज नष्ट होतें, व एखादेवेळीं गर्भ राहिल्यास, अल्पायु, शरिरानें व्यंग, अशा प्रकारची संतति होते, तेव्हां अशा-प्रकारचे संबंध होऊं देऊं नयेत. त्याच्या उलट जिला १६ वर्षे पूर्ण झाली आहेत, जिची प्रकृति निरोगी आहे अशा स्त्रीशीं संबंध असल्यास मुलगा निरोगी होतो, व याच्यापेक्षां वयानें कमी असल्यास वरील प्रमाणें संतति होते तात्पर्य काय आपल्या मुनिनां या नवीन प्रजा शास्त्राची माहिती होती. आज ती कांहीं आप-ल्याला नवीन ना ी. संतति चांगली होणें हें ज्याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या प्रकृतीवर अवलंबून आहे त्याचप्रमाणें आनुवंशिकपणा व बाह्य परिस्थिती(Environment) यांवर अवलंबून आहे. आनुवंशिकपणाचा संततीवर कसा परिणाम होतो याबद्दल पाश्चात्य शास्त्रवेत्यांचे प्रयत्न चालले आहेत, परंतु त्यांच्यामध्यें एक वाक्यता आढळून येत नाहीं, शिवाय त्यांनीं जी माहिती दिली आहे, ती सामान्य वाचकांना समजणें अत्यंत कठिण आहे. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं संततिमध्यें शेंकडा ५० गुण आईबापांचे उमटतात या गुणांची वांटणी खालीलप्रमाणें केलेली आहे. अर्धेगुण वडिलांचें, अर्धेगुण आईचे, एक अष्टमांश आजोबाच्या बाजूचे, आईकडील, कुटुं-बांचे, अशाप्रकारें गुण उतरत असतात, परंतु त्याबरोबरच संयोग होण्याच्यावेळीं, शारिरीक व मानसिक जे विचार असतात, त्यांचा संततीवर परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं.

आनुवंशिकपणाचा हा नियम पूर्णावस्थेंत आला नाहीं, हे खालील गोष्टी-वरून सिद्ध होतें. रोगोत्पादक जंतूचा प्रत्यक्ष ( Pathogenic-germs ) परिणाम वीर्यजंतूवर होतो असे दिसत नाहीं, कारण जर स्त्रीबीज अगर वीर्यजंतु हे दूषित असले तर त्यांची वाढ, पोषण, हालचाल वगैरे होणार नाहीं. उपदंश-विषांमुळें वारंवार गर्भपात, गर्भस्राव झाल्याचें पहाण्यांत येतें, हें त्या विषांमुळें नसून ज्या पासून पिंड तयार झालेला असतो त्याच्यामधील वरील शक्तिच नष्ट झालेली असते सांसर्गिक विकार हें बापाच्या द्वारें मुलांमध्यें उतरतात किंवा नाहीं, हा ही एक प्रश्नच आहे. पुष्कळ उदाहरणें अशीं आढळतात कीं उपदंशजन्य बाप असला तर त्याच्या मुलांवर त्याचा परिणाम होतो, व आईमध्यें एक प्रकारची प्रतिबंधक शक्ति उत्पन्न होते. स्त्री पुरुषांची प्रकृति असेल त्याप्रमाणें गर्भावर परिणाम होत असतो. पुरुष तरुण, आनंदी, मनमिळाउ प्रेमी असला तर होणारें मूल ही त्याप्रमाणेंच निपजतें. याच्या उलट उतारवयअसले अग्निमांद्य, मलेरीया व यकृताचा विकार असला तर मन साहजिकच चिंतातुर असतें, व अशा स्थितींत संयोग झाल्यास होणारीं मुलें, किरकिर करणारीं, रोगी अशीं निपजतात. तारुण्यांत मज्जातंतू चंचल असतात, तेव्हां अशा वयांत होणारी मुलें चंचल वृत्तीचीं होतात. संधीवात क्षय, ज्या वंशांत आहे त्यांच्या मुलांना तोच विकार होतो, परंतु शेवटीं जीवन शास्त्रवेत्यांनीं खालील शब्दांत त्याची बोळवण केलेली आहे. There is no conclusive evidence that the germ plasm is a carrier of infectious germ. आईच्या स्वभावाचा विशेष परिणाम गर्भावर होत असतो. ८-९ महिनेपर्यंतच गर्भाचें पोषण व वाढ आईच्या गर्भाशयांत होत असतें. आई ज्याप्रमाणें खाणें खाईल, त्याप्रमाणें रुधिराभि-सरणाच्या द्वारें गर्भाचें पोषण होत असतें, व मुलांचा स्वभाव राजस, तामस अगर सात्विक होणें अन्नांच्या गुणांवर अवलंबून असतें. याकरितांच गर्भवती स्त्रियांनीं कसें वागावें, त्यांच्याशीं वर्तन कसें ठेवावें ह्याची माहिती मागें एका प्रकरणांत दिलेली आहे, त्यावरून कळून येईल. पुरुषांच्यामध्यें असणारा वीर्यजंतू फक्त स्त्रीबीजाशीं संलग्न होण्याचें कार्य करित असतो, त्यावेळीं जी कांहीं परिस्थिती असते, जे विचार असतात, त्याचा फोटोग्राफ त्यांवर उतरत असतो.

वरील उताऱ्यावरून स्त्रीपुरुषांची प्रकृति विवाह करतांना निरोगी पाहिजे, हें आपोआप सिद्ध होतें. आपली विवाह पद्धति जर पाहिली, तर या सर्व गोष्टींचा

विचार करण्यांत यावा असेंच शास्त्रकारांचें मत आहे. व त्यासाठींच आपले वाडवडील नेहमीं कुल व शील यांकडे लक्ष देत असतात. परंतु अशा प्रकारचे विवाह होण्यास हुंड्याची चाल नष्ट झाली पाहिजे. विवाह करतांना वर वधू यांच्या आईबापांनीं, पैशामुळें लग्न मोडूं नये. हा हुंडाच आज समाज–सुधारक सुशिक्षीत स्त्रीपुरुषांना भिन्न जातीय विवाह करण्यास भाग पाडत आहे. .प्रेम-विवाह करावेत, व याच्या मुळांशीं उच्च उद्देश असला, व भावी संततिच्या दृष्टिनें योग्य असला तरी अशा प्रकारची पद्धत व सवलत देणें समाजाला बन्धनकारक झाल्याशिवाय रहाणार नाहीं. विवाहापूर्वी स्त्रीपुरुषांना एकदम एकत्र राहूं देणें ही पद्धत पाश्चात्य लोकांच्या दृष्टीनें कितीही चांगली असली तरी आपल्या देशांत ती हानिकारक आहे, प्रेम हें नेहमीं चंचल असतें व तें कायम टिकवण्यास सह-वासच लागतो. पूर्वकालीन आईबापांनीं मुली पहाण्याची व पसंत करण्याची रीत बदलून मुलानें आपण पाहण्याची जी सवलत मिळालेली आहे, तेवढी आजच्या कालाला पुरेशी आहे, संततिनियमन म्हणजे संयोगाच्या वेळी, गर्भाशयाच्या तोंडाला एक प्रकारचें आवरण घालून पुरुषाच्या वीर्यजंतूच्या प्रवेशाला अडथळा करणें असा त्यांचा अर्थ आहे व या संबंधी जे उपाय योजण्यांत आलेले आहेत त्यांचा परिणाम खालीलप्रमाणें होतो.

( १ ) वीर्यजंतूचा गर्भाशयांत प्रवेश होऊं न देणें.

( २ ) वीर्य इंद्रियस्थानीं रहून त्यांतील जंतूवा रसायनिक औषधानीं नाश करणें.

( ३ ) धातुवाहिनी ( Shermatic Cord ) व स्त्रियांमधील बीज वाहाक नलिका कापणें.

( ४ ) गर्भाशयाच्या तोंडाला पेसरी बसवणें. वरील प्रकार आपल्या स्त्रियांमध्यें कितपत उपयोगांत येईल हाही प्रश्न आहे. प्रत्येक कुटुंबांत २ किंवा ३ यांवर मुलें होऊं नयेत व जास्त मुलें झाल्यास मध्यमवर्गाला कठिण जातें, याकरितां संतती नियमनासारखें उपाय प्रत्येक तरुण दांपत्यानें अमलांत आणले पाहिजेत असें समाजस्वास्थ्यवादी म्हणतात आहेत. संतती होण्याकरितां पुष्कळ नवससायास करित असतात, परंतु मुलें होत नाहींत, व ज्यांना पोटभर खावयाला मिळत नाहीं, त्यांना संतति पुष्कळ होत असते, यासंबंधीचें विवरण २३ व्या

प्रकरणांत आलेलें आहे. गर्भधारणा केव्हां होते, यांची इंद्रियविज्ञानशास्त्र दृष्ट्या माहिती झालेली असली तरी या कामीं शेवटीं देवावरच हवाला टाकावा लागतो. स्त्रीसमागम संबंधीं पुष्कळ नियम शास्त्रकर्त्यांनीं सांगितलेले आहेत, व ते ज्या प्रमाणें अमलांत आणणें कठिण आहे, त्याचप्रमाणें हे नियम करणें ही कठिण आहे. इटाली, फ्रान्स वगैरे देशांत अशा प्रकारची पद्धति अमलांत आणल्या-पासून, प्रजा घटत चालली आहे, ह्मणून तिकडचे लोक प्रजा वाढवण्यांसंबंधीं प्रयत्न करीत आहेत; तात्पर्य काय आमच्या ज्या सुशिक्षीतांना पाश्चात्यांची चळवळ कोणच्याही प्रकारची असो, ती चळवळ डोक्यावर घेऊन उदोउदो करण्याची संवय लागली आहे, ती सोडून देऊन त्यांनीं सत्यांश काढून लोकांपुढें आपल्या देशाची परिस्थितीनुरूप मार्ग ठेवणें श्रेयस्कर आहे. जगाचें वातावरण हे येथें संपत आहे. लेखकानें आपल्या मतानें सामाजिक चालीचा उहापोह करून नवीन विचार करण्याची भूमिका तयार केलेली आहे, ती कितपत साध्य झाली आहे, हें वाचकांवरच सोपवणें इष्ट दिसतें. सध्यांच्या स्थितींचें बारकाईनें निरीक्षण करण्यास लेखकाच्या धंद्याची बरीच मदत त्याला झालेली आहे, त्यावरून आमच्या देशांतील स्त्रीपुरुष, बालकांची स्थिती खालावत कशी चालली आहे, व या प्रश्नांवर जे विचार सुचले ते वाचकांपुढें ठेवावे अशी इच्छा होऊन जगांच्या वातावरणांत स्वच्छंदानें विहार करण्याची बुद्धि झाली तिला अनुसरून मनांत जे जे विचार आले ते ते अत्यंत मोकळेपणानें वाचकांपुढें मांडले आहेत; यांपैकीं सर्वच विचार सर्व लोकांच्या पसंतीस पडतील असें नाहीं व लेखक तशी अपेक्षा करीत नाहीं. पुस्तक छापतांना घाई झाल्यामुळें, कांहीं वाक्यदोष, शब्द दोष सुधारून घेण्यांचे व पुष्कळ गोष्टींचा विचार करण्यांचे राहून गेलेलें आहे, तरी हंसक्षीर न्यायानें जें उपयुक्त वाटेल तें ध्यावें, व अशा रितीनें स्वतःचा, समाजाचा व देशाचा फायदा करून द्यावा हाच उद्दिष्ट हेतु आरंभापासून मनांत वाळगून हीं लेखमाला गुंफण्यांत आलेली आहे. लेखकाचा हा उद्देश अंशतः जरी साध्य झाला तरी तो स्वतःस धन्य मानील.

दा. क्र. ४३१८

प्रकाशकः—वासुदेव कृष्ण सांडू, मालकः-दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स
ठाकुरद्वार, मुंबई, नं. ४.

मुद्रकः—अ. ज. आवडे, न्यू मनोहर प्रिंटिंग प्रेस, गिरगांव बॅक रोड, मुंबई नं. ४.

REFBK-0004317